
भ्रम आणि निरास


डॉ. नरेंद्र दाभोळकर

म. अं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं क्र. ३१९९



REFBK-0024717


संदर्भ विविध
३११९
२४७१५
२४१७।८५



26 FEB 1989

भ्रम आणि निरास

डॉ. नरेन्द्र दाभोळकर


REFBK-0024717

राजहंस प्रकाशन / पुणे

प्रकाशक
दिलीप माजगावकर
राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पार
पुणे – ४११ ०३०



© शैला दाभोळकर


मुखपृष्ठ
सुभाष अवचट

आवृत्ती पहिली : ऑक्टोबर १९८५
आवृत्ती दुसरी : डिसेंबर १९८६

मुद्रक
संगम प्रेस प्रा. लि.,
१७ ब, कोथरूड,
पुणे ४११ ०२९.

किंमत तीस रुपये

भ्रम आणि निरास



...ती. माई व ती. दादा
ज्यांच्यामुळे जीवनाला दिशा मिळाली

...शैला
जिच्यामुळे चळवळीत पूर्ण वेळ
वाहून घेणे शक्य झाले

मनोगत

अंधश्रद्धा विरोधी चळवळीतील मी एक कार्यकर्ता आहे. या विश्वातील घडामोडी कुठल्यातरी दैवी शक्तीच्या सामर्थ्याने, आशीर्वादाने घडतात यावर माझा विश्वास नाही. लोकांनी स्वतःला पडणाऱ्या सर्व प्रश्नांचा विचार स्वतःच्या बुद्धीने करावा. विवेकाच्या, चिकित्सक बुद्धीच्या, आधारे त्याची सोडवणूक करावी असे मला वाटते.

ही गोष्ट सोपी नाही याची मला जाणीव आहे. माझ्या जवळच्या व्यक्तींच्या बाबतही ही गोष्ट मी घडवून आणू शकलेलो नाही. ती संपूर्ण समाजात या पुस्तकाने घडून येईल असा माझा भ्रम नाही.

मग हे पुस्तक मी का लिहिले आहे ?

वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या आधारे अंधश्रद्धेच्या विरोधात वाटचाल चालू रहावी, आपापल्या कुवतीनुसार मार्गक्रमण करावे हेही मला आश्वासक वाटते. यासाठीच हा प्रयत्न आहे.

अंधश्रद्धेपासून विज्ञानदृष्टीकडे घेऊन जाणारी ही दिशा कोणती, हे समजावून घेण्यासाठी प्रथम अंधश्रद्धेचे मानसशास्त्र समजावून घ्यावयास हवे.

बुद्धी व भावना या दोन्हीच्या साह्याने माणसाचे जीवन घडते. व्यक्तिमत्त्वात त्याचे संतुलन असावे लागते. हे संतुलन असणारा माणूसही, पूर्ण बुद्धिनिष्ठ पद्धतीनेच विचार करतो असे नाही. तोही छोट्यामोठ्या अनेक समजुती स्वतःशी बाळगून असतो. त्या अवैज्ञानिकच असतात; परंतु केवळ तेवढ्यामुळे त्याचा तोल गेला असे होत नाही. मात्र बुद्धी व भावना याचे हे संतुलन एका मर्यादेपलीकडे बिघडले की, बुद्धी गहाण पडते. माणूस भावनेची शिकार बनतो.

उदाहरण घेता येईल. रात्रीची वेळ आहे. तातडीचा निरोप देण्यासाठी जावयाचे आहे. रस्ता स्मशानातून जातो. स्मशानाजवळ घाबरून दातखीळ बसून बेशुद्ध पडणे वा अत्यावश्यक असलेला निरोप देण्याचे कामच सकाळपर्यंत लांबणीवर टाकणे हे दोन्ही भीतीच्या भावनेचे शिकार बनल्याचे लक्षण आहे. मग व्यक्ती मार्ग शोधते. रामरक्षा म्हणत स्मशान पार करते. रामाचे नाव घेतल्याने भूत पळून जाते व संकटातून रक्षण होते, या श्रद्धेचा तो वापर करतो. ही उघडपणे अंधश्रद्धाच आहे. बुद्धीशी विसंगत आहे. परंतु एका मर्यादित काळासाठी या अंधश्रद्धेचा वापर केला जातो व कार्यभाग पार पडला या अर्थाने ती उपयुक्त ठरते. समजा, याही पुढे जाऊन रामरक्षेचा वापर, ही व्यक्ती हरघडी करू लागली. प्रत्येक वेळेस रस्ता ओलांडताना, बसमध्ये चढताना, साहेबांनी केबिनमध्ये बोलविल्यावर जर तिने रामरक्षेचे पठण चालू केले, तर मात्र ती व्यक्ती रामरक्षाही संकटातून तारून नेते या अंधश्रद्धेची शिकार बनली असे म्हणावे लागेल.

रस्त्यावर खाचखळगे असतात. त्यावरून वाहने धक्के खात जातात. ज्यांची बांधणी म्हणजे मूळ सांगाडा व त्याची जुळणी या दोन्ही गोष्टी मजबूत असतात, ती वहाने दीर्घकाळ टिकतात.तसेच जीवनातील रस्त्याच्या खाचखळग्यांवरून जातानाही ज्या व्यक्तिमत्त्वात आनुवंशिक आणि वातावरणातील जडणघडणीमुळे कणखरपणा आलेला असतो,ती टिकतात. पण वाहनाची बांधणी जुळणी मजबूत असूनही आपण त्यांना शॉक ॲबसॉर्बर बसवतो. धक्क्याची तीव्रता त्यामुळे बरीच कमी होते. बहुसंख्य व्यक्तीही स्वतःला असेच शॉक ॲबसॉर्बर बसवतात. हे शॉक ॲबसॉर्बर म्हणजेच अंधश्रद्धा. जीवनमार्गावरच्या आशा, निराशा, अडचणी, अपेक्षाभंग या धक्क्यांतून त्यामुळे व्यक्तीला स्वतःचे संरक्षण करता येते.

आजच्या जीवनातले अनेक धक्के हे सामाजिक परिस्थितीतून आलेले असतात. नोकरी, जोडीदार, घर, शिक्षण, औषधोपचार या सर्वच बाबतीत बहुसंख्यांच्या पदरी तीव्र निराशा येते. यातून सावरणे व आयुष्य जगणे तर अटळ असते. मग लोक कोणी सिद्धिविनायक, गुरुचरित्राची पोथी, भविष्य, मंत्रतंत्र, बाबा, गुरू, पुनर्जन्म यांचा शॉक ॲबसॉर्बरसारखा उपयोग करतात. खरेतर त्यांच्या दुःखाचे कारण समाजव्यवस्थेत असते. त्यांच्या सामाजिक दुःखाची निराकरण करणारी व्यवस्था निर्माण होऊ शकते. पण त्यासाठीच्या झगड्याचा मार्ग खडतर व लांबचा असतो. यशस्वी कधी होईल याची खात्री नसते. लोकांना त्यामध्ये स्वतः मोडून पडण्याची भीती वाटते. त्याऐवजी

मनोगत

अंधश्रद्धा विरोधी चळवळीतील मी एक कार्यकर्ता आहे. या विश्वातील घडामोडी कुठल्यातरी दैवी शक्तीच्या सामर्थ्याने, आशीर्वादाने घडतात यावर माझा विश्वास नाही. लोकांनी स्वतःला पडणाऱ्या सर्व प्रश्नांचा विचार स्वतःच्या बुद्धीने करावा. विवेकाच्या, चिकित्सक बुद्धीच्या, आधारे त्याची सोडवणूक करावी असे मला वाटते.

ही गोष्ट सोपी नाही याची मला जाणीव आहे. माझ्या जवळच्या व्यक्तींच्या बाबतही ही गोष्ट मी घडवून आणू शकलेलो नाही. ती संपूर्ण समाजात या पुस्तकाने घडून येईल असा माझा भ्रम नाही.

मग हे पुस्तक मी का लिहिले आहे ?

वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या आधारे अंधश्रद्धेच्या विरोधात वाटचाल चालू रहावी, आपापल्या कुवतीनुसार मार्गक्रमण करावे हेही मला आश्वासक वाटते. यासाठीच हा प्रयत्न आहे.

अंधश्रद्धेपासून विज्ञानदृष्टीकडे घेऊन जाणारी ही दिशा कोणती, हे समजावून घेण्यासाठी प्रथम अंधश्रद्धेचे मानसशास्त्र समजावून घ्यावयास हवे.

बुद्धी व भावना या दोन्हीच्या साह्याने माणसाचे जीवन घडते. व्यक्तिमत्त्वात त्याचे संतुलन असावे लागते. हे संतुलन असणारा माणूसही, पूर्ण बुद्धिनिष्ठ पद्धतीनेच विचार करतो असे नाही. तोही छोट्यामोठ्या अनेक समजुती स्वतःशी बाळगून असतो. त्या अवैज्ञानिकच असतात; परंतु केवळ तेवढ्यामुळे त्याचा तोल गेला असे होत नाही. मात्र बुद्धी व भावना याचे हे संतुलन एका मर्यादेपलीकडे बिघडले की, बुद्धी गहाण पडते. माणूस भावनेची शिकार बनतो.

उदाहरण घेता येईल. रात्रीची वेळ आहे. तातडीचा निरोप देण्यासाठी जावयाचे आहे. रस्ता स्मशानातून जातो. स्मशानाजवळ घाबरून दातखीळ बसून बेशुद्ध पडणे वा अत्यावश्यक असलेला निरोप देण्याचे कामच सकाळपर्यंत लांबणीवर टाकणे हे दोन्ही भीतीच्या भावनेचे शिकार बनल्याचे लक्षण आहे. मग व्यक्ती मार्ग शोधते. रामरक्षा म्हणत स्मशान पार करते. रामाचे नाव घेतल्याने भूत पळून जाते व संकटातून रक्षण होते, या श्रद्धेचा तो वापर करतो. ही उघडपणे अंधश्रद्धाच आहे. बुद्धीशी विसंगत आहे. परंतु एका मर्यादित काळासाठी या अंधश्रद्धेचा वापर केला जातो व कार्यभाग पार पडला या अर्थाने ती उपयुक्त ठरते. समजा, याही पुढे जाऊन रामरक्षेचा वापर, ही व्यक्ती हरघडी करू लागली. प्रत्येक वेळेस रस्ता ओलांडताना, बसमध्ये चढताना, साहेबांनी केबिनमध्ये बोलविल्यावर जर तिने रामरक्षेचे पठण चालू केले, तर मात्र ती व्यक्ती रामरक्षाही संकटातून तारून नेते या अंधश्रद्धेची शिकार बनली असे म्हणावे लागेल.

रस्त्यावर खाचखळगे असतात. त्यावरून वाहने धक्के खात जातात. ज्यांची बांधणी म्हणजे मूळ सांगाडा व त्याची जुळणी या दोन्ही गोष्टी मजबूत असतात, ती वाहने दीर्घकाळ टिकतात. तसेच जीवनातील रस्त्याच्या खाचखळग्यांवरून जातानाही ज्या व्यक्तिमत्त्वात आनुवंशिक आणि वातावरणातील जडणघडणीमुळे कणखरपणा आलेला असतो, ती टिकतात. पण वाहनाची बांधणी जुळणी मजबूत असूनही आपण त्यांना शॉक ॲबसॉर्बर बसवतो. धक्क्याची तीव्रता त्यामुळे बरीच कमी होते. बहुसंख्य व्यक्तीही स्वतःला असेच शॉक ॲबसॉर्बर बसवतात. हे शॉक ॲबसॉर्बर म्हणजेच अंधश्रद्धा. जीवनमार्गावरच्या आशा, निराशा, अडचणी, अपेक्षाभंग या धक्क्यांतून त्यामुळे व्यक्तीला स्वतःचे संरक्षण करता येते.

आजच्या जीवनातले अनेक धक्के हे सामाजिक परिस्थितीतून आलेले असतात. नोकरी, जोडीदार, घर, शिक्षण, औषधोपचार या सर्वच बाबतीत बहुसंख्यांच्या पदरी तीव्र निराशा येते. यातून सावरणे व आयुष्य जगणे तर अटळ असते. मग लोक कोणी सिद्धिविनायक, गुरुचरित्राची पोथी, भविष्य, मंत्रतंत्र, बाबा, गुरू, पुनर्जन्म यांचा शॉक ॲबसॉर्बरसारखा उपयोग करतात. खरेतर त्यांच्या दुःखाचे कारण समाजव्यवस्थेत असते. त्यांच्या सामाजिक दुःखाची निराकरण करणारी व्यवस्था निर्माण होऊ शकते. पण त्यासाठीच्या झगड्याचा मार्ग खडतर व लांबचा असतो. यशस्वी कधी होईल याची खात्री नसते. लोकांना त्यामध्ये स्वतः मोडून पडण्याची भीती वाटते. त्याऐवजी

अंधश्रद्धेचा शॉक ॲबसॉर्बर लावून जगणे सोईचे वाटते. अंधश्रद्ध माणसाला बदलताना म्हणूनच,उपहासापेक्षा आत्मीयतेची आणि क्रोधापेक्षा करुणेची गरज असते. व्यक्तीची ही अगतिकता केवळ शिक्षणाने नाहीशी होत नाही. तो व्यक्तीच्या विचार करण्याच्या पद्धतीचा व जडणघडणीचा भाग आहे. त्यामुळे सुशिक्षित मंडळीही अंधश्रद्धेचे बळी झालेले आढळतात.

समाजव्यवस्थेमुळे भोगावयास लागणारी दुःखे जसजशी कमी होतील, त्या प्रमाणात अंधश्रद्धा कमी होत जाईल हे खरे, पण त्याचे निर्मूलन होईल काय ? मानवी जीवनातले अपेक्षाभंगाचे क्षेत्र इतक्या विविध कारणांनी व्यापलेले आहेत की, त्यासाठी, अंधश्रद्धेचा शॉक ॲबसॉर्बर वापरण्याची गरज माणसाला वाटतच राहणार. प्रत्येक व्यक्ती, विवेकनिष्ठ पद्धतीत, सर्व वास्तव समजावून घेण्याएवढी मानसिकदृष्ट्या प्रगत झाली, आणि व्यवहारात तसे आचरण करू लागली, तरच अंधश्रद्धा मुळातून खणून काढता येईल. परंतु ही फार दूरची, असंभाव्य वाटावी अशी शक्यता झाली.

सामाजिक परिस्थितीची आणि मानवी मनाची ही परिस्थिती लक्षात घेऊन अंधश्रद्धा कमी करण्याचे प्रयत्न करावयास हवेत. या मार्गावरचे साथीदार बरेच पुढे मागे असणार. त्यांनी एकमेकांचे उणेदुणे काढणे व अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामात कोण अस्सल व कोण कम अस्सल याची उठाठेव करणे टाळावयास हवे. त्यापेक्षा विविध पातळीवर, या प्रयत्नात जास्तीत जास्त लोक कसे सहभागी होतील हे पहावयास हवे. श्याम मानवांनी पूर्ण वेळ देऊन पुढाकार घेतल्यानंतर अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कामाने नागपूर व आसपासच्या भागात चांगले मूळ गेल्या तीन वर्षांत धरले आहे. त्याचे उदाहरण याबाबत बघण्यासारखे आहे. नागपुरात आधी 'मानवीय नास्तिक मंच' या नावाने काम चालू होते. ते जोर धरत नव्हते. कामाचा उठाव करण्याचा प्रश्न निर्माण झाला. त्या वेळी नास्तिकता या शब्दानेच माणसे जवळ न येता दूर जातात, तो शब्द गाळावा असा काहींनी आग्रह धरला. आग्रह धरणारे सर्व कार्यकर्ते स्वतः नास्तिक होते.यामुळे 'अंधश्रद्धा निर्मूलन समिती' हे नाव घेतले गेले. तीन वर्षांत वातावरण पुरेसे ढवळून निघाले. बाबा, बुवा, भुतेखेते, भानामती या अंधश्रद्धेच्या उघड प्रकारापलीकडे देव या संकल्पनेची चिकित्सा लोकांच्यासमोर आता करण्यास हरकत नाही, असे कार्यकर्त्यांना वाटू लागले आहे. हा तरतम भाव अर्थातच पूर्णतः स्थलकाल सापेक्ष व कार्यकर्त्यांचा परिस्थितीचा अंदाज,यावर अवलंबून आहे.

याबाबतची माझ्या मनातील एक सर्वसाधारण रूपरेखा पुढील प्रकारची

आहे. (अर्थातच प्रत्येक जण आपापल्या मतानुसार यात काही वेगळी मांडणी करू शकेल.)

ज्या अंधश्रद्धा उघडपणे अमानुष अथवा अघोरी असतात, त्यांच्याविरुद्धच्या जनजागरणास अनेकांचा चटकन पाठिंबा मिळतो. दोन वर्षांपूर्वी चंद्रपूर, औरंगाबाद जिल्ह्यांतील विहिरीस पाणी लागावे म्हणून झालेले नरबळी, स्वतःवरच्या संशयाचे निराकरण करण्यासाठी बाईला उकळत्या तेलाच्या कढईत हात घालून नाणे वर काढावयास लावण्याचे अधूनमधून कानावर येणारे प्रकार, जट आली वा नवस बोलली या अंधश्रद्धेपायी मुलीला देवदासी बनविणे, अनेक जत्रांतील कमी जास्त अघोरी प्रकार, मग ते काळूबाईच्या जत्रेत हजारो बकरी कापून त्याचा होणारा चिखल असो, वा उंच काठीला माणसाला टांगून बैल गाड्यावरून पळवत नेणारे बगाड असो. या सर्वांचे स्वरूप फार उघडपणे शोषणाचे व आविवेकी असते. या उदाहरणांवरून अंधश्रद्धेवरील संवाद चालू केला तर माणसाच्या मनाला अंधश्रद्धाची चिकित्सा करण्याची गरज लवकर पटते असा चळवळीतील अनुभव आहे.

अनेक अंधश्रद्धा अज्ञान, अडाणीपणा, शकुन-अपशकुनांच्या कल्पनांचे खेळ यातून आलेल्या असतात. जखम झालेल्याने भात खाल्ला तर जखमेत पू होतो यासारख्या आरोग्यविषयक, अनेक चुकीच्या समजुती; मूकबधिर, पोलिओग्रस्त मुलांच्यावरच्या अवैज्ञानिक अंधश्रद्ध उपचार पद्धती, याबाबत लोकांना नीटपणे डोळस करता येते. अंधश्रद्धेतून होणारी वंचना थांबविता येते. पिसाळलेला कुत्रा चावल्यानंतर अज्ञानापोटी वा चौदा इंजेक्शने टाळण्याच्या भीतीपोटी, माणसे गोळ्या घेतात आणि मृत्यूला आमंत्रण देतात. साप चावल्यानंतर अनेकदा व्यक्ती हॉस्पिटलआधी मांत्रिकाकडे वा देवळात नेली जाते. चावलेला साप विषारी असेल तर नंतर डॉक्टरकडे त्याला आणीपर्यंत वेळ टळून गेलेली असते. या स्वरूपाच्या अंधश्रद्धा मोडून काढण्यास लोकांचा अनुकूल प्रतिसाद असतो. ही आघाडी चळवळीला अतिशय अनुकूल आहे.

पाल चुकचुकणे, दिवा विझणे, मांजर आडवे जाणे अशा शकुन-अपशकुन ठरविणाऱ्या एक ना दोन शेकडो समजुती महाराष्ट्राच्या, भारताच्या विविध भागांत विविध प्रकारच्या आढळतात. याबाबतची टीका, उपहास, चिकित्सा माणसांना अंतर्मुख करते, अंधश्रद्धेपासून दूर नेते असा अनुभव आहे.

बुवाबाजी, भुताखेताने झपाटणे वा देव अंगात येणे याच्याशी लढाईची पाळी आली की मामला तेवढा सरळ राहत नाही. बुवांचे तथाकथित चमत्कार

हे हातचलाखीचे वा करामतीचे कमी जास्त प्रकार आहेत, हे लोकांना चटकन पटते. अगदी सत्यसाईबाबांच्याबाबत देखील "सोन्याचांदीच्या वस्तू हवेतून काढून भक्ताला देणारे बाबा या गरीब देशात पुन्हा सुवर्णयुग का आणत नाहीत ? कुठल्याच कस्टमला यांची चौकशी करावीशी का वाटत नाही ?" या उद्गारावर श्रोतृवर्ग दाद देतो असा माझा अनुभव आहे. परंतु कोणताच चमत्कार न करणारेही अनेक बाबा, स्वामी, सिद्धपुरुष, गुरू, महाराज असतात. लोकांचा त्यांच्यावर प्रचंड विश्वास असतो. कोणत्या मानसिकतेतून या बाबांची निर्मिती होते याची सर्वसाधारण चिकित्सा करण्यामुळे जनजागृती होते हे खरे आहे. परंतु त्या पलीकडे जाऊन या बाबांचा, देवर्षींचा मुखभंग करणे अवघड असते. अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीचा वैचारिक पाया सर्वसामान्यात विस्तारित होत जाणे हेच त्याच्यावरचे खरे उत्तर आहे.

भुताने झपाटणे वा देव अंगात येणे या गोष्टी थोतांड आहेत, याची स्पष्ट जाणीव चळवळीतील कार्यकर्त्यांनी, लोकांना सतत देत रहावयास हवी. अशा लोकांना योग्य मानसोपचार मिळेल. समाज याबाबत भाविक, डोळस व सहानुभूतीपूर्ण बनेल याचेही शक्य ते सर्व प्रयत्न करावयास हवेत. भूत दाखविण्याचा दावा करणारे, देवी अंगात येण्याचा बहाणा करणारे, यांच्या जाहीर मुलाखती घेऊन, त्यांना आव्हान देऊन, त्यांचा फोलपणा जगजाहीरही करावयास हवा. परंतु तरीही दुर्बल मानसिक धारणा व त्रासदायक कौटुंबिक सामाजिक परिस्थिती यातूनच हे प्रकार व्यक्तीला सोसावे लागतात याचे भान व अवधान ठेवूनच ही आघाडी लढवावी लागते.

व्रतवैकल्ये, उपासतापास, नवससायास, उत्सव हे आपल्याकडील व्यक्ती व समाजजीवनाचाच एक भाग असतात. यातला बहुसंख्य भाग धर्मावर व परंपरांवर आधारित असतो. यावर टीका करावी की नाही ? कोणत्या प्रकारे ? हा एक नेहमी चर्चेचा विषय असतो. यातील प्रत्यक्ष शोषणावर व उघड विसंगतीवर आधारलेली जी कर्मकांडे असतात. उदाहरणार्थ, यज्ञात मोठ्या प्रमाणात तेल, तूप धान्य जाळणे याला उघड व ठाम विरोध करावयास हवा. वटपौर्णिमेला वडाच्या झाडाला प्रदक्षिणा घालणे व दोऱ्या बांधणे यासारख्या अनेक प्रकारांची खिल्ली उडवावयास हवी. जे निरुपद्रवी विधी असतात उदाहरणार्थ, भाऊबीज, संक्रात त्यांचा आधार धार्मिकच असतो. परंतु जास्त भाग उत्सव, सण साजरा करण्याचा आणि भावनांचा असतो. या अर्थाने ते निरुपद्रवी असतात. माणसाचे जीवन वैविध्यपूर्ण, उबदार, रंगतदार, बनवण्यासाठी अशा कर्मकांडांची

गरज लागते, असे अनेकांना वाटते. त्याची चिकित्सा केल्यास, वाढदिवसाला मेणबत्या पेटविणे, केक कापणे यात असे कर्मकांडच नसते का? असा प्रतिप्रश्न विचारला जातो. समाजाला अशा कार्यक्रमांची गरज राहणार हे खरेच; परंतु धर्म व परंपरा यांचा आधार– मग तो हास्यास्पद व निरुपद्रवी असला तरी बहुसंख्येला अंधश्रद्धेचा धागाच बळकट करत असतो, या गोष्टींना फाटा देऊन पर्यायी कार्यक्रम देणे हेच खरे यावरचे उत्तर आहे.

अमानुष, अघोरी, अज्ञानमूलक अंधश्रद्धा, बुवाबाजी, दैवीपुरुष, भुतेखेते, देव अंगात येणे, व्रते, नवस, उपास या सगळ्याचा प्रतिवाद करत केलेल्या वाटचालीत एका मर्यादेनंतर आपण एका अटळ टप्प्यावर येतो. परमेश्वर वा तत्सम कोणी या विश्वाचा नियंता आहे, त्याची लीला अगाध आहे, मानवाच्या आकलनापलीकडची आहे, हे आपल्या बुद्धीला समजणाऱ्या व न समजणाऱ्या असंख्य गोष्टी या त्याचेच आविष्कार आहेत, हे गृहीतकृत्यच ठामपणे नाकारावे लागते. हे घडणे इष्ट आहे असे मी मानतो. परंतु अंधश्रद्धा निर्मूलनाच्या वर वर्णन केलेल्या वाटचालीत सहभागी होणाऱ्या बहुसंख्यांचा देखील याला विरोध असतो.

कार्यकर्त्याने हे गृहीतकृत्य नाकारूनच मग अंधश्रद्धा निर्मूलनाच्या चळवळीत सहभागी व्हावे असे मानणे मला योग्य वाटत नाही. अनेक कार्यकर्ते वर उल्लेखलेल्या वाटचालीत क्रमाक्रमाने एकएक अंधश्रद्धा सोडताना व नवा विचार स्वीकारताना मला आढळतात. चळवळीच्या संबंधात येणारे अनेक लोक देवाचे अस्तित्व मानूनही त्या आधीचा टप्प्यावर प्रभावी साथ देतात, असा माझा अनुभव आहे.

ईश्वराएवढाच विज्ञाननिष्ठा व अध्यात्मविषयक दृष्टिकोन हा एक महत्त्वाचा वादविषय बनलेला आहे.

विज्ञानावरील निष्ठा म्हणजे विज्ञाननिष्ठा. विज्ञानाच्या उदयालाच धर्मसंस्थापकांचा आणि धर्मोपदेशकांचा विरोध होता. धर्मश्रद्धा आणि विज्ञाननिष्ठा या परस्परविरोधी प्रवृत्ती आहेत अशी त्यांची धारणा होती. सृष्टीचे रहस्य हे धर्मग्रंथांनी स्पष्ट केले आहे ते सर्वांनी स्वीकारावयास हवे, असा त्यांचा आग्रह होता. यापेक्षा वेगळ्या पद्धतीने सृष्टीच्या व्यवहाराची उकल करणे हे श्रद्धाहीनतेचे लक्षण होते. विज्ञानाने, बुद्धितत्त्वाच्या साह्याने या रहस्याचा भेद करण्यास प्रारंभ केला. निरीक्षण, प्रयोग, प्रमाण यांवर ही पद्धती अवलंबलेली होती. या पद्धतीत एक काटेकोर तर्कसंगती असते आणि त्यातून सार्वकालिक, वैश्विक आणि निरपवाद सिद्धान्त निघतात. प्रयोगाने सिद्ध होऊ शकेल तेच सत्य ही भूमिका विज्ञाननिष्ठ

जीवनदृष्टीच्या केंद्रस्थानी असते. सत्य नुसते प्रयोगसिद्ध नव्हे तर सामुदायिक व वस्तुनिष्ठ असते अशी धारणा असते. घटनेतील कार्यकारण भाव आणि सत्य शोधणे हे करताना भावना, विचार मध्ये येऊ न देता तर्काच्या, बुद्धीच्या आधारे सतत कार्यशील राहणे म्हणजे विज्ञाननिष्ठा. याच दृष्टीने जीवनाकडे बघणे, जीवनाची आखणी करणे, जीवनातील प्रश्न सोडविण्यासाठी या दृष्टीचा अंगीकार करणे, याच दृष्टीने जीवनाचे भले होईल हा विश्वास बाळगणे म्हणजे विज्ञान-निष्ठा. या पद्धतीनेच सत्य गवसेल हा विश्वास, ते शोधण्याची तीव्र इच्छा आणि याच मार्गाने प्रश्नावर तोडगा निघून मनुष्य अधिक सुखी होईल हा विश्वास या जीवनरहटीचा गाभा असतो.

याउलट, अध्यात्म म्हणजे नेहमीच्या वास्तवापेक्षा वेगळ्या वास्तवावरचा विश्वास. आपले अस्तित्व हे मनुष्य, समाज व जग याच्या अतीत आहे. ते माणसाची बुद्धी, इंद्रिये आणि अनुभव याच्या पलीकडे आहे. याला तत्त्व म्हणा, चैतन्य म्हणा, आत्मा, परमात्मा, ब्रह्म म्हणा. परंतु हे जे आहे त्याच्याशी माझे आंतरिक रक्ताचे नाते आहे अशी श्रद्धाशील भावना अध्यात्मवादी विचार करणाऱ्याची असते. आपण कोण ? का ? कशासाठी ? हे जाणण्याची तीव्र इच्छा निर्माण होणे आणि आत्मविकासाची तळमळ लागणे, आत्मिक जीवन खरे आहे आणि लौकिक जीवन क्षणभंगुर आहे असे मानणे म्हणजे आध्यात्मिक भावना. आध्यात्मिक ओढीत परमार्थाची ओढ येते. आत्मा आहे काय ? तो अविनाशी आहे काय ? आत्मा परमात्मा यांचा संबंध काय ? त्यांची एकरूपता कशी होते ? इत्यादी विषयक प्रश्न आध्यात्मिक माणसांना पडतात, तशा स्वरूपाचे ज्ञान हे संपूर्णपणे व्यक्तिगत व अनुभवगम्य आहे, म्हणूनच पूर्णतः व्यक्तिनिष्ठ आहे. ही अनुभूती निरीक्षण, प्रयोग, प्रमाण, तर्क याने प्रतिपादता येत नाही म्हणून त्यांना विज्ञाननिष्ठेचे निकष कसे लावणार असे या बाजूच्या मंडळीचे म्हणणे असते. व्यक्तिगत जीवनात पावित्र्य व शुचिता यावी यासाठी धडपडणे आणि परमेश्वराची भक्ती वा अन्य साधना करणे हा अध्यात्मनिष्ठेचा आणखी एक प्रकार आहे.

अध्यात्मनिष्ठा व आजच्या प्रस्थापित वर्गांपैकी कोणत्यातरी एका धर्मावरील व देवावरील श्रद्धा व निष्ठा हे समीकरण एखादा अपवाद वगळता सर्वांच्या मनात पक्के असते. विशेषतः हिंदू माणसाची ख्याती जगभर त्याच्या अध्यात्मिकतेबद्दल झाली असल्यामुळे त्याला तर यात गौरव वाटतो. ही तथाकथित अध्यात्मनिष्ठा व्यवहारात अंधश्रद्धांनाच खतपाणी घालते. आध्यात्मिक दृष्टीने मानवाचे कल्याण

होईल ही श्रद्धाळू जनांची धारणा असते, पण व्यवहारात तसे दिसत नाही. उलट अध्यात्मवादाने अन्याय व विषमतेचे पोषण केलेले बहुसंख्य वेळा दिसते. अध्यात्मिकतेचे पर्यवसन बहुतेक वेळा अंधश्रद्धेनेच घडते असे का होते? ही सृष्टी नियमांनी बद्ध आहे असे विज्ञानवादी मानतो. परंतु सृष्टी नियमांच्याद्वारा आपल्याला ईश्वराच्या अंतिमसत्तेचे स्वरूप दिसते असे अध्यात्मवादी मानतो. एवढे मानल्यावर एखादा अपवाद वगळता तो शांत बसत नाही. तर आपल्यासाठी, आपल्या अपेक्षेसाठी, समाजासाठी, त्यांच्या सुखदुःखासाठी, भल्याबुऱ्यासाठी ईश्वराने स्वतःच्या सृष्टीनियमरूपी आविष्कारात बदल करावे, असे तो मानतो. अशी अपेक्षा बाळगणे हीच अंधश्रद्धा आहे. कर्मकांड, ध्यानधारणा, होमहवन, पूजा-अर्चा, मंत्रतंत्र हे सर्व त्याचे दृश्य स्वरूप आहे. यातूनच अध्यात्माच्या नावाखाली उघड उघड अंधश्रद्धेचा प्रचार चालू होतो. याच्याशी दोन हात करण्याची तयारी ठेवावीच लागते.


× × ×

पुस्तकाचे दोन भाग आहेत. पहिल्या भागात संबंधित विषयाचे विवेचन आहे. दुसऱ्या भागात अंधश्रद्धांच्या विविध प्रकरणांत लढताना मला स्वतःला आलेले चळवळीचे अनुभव आहेत.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, मे. पु. रेगे, डॉ. सुनंदा अवचट, डॉ. अनिल अवचट, डॉ. राजीव जोशी, डॉ. चंद्रशेखर पांडे, डॉ. भा. ल. भोळे, शाम मानव, प्रा. हेमंत देवस्थळी, डॉ. शरद अभ्यंकर, किशोर बेडकिहाळ, डॉ. प्रसन्न दाभोळकर, दिलीप माणगावे, लोकविज्ञान संघटनेचे कार्यकर्ते यांच्याशी झालेली चर्चा व यांनी लिहिलेली, संपादित केलेली वा सुचवलेली पुस्तके यांचा मनन, चिंतन, लेखन यासाठी उपयोग झाला. या सर्वांचा मी कृतज्ञतापूर्वक ऋणी आहे.

अर्थात पुस्तकातील उणिवांचे सर्व उत्तरदायित्व मात्र माझ्याकडेच आहे, हे मी नम्रपणे नमूद करतो.

डॉ. नरेन्द्र दाभोळकर



मुळावर घाव

योगायोगाची गोष्ट घडली ती अशी, की श्री. दाभोळकरांच्या ग्रंथासाठी हे प्रास्ताविक मी लिहायला प्रारंभ करीत असतानाच माझ्या हाती श्रीमती कमलाबाई पाध्ये यांनी काही चिठ्ठ्या आणून दिल्या आणि त्या म्हणाल्या की, " श्रीरामपूर येथे नुकतेच जे युवतींचे शिबिर घेण्यात आले त्या वेळी अंधश्रद्धेवर मी जे तेथे जमलेल्या युवतींसमोर बोलले, त्यावर त्यांनी विचारलेल्या शंकांचे व प्रश्नांचे हे भेंडोळे आहे.तुम्ही एकदा त्यावरून नजर फिरवा." मी त्या चिठ्ठ्या वाचल्या आणि मनात विचार आला की श्रीरामपुरातील मेळाव्यासाठी आलेल्या ह्या युवती बहुतांशी तेथील आसमंतामधील वेगवेगळ्या कॉलेजच्या विद्यार्थिनी होत्या ही गोष्ट लक्षात घेतली, की या घटकेला महाराष्ट्रातील तरुण सुशिक्षित पिढी मानसिक विकासाच्या कोणत्या पातळीवर विचार करते आहे, याविषयी काही ढोबळ अनुमान करणे चुकीचे ठरणार नाही. शितावरून भाताची परीक्षा. श्रीरामपूर येथे जमलेल्या मुली मुंबई पुण्याच्या मानाने सर्वसाधारण ज्ञानाच्या क्षेत्रात आणि चालरीत, वेशभूषा आणि झुळझुळीतपणा यांच्या बाबतीत थोड्याफार मागासलेल्या असतील असे आपण म्हणू फारतर. पण हा पाचशे युवतींचा गट दुर्लक्ष करण्यासारखा खासच नाही. त्या गटातील मुली अनेक विज्ञान शाखांमधून अध्ययन करीत असणार आणि त्यांतील काही जणी तरी वनस्पतिशास्त्र, जीवशास्त्र अशा शास्त्रांशी परिचित असणार, त्याचा पुरावा त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवरून सहज मिळतो आहे. उदाहरण म्हणून हे दोन तीन प्रश्न पाहा :

(१) महाभारत हा पुरातन ग्रंथ आहे. त्याचा Base (आधार, मूलाधार हे शब्द सुचले नाहीत.) म्हणजे परमेश्वर होय. तर कर्णाचा जन्म Parthanogenetic होता हे उदाहरण आम्हाला आजही Parthogenesis शिकवताना सांगितले आहे. असे का ? सारांश, विज्ञानाला परमेश्वरी अंशाचा Base आहे, असे आम्हाला म्हणावयाचे आहे. आपले म्हणणे काय ?

हाच प्रश्न, पण मांडणी जरा वेगळ्या पद्धतीने करून दुसरी एक विद्यार्थिनी विचारते आहे :

Parthogenesis birth of young child without formation of zygote combination of gamets) कर्णाचा जन्म अशा प्रकारे झाला (कुंतीच्या लग्नाअगोदर) तरी त्या प्रश्नाचे विश्लेषण द्यावे. मग यामध्ये दैवाचाच भाग आहे असे म्हणणे योग्य नव्हे काय ?

आता दुसरा प्रश्न काय होता ते पाहू या.

(२) समाजरचना आणि मनःशांतीसाठी प्रार्थना आवश्यक आहे. केवळ वैज्ञानिक निकषावर(?)चालणारी अमेरिका व रशिया या प्रगत राष्ट्रांची माणसे मनोवैफल्यग्रस्त, मनःशांती हरवलेली आहेत. याउलट भारतीय संस्कृतीने प्राणायाम व गायत्री मंत्र ग्रहण करणारी माणसे मनःशांती व प्राप्त परिस्थितीत सुख मानणारी आहेत. याविषयी आपले मत सांगा.

तिसरा प्रश्न चतुराइने असा विचारण्यात आला आहे की:

(३) स्वर्ग-नरकावरील विश्वास हादेखील अंधःश्रद्धेचाच भाग आहे. परंतु स्वर्ग-नरक हे दोन्ही विभाग खोटे आहेत असे लहानपणापासून मुलांना सांगितले तर ती वाईट कर्म करण्यास प्रवृत्त होतील.

विद्यार्थिनींनी प्रश्न जसे सादर केले त्यांतील शुद्धाशुद्ध देखील जसेच्या तसे ठेवून मी ते येथे उद्घृत केलेले आहेत. पहिल्या दोन प्रश्नांत तर शुद्धलेखनाच्या व मांडणीच्या अनेक चुका दाखवता येतील. पण त्यांना मी महत्त्व देत नाही. कारण येथे महत्त्व आहे ते विचारसरणीचे. ह्या दोन विद्यार्थिनींनी जे प्रश्न विचारले आहेत, ते विज्ञानाच्या आश्रयाने, म्हणून त्यांचा अधिक गंभीरपणे आपण विचार करावयास हवा. ज्या विज्ञानाच्या कुऱ्हाडीने अंधःश्रद्धेची विषवल्ली आपण छाटू पाहतो त्या विज्ञानालाच आपल्या विळख्यात घेऊन अंधःश्रद्धा कशी फोफावू पाहते आहे, त्याचे हे दोन प्रश्न म्हणजे उत्तम उदाहरण होय. यातले सर्व शब्द

अशा झोकात वापरलेले आहेत की प्रश्न वाचणाराला असे वाटावे की अयोनि संभव मुले आणि ती सुद्धा लागोपाठ होणे, स्त्री बीजाचा पुरुषाच्या रेताशी संबंध न येताच ते सगर्भ बनणे या घटना जणू साधारण व विज्ञान-मान्य झालेल्या आहेत. कर्ण, धर्म, भीम आणि अर्जुन हे चार पुत्र कुंतीला सूर्य-यमादि देवतांपासून तर नकुल सहदेव हे माद्रीला अश्विनीकुमारापासून झाले. कारण त्या दोघींचा पती जो पंडुराजा तो नपुंसक होता, हे महाभारत मान्य करीत होते. मग ही पुत्रोत्पती कशी झाली या प्रश्नांचे उत्तर महाभारतकार असे देतात, की कुंतीला असा एक मंत्र ठाऊक होता की, तिला ज्या देवाशी आपला संगम व्हावा अशी इच्छा होई तो देव तिने तो मंत्र जपला की हजर होई आणि तिला पुत्र-प्राप्ती होई. तिने एकदा तो मंत्र माद्रीला दिला आणि माद्रीने एकाच वेळी आश्विनी नामक देवांची जोडीच बोलावली. त्यामुळे एका झटक्यात तिला दोन पुत्रांची प्राप्ती झाली. येशूची जन्मकथा तर अशी आहे, की माता मेरीला आपल्याला गर्भ राहिल्याचे वर्तमान एका देवदूताकडून कळले. तोपर्यंत तिला असे काही घडल्याचा पत्ताच नव्हता. कारण तिचा तिच्या नवऱ्याशी संबंधच आलेला नव्हता आणि त्या भोळीने पुरुष वीर्याचा स्त्री योनीत प्रवेश झाल्यावाचून गर्भ राहतो, हे ज्ञान कॉलेजात संपादनही केलेले नव्हते ! म्हणून तिला थोडे आश्चर्य व लज्जा वाटली असावी आणि देवदूताच्या संदेशाच्या आसरा बायबल लिहणाऱ्यांना शोधावा लागला असावा. आता मंत्रांचा अथवा दैवी शक्तीचा आश्रय घेण्याची गरजच राहिलेली नाही, असे आजच्या तरुण विद्यार्थी विद्यार्थिनींना त्यांचे शरीरशास्त्र शिकवणारे आचार्य सांगत असावेत. ते त्यांची अशी समजूत करून देत असावेत की स्त्रीपुरुषांच्या बीज-वीर्य मीलनावाचून-सुद्धा सचेतन गर्भाची वाढ शक्य असते ! आणि एकदा ही समजूत झाली की कुंतीला झालेले चार पुत्र, माद्रीचे जुळे, गांधारीचे एकाच गर्भातून निर्माण झालेले शंभर कौरव, कुमारी मेरीचा येशू ह्या सर्वांची विज्ञान-युक्त संगती लावण्याचा मार्ग खुला होतो ! अलीकडे पाश्चात्त्य व भारतीय जीवशास्त्रज्ञांनी काच नलिकेतून स्त्री-पुरुष जीवरेणूंचा संगम घडवून गर्भ-संवर्धनाचे तंत्र विकसित केल्यामुळे तर आमच्याकडील संस्कृतिरक्षकांची मोठीच सोय झालेली आहे. शंकराचे वीर्य गवतात सांडले त्यातून जो मुलगा जन्मला आणि ज्याला कृत्तिकांनी संगोपिले तो कार्तिकेय झाला.

द्रोणात आणखी कोणाचे तरी वीर्य धरले त्यातून द्रोणाचार्य झाला. या सर्व भाकड कथांना अंधश्रद्धेच्या पाशातून सोडवून शास्त्रमान्यतेच्या पायरीवर आणून बसवण्याचा उद्योग आपल्याकडील काही विद्वान हल्ली करीत असावेत असा संशय येतो. कोठेही नवा शोध लागण्याचा अवकाश की आम्ही आमची पोथ्या, पुराणे उघडतो आणि हे सर्व प्रयोग भारतात शेकडो हजारो वर्षांपूर्वीच लागलेले आहेत, असे बिनदिक्कत सांगू लागतो. भारतामधील अंधश्रद्धेशी झगडत असताना या दांभिक विज्ञानरूपी शास्त्राचेही तुकडे आपणास करावे लागतील. गंगेचे पाणी एवढे पावन का? वडाची पूजा कशासाठी करायची? मारुतीला रुईच्या पानांची माळ का घालायची? आणि शनीला तेल का द्यायचे? गणपतीला दुर्वा आवडतात त्या का? या किंवा असल्या प्रश्नांची जी उत्तरे देतात त्यांच्यावर जाणूनबुजून विज्ञानाचा मुलामा चढवला जात असतो. आणि आपल्या परंपरागत सर्व वेडगळ चालीरीतींचे विज्ञानातील शब्द वापरून आवेशाने समर्थन केले जात असते. वेदान्ताच्या परिभाषेत बोलायचे झाल्यास हे कृतक ज्ञान अथवा तथाकथित ज्ञान म्हणजे अविद्या होय.

आता तिसऱ्या प्रश्नाकडे वळू. हा एका वेगळ्या पद्धतीमधून अंधश्रद्धांची जपणूक करण्याचा खुबीदार प्रयत्न आहे. ज्या विद्यार्थिनीने हा प्रश्न मांडला ती विद्यार्थिनी एकटी नाही, ती भारतामधील ९० टक्क्यांहून अधिक लोकांचे प्रतिनिधित्व करीत आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. मेल्यावर स्वर्ग अथवा नरक नावाचे काही लोक अथवा प्रदेश आहे यावर माणसे आता श्रद्धा ठेवतील हे संभवनीय नाही. कारण पृथ्वी भोवतालच्या अवकाशात सहस्रावधी योजनांपर्यंत मनुष्यकृत यानांनी व स्वतः मानवाने शोध घेतलेला आहे. तो शोध सतत चालू राहणार आहे हेही सर्वजण जाणतात. त्यात स्वर्गाचा पत्ता लागलेला नाही ना नरकाचा. मग स्वर्गनरकाची मिथ्या कथा कशी सांभाळायची? एक असे तरी कबूल करावे की स्वर्गनरकाची कल्पना झूट आहे किंवा असे म्हणावे की अजून मानव काही जगाचा कानाकोपरा धुंडाळून आलेला नाही. आज ना उद्या स्वर्ग नरक एखाद्या ग्रहगोलावर आढळणार नाही कशावरून? भारतातले ऋषीमुनी, येशू, महमद पैगंबर काय असत्य बोलत होते की काय? पण हा 'शेषं कोपेन पूरयेत्'चा मार्ग झाला. तिसरा मार्ग आहे तो चक्र पलायन वादाचा, खुन्या मुरलीधर मंदिरातील कोण्या एका पुराणिक बोवांनी

आमच्या विहीणबाईंना सांगितलेला. त्या अमेरिकेतील कार्नेगी विश्वविद्यालयातल्या चंद्रावरील दगडाचे दर्शन घेऊन आलेल्या होत्या. पुराणश्रवणानंतर त्यांनी बोवांना विचारले की बुवा तुम्ही चंद्राचे जे वर्णन करता ते बरोबर वाटत नाही. मी चंद्रावरचा दगड पाहून आलेली आहे. त्यावर बुवा तत्काळ उद्गारले, " बाई आम्ही ज्याच्याविषयी बोलतो तो चंद्र वेगळा आणि तुम्ही बोलता तो वेगळा ! "

मात्र श्रीरामपूरच्या विद्यार्थिनीने विचारलेल्या प्रश्नाचा रोख अगदी भिन्न आहे. त्यात एकदम मान्य करून टाकलेले आहे की स्वर्ग वा नरक ह्या केवळ कल्पना आहेत. त्या सत्य नाहीतच. पण व्यापक सामाजिक हिताकडे लक्ष देऊन त्या मान्य कराव्या लागल्या तर काय हरकत असावी ? व्यापक हितासाठी असत्य स्वीकारण्याचा वाद फार जुना आहे आणि लोकमान्य टिळकांनी आपल्या गीतारहस्य ह्या सुप्रसिद्ध ग्रंथात त्याचा अगदी कीस काढलेला आहे. " अश्वत्थामा मृतः । नरो वा कुंजरो । " ही धर्मराजाने द्रोणाचार्यांना ऐकवलेली उक्ती सर्वश्रुत आहे. धर्मराजाचे हे संदिग्ध उत्तर समर्थनीय का ? तर तसे उत्तर देऊन द्रोणाचार्यांना रणांगणातून जर बाहेर काढले नसते, तर पांडवांचा पराभव व कौरवांचा जय झाला असता. म्हणून बहुजन हिताय असत्य बोलले तरी चालेल अशी ही भूमिका ! त्याच भूमिकेचा या प्रश्नामध्ये स्वीकार केलेला आढळेल. प्रारंभीच्या दोन प्रश्नांमध्ये विज्ञानाचा देखावा निर्माण करून त्याच्यामागे अंधश्रद्धेला दडवण्याचा ज्याप्रमाणे प्रयत्न केलेला होता त्याप्रमाणे या प्रश्नात व्यापक समाजहिताचा अथवा सामाजिक नीतीरक्षणाचा आभास निर्माण करून स्वर्ग-नरकाविषयी असत्याच्या प्रचाराची गरज प्रतिपादन केलेली आहे. देवाचे अस्तित्व जर मानले नाही तर सर्व नीतिनियमांची इमारतच कोसळून पडेल. असे आग्रहाचे प्रतिपादन करणाऱ्या लोकांत आणि स्वर्ग नरक या मुळातून मिथ्या असलेल्या कल्पनांचा त्याग केल्यास समाज अनाचारी बनेल असा युक्तिवाद मांडणाऱ्या लोकांत काही फरक नसतो. दोन्हीही प्रकारचे लोक, ईश्वर, देव, स्वर्ग, नरक या असत्य व असिद्ध कल्पनांच्या ढिसाळ पायावर सामाजिक नीतिनियमांची उभारणी झालेली आहे असा आपल्या प्रतिपादनाचा अर्थ होतो, हे जणू विसरूनच जातात.

वस्तुस्थिती काय आहे हे जर आपण पाहू गेलो तर हे कोणालाही

मान्य करावे लागेल की ईश्वर, पैगंबर, श्रुति-स्मृती, बायबल, कुराण, धम्म इत्यादी धर्मग्रंथ मानणारे, सकाळ-संध्याकाळ पूजा करणारे अथवा नमाज पढणारे, व्रतवैकल्ये करणारे, बुवा, महंत, साधू, सिद्ध आणि भगवान यांच्यावर विश्वास ठेवणारे लोक समाजामध्ये ९९% हून आधिक असतात. निरीश्वरवादी. अज्ञेयवादी अथवा बुद्धिप्रामाण्यवादी लोकांचे प्रमाण १% सुद्धा असेल की नाही याबद्दल मला शंका आहे. ईश्वर, धर्मग्रंथ आणि स्वर्ग नरकासारख्या गोष्टींवर विश्वास ठेवण्यावर समाजाची नीतिमत्ता आधारलेली असते, हा सिद्धान्त जर सत्य असेल तर आजची बेबंद-शाहीची परिस्थिती आणि आजचा भ्रष्टाचार निर्माण होण्याचे कारण काय? एक टक्का असलेल्या अश्रद्ध लोकांनी आजचा समाज नासवला आहे, की नव्याण्णव टक्के सश्रद्ध लोकांनी ? धर्माचरणाची कवायत दररोज करणारी मंडळी तर सर्रास नीतिबाह्य वर्तन करताना आपण पाहतोच; परंतु याहूनही गंभीर गोष्ट अशी आहे की धर्मावर प्रगाढ श्रद्धा असलेल्या लोकां-कडून धर्माच्याच नावाने अस्पृश्यतेचे नियम (?) कटाक्षाने पाळले जातात आणि देवीच्या नावाने तरुण मुलींना वेश्या व्यवसायात खुशाल ढकलले जाते. अशा प्रकारच्या विपर्यस्त व असत्य श्रद्धांनाच पुढेपुढे अंध-श्रद्धेची असंख्य तंतुमुळे फुटत राहतात आणि तीच मग समाजरचनेत खोलवर शिरून समाजाच्या विनाशास कारणीभूत ठरत असतात. भारता-मधील अंधश्रद्धा इतर देशांतील अंधश्रद्धांप्रमाणे धर्मश्रद्धेच्या जोडीने वाढत गेलेली आहे आणि मानवी मूल्यांचा तिने नाश केलेला आहे याचे भान आपण सतत ठेवावयास हवे. इलियड अथवा ओडिसीसारखी महाकाव्ये, रामायण, महाभारतासारखे ग्रंथ अथवा बायबल व कुराणासारखे धर्मग्रंथ जर अभ्यासले तर माझ्या या विधानाचा खरेपणा कोणाच्याही सहज लक्षात येईल. यज्ञ, बलिदान, प्रार्थना त्यांच्याद्वारा देवांना प्रसन्न करून घेता येते आणि देव प्रसन्न झाले, की आपणाला इष्ट ते सर्व काही साध्य करून घेता येते ही श्रद्धा समाजात निर्माण करण्याचे प्रयत्न अखंड चालू असल्याचे दाखले या पवित्र ग्रंथांच्या पानापानावर आढळतील. बरे हे ग्रंथकार अप्रामाणिक होते असेही आपण म्हणण्याचे कारण नाही. कारण ते स्वतःच ज्या श्रद्धांनी ग्रस्त झालेले होते त्या श्रद्धा त्यांनी इतरांच्या मनात रुजवाव्यात यात अप्रामाणिकपणा तो कोणता ? सामाजिक दृष्टिकोनातून या ग्रंथांकडे पाहिले तर आपल्याला

असा निष्कर्ष काढावा लागतो की त्या काळातील जी प्रगल्भातील प्रगल्भ माणसं होती त्यांची, म्हणजे व्यास, वाल्मीकी, होमर, पैंगबर, ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास अशा सारख्यांची व त्यांच्या सकट सर्वांचीच हव्यकव्य, शुभाशुभ, शकुन, चमत्कार यांवर पूर्णपणे श्रद्धा होती. पण अशा अंधश्रद्धा हा मानवजातीच्या विकासातला एक अटळ टप्पा असतो. कोणत्याही देशातील मानवसमूहाला तो चुकवता आलेला नाही. चंद्र सूर्यांना लागलेली ग्रहणे, पंचमहाभूतांची कृपा व अवकृपा, पक्षी अथवा प्राणी यांचे उजवे डावे जाणे, घुबडाचा घूत्कार, कावळ्याची काव काव, कोल्ह्याची कुई, पिंगळ्याचे ओरडणे, पालीचे चुकचुकणे या सर्वांचा अर्थ लावण्याचे प्रयत्न मानवाने जगभर केलेले आहेत आणि रामाच्या पदस्पर्शाने 'अहिल्या शिळा' मुक्त झाली, येशू समुद्रावरून चालला, पैंगबरांच्या मुखाने अल्ला प्रत्यक्ष बोलला ह्या चमत्कारांवर मानवांनी विश्वास ठेवलेला आहे. मग ते अथेन्स अथवा मॅसेडोनियात राहणारे असोत, नील नदीच्या काठी पिरॅमिड बांधणारे असोत, युफ्रातिस आणि तैग्रिस यांच्या दुआबात वस्ती करणारे असोत किंवा पंचनद्यांच्या प्रदेशात यज्ञ करणारे असोत. बुद्धिप्रामाण्यवादी बुद्धदेवांचे अनुयायी देखील पुढे पुढे या मंत्रतंत्रात गुरफटून गेलेले दिसतात. आपल्याला ज्या नैसर्गिक घटनांचा उलगडा करता येत नाही त्यांना देवतारूप देऊन त्यांच्यासमोर मनुष्य नतमस्तक कसा होतो ते अमरनाथ आणि जटाशंकर या स्थानी जाऊन पाहावे म्हणजे लक्षात येईल. काही ध्वनी एका विशिष्ट पद्धतीने एकत्र आणले की, त्यातून आल्हाददायक अथवा उत्तेजक स्वरमाला तयार होतात. हे मानवाच्या लक्षात आल्यानंतर त्याला सुचले की ते ध्वनी आणखी वेगळ्या पद्धतीने एकत्र गुंफून जर मंत्र तयार केले तर त्यांच्या उच्चारणाने अनिष्टाचा अथवा अशुभाचा नाश का करता येणार नाही ? जप, बीजमंत्र, शापवाणी, आशीर्वाद अशांसारख्या ध्वनी-व्यवस्था या कल्पनेतूनच निर्माण झालेल्या आहेत. मग रामनामाने शिळा तरल्या, तथास्तू असे शब्द उच्चारताच जे हवे ते घडले, साधूंच्या आशीर्वादाने संन्याशाला मुलेही झाली असे जर वाटू लागले तर त्यात नवल ते काय ? या आणि यासारख्या शेकडो हजारो कल्पना आपल्या समाजाच्या रक्तात इतक्या भिनलेल्या आहेत, की त्या येथील जनजीवनाच्या प्रवाहावर जलपर्णीसारख्या माजल्या असून त्यांनी आपल्या समाजजीव-

नाचा प्रवाहच तुंबवून आणि नासून टाकलेला आहे. तो पुन्हा निर्मळ आणि प्रवाही बनवावयाचा असेल तर काठावर उभे राहून दिलेल्या प्रवचनाद्वारा ते काम पुरे करता येणार नाही. ऐन पाण्यात उतरून अपार परिश्रम अनेक वर्षे जर आपण चालू ठेवले तरच हा कुंठित प्रवाह पुनःश्च चालू करण्याची आपणाला आशा धरता येईल. अर्थात हे काम करताना जीवघेणी अंधश्रद्धा कोणती आणि कोळिष्टकी अंधश्रद्धा कोणती याचा विवेक करून निकराचा प्रहार प्रथम कोठे करावयाचा हे ठरवावे लागेल. त्याकरता अनेक बाजूंनी हल्ले चढवावे लागतील आणि अनेक क्षेत्रांत संघर्ष करावा लागेल. खरे बोलावयाचे तर ज्याला ज्याला अंधश्रद्धे-विरुद्ध उभे ठाकावयाचे असेल, त्याला त्याला आपल्या घरापासूनच नव्हे तर स्वतःपासूनच प्रारंभ करावा लागणार आहे, आणि एक एक पाश तोडीत पुढे सरावयास लागणार आहे.

सत्य असत्याशी मन केले ग्वाही
मानियले नाही बहुमता ॥

अशा निर्धाराने त्याला काम करीत राहावे लागणार आहे. माझी क्रांती माझ्यापासून सुरू होते, असे गांधीजी म्हणत ते याच अर्थाने.

श्री. नरेंद्र दाभोळकरांचे हे पुस्तक अशा निर्धाराच्या कार्यकर्त्यांना उपयोगी पडेल याबद्दल मला शंका वाटत नाही. प्रामाणिक अभ्यासूला आणि कार्यकर्त्याला युक्तिवादाने चालू अंधश्रद्धांचे स्वरूप आणि त्यांची व्याप्ती उलगडून दाखवील अशी ही पोथी आहे. भारतामधील अंधश्रद्धांची जर शिरगणती केली तर त्यांची संख्या काही लाख तरी भरेल. मात्र त्यात तूप जाळणाऱ्या यज्ञापासून स्वतःला मूल व्हावे म्हणून दुसरीचे मूल मारण्याच्या प्रकारापर्यंत, आणि अभ्यास न करता परीक्षा उत्तीर्ण करता यावी म्हणून गणपतीला साकडे घालणाऱ्या विद्यार्थ्यापासून अणु प्रकल्पांचा प्रारंभ नारळ फोडून करणाऱ्या महामंत्र्यापर्यंत सर्वांची गणती व्हावयास हवी. कारण ही सगळी अंधश्रद्धेचीच पिलावळ आहे. अंधश्रद्धा म्हणचे आंधळा विश्वास. म्हणजे कार्यकारण भाव माहिती नसता अथवा तो समजून घेण्याची गरज न वाटता ठेवलेला विश्वास. अंधश्रद्धा ही विज्ञानाची वैरीणच होय, कारण तिचे वर्तन विज्ञानाच्या गतिविधींच्या सर्वथैव विरुद्ध असते. विज्ञानाचा कायदा असा असतो की,

ते एकेक पाऊल पुढे जाण्याचा सतत प्रयत्न करीत असते. परंतु जे सिद्ध झाले असे वाटले त्याला असिद्ध ठरवणारा अंशमात्र देखील पुरावा जर समोर आला तर सिद्ध सिद्धान्त असिद्ध समजून त्याची प्रारंभापासून फेर-तपासणी करण्याची विज्ञानाची तयारी असते. अंधश्रद्धेची प्रक्रिया याच्या उलट असते हे स्पष्टच आहे. उदाहरण म्हणून आपण सर्पदंश झालेल्या माणसाचे प्रकरण घेऊ. अनेक गावांमधून ज्या माणसाला साप चावला असेल त्याला म्हसोबाच्या नाही तर मारुतीच्या देवळात नेऊन ठेवतात. तेथे किती माणसे खऱ्याखुऱ्या विषारी सर्पाच्या दंशानंतर आणली, त्यातली किती विषमुक्त झाली, किती दगावली याचा काही हिशोब ठेवण्याची किंवा विचारण्याची सोयच नसते. जो वाचला तो देवाच्या कृपेने आणि जो मेला तो त्याचा येथील शेर भरला म्हणून, असा गमतीचा हिशोब तेथे असतो. मुंबईची हाफकिन संशोधन शाळा जर सर्पविष यावरील आपल्या औषधांचा असा हिशोब जगापुढे मांडील तर तेथील संशोधकांना जगात कोणी कवडीची किंमत देणार नाही. पण म्हसोबाच्या अथवा मारुतीच्या देवळात नेलेला किंवा मांत्रिकाकडे उपचार घेतलेला माणूस मेला तरी त्या देवाची अथवा भगतांचा बेअब्रू होण्याचा प्रश्नच नसतो. अंधश्रद्ध माणसे त्यांच्याकडे येतच राहतात. कारण त्यांची श्रद्धा दृढमूल झालेली असते तो इतकी की ह्या अपयशाच्या वाऱ्या-वादळाचा तिच्यावर काहीच परिणाम घडत नाही.

अंधश्रद्धा वा बुद्धिप्रामाण्य यांचा खरा संघर्ष माणसाच्या मना-मध्ये तरुण वयात होत असतो. १६ ते २५ या वयात माणसाचे मन श्रद्धावादी तरी बनते किंवा बुद्धिवादी तरी बनते. बहुतेक व्यक्ती तडजोड वादी वृत्ती स्वीकारतात. गेल्या शंभर दीडशे वर्षांचा इतिहास पाहिला तरी असे प्रत्ययास येईल की लोकहितवादी, महात्मा फुले, लोकमान्य टिळक, सुधारक आगरकर, स्वामी विवेकानंद, वीर सावरकर, डॉ. आंबेडकर यांची मते याच वयात पक्की झाली होती. म्हणून अंधश्रद्धांचा त्याग करण्यासाठी आवश्यक तो प्रचार कॉलेजमधील युवक युवतीं मध्येच प्रामुख्याने व्हावयास हवा. क्षणोक्षणी मांत्रिकाकडे, गुरूकडे अथवा देवाकडे धाव घेण्याची सवय लागली की पुरुषार्थ निकालात निघतो, हे त्यांना समजले पाहिजे किंवा समजावून सांगितले पाहिजे.

अंधःश्रद्ध मनुष्य कोणत्या थराला जाऊ शकतो त्याचे अगदी

अलीकडचे उदाहरण म्हणजे आपल्या भूतपूर्व महामंत्री इंदिराजी यांचा खून. त्यांना गोळ्या झाडून ठार करणाऱ्या त्यांच्या अंगरक्षकाचे प्रकरण सध्या न्यायालयात चालू असून त्यातून उजेडात आलेली माहिती पाहा. सरकारी साक्षीदाराने आणि त्या मारेकऱ्याच्या परिचित माणसाने न्यायाधिशासमोर उघड केलेली माहिती अशी की, गेल्या सप्टेंबरमध्ये इंदिराजींच्या निवासस्थानावर एक बहिरी ससाणा उतरताना बियांतसिंगाने पाहिला. त्या पक्ष्याला पाहताच त्या अंगरक्षकाला वाटले की हा आपल्याला गुरु गोविंदसिंगांचा आदेशच आलेला आहे. बहिरी ससाणा हा एक शिकारी पक्षी मानला जातो. ज्याअर्थी तो इंदिराजींच्या घरावर उतरला त्याअर्थी येथे शिकार आहे असे सुचवणारी ही खूण खुद्द गुरु गोविंदसिंगांनीच पाठवलेली असावी. सुवर्ण मंदिरात सैन्य पाठवले म्हणून सर्व शीखसमाज इंदिराबाईंवर नाराज झालेला होताच. श्री. खुशवंतसिंगासारखे ख्यातनाम पत्रकारदेखील संतापले होते. सुवर्ण मंदिराचा वापर अतिरेकी शिखांनी शस्त्रास्त्रांच्या कारखान्याप्रमाणे व भुईकोट किल्ल्याप्रमाणे करण्यास सुरुवात केली होती, हे कितपत योग्य होते याचा विचार करण्याची गरजही जर कोणाला वाटली नाही, तर ती बियांतसिंगाला काय म्हणून वाटावी ? अशा प्रकारे आधीच दुश्चित्त झालेल्या ह्या अंगरक्षकाला जेव्हा दशम गुरूचा साक्षात्कार आपणाला झालेला आहे असे वाटले, त्या वेळी त्याने मनाशी ठरवले की बाईला जिवंत ठेवायचे नाही. गुरूची आज्ञा प्रत्येक निष्ठावान शिखाने शिरोधार्य मानलीच पाहिजे. मग देशाचे वाटोळे होवो की आपल्या जातभाईंचे शिरकाण होवो ! विवेक, संयम, देशहित इत्यादी विचार अंधश्रद्धेच्या ज्वरात जळून जातात.

अंधश्रद्धेचे भारताला लागलेले हे खग्रास ग्रहण श्री. दाभोळकरांच्या या प्रयत्नाने जरी अंशतःच सुटले, तरी ते इष्टच ठरणार आहे. विज्ञानाचा सूर्य माथ्यावर आलेला असताना अंधश्रद्धेची झापडे बांधून ठेचकळत राहण्यात शहाणपण ते काय ? विज्ञानानेही काही जटिल समस्या निर्माण केलेल्या आहेत, पण त्यांचा विचार स्वतंत्रपणे करावा लागेल.

पुणे
३-९-८५

ना. ग. गोरे

अनुक्रम

१. अंधश्रद्धेची आगीबाणी १

२. बुवाबाजीविरुद्ध बंड १२

३. झपाटणे–देवाने आणि भुताने २५

४. अंधश्रद्धेचा आसूड ३८

५. भानामतीची भानगड ४९

६. वशीकरण विद्येचे विज्ञान ५६

७. ग्रहांचे मायाजाल ६४

८. नवे जुने बुद्धिभेद ७४

१. पुनर्जन्म

२. भावातीत ध्यान– एक अर्ध सत्य

३. दिशाभुलीचे नवे मार्ग

४. परामानसशास्त्र

९. वैज्ञानिक दृष्टिकोन-बुद्धिप्रामाण्यवाद ८४

१०. बुवाबाजीविरुद्ध झुंज ९४

१. गोडबाबाचा गडबडगुंडा

२. जंगलीदास महाराजांची अघोरी साधना


३. सिद्ध बाळयोगीराजाच्या लीला

४. दोन तरुणींचा संन्यास दीक्षाविधी

११. परिशिष्ट– १३०

१. आपल्यासाठी

२. नार्वेकर गुरुजीचा अखेरचा निरोप



एक

अंधश्रद्धेची आणीबाणी

अज्ञानाचे भय, कुतूहल आणि आश्चर्य माणसाला सनातनकालापासून वाटत आले आहे. सारासार बुद्धीला सहजपणे न उलगडणारी कोडी त्याला खुणावत आली आहेत. विश्वाच्या पसाऱ्यामधील स्वतःची क्षुद्रता आणि नगण्यता त्याच्या अंतर्मनात भीतीच्या तारा छेडते. वास्तव परिस्थितीमधली अगतिकता व्यवहारात त्याला आधार शोधायला भाग पाडते.

जंगलामध्ये आदिम अवस्थेत राहणाऱ्या मानवाने विजेचा कडकडाट ऐकला; सोसाट्याने थैमान घालणारा वारा बघितला. प्रचंड भूभाग बेचिराख करणारे वणवे बघितले, धुंवाधार कोसळणारा पाऊस बघितला, तळपणारा सूर्य आणि ऋतुचक्राप्रमाणे बदलत जाणारी पृथ्वी पाहिली. या साऱ्याचे कार्यकारण संबंध आकलन न झालेल्या त्याने या सर्वांना पंचमहाभूतांच्या जागी बसवले. त्यांची भीती बाळगली. त्यांचा आदरही केला. त्यांची पूजा बांधली.

न कळणाऱ्या असंख्य घटना त्याच्या आजूबाजूला पसरलेल्या होत्या. माणसे अचानक मरत होती. एखाद्या साथीच्या तडाख्यात पिकलेली फळे टपटप पडावीत, तशी गावेच्या गावे उजाड होत होती. कोणी असहाय व्याधीने तळमळत होती. कोणी एकदम खुळ्यासारखी वागायला लागत होती. निसर्गाची रुद्र-भीषणता, मानवी जीवन व वर्तनाची अनाकलनीयता आणि वास्तवातले अज्ञान आणि अगतिकता या साऱ्यामधून अंधश्रद्धेपलीकडे दुसरे काय जन्म घेणार ?

मानवी संस्कृतीचा प्रवाह पुढच्या काही हजार वर्षांत कितीतरी पुढे सरकला. ठिणगी पाडून प्रकाश शोधणाऱ्या माणसाच्या हातात आसंमत सूर्य-प्रकाशासारखा लख्ख उजळून टाकणारी शक्तिशाली प्रकाश ज्योत आली. अग्नि-देव काड्यापेटीत बंद झाला. वारा पंख्यात जाऊन हुकमाचा गुलाम बनला. विजली देवी बटणाच्या आज्ञेप्रमाणे नाचू लागली. खरे तर या साऱ्या आयुधांच्या साम-र्थ्याने अंधश्रद्धेचा अंधार कायमचा गाडून टाकायला पाहिजे होता. भूतकाळात पिटाळायला पाहिजे होता. पण घडले आणि घडत गेले ते विपरीत होते आणि आहे.

विज्ञानाच्या गतिमान युगात मानवाने प्रवेश केला. भारतात आगगाडी पहिल्यांदा धावू लागली- त्या वेळी गाडी सुटण्यापूर्वी प्रत्येक वेळेस तिच्यापुढे नारळ फोडला जायचा. ही खुळी समजूत मागे पडली. गावाजवळून दोन-चार तासांनी रेल्वे गाडी जाऊ लागली. प्रवासी बस तर थेट गावातच येऊ लागली. गावात वीज आली. आधुनिक बी-बियाणे आले. अत्याधुनिक ट्रॅक्टर आले. रेडिओ कधीच आला होता. आता तर टेलिव्हिजनही येऊन दाखल झाला. उपग्रहांच्या झटपट यंत्रणेने जगाच्या कानाकोपऱ्यात खुट्ट झालेले गावच्या ग्यानबाला कळू लागले.

पण तरीही गावची जत्रा, त्यातले मानपान, त्यातल्या जुन्या कल्पना, अंध-श्रद्धा यांची चलती राहिलीच. मांढरदेवीच्या यात्रेला हजारोंनी बकरी मारून त्यांच्या रक्तामांसाचा चिखल करण्यात धन्यता मानणारी भाविकांची गर्दी चालूच राहिली. अशा देव, देवी, पीर, जागृत दैवते यांची गावोगावची रेलचेल कमी न होता वाढतच गेली. आपल्या नशिबाची, भोगाची उत्तरे शोधण्यासाठी देवीला कौल लावणे आणि त्याच्या आदेशाप्रमाणे वागणे यात फरक पडला नाही. आजारी माणसाला डॉक्टरांकडे नेण्याआधी काही बाहेरचे झाले आहे का ? याचा शोध चालूच राहिला. खेड्यात हे चालू राहिले यात नवल नाहीच पण जगताना क्षणोक्षणी विज्ञानाचा आधार घेण्याऱ्या सुबुद्धीतही सिद्धिविनायकाच्या रांगा वाढतच राहिल्या. कोपऱ्याकोपऱ्यावर साईबाबांची मंदिरे उभी राहू लागली. सत्यनारायण आणि त्यांचा प्रसाद हे जीवनाचेच एक अविभाज्य अंग झाले. भविष्याची मासिके, गूढ विद्येची, तंत्र-मंत्रांची पुस्तके यांची चलती चालू राहिली. माणसाने विज्ञानाची सृष्टी घेतली पण दृष्टी घेतली नाही. अंधश्रद्धेची आणीबाणी चालूच राहिली.

या देशाने एका राजकीय आणीबाणीची झलक बघितली आहे. त्या आणीबाणीत हात असून इच्छा असेल ते लिहावयास, तोंड असून सत्य ते सांगावयास, पाय असून अन्यायाविरुद्ध मोर्चा काढावयास बंदी होती. सगळे वातावरणात कसे जखडबंद होते. पण ही वरून लादलेली कृत्रिम आणीबाणी होती. मताच्या पेटीतून एकोणीस महिन्यांनंतर ती उलथून पडली. पण या देशाला एकोणीस महिने नव्हे, एकोणीस वर्षे नव्हे, चांगले एकोणीसशे वर्षांहूनही अधिक काळ दोन आणीबाणींनी ग्रासले आहे. एक आहे अंधश्रद्धेची, दुसरी आहे जातीयव्यवस्थेची. या आणीबाणींची दुर्दैवी स्थिती अशी की, त्या आपल्यावर फार फार चतुरपणे लादल्या गेल्या आहेत. त्यांचे भानही राहिलेले नाही. त्यामुळे हाता-पायांत पडणाऱ्या बेड्यांना मंडळी फुलांचे गजरे समजू लागली आहेत. ही गुलामी वरून लादण्याची गरजच राहिलेली नाही. जातीसाठी माती खाण्याचे आणि 'ठेविले अनंते तैसेची राहण्याचे' तत्त्वज्ञान हे मुळी आता माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचाच एक भाग बनून गेले आहे.

मला माझ्या दवाखान्यात आलेली एक बाई आठवते. चेहरा घामाने डबडबलेला. नुसती जिना चढून येण्यामुळे धाप लागलेली. फिकट डोळे, हाता-पायाला सुटणारे कंप, पायात चढलेले गोळे. सारी लक्षणे शरीरातील रक्तक्षयाची (ॲनिमिया). तपासणी केली. निदान बरोबर होते. अन्य दुखणे कोणतेच नव्हते. दुखणे होते ते हेच की, शरीरात रक्त खूप कमी झाले होते. अंगात जीवनसत्त्वे आणि पोषक द्रव्ये यांची कमतरता होती. औषधापेक्षाही खरी गरज होती पुरेसे आणि योग्य प्रकारचे अन्न नियमित घेण्याची. मी तिच्या नवऱ्याला बोलावले. त्याला ठणकावून सांगितले की, " बाईचा आजार पूर्ण बरा होईल; पण तिने नियमितपणे अमुक अमुक खावयास हवे. तुमची स्थिती अडचणीची असेल तरीही तुम्ही तिला या गोष्टी मिळतील हे बघावयास हवे." त्यावर तो उसळून म्हणाला, " डॉक्टर, घरी मस्त दूध-दुभतं आहे. भाजी-पाला आहे. अंडी आहेत पण ही खाईल तर ना ? आधी आठवड्यातले मंगळवार, गुरुवार, शुक्रवारचे उपवास होते. त्यात श्रावणातले सोळा कडक सोमवार झाले. आता नुकतेच नवरात्राचे नऊ उपवास संपलेत. घरी खाणंपिणं असून काय जाळायचंय ?" त्यांचे म्हणणे खरे होते. पण बाईला मी उपवास सोडण्याचे पटवू शकलो नाही. पुढे अनेकदा रोजगार हमीवर किमान वेतनासाठी भांडणाऱ्या स्त्रियांना मी हा प्रश्न विचारला, पोट भरण्यासाठी पैसे मिळावेत म्हणून राबणाऱ्या बहुसंख्य आया बाया मिळणाऱ्या

पैशात जेवढी खळगी भरणे शक्य होते तेवढीही या देवस्की उपवास-तापासाच्या पायात त्या भरत नव्हत्या. स्वतःच स्वतःवर लादून घेतलेली ही आणीबाणी होती. डोळसपणे बघितले तर या आणीबाणीची शेकडो रूपे आपल्याला आजूबाजूच्या जनजीवनात दिसून येतात. आपले जीवन आपल्या सामर्थ्याने, कर्तृत्वाने, पुरुषार्थाने घडत नाही, एक अदृश्य शक्ती या साऱ्यांचे नियंत्रण करत असते. तिच्या इच्छेप्रमाणे, लीलेप्रमाणे बरे वाईट भोगावे लागते. अशी दृढ कल्पना, श्रद्धा शतकानुशतके जनमानसात मूळ धरून आहे. स्वतःच्या शेतीची परवड वर्षानुवर्षे बघणारा गरीब अडाणी शेतकरी आपल्या दैन्य दारिद्र्याचा बोल आपल्या नशिबाला, कर्माला लावतो आणि व्यवसायात अपेक्षित यश न मिळणारा तरुण डॉक्टर "साला आपल्या नशिबातच नाही," असे म्हणून मोकळा होता.

माणसे सुशिक्षित असोत वा अशिक्षित, सोसावे लागणारे भोग हे नशिबाचे देणं आहे अशीच त्यांची धारणा असते. हे नशीब जो तो जन्मतानाच बरोबर घेऊन येतो. आणि त्याप्रमाणेच बरे वाईट घडत असते असेही सर्वांना वाटत असते. कुणाच्या तरी कृपाप्रसादाने एखाद्याचे नशीब उजळते. पण असा भाग्यवान वगळता सर्वांना नशिबाप्रमाणे सोसणे अटळच आहे अशीच भावना दृढ असते. ही भावना एवढी दृढ होण्याचे कारण म्हणजे या कल्पनेला तत्त्वज्ञानाने सिद्धान्ताचे स्वरूप दिले आहे. कर्मविपाक सिद्धान्त म्हणतात तो हाच. या जन्मी माणूस सोसत असलेले दुःख दैन्य यांचे मूळ त्याच्या पूर्वजन्मीच्या करणीत आहे आणि या जन्मी माणसाने केलेल्या कर्माची फळे पुढच्या जन्मी त्याला चाखावयास मिळणार आहेत, असा हा सिद्धान्त सांगतो. माणसाचे वर्तमान असे अदृश्य भूत-भविष्यांशी कर्मविपाकाने पक्के बांधले की, माणसाच्या साऱ्या प्रश्नांची उत्तरे कशी साधी सोपी सरळ बनतात. या जन्मी अमुक अमुक का सोसावे लागते ? तर पूर्वजन्मीच्या पापाचे फळ म्हणून. यातून सुटका होण्यासाठी पुण्य आचरण केले तर त्याचे फळ मिळणार, पुढच्या जन्मी. म्हणजे शेवटी या जन्मी जे सोसावे लागते ते निमुटपणे बिनतक्रार सोस. त्याच्याविरुद्ध बंड करू नकोस त्याचा काही उपयोगही होणार नाही. ही माणसाच्या मनाची धारणा या सिद्धान्ताने दृढमूळ केली. पुन्हा पुण्याचरण म्हणजे तरी काय ? समाजोपयोगी सत्कृत्य नव्हे तर ब्राह्मणाला जेवण घालणे, दक्षिणा देणे, गाईची शेपटी तोंडावरून फिरवणे, गोमूत्र पिणे, अशी अंधश्रद्धा जोपासणारी कर्मकांडे. आज उधार अन् उद्या रोख असे आश्वासन हा सिद्धान्त देतो. आज चहाचा कप मिळण्याची मारामार असेल

पण उद्या स्वर्गात मरणोत्तर अमृताचा पेला मिळेल, रेशनच्या रांगेत उभे राहण्यात हा जन्म जाईल पण स्वर्गात कामधेनू जे जे वांच्छील ते ते देईल, अशी भुरळ तो घालतो.

खरे तर, या जन्मी केलेल्या कृत्याचे फल वा प्रायश्चित्त पुढच्या जन्मी मिळते हे गृहीत कृत्यच तकलादू आहे. तर्कदुष्टही आहे. एकतर कुठले कृत्य हे चांगले, कुठले वाईट हे स्थल कालानुसार बदलत असते. त्यामध्ये एका वेळेला एके ठिकाणी एक कृत्य चांगले म्हणून त्याला पुढच्या जन्मी बक्षीस व तेच कृत्य दुसऱ्या काल-खंडात दुसऱ्या ठिकाणी वाईट मानलेले म्हणून त्याला पुढच्या जन्मी शिक्षा अशा अनेक विसंगती संभवतात. भारतात काही काल सतीची चाल रूढ होती. पती-बरोबर जाळून घेणारी स्त्री पवित्र होती. तिला सद्गती मिळत होती. परंतु राजा राममोहन रॉय सारख्यांच्या प्रयत्नामुळे समाजाचा दृष्टिकोन बदलला. सतीची चाल बंद झाली आणि ती अयोग्य, दुष्ट होती अशीही लोकांची धारणा झाली. ज्या वेळी सतीची चाल चालू होती त्या वेळी सती न जाणारी स्त्री पाप करत असे म्हणून तिला पुढच्या जन्मी दुर्गती मिळावयाची आता मात्र सती न जाणाऱ्या स्त्रीला (बदललेल्या कालमानाप्रमाणे) सद्गती मिळते असे मानायचे काय ? अशी अनेक उदाहरणे देता येतील. आणि मग कर्मविपयाचा सारा सिद्धान्तच हास्यास्पद वाटू लागतो.

या सिद्धान्ताची तर्कदुष्टता अशी की स्वतंत्रपणे काही हालचाल करण्याचे माणसाचे स्वातंत्र्यच तो संपवून टाकतो. कारण या सिद्धान्ताप्रमाणे व्यक्तीची या जन्मातील चांगली-वाईट कृत्ये ही मागच्या जन्मीच्या भल्याबुऱ्या कर्माप्रमाणे नियत झालेली असतात. असे असेल तर पुढच्या जन्मी सुख मिळावे म्हणून चांगले कृत्य करायला व्यक्तीला वाव कोठे राहतो ? मानवाला इच्छाशक्तीचे स्वातंत्र्य नाही असा अर्थ त्यातून निघतो. शिवाय या जन्मी केलेल्या चांगल्या कृत्याचे फळ आणि वाईट कृत्याबद्दल कठोर शासन याच जन्मी का होत नाही, हा प्रश्नही शिल्लक राहतोच. वाईट वागणाऱ्याला या जन्मी कठोर शासन मिळतेच असे नाही. आजच्या समाजव्यवस्थेत त्याला समृद्धी मिळण्याचीच शक्यता अधिक आहे. असे असताना पुढच्या जन्मी त्याला शासन होईल हे मानणे म्हणजे मनाची भावडी समजूत घालणे आणि डोळ्यादेखत घडणाऱ्या अन्यायाचा प्रतिकार केला नाही तरी चालेल, अशी शिकवण देणे होय.

कर्मविपाकाचा सिद्धान्त म्हणूनच अंधश्रद्धेला एक मजबूत आधार मिळवून

देतो. पण अंधश्रद्धा म्हणजे तरी नेमके काय आहे?

श्रद्धा हा शब्द श्रत्+धा या धातूपासून झाला आहे. श्रतचा अर्थ Belief किंवा Faith असा होतो आणि धा म्हणजे धारण करणे. श्रद्धा याचा अर्थ Bilief in devine revelation किंवा religious faith असा होतो. ज्या कल्पनेवर दृढ विश्वास असतो अशा भावनेलाच श्रद्धा म्हणतात. विमान, टेलिफोन, रेडिओ यांच्यावर माझी श्रद्धा आहे असा वाक्यप्रचार कोणी करत नाही. ज्या गोष्टी वैज्ञानिक दृष्टया सिद्ध झालेल्या असतात त्यावर आपला विश्वास असतो. विश्वास हा अनुभवजन्य आणि प्रत्ययकारी असतो. याउलट जी श्रद्धा डोळस नसते तिला आपण अंधश्रद्धा म्हणतो. अंधश्रद्धेचा पहिला बळी विवेक हा आहे. फार पुरातन काळापासून मूळ अंधश्रद्धा परमेश्वरासारख्या अज्ञात शक्तीच्या अस्तित्वाविषयी आहे. त्यातही गंमत अशी की हा ईश्वर निराकार, निर्विकार, निर्गुण मानलेला आहे. अशा अस्तित्वात नसलेल्या शक्तीला प्रसन्न करणे यात मूलभूत विरोध आहे हे लक्षातच घेतले जात नाही.

अंधश्रद्धेची खरी भयानकता म्हणजे ती माणसाची सगळ्यात वैशिष्ट्यपूर्ण गोष्टच मारून टाकते. ती म्हणजे माणसाची चिकित्सक बुद्धी आणि विवेकशक्ती. जन्मजात माणूस अत्यंत दुबळा प्राणी आहे पण माणूस मोठा ठरतो आणि वेगळा असतो, तो त्याच्या विवेचक आणि विवेक शक्तीमुळे. अंधश्रद्धा या बुद्धीला मूठमाती देते. एखादी गोष्ट तपासून घासून पुसून प्रयोग करून डोळसपणे स्वीकारण्याऐवजी आहे तशीच स्वीकारण्याकडे कल वाढतो. यातून वाढते फक्त अगतिकता आणि शरण जाण्याची वृत्ती. एके काळी भारतात ही चिकित्सकता जागृत होती. नागार्जुन, आर्यभट्ट, वराहमिहिर पंतजली, कपिल यांचा हा काल होय. या काळात तर्कशास्त्र, कार्यकारणभाव याची मीमांसा करण्यात येत असे; परंतु इ. स. ६०० ते १८०० हा काल वैचारिक दृष्टया तमोयुगच होता. आणि भारतातले बहुसंख्य लोक वैचारिक दृष्टया आजही कमी जास्त प्रमाणात याच काळात वावरतात काय अशी शंका यावी अशी स्थिती आहे. या कालखंडात मराठे, रजपूत, शीख यांच्यात काही असामान्य राजे होऊन गेले. ज्ञानेश्वर, तुकाराम, कबीर हे सत्पुरुष जन्माला आले. परंतु गणित, रसायन, पदार्थ विज्ञान हे प्रांत कोरडे राहिले. ह्याच काळात धर्मशास्त्र आणि रूढीचे दंडक कडक झाले. या दंडकांना तर्काचा,कार्यकारण भावाचा कसलाच आधार नव्हता आणि नाही. कुणी कांदा खाऊ नये, कुणी मांस खाऊ नये. कुणी कसे गंध लावावे. कुणी

कुणाच्या पंगतीला बसावे. किती पदरी जानवे घालावे हे सर्व नियम याच काळात रूढ झाले. परलोकाविषयी जास्त आकर्षण निर्माण झाले. बुद्धीची पिछेहाट झाली. युरोपमध्ये याच्यापेक्षा वेगळे घडले.

बाराव्या शतकापर्यन्त युरोपमध्ये सरंजामशाही अर्थव्यवस्थेचा, मध्ययुगीन विचारांचा अंधश्रद्धांचा प्रभाव होता.

युरोपातील शास्त्राची प्रगती कुंठित झाली होती. परंतु पवित्र रोम साम्राज्यावर बगदादच्या अब्बासी खलिफांचे, ईजिप्तच्या फतिमी खलिफांचे, सेजलुक तुर्कांचे, आणि नार्मन टोळ्यांचे हल्ले झाले. ११ ते १३ व्या शतकात धर्मयुद्धे झाली.

धर्मयुद्धांमुळे पाश्चिमात्य देशांतील सरंजामशाही अगदी मोडकळीस आली. कर्जबाजारी सरंजामदारांना जमिनी विकाव्या लागल्या. त्यांची बंधने सैल झाली. या धर्मयुद्धांमुळे कूपमंडूक वृत्तीचा सरंजामशाही वर्ग जाऊन नवा व्यापारी वर्ग निर्माण झाला. नौकानयन, व्यापार यात खाणेपिणे, रूढी यांच्या बंधनात शिथिलता आली. भूदास पद्धतीला आळा बसून कामगारवर्गाचा उदय झाला. व्यापार आणि उद्योगाला चालना मिळाली.

युरोपातील लोकांना धर्मयुद्धे आणि व्यापार या निमित्ताने नवी भूमी, नवे वातावरण, नवे ज्ञान मिळाले. पूर्वेकडील अभ्यासू विचारवंताचा अरबांनी केलेल्या शास्त्रीय आणि कलाविषयक प्रगतीचा परिचय झाल्याने युरोपचे वैचारिक क्षितिज मोठे झाले.

या नव्या विचारांमुळे वाङ्मय, कला, तत्त्वज्ञान आणि विज्ञान या सर्व क्षेत्रांत बंडखोरी सुरू झाली. इटालियन विचारवंत मॅर्सिलीओ ह्याने 'पोपपेक्षा राजा श्रेष्ठ आहे. धर्मगुरूंना जादा अधिकार नसावेत. समाजाला चर्चची जमीन काढून घेण्याचा हक्क आहे,' वगैरे विचार प्रसृत केले. चर्च आणि राजसत्ता यांचे संघर्ष घडले. पीटर ॲबेलॉर्ड, रॉजर बेकन (१२१४–९४) इत्यादी विचारवंतांनी 'कोणतेही वचन केवळ देव म्हणाला म्हणून पत्करता येत नाही ते तुमच्या बुद्धीला पटले पाहिजे. केवळ अमक्याने सांगितले म्हणून विश्वास ठेवू नका. प्रयोगाच्या आणि तर्कशास्त्राच्या कसोटीवर प्रत्येक सिद्धान्त घासून पहा.' वगैरे शास्त्रशुद्ध विचारसरणी मांडावयास सुरवात केली. पुढे पंधराव्या सोळाव्या शतकात राजसत्तेने मार्टिन ल्यूथर वगैरे धर्मसुधारकांना उघड उघड पाठिंबा दिला. अशा प्रकारे सत्ताधीश व विचारवंत यांच्या संयुक्त चढाईमुळे धर्माचे वर्चस्व

आणि अंधश्रद्धा यांचा पगडा कमी होऊन राष्ट्रवाद व विज्ञान यांची वाढ झाली. या साऱ्यामुळे युरोपमध्ये सरंजामशाहीचा वैचारिक आणि आर्थिक पराभव होऊन प्रबोधनाची चळवळ उभी राहिली. नवीन शोध लागून विज्ञानाची वेगाने वाढ होऊ लागली. उद्योजकांतून भांडवलदार वर्गाचा उदय झाला. अठराव्या शतकात झालेल्या या औद्योगिक क्रांतीमुळे हे परिवर्तन दृढ झाले. वैचारिक प्रबोधन, बदलते अर्थकारण या बदलांमुळे युरोपात वैज्ञानिक मनोवृत्ती वाढीस लागली.

भारतात राजसत्ता आणि धर्मपीठे ह्या शासन करणाऱ्या संस्थांमध्ये सत्तेच्या वाटणीवरून संघर्ष झालाच नाही. उलट भागीदारीच राहिली. त्यामुळे इंग्रजी सत्तेचा जम बसेपर्यंत सरंजामशाहीच टिकून राहिली. इंग्रजी राजवटीनतर भारतात साम्राज्यशाहीची अनुषंगिक पैदास म्हणून व्यापार, सावकारी, दलाली करणाऱ्या वर्गातून भांडवलदार वर्गाचा उदय झाला. त्यांना मध्ययुगीन विचारसरणी नष्ट करण्याची गरज भासली नाही वा सरंजामी-अर्थव्यवस्थेविरुद्ध लढावे लागले नाही, त्यामुळे भारतात वैज्ञानिक मनोवृत्ती रुजलीच नाही.

अर्थकारण आणि अंधश्रद्धा या दुधारी विरुद्ध लढणारे काही समाज सुधारक ब्रिटिश काळात भारतात,विशेषतः महाराष्ट्रात जन्माला आले. त्यांनी आधुनिक वैज्ञानिक विचारांचा पुरस्कार केला. धार्मिक विचारांमागचा भंपकपणा उजेडात आणला. महात्मा फुलेंनी प्रश्न विचारला, ' मुहूर्त पाहून झालेल्या आमच्याकडच्या लग्नात बालविधवा होतात आणि तिकडे परदेशात मुहूर्ताशिवायच लग्ने करतात हे कसे ? काटेकोर मुहूर्त पाहून चालणारी पेशवाई बुडाली आणि मुहूर्ताशिवाय लढणारी ब्रिटिश अमदानी रुजली हे कसे ? ' फुल्यांना जाऊन शंभर वर्षे होत आली. ब्रिटिशही गेले.मात्र स्वातंत्र्यानंतरही भारतातील या दुहेरी शोषणाविरुद्धच्या लढाईची गरज अजिबात कमी झालेली नाही. प्रबोधनाची जोरदार चळवळ स्वातंत्र्योत्तर काळात झालीच नाही. खुंटलेली भांडवलशाही, जमीनदारी अर्थव्यवस्था आणि सरंजामशाही विचाराचा प्रभाव, अशी भारताची आजची स्थिती आहे. सरंजामशाही विचार भारतामध्ये जातिव्यवस्थेच्या प्रभावामुळे अगदी हाडीमाशी खिळलेला आहे. त्यामुळे भांडवलदारीचा विकास झाला अथवा शेती भांडवली पद्धतीने झाली तरी जातिव्यवस्था प्रभावीपणे टिकून असल्यामुळे भारतात आधुनिक विचारसरणी रुजू शकली नाही. धर्मश्रद्धेचा प्रभाव कमी होऊ शकला नाही. जातिव्यवस्थेची संपूर्ण रचना उच्चनीचता, पवित्र अपवित्रता या

कल्पनेवर उभी आहे. पुन्हा त्याला काहींनी श्रम करणे योग्य, काहींनी श्रम करणे अयोग्य, मालमत्तेचा अधिकार काहीजणांना, काहींना मालमत्ता धारण करण्यास मनाई,अशा भौतिक आधाराची जोड आहे. संपूर्णपणे अवैज्ञानिक व अमानुष पातळीवर उभे असलेले हे जातिव्यवस्थेचे जोखड फेकून दिल्याशिवाय वैज्ञानिक आणि मानुष अशा विचारांचा प्रचार होणे, आणि अंधश्रद्धेच्या महत्त्वाच्या मूलाधाराला धक्का बसणे हे शक्य होणार नाही.

ही सर्व मांडणी महाराष्ट्रात फुले, विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केली आहे. रूढी, अंधश्रद्धा, आंधळ्या समजुती, चुकीच्या परंपरा या सर्वांना अशा शास्त्रीय पायावर तर्क-कठोरपणे आणि कृतिशीलतेने विरोध करणाऱ्या या महापुरुषांची नावे सध्या उठता बसता घेतली जातात. परंतु त्यांच्या विचारांची मात्र पिछेहाट होत आहे की काय याची शंका यावी अशी परिस्थिती आहे.

परंतु पिछेहाट ही तशी काही महाराष्ट्रातील वा भारतातीलच गोष्ट नाही. जगभर या ना त्या प्रमाणात ती जाणवत आहे. त्याची कारणे स्थलकालानुसार वेगवेगळी आहेत. विज्ञानाच्या स्पर्धेत सगळ्या जगाच्या पुढे धावणाऱ्या अमेरिकेतही भविष्य, गूढ मानसिक शक्ती, पिरॅमिड पॉवर, उडत्या तबकड्या सायकिक सर्जरी (मानसिक सामर्थ्याच्या आधारे शस्त्रक्रिया) युरी गेलरचे दैवी सामर्थ्य अशा गोष्टींची चलती आहे. औषधे, मानसोपचार यावरला लोकांचा विश्वास कमी झाला आहे. दैनिके भविष्यांना जास्त जागा देऊ लागली आहेत. दैवी शक्तीबद्दलची उत्सुकता वाढते आहे. भांडवलशाहीच्या एका वेगळ्या टप्प्यावरच्या विकासाने हे घडते आहे. अनेक गोष्टी आवाक्याबाहेर गेल्यासारखे जाणवते आहे. कुणीतरी अद्भुत व्यक्ती वा विचार लोकांना अशा अवस्थेत हवा हवासा वाटतो. अशा विचारांच्या पाठीमागे जावयाचे म्हणजे स्वाभाविकच चिकित्सा आणि विवेकाशी फारकत घेणे झाले.

अर्थात तज्ज्ञांचे संघ, शास्त्रज्ञांच्या परिषदा, मानसोपचार संमोहन तज्ज्ञ, जादूगार अशी अनेक मंडळी याच्या विरोधातही उभी राहत आहेत. या विरोधातून सर्व जगभरच याबाबत मतामतांचा एक गलबला या क्षेत्रात चालू आहे. काहींना हा विरोध अनावश्यक वाटतो. तर काहींना वाटते या प्रयत्नांचा उपयोग नाही. कारण संबंधितांनी मनाची कवाडेच बंद केलेली असतात. तेव्हा पालथ्या घड्यावर पाणी ओतण्यात काय मतलब ? मात्र काही कारणासाठी याविरुद्ध लढा

पुकारायलाच हवा, असे वाटणारेही अनेक आहेत. ज्या देशात दूरचित्रवाणीचे माध्यम शासकीय नाही. त्या ठिकाणी अशा दैवी सामर्थ्याचे आणि चमत्कारांचे प्रयोग दूरचित्रवाणीवरही दाखविले जातात. शस्त्रक्रिया सर्जरीसारख्या बनावट उपायाकडे या प्रचारातून रुग्णाला ढकलणे हा त्याच्या जिवाशी खेळ होतो. म्हणून त्याला विरोध केला जात आहे. उद्या या स्वरूपाचा भ्रम समाजात पसरवला गेला तर शास्त्रीय विकासासाठी असलेला पैसा ही या असल्या संशोधनासाठी वळविण्याची मागणी पुढे येईल, अशी भीती व्यक्त केली जात आहे. अंधश्रद्धेच्या जोखडातून मुक्त करणे कसे गरजेचे आहे याचे एक उदाहरण बघण्यासारखे आहे. काही वर्षांपूर्वी लंडनच्या संडे टेलिग्राफमध्ये नायजेरियाच्या ॲन्थनी ओकेचा (Anthony Okotche) यांनी लेख लिहिला होता. आफ्रिकन लोकांवरचा मॅजिकचा प्रभाव लक्षात घेऊन त्याचा उपयोग आफ्रिकेतील रहिवाशांच्या गळी आपले तत्त्वज्ञान उतरण्यासाठी कसा केला जातो याचे उदाहरण त्याने दिले आहे.

राजकीय प्रचारकांकडेच मुळी कवटी. हुबेहूब सापासारखे दिसणारे प्लॅस्टिकचे साप आणि गूढता वाढविणाऱ्या अनेक गोष्टी दिल्या जात. कवटी टेबलावर ठेवून लोकांना जमवले जाई. कवटीतून आवाज येई. "मी तुमचा पूर्वज बोलतोय. आजच्या आज अमुक अमुकाचा खून कर नाही तर मी तुला आणि तुझ्या वंशाला बरबाद करीन." भांबावलेले, भेदरलेले, अंधश्रद्ध रहिवासी या आदेशाचे पालन करीत. हा आवाज कवटीखालच्या मायक्रोफोनमधून येतो हे त्यांना कळणे शक्य नव्हते. अंधाऱ्या खोलीत नाचणारे हाडाचे सापळे, धुपाच्या धुरातून दिसणाऱ्या आकृती ही सारी चलाख बनवाबनवी. ह्या आफ्रिकन अडाण्यांच्या लेखी ब्लॅक मॅजिक करणारा एखादा कार्यकर्ता करे.

एखाद्या अंधश्रद्धेला खतपाणी घालणे चालू झाले की मग न सिद्ध झालेले सिद्धान्त मांडणे. सत्याची मोडतोड, लबाडी, पुरावे लपविणे, बनवाबनवी, रचलेल्या गोष्टींचा प्रसार,ही सगळी ढोंगबाजी चालू होते. समाज-मानसात प्रयत्नवादाऐवजी दैववादाचे वातावरण पसरते. प्रश्नांची दैववादी उत्तरे ठोकरून प्रत्यक्ष व्यवहाराच्या परिस्थितीचा अभ्यास करून उत्तरे शोधून काढणे, हे प्रयत्नवादाचे काम आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन हा त्यासाठी पायाभूत आहे. यासाठी तिहेरी प्रयत्न हवा. एकतर आपल्या मनावर परंपरेने लादलेली दैववादी गुलामगिरी लाथाडून देण्याचा पक्का निर्धार हवा. तसा प्रयत्न हवा. दुसरे म्हणजे विज्ञानाच्या

प्रकाशात वाटचाल करताना जी उत्तरे स्वच्छ दिसतात त्यांचा स्वीकार आणि पुढच्या दृष्टीने निश्चयी आगेकूच हवी. उदाहरणार्थ, पटकीने एकेकाळी हजारो माणसे मरत. पटकी जावी म्हणून मरीआईचा गाडा ओढला जाई. आज यातील हास्यास्पदता सर्वांनाच समजली आहे. पण कॅन्सर बाबत अशीच गूढता आज नाही काय ? निश्चय असा हवा की एक दिवस त्यावरही विजय मिळविला जाईल. त्यानंतरही अज्ञात रस्ता राहीलच. पण वाटचालीची दिशा आणि डोळस प्रयत्न यामुळे या अज्ञाताबाबत गूढता आणि दैववाद याचा स्वीकार केला जाणार नाही.

बेकारी, महागाई यांसारख्या गोष्टींचा तर दैवाशी काहीच संबंध नाही. त्या मानवनिर्मित, व्यवस्थानिर्मित आहेत. कोणत्याही देवाला नवस न करता आणि दैवाला दोष न लावता त्या संपवता येणे शक्य आहे.

बुद्धीला प्रमाण मानून, चिकित्सक विचाराने आणि विवेकी निर्धाराने हा तिहेरी प्रयत्न करावयास हवा. उद्याची मानवाच्या प्रगतीची वाट त्याच्यातूनच सापडणार आहे.

* *

दोन

बुवाबाजीविरुद्ध बंड

आपण एका अज्ञाताच्या हातातले बाहुले आहोत. त्याच्या कृपाप्रसादाने आपले जीवन उद्धरून जाते. त्याच्या संताप रागाने आपले आयुष्य मातीमोल होते. असे माणसाला मनाच्या एका कोपऱ्यात सतत वाटत असते. माहीत नसलेल्या या अज्ञाताचा वेध घेण्याचे ते समजावून घेण्याचे त्यामध्ये मंगल घडावे आणि अमंगल टळावे यासाठी प्रयत्न करावयाचे काम घाऊकपणे काहींनी आपल्या हातात घेतलेले असते. त्याचा धंदा मांडलेला असतो. या मंडळींना आपण बुवा, बाबा, महाराज म्हणतो. एखाद्या कमिशन एजंटाने दलालीवर काम करावे त्याप्रमाणे माणसाच्या चिंता, दुःख, काळजी निवारण्याचे काम ही मंडळी करत असतात. शेवटी बुवाबाजी हा एक बरकतीचा धंदा बनतो आणि त्याला आवश्यक असलेली सर्व कौशल्ये मग आत्मसात केली जातात.

मागणी तसा पुरवठा हे तत्त्व या बुवाबाजीला पण लागू पडते. एखादे गरिबाचे मूल खेडेगावात आजारी पडले तर त्याला गावच्या डॉक्टरांकडे नेऊन सुई मारून आणली जाते. शहरामध्ये एखाद्याचे त्याच रोगाने आजारी पडलेले मूल स्पेशालिस्टला दाखवले जाते आणि मुंबईत एखाद्या धनाढ्याच्या मुलाला तोच आजार झाला तर जसलोक इस्पितळातील वैद्यकीय सेवा त्याच्यासाठी हजर असते. बुवांचेही तसेच आहे. खेडेगावातल्या लोकांना, त्याचे भविष्य सांगायला काळजी दूर करायला, मंत्रतंत्र सुचवायला, रस्त्याने भविष्य सांगणार, ज्योतिष

सांगणार, म्हणून फिरणारा कुडमुड्या ज्योतिषी असतो. पोपटाचा पिंजरा घेऊन बसणारा कोणी असतो. हातामधून हळदी-कुंकू काढून दाखवणारी बाई असते. शिकल्या सवरल्या शहरी मध्यम वर्गासाठी कुंडल्या असतात. कोणी हात बघून भविष्य सांगणारा, कोणी काजळाच्या डबीत बघून, रुद्राक्षाची माळ बघून तर कोणी स्फटिकाच्या लोलकातून भविष्याचा वेध घेतो. सगळ्यात प्रतिष्ठित पद्धती भृगुसंहितेची. भृगुऋषींनी म्हणे जगामध्ये आजपर्यन्त जन्माला आलेल्या आणि अजून जगाच्या अंतापर्यन्त जन्म घेणाऱ्या सर्व बालकांचे भविष्य तांब्यांच्या तीन चार हजार पट्ट्यांवर कोरून ठेवलेय. आपले काम फक्त ते वाचून बघण्याचे. अर्थातच त्याचे वेगळे शास्त्र आहे आणि फीही तशीच जबर आहे. भृगुसंहिता वाचण्याची ख्याती असलेल्या एका महाराजांनी मला एकदा चांगलेच चमकावले होते. मी त्यांना बिनतोड प्रश्न टाकल्यासारखे विचारले "या अवघ्या तीन-चार हजार धातूच्या पट्ट्यांवर जगातल्या सर्वांचे भविष्य लिहिलंय हे काही पटण्यासारखं नाही. हे कसं शक्य आहे?" महाराजांनी माझ्याकडे एकदा दृष्टिक्षेप टाकला, माझ्या अडाणीपणाची कीव केली. आणि म्हणाले, "बाळा, ज्या महान ऋषींना सारे भूत भविष्य कळत होते. त्यांना हे विचारावयास पुढे कोण कोण येणार हे साधे समजत नव्हते असे का तुला वाटते? जे भविष्य विचारावयास येणार आहेत. त्यांचेच भविष्य त्यांनी बिनचूक लिहून ठेवले. हीच तर त्यांची थोरवी आहे. आता बोल."

बडेबडे व्यापारी, कारखानदार, राजकारणी, या सगळ्यांना लागतात कोणी सत्यसाईबाबा, महेश योगी, हरेकृष्ण हरे राम पंथी वा आचार्य भगवान रजनीश. सत्यसाईबाबा या भक्तांच्यासाठी हवेतून हात फिरवून क्षणार्धात त्यांच्या हातावर विभूतीपासून ते रत्नहारापर्यन्त काहीही ठेवतात. हरे कृष्ण हरे रामाची ध्यान मंदिरे असतात पंचतारांकित हॉटेलांना लाजवणारी. तर भगवान रजनीश संभोग व समाधी यांची संभोगातून समाधीकडे अशी जुळणी करून देतात! पैशाच्या, स्पर्धेच्या, राजकारणाच्या, जीवनाच्या जीवघेण्या स्पर्धेत या सर्वांमुळे थोडा मानसिक आधार सापडतो.

अगतिक माणसाला तथाकथित दिलासा देण्याचे सामर्थ्य हेच बुवाबाजीचे खरे यश असते आणि रहस्य असते. समोरच्या माणसाचे मन वाचता येणे, त्याच्या व्यथा वेदना 'ता' म्हणता ताकभात अशा ओळखता येणे. आजुबाजूच्या परिस्थितीचे निरीक्षण करून बहुधा बरोबर ठरतील असे निष्कर्ष त्यातून काढणे,

बुवाला गरजेचे असते. माझ्या दवाखान्यात येणाऱ्या एका कुडमुड्या जोश्याची ख्याती 'बाई माणसाचे मनातले अचूक ओळखणारा' अशी होती. मी त्याला त्याच्या यशाचे रहस्य विचारले. पहिल्यांदा त्याने थापा मारून पाहिल्या. मग मी खनपटीच बसल्यावर म्हणाला, 'डॉक्टर, साधं आहे. आम्ही बाई माणसाच्या घरात जाऊन आम्मा म्हणून हाक घातली की, बाई पहिल्यांदा डोकावते. आले हं म्हणून हातातले काम संपवून वा आवरून पाच मिनिटांत बाहेर येते. तोपर्यन्त आम्ही बघतो. घराच्या भिंतीवर नवरा-बायकोचा फोटो असतो. बऱ्याच वेळा त्याखाली तारीख पण असते. मग आम्ही बघतो घरात कुठे लहान मुलाचा फोटो दिसतो का? तो नसला तर घरात कुठे मुलाची खेळणी दिसतात का? घर मुलाने खेळून विस्कटलेले दिसते का नीटनेटके? यानंतर घरात वा बाहेर दांडीवर लहान मुलाची अंगडी-टोपडी दिसतात का? हे पाहतो, आणि कुठेच काही दिसले नाही तर लगबगीने आतल्या खोलीतून बाहेर येणाऱ्या बाईला म्हणतो, 'बाई, काही काळजी करू नकोस, आवंदा तुला नक्की मुलगा होईल.' ती बाई म्हणते, 'कसं माज्या मनातलं वळकलसं बाबा.' मग पुढचा धंदा कसा सुरळीत पार पडतो.

एखाद्या चतुर व्यापाऱ्याने गिऱ्हाईक पटवणे आणि बुवा, ज्योतिषी, तांत्रिक यांनी आपले गिऱ्हाईक गटविणे यात तसा काहीच फरक नाही. दोन्ही धंदेच आहेत. आणि त्यासाठीचे आवश्यक पायाभूत कौशल्य दोन्हीमध्येही असावे लागते.

या कौशल्याला कुठल्या तरी अमानवी शक्तीची झालर असणे अत्यावश्यक असते. बहुतेक वेळा ही झालर दैवी कृपेने साध्य झालेल्या एखाद्या चमत्काराच्या स्वरूपात असते. चलाखीचा दर्जा, आणि समोरचे भक्तगण वेगळे असले तरी चमत्काराचा प्रकार थोड्या फार फरकाने तोच असतो. सातारा जिल्ह्यातील फलटण जवळच्या तरडगावचा विलासबाबा हातातून काढायचा, यज्ञ करताना पाण्याने अग्नी पेटवायचा, आणि तोंडातून शिवलिंग बाहेर काढायचा तर एखादा सत्यसाईबाबा हातातून नुसता अंगाराच नव्हे, तर चांदी सोन्याच्या अंगठ्या, सोन्याची लॉकेट्स आणि रत्नांचे हारही काढून आपला प्रसाद म्हणून आजही देतो. कुठल्याच कष्टमला ं कधी या सिद्धांची चौकशी करावीशी वाटली नाही. अर्थात साईबाबांचा कृपाकटाक्षही भक्तगणांच्या श्रेणीप्रमाणे बहुधा बदलत असतो. सामान्य जनांना मिळतो चिमुटभर अंगारा.

व्यापारी, कारखानदार यांच्यासाठी असतात छोट्या मोठ्या अंगठ्या आणि नामदार, मुख्यमंत्री, संस्थानिक, बडे परदेशी यांच्यासाठी हवेतून हात फिरवून निघतात हिऱ्यांचे हार. चमत्काराचे दैवी सामर्थ्य हे या बाबांच्यावर असलेल्या दैवी वरदहस्ताचे लक्षण मानले जाते. आणि तेच सामर्थ्य आपल्याला संकटातून तारून नेईल असे मानायला,गांजला गेलेला भक्त तयार होतो.

चमत्काराबरोबरच एखादी सिद्धी वा वेगळेपण हेही साक्षात्काराचे लक्षण मानले जाते. मग एखाद्या बारामतीच्या गोडबाबाला हात लावेल ती वस्तू गोड करण्याची किमया प्राप्त झालेली असते, तर एखादा हनुमान बाबा हा आपल्याला प्रत्यक्ष हनुमानाची शेपटी आल्याचा दावा करतो. हे महाराष्ट्रात आणि भारतातच घडते असे नाही. इंग्लंडच्या टी. व्ही. वर कोणी युरी गेलर आपल्या तथाकथित परामानस शक्तीचे काही चमत्कार दाखवतो. आणि काही काळ तरी तमाम मंडळींना मामा बनवतो. चिकित्सकतेशिवाय सगळ्याकडे बघणारा जनता जनार्दन हे सारे खरेच मानून चालतो.

काही बाबा आपले वेगळेपण अघोरी साधनेने सिद्ध करतात. नेर्ले गावातल्या जंगली महाराज बाबांची पंचाग्नी पूजा या प्रकारातील होती. तीन फूट त्रिज्येच्या वर्तुळाच्या चारी बाजूंनी अग्नी पेटवावयाचा व त्या रसरसत्या इंगळ्याच्या मध्यभागी उन्हाळ्याच्या दिवसांत भर दुपारी बारा वाजता साधनेला बसावयाचे. साधनेला बसणाऱ्या मुली असायच्या अविवाहित. पंधरा-सोळा वर्षांच्या तरुणी. मोठ्या भक्तिभावाने त्या हे करायच्या. या पूजेला स्वाभाविकपणेच हजारोंनी समुदाय जमायचा आणि तो जंगली दासबाबांचा भक्तही बनायचा.

खरे तर चमत्कार नसतातच. चमत्कार असतात एक तर निव्वळ बनवेगिरीचा मामला,अथवा न उलगडलेले विज्ञानाचे रहस्य. फसवाफसवीच्या या प्रकाराला डॉ. कोवूरांनी पूर्वीच आव्हान देऊन ठेवलंय. खाली दिलेल्या चमत्कारांपैकी कोणताही चमत्कार कोणीही करून दाखवला तर त्या व्यक्तीला डॉ. कोवूर एक लाख रु. बक्षीस देतील. मात्र हे चमत्कार डॉ. कोवूर व त्यांचे सहकारी यांच्या समोर व एका उभयपक्षी मान्य अशा व्यासपीठावर झाले पाहिजेत व त्यात काही हातचलाखी नाही ना याची तपासणी करण्याचा अधिकार डॉ. कोवूर यांना असला पाहिजे.

१. लखोटाबंद चलनी नोटेचा अनुक्रमांक ओळखणे.

२. चलनी नोटेची अचूक प्रतिकृती निर्माण करणे.

३. पाय न हलवता जळत्या निखाऱ्यांवर अर्धा मिनिट स्थिर उभे राहणे.

४. डॉ. कोवूर यांनी सांगितलेली वस्तू शून्यातून निर्माण करणे.

५. मनःशक्तीच्या साहाय्याने एखादी वस्तू हलवून अथवा वाकवून दाखविणे.

६. अतीद्रिंय शक्तीच्या साहाय्याने (टेलिपथी) दुसऱ्या व्यक्तीच्या मनातील विचार ओळखणे.

७. प्रार्थना, आत्मिक शक्ती, दृढश्रद्धा, पवित्रतीर्थ, विभूती, पवित्र वाळू इ. च्या साहाय्याने,कापलेला अवयव शरीरावर किमान एक इंच वाढवून दाखविणे.

८. योगशक्तीने हवेत अधांतरी तरंगणे.

९. योगशक्तीने हृदयाचे ठोके पाच मिनिटे बंद करणे.

१०. योगशक्तीने तीस मिनिटे श्वास बंद करणे.

११. पाण्यावर चालणे.

१२. एके ठिकाणी शरीर सोडून त्याच वेळी दुसऱ्या ठिकाणी अवतीर्ण–दृश्य होणे.

१३. भविष्यातील घटना ओळखणे.

१४. योगसमाधी अथवा भावातीत ध्यानधारणेने 'ज्ञानप्राप्ती' करून दाखवणे अथवा विचारशक्ती विकसित करणे.

१५. दैवी शक्ती अथवा भुताचा संचार झाल्याचा परिणामी किंवा, पुनर्जन्म झाल्यामुळे,अनोळखी भाषेत बोलणे, अथवा अनोळखी भाषेचा अर्थ सांगणे.

१६. छायाचित्र घेता येईल असे भूत हजर करणे.

१७. छायाचित्राच्या निगेटीव्हमधून अदृश्य होणे.

१८. कुलूपबंद खोलीतून अद्भुतशक्तीच्या साहाय्याने बाहेर पडणे.

१९. दैव शक्तीने एखाद्या पदार्थाचे वजन अथवा आकार वाढविणे.

२०. लपविलेली वस्तू शोधून काढणे.

२१. पाण्याचे पेट्रोल अथवा दारूत रूपांतर करणे.

२२. दारूचे रक्तात रूपांतर करणे.

२३. दहा व्यक्तींच्या ठश्यांवरून अथवा, मिनिटापर्यंत अचूक नोंदलेली जन्मवेळ व अक्षांश रेखांशासह जन्मठिकाण देणाऱ्या जन्मपत्रिकांवरून त्या व्यक्ती जिवंत आहेत की मृत, स्त्री की पुरुष हे ओळखणे. पाच टक्क्यांपर्यंत चूक उत्तरे देण्याची परवानगी.

डॉ. कोवूर यांनी हाताळलेल्या काही मनोरुग्णांच्या केसेसवर आधारित 'पुनर्जन्म' आणि 'मऊ पिरवी' या चित्रपटांच्या चित्रीकरणासाठी डॉ. कोवूर १९७२ मध्ये भारतात आले होते. त्या वेळेस या आव्हानाला भारतात बरीच प्रसिद्धी मिळाली.

कोवूरांचे आव्हान जाहीर झाल्यापासून त्यांच्याकडे अगणित पत्रांचा पूर वाहू लागला. त्यातील बहुसंख्य पत्रे ही 'बाबा' किंवा त्यांचे भक्तगण यांच्याकडून आलेली असत आणि त्यांत अतिनैसर्गिक शक्तींचे अस्तित्व आम्ही सिद्ध करू असा दावा केलेला असे. त्याच वेळी अनेक वृत्तपत्रांतून स्वतःच्या दैवी शक्तीच्या बढाया मारणारे लेख प्रसिद्ध झाले. त्यांत डॉ. वडलामुदी (डेक्कन हेरॉल्ड) संत तीर्थंकर (हिंदू आणि दि टाइम्स ऑफ सिलोनमधून) आर. पी. तिवारी (इंडियन एक्सप्रेस आणि भारत ज्योतीमधून) आणि कलना येथील एक अनामिक (अमृत बझार पत्रिका) इत्यादी व्यक्ती होत्या. या व्यक्तींनी डॉ. कोवूरांचे आव्हान स्वीकारण्याची तयारी दाखविली होती. या सर्व आव्हान-प्रतिआव्हानांना निश्चित स्वरूप देण्यासाठी डॉ. कोवूरांनी खालील योजना जाहीर केली.

कोवूरांचे आव्हान स्वीकारण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांनी कोवूरांच्या मुंबईतील वा बिहारमधील प्रतिनिधीकडे रु. १०००/-अनामत रक्कम ठेवावी. ही रक्कम मिळाल्यानंतर तो प्रतिनिधी त्या सिद्धपुरुषाचा खरेखोटेपणा तपासण्यासाठी एक प्राथमिक कसोटी घेईल. त्या सिद्ध पुरुषाने त्याला दाखविलेल्या एक रुपयाच्या नोटेची प्रतिकृती निर्माण करणे किंवा त्या प्रतिनिधीच्या खिशात ठेवलेल्या बंद लखोट्यातील नोटेचा नंबर ओळखणे, अशा स्वरूपाची ही कसोटी असेल. यांपैकी कोणत्याही एका कसोटीत यशस्वी होणाऱ्या सिद्धपुरुषाला अनामत रक्कम परत दिली जाईल.

ढोंगी बगळ्यांनी निष्कारण वेळ खाऊ नये व त्यांना दूर ठेवता यावे म्हणून ही प्राथमिक कसोटीची अट घालण्यात आली होती.

ही अट भारताच्या व श्रीलंकेच्या वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होताच या तथाकथित सिद्धपुरुषांची पोकळ बडबड बंद पडली. सत्यसाईबाबा, नीलकांतबाबा, पंड्रिमलै स्वामीगल, आचार्य रजनीश, वडलामुदी, तीर्थंकर, तिवारी, दत्ता बाळ, गुरुदेव मुक्तानंद, निर्मलादेवी, त्रिप्रचार योगिनी, पूज्य दादाजी, आनंदमूर्ती, गुरुमहाराजजी आणि इतर बाबा लोकांनी केलेली हातचलाखी डॉ. भगवंतम् वा

गव्हर्नर के. के. शहासारख्या माणसांनी आंधळेपणाने कितीही पाठिंबा दिला तरी ' चमत्कार ' ठरणार आहे थोडीच ?

मात्र सरते शेवटी डॉ. कोवूरांचे हे आव्हान साईकृष्ण या बालयोग्याच्या वतीने स्वीकारणारी एक व्यक्ती निघाली. त्याची कथा उद्बोधक व मनोरंजक आहे.

कर्नाटकातील पांडवपूरचा किटी नावाचा सहा वर्षांचा मुलगा एक दिवस ' साईकृष्ण ' बनला. हा मुलगा भगवान श्रीकृष्णाचा अवतार असून शून्यातून वस्तू निर्माण करण्याचा चमत्कार तो करून दाखवतो असा दावा त्याचे आईवडील व सत्यसाईबाबा करीत. साईकृष्णाचे आईवडील व इतर साईबाबा-भक्त रोज साईबाबांचे भजन म्हणू लागताच साईकृष्ण एकदम समाधिस्थ होतो आणि आईच्या मांडीवर झोपी जातो, असेही म्हटले जात असे. तो आईच्या मांडीवर पहुडलेला असता साईबाबांचे फोटो, साईबाबांची पदके (जर्मनीत बनविलेली), विभूती, मध, चलनी नोटा इत्यादी वस्तू शून्यातून त्याच्या शेजारी अवतीर्ण होत.

अतींद्रिय, गूढ वा अतिनैसर्गिक शक्तीने चमत्कार करून दाखविण्यास डॉ. कोवूरांनी जाहीर केलेले एक लाख रुपयांचे आव्हान बेंगलोरचे एक डॉ. जी. वेंकटराव यांनी साईकृष्णाच्या वतीने स्वीकारले. इंडियन रॅशनॅलिस्ट असोसिएशनकडे या डॉ. कोवूरांच्या भारतातील प्रतिनिधी संस्थेकडे एक हजार रुपये अनामत रक्कम भरून त्यांनी डॉ. कोवूरांना या ' अद्भुत मुलाची ' तपासणी करा व एक लाख रुपये द्या, असे आव्हान दिले. डॉ. कोवूरांना उद्देशून लिहिलेल्या २४ सप्टेंबर १९७५ च्या पत्रात डॉ. राव म्हणतात, 'आमचा हा ' अवतारी मुलगा ' त्याच्या शरीरातून विभूती, कुंकू, मध वगैरे गोष्टीच निर्माण करतो असे नाही; तर बंद लखोट्यातील चलनी नोटेचा क्रमांकदेखील तो ओळखू शकतो. त्याच्या दृष्टीने या साऱ्या थिल्लर गोष्टी आहेत. तुम्ही जेव्हा त्याच्या अद्भुत सिद्धीचा स्वतः अनुभव घ्याल तेव्हा तुमची खात्री पटेल, आणि मग तुम्हांला एक लाख रुपये मोजून द्यावे लागतील. मला या अवतारी मुलाने असे सांगितले आहे की, तुम्ही जगभर प्रसिद्धी मिळावी म्हणून धडपडत आहात. पण या प्रयत्नात तुम्ही आजवर लोकांकडून मिळवलेला सर्व आदर गमावून बसणार आहात,असे भविष्य त्याने वर्तविले आहे. तुम्हांला लवकरच फळे चाखायला मिळतील.'

डॉ. राव यांनी डॉ. कोवूरांचे आव्हान स्वीकारल्याची बातमी भारतातील

वृत्तपत्रांतून सर्वत्र प्रसिद्ध झाली आणि या नव्या अवतारी पुरुषाचा आशीर्वाद घेण्यासाठी लाखो भोळे भक्तगण साईकृष्णाकडे धावत सुटले. अर्थात भारतातील पत्रकारांना या साऱ्या प्रकाराबद्दल शंका होतीच. त्यामुळे बऱ्याच पत्रकारांनी हे आव्हान म्हणजे एक फसवणूक आहे, अशी त्याची बोळवण केली.

डॉ. कोवूरांच्या मदतीने जेव्हा कर्नाटक रॅशनॅलिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष प्रा. ए. एम. धर्मलिंगम् तपासणीसाठी काही पत्रकारांसमवेत डॉ. राव यांच्याकडे गेले तेव्हा मात्र डॉ. राव यांनी तपासणीला तोंड देण्याचे नाकारून माघार घेतली आणि एक हजार रुपयांच्या अनामत रकमेवर त्यांनी पाणी सोडले. साईकृष्णाचे वडील सेत्ताप्पा यांनी तर त्या मुलाच्या दैवशक्तीची तपासणी करू देण्यास नकार दिला. व आपण कोणा डॉ. राव यांना ओळखतच नसल्याचे आणि त्यामुळे आमच्या वतीने त्यांनी आव्हान स्वीकारण्याचा प्रश्नच उद्भवत नाही असे सांगितले. ते म्हणाले, 'माझ्या मुलाने' मला डॉ. कोवूरांच्या एक लाख रुपयाची गरज नाही असा निरोप डॉ. कोवूरांना देण्यास मला सांगितले आहे. त्यानाच (डॉ. कोवूरांना) जर काही पैशाची गरज असल्यास मला सांगा, मी निर्माण करून देईन असेही त्याने सांगितले आहे.

डॉ. कोवूरांच्या भारतातील बुवाबाजीविरोधी भाषणांच्या कार्यक्रमानंतर बंगलोर विद्यापीठाचे उपकुलगुरू अणुशास्त्रज्ञ डॉ. एच नरसिंहय्या यांच्या अध्यक्षते-खाली एक बाराजणांची समिती स्थापन करण्यात आली. भारतातील अवतारी पुरुषाच्या चमत्कारांची वैज्ञानिक तपासणी करणे हा या समितीचा उद्देश होता. या समितीमध्ये शास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ, मानसोपचारतज्ज्ञ, डॉक्टर, वकील आणि इतर तज्ज्ञ व्यक्तींचा समावेश करण्यात आला होता.

या समितीच्या काही सभासदांनी १५ जुलै १९७६ रोजी साईकृष्णाच्या घरी गुपचुप भेट दिली. तो गुरुवारचा दिवस होता. पांडवपूरमधील साईबाबांचे भक्त दर गुरुवारी तिथे साईभजन म्हणण्यासाठी जमत आणि त्या वेळी साईकृष्ण भक्तांसमोर चमत्कार करून दाखवतो, असे कळल्याने या समितीने भेटीसाठी गुरुवार निवडला होता. त्या दिवशी कसलाही चमत्कार न होता भजन संपले आणि भक्तगण उठू लागले. भक्तलोक उठत असतानाच समितीच्या एक सभासद व प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ डॉ.(श्रीमती) विनोद एन. मूर्ती यांच्या असे लक्षात आले की, साईकृष्णा त्याच्या चड्डीच्या कंबरपट्टयाशी काहीतरी चाळा करतो आहे. 'काय त्रास होतोय मुला? तुझं पोट दुखतंय का?' त्यांनी विचारले. 'हो' म्हणून त्याने

मान हलविली. त्याच्या चड्डीची नाडी घट्ट असल्यास सैल करावी म्हणून त्या पुढे झाल्या आणि त्यांनी त्याचा सदरा, बनियन वर केला. आणि काय चमत्कार? खाली बाहेर आला बनियनच्या घडीत लपलेला अंगारा!

अशा रीतीने या अवतारी मुलाचा अवतार त्याच्या भक्तगणांसमोरच समाप्त झाला. डॉ. कोवूरांच्या मृत्यूनंतर बी. प्रेमानंद– केरळ यांनी हे आव्हान पुढे चालू ठेवले. प्रेमानंदांचे आव्हानही गेल्याआठ वर्षांत कोणी स्वीकारलेले नाही. त्यांच्या दोन वर्षांपूर्वीच्या गाजलेल्या महाराष्ट्र विज्ञान यात्रेत वाईचे गूढविद्या संशोधन केंद्र चालविणारे संशोधक तयार झाले आणि मागे पळाले. तरडगावच्या (ता. फलटण, जि. सातारा) विलासबाबा मार्फत ॲड. अशोक निळे यांनी आव्हान स्वीकारतो असे पेपरात दिलेले मला सांगितले आणि लगेच टाकी तपशील ठरविण्याची वेळ येताच काढता पाय घेतला. अशा प्रकारचे चमत्कार शक्य आहेत, असा दावा करणाऱ्यांचे खुलासे दोन प्रकारचे असतात. दत्ता-बाळची अशी सविस्तर मुलाखत मी घेतली होती. ती साप्ताहिक माणूसच्या 'ज्ञान अज्ञानाच्या सीमारेषेवर' या विशेषांकात प्रसिद्धही झाली होती. त्यांनी हे स्पष्टीकरण दिले होते. त्याच्या मते असे चमत्कार करण्यामध्ये हजारात एखादा सच्चा असतो. बाकीची सारी भोंदुगिरी. पण या गोष्टी शक्य आहेत हे मात्र निर्विवाद. अदृश्य पिशाच्चांच्यावर ताबा ठेवणारे काही लोक असतात. त्यांच्याकडून ते आपल्या हातामध्ये या वस्तू आणवून घेतात. दुसरा पैलू अधिक महत्त्वाचा. प्रत्येक अणूची Electron, Proton, Neutron, अशी विशिष्ट रचना असते. त्या अणूचे स्वरूप त्यामुळे नक्की केले जाते. सिद्धी प्राप्त झालेला पुरुष आपल्या सामर्थ्याने या अणूचे विघटन करतो, स्वतःकडे आणतो आणि नंतर पुन्हा त्याचे संयोगीकरण करून वस्तू निर्माण करतो. This Universe is Porous हे विश्व छिद्रमय आहे. हा मान्य झालेला सिद्धान्त आहे. त्यामुळे या छिद्रातून वस्तू विघटित स्वरूपात स्वतःकडे आणणे त्याला शक्य होते. या प्रकारे दुसऱ्या कोणत्याही ठिकाणची कोणतीही वस्तू हातात आणणे शक्य आहे. यासाठी खर्च पडणारी शक्ती प्रचंड असल्याने केवळ अल्प प्रमाणातच या गोष्टी करता येतात.

प्रत्यक्ष प्रचितीच्या अभावी थोतांडापलीकडे या प्रमेयाची बोळवण दुसरी काय करणार? कोणतीही ज्ञात भौतिक शक्ती वापरल्याशिवाय एखादी टाचणीदेखील एक मिलिमीटरही इकडून तिकडे हालविता येणे शक्य नाही. जागतिक जादूगार संघटनेचेही असा चमत्कार करणाऱ्याला भले मोठे बक्षीस आहे. असे

दिवंगत जादूगार रघुवीर मला म्हणाले होते– एखाद्या पदार्थाचे मनःसामर्थ्याने त्याच्या मूलद्रव्यामध्ये विघटन करणे, स्थलांतर करणे आणि पुन्हा संयोगीकरण करणे ही तर कल्पनाशक्तीची एक अफलातून थाप म्हणावी लागेल.

माणसाच्या मनाचे मनोव्यापार अजूनही विज्ञानास पूर्णांशाने ज्ञात नाहीत. मेंदूतील अनेक जागांचे नेमके काम आणि सामर्थ्य याचे संशोधन आजही चालू आहे. योगसामर्थ्याने आपण मज्जासंस्थेच्या अज्ञात सामर्थ्यावर स्वामित्व मिळवतो, अशी हठयोगासारखी साधना करणाऱ्यांचा दावा असतो. शरीरातील वायु व इंद्रिये व मज्जारज्जू यांच्यावर स्वामित्व मिळवण्याने पाण्यावरून चालणे, भिंतीपलीकडचे पाहणे, मैलावरचे ऐकणे, किंवा वास घेणे या सिद्धी प्राप्त होतात. असाही त्यांचा दावा असतो.

योग हे शरीर व मन यांची समतोल अवस्था प्राप्त करून घेण्याचा प्रकार आहे. हे मान्य करावयास हरकत नाही; परंतु त्याच्यामुळे सिद्धी प्राप्त होतात असे मानावयास आधार नाही. काही वर्षांपूर्वी एका हटयोग्याने पाण्यावरून चालण्याचा जाहीर प्रयोग केला. ब्लिटझने त्याचा खूप गाजावाजाही केला होता. प्रत्यक्षात पाण्यावर पहिले पाऊल टाकताच स्वामी महाराज आत गेले. या आधी वा नंतरही योगसाधनेने येणाऱ्या अतींद्रिय शक्तीची चर्चा समाजात नेहमी चालू असते.

वस्तुतः कोण्या बुवा वा बाबांचे चमत्कार असोत वा कोणाला योगामुळे प्राप्त झालेले सामर्थ्य असो, लक्षात ठेवण्याची गोष्ट ही की, यापैकी काहीही अजून सिद्ध झालेले नाही. आपल्याला ही शक्ती मिळाल्याचा दावा जे करतात, ते त्याची वैज्ञानिक,वस्तुनिष्ठ चाचणी देण्यास कधीही पुढे येत नाहीत.

एका अर्थाने चमत्कार हे कधी सिद्ध होण्यासारखे नसतातच. चमत्कार सिद्ध करावयास सांगणे म्हणजे स्वतःला नेमकी किती बाजता झोप लागली हे स्वतः लिहून ठेवण्यासारखे आहे. झोप लागली असेल तर लिहून ठेवणे शक्य नाही आणि लिहून ठेवले तर त्या वेळी झोप लागलेली असणार नाही. चमत्कार सिद्ध झाले की ते चमत्कार राहत नाहीत. ती साधी वैज्ञानिक सत्ये बनतात. तो पर्यंत तो तथाकथित चमत्कार राहतो, कसोटी न घेतलेला सिद्ध न झालेला. एखाद्या अंगाऱ्यामुळे होतात असा दावा असेल आणि शास्त्रीय तपासणीनंतर त्या भस्मामध्ये वाय क्रोमोसोम वाढविण्याचे औषधी द्रव्य आहे, असे सिद्ध झाले तर तो चमत्कार राहत नाही. तर फक्त लोकांना ज्ञात नसलेले एक

अनावृत्त सत्य असते एवढेच. साध्या राखेपलीकडे कोणताच गुणधर्म ज्या अंगाऱ्यात नाही त्याच्या सेवनाने हटकून मुलेच होतात, असे सिद्ध होणे म्हणजे विज्ञानाचे ज्ञात नियम ओलांडणारा चमत्कार होणे असे होईल. हा आजतरी निव्वळ कल्पनाविलास आहे.

माणसे बुवाबाजीला शरण जातात ती केवळ या चमत्कार करणाऱ्याच्या सामर्थ्यामुळे आणि त्यामधले ढोंग उघडे पाडले की, माणसे त्यापासून दूर होतील असे समजणे मात्र निव्वळ वंचना ठरेल. केवळ विज्ञानाचा वाढता प्रसार हे बुवाबाजीवरचे उत्तर नाही. विज्ञानाच्या प्रसाराबरोबरच माणसाच्या जीवनातले भीतीचे साम्राज्यही वाढत चालले आहे. आणि त्याची कारणे इथल्या सामाजिक वस्तुस्थितीत आहेत. आज कसे बसे जेवावयास मिळते पण उद्या वाढत्या महागाईबरोबर ताटातले किती पदार्थ कमी होत जाणार हे माहीत नाही. मुलाचे शिक्षण पूर्ण झाले पण नोकरी कसली आणि कधी मिळेल याची कल्पना नाही. मुलगी लग्नाला आली आहे पण हुंड्यांचा बाजार झेपणार नाही. शेजारच्या चाळीतल्या बायकांना गुंडांनी अकारण छेडले. माझ्या बायकोवर ती पाळी येणारच नाही, याची शाश्वती नाही. शेजारच्या गावातील अल्पसंख्याकांची घरे पेटवली गेली. माझ्या घरादाराची राखरांगोळी होणारच नाही याची खात्री नाही. जीवनातले अस्तित्वाचेच असे अनेक प्रश्न अनेक अंगांनी अनुत्तरित असतात. एका अज्ञात भीतीने वेढलेले असतात.

सुशिक्षित समाजातही अंधश्रद्धाळूपणा फार मोठ्या प्रमाणात आहे यावरूनही केवळ अज्ञानाने हा प्रश्न निर्माण झालेला नाही हे लक्षात येईल. सुशिक्षित समाजातील व्यक्तीचे जीवनही अनियंत्रित सामाजिक परिस्थितीने वेढलेले असते. नोकरी मिळणे, ती टिकणे, बढती मिळणे, धंदा चालणे, इत्यादी सर्व बाबी वैयक्तिक प्रयत्नांनी कमाविलेले कौशल्य, बुद्धी, केलेले श्रम यापेक्षा अनियंत्रित सामाजिक शक्तींवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहेत. स्त्रीचे मनाजोगते लग्न ठरणे हे हुंडा, जातपात, खानदान या सर्वस्वी हाताबाहेरच्या गोष्टींवर अवलंबून राहते. मिळालेला नवरा कसाही असला तरी सुशिक्षित स्त्रीलादेखील मुकाटपणे सोसावा लागतो. त्याच्या बऱ्यावाईटपणावर सारे आयुष्य कसे जाणार हे ठरते. हा साराच खेळ मग नशिबाचा वाटू लागतो आणि सुशिक्षित स्त्रीयांमध्येही दैववाद रुजतो. कारण मन सतत दुबळे, संभ्रमित झालेले असते.

या मनाला एखादे सांत्वन हवे असते. अगतिकतेवर आधार हवा असतो.

आपल्या दुबळेपणाला संरक्षण देणारी एखादी शक्ती हवी असते. हातातून अंगारा काढणारा, दूरदृष्टीच्या योगसिद्धीने भिंतीपलीकडचे पाहणारा, मंत्राने अग्नी पेटवणारा बाबा, बुवा, महाराज या दुबळ्या मनांना हा आधार देतात. जादूगार हे सर्व प्रयोग याहीपेक्षा सफाईने करत असतो. पण जादूगार हा फसवणुकीचे झक्क खेळ करत असतो. आपण जादूचे प्रयोग बघायला तिकीट घेऊन जातो तेव्हा स्वतःची बघता बघता झालेली फसवणूक बघावयास जात असतो त्यामुळे रिकाम्या हॅटमधून जिवंत ससा काढणारा जादूगार हा आपल्या आनंदाचा, कौतुकाचा, रंजनाचा विषय असतो. पण तो कधीही पूज्य नसतो. तो आपल्या प्रश्नांची उत्तरे देणारा आहे असे आपण कधीही मानत नाही. मात्र हातातून विभूती काढणारा बाबा आपले भवितव्य बदलेल असे आपल्याला वाटते. योगसिद्धीने भिंतीपलिकडे डोकावणारा योगी महाराज अज्ञानाच्या भिंतीपलिकडच्या आपल्या भविष्यातही डोकावेल आणि सारे सुरळीत रांगेला लावून देईल, असा विश्वास आपल्याला वाटतो. एखादा माणूस चांगले भाषण देतो. म्हणून तो चांगले गाणे म्हणेल अथवा चांगले भरतनाट्यही करील असे आपण मानतो काय ? भाषण वेगळे आणि भरतनाट्य वेगळे. दोन्ही अगदी स्वतंत्र कला आहेत. हे आपण समजू शकतो. परंतु हातातून अंगारा काढणे आणि भक्ताचे संकट निवारण करणे याही अगदी वेगळ्या बाबी आहेत हे आपणाला का पटत नाही ? याउलट चमत्कार करणाऱ्या व्यक्तीला मानवी मन शरण जाते, कारण चमत्कार माणसाचे मन दुबळे, आंधळे आणि पांगळे करते.

बुवाबाजी बरोबरचे आपले खरे भांडण या ठिकाणी आहे. माणसाने स्वतःचे प्रश्न वास्तवात समजावून घेणे, ते सोडवण्यासाठी पुरुषार्थी झुंजणे हे माणसाचे माणूसपण आहे. हे माणूसपण चढत्या श्रेणीने प्राप्त करून घेणे हे तसे सोपे काम नाही. पण म्हणूनच परिवर्तनाच्या चळवळीपुढचे ते आव्हान आहे. माणसाला अगतिक करणाऱ्या या प्रश्नाची सोडवणूक आजच्या प्राप्त परिस्थितीत होणारही नाही. आणि एकूणच सर्व समाजव्यवस्था बदलल्याशिवाय या अगतिकतेवर प्रभावी उत्तरही मिळणार नाही. परंतु ते उत्तर आजच्या घडीला नाही म्हणून माणसाचा दुबळेपणा हा आपल्या धंद्याचा भाग बनविणे हे केव्हाही निषेधार्थच. माणसाच्या या दुबळेपणाचे स्वरूप समजावून घेणे, व्यक्तीला समजावून देणे, त्याला आत्मनिर्भर करणे, हे अंधश्रद्धाविरोधी लढ्याचे आद्य

कर्तव्य आहे आणि त्यासाठीची सुरवात ही बुवांची भोंदुगिरी, बाबांची बंडलबाजी आणि महाराज म्हणवणाऱ्यांच्या तथाकथित सिद्धी सामर्थ्य यांचे बिंतळ उघडे पाडून करावयास हवी.

* *

तीन

झपाटणे–देवाने आणि भुताने

भुताची आणि आपली गाठ लहानपणीच पडते. खेडेगावात असो वा शहरात, भुताच्या भयचकित करणाऱ्या गोष्टींनी रंगलेली रात्र न ऐकलेला माणूस विरळाच. माणसाचे शरीर हे वस्त्राप्रमाणे असते. आत्मा अविनाशी असतो ही आपल्याकडची ठाम समजूत. माणूस मरतो त्यातल्या अनेकांच्या वासना अतृप्त असतात. बाळंतपणात, रजस्वला असताना अपघात, आत्महत्या, यामुळे मृत्यू घडतो. विश्वासघाताने कुणी मारला जातो. अशा मृत व्यक्तींचा आत्मा भूतयोनीत प्रवेश करतो. इतरांना दृश्य वा अदृश्य स्वरूपात त्याचे अस्तित्व जाणवत राहते. भूत ही पितर गंधर्व यांसारखी एक मानवेतर योनी बनते. भुताची सावली पडत नाही. प्रतिबिंब दिसत नाही. पाय उलटे असतात. काहींना शीरच (डोके) नसते. तर काहींचे डोळे छातीवर असतात. खून झालेल्या ब्राह्मणाचा ब्रह्मसंबंध बनतो. धनलोभी ब्राह्मणाच्या भुताला ब्रह्मराक्षस म्हणतात. बाळंतपणानंतर दहा दिवसांत दगावलेल्या बाईची हडळ बनते. भूतभविष्य सांगणाऱ्या भुताला कर्णपिशाच्च म्हणतात. स्मशान, ओसाड घरे, पडक्या विहिरी, पिंपळ, पाणवठा ही भुतांची वसतिस्थाने. ही भुते मग आपले प्रताप दाखवतात. कुणाला झपाटतात. कुणाला बिघडवतात. झपाटणारा समंध पिवळा भात, उलट्या पऱ्याचं कोंबडं असा नैवेद्य घेतल्याशिवाय झाड (झपाटलेला माणूस) सोडत नाही. रामनामापुढे मात्र भुताचे काही चालत नाही.ते दूर पळतं....हे असे आपले शिक्षण आपोआपच

होऊन गेलेले असते. सर्व जगभरच या समजुती आढळतात. विज्ञानाने सिद्ध न झालेल्या या गोष्टींवर अज्ञान, भीती, मनोविकृती इत्यादी अनेक कारणांनी लोकांचा ठाम विश्वास असतो. काही जणांना भूत झपाटते, तर काही जणांच्या देव वा देवी अंगात येते. भूत असो वा देव, अंगात शिरून व्यक्तीचे वाटोळे करण्याबाबत त्यांची संयुक्त आघाडी असते. या आघाडीमुळे निर्माण झालेली बिघाडी म्हणजे नेमके असते तरी काय ?

मनुष्याला भूत लागते वा देव अंगात येतो म्हणजे त्याचे व्यक्तिमत्त्व दुभंगते. माणसाचे मन असते हिमनगासारखे. हिमनगाचा एक अष्टमांश भाग पाण्यावर असतो आणि सात अष्टमांश भाग असतो पाण्याखाली. तसे माणसाचे ई व्यक्त मन दैनंदिन जीवन व्यवहार बघत असते. आणि अनेक इच्छा-आकांक्षा, व्यथा-वेदना, आशा-निराशा या ई मनात दडवून टाकते. व्यवहारी जगात व्यवहाराने वागायचे तर हे अटळ असते. आपली भांडणे, कटू अनुभव, प्रेम, द्वेष, अपेक्षा-भंग यांचा ताण सतत वागवत जगणे, इष्ट नसते. शक्य नसते. मग आपल्या ई अंतर्मनात आपण त्यांना गाडून टाकतो. आपले बाह्यमन अंतर्मनातील हा सुप्तावस्थेमधला कल्लोळ नियंत्रित करते. बाह्यमनाने केलेले ा अंतर्मनाचे नियंत्रण अनेक कारणांनी सुटू शकते. माणूस आजारी असतो. चिंताग्रस्त असतो. एखाद्या सततच्या दुखण्याने भयभीत झालेला असतो. आपल्या प्रश्नाचे उत्तर न मिळाल्याने मनावर ताण घेऊन वागत असतो.

आपल्या देशात स्त्रिया सतत तणावाखाली वावरत असतात. त्यामुळे अंगात येणाऱ्या व्यक्तींमध्ये स्त्रियांचे प्रमाण अधिक असते. कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक असे अनेक ताण प्रदीर्घकाळ त्यांच्यावर असतात गरीब व मागास वर्गीयात तर स्त्रिया सर्वस्वी परावलंबी असतात. या सर्वांमुळे स्त्रियांच्यात अंगात येण्याचे प्रमाण जास्त आढळते. अंगात येणाऱ्या वा झपाटल्या जाणाऱ्या व्यक्ती या सामान्यपणे दुसऱ्यांच्या तंत्राने चालणाऱ्या असतात. स्वतः विचार करणे, स्वतःचा निर्णय स्वतः घेणे, त्यांना जमत नाही. दुसऱ्यांकडून मिळालेली सूचना अशी व्यक्ती पटकन् स्वीकारते. अंगात येण्याचा प्रकार चालू होतो. त्याच्या आसपासच्या काळात व्यक्तीला मोठा मानसिक वा शारीरिक धक्का बसलेला असतो. व्यक्ती मनाने हळवी असते. त्या व्यक्तीचा अंगात येणे, संचार होणे, अशा संचार अवस्थेत लोकांना सल्ला व उपचाराबद्दल माहिती देण्याची क्षमता येणे, या सगळ्या बाबींवर फार पक्का विश्वास असतो. अशा मनोवस्थे-

मधल्या व्यक्तीला एखादा साधा आघातही मनाचा तोल ढासळून टाकण्यासाठी पुरेसा असतो. मग हा आघात चित्राविचित्र सावल्यांचा असो, अमावस्या, पौर्णिमा या दिवसांच्या वातावरणाचा असो, पाणवठ्यावरून एकटेच परत येताना दाटून येणारी, गूढ वाटणारी संध्याकाळ असो वा एखादी आरोळी वा किंकाळी असो. व्यक्तीच्या मनाचा तोल गेला की त्याचे वागणे, बोलणे बदलते, आणि त्याला अंगात आल्याचा, झपाटल्याचा शिक्का बसतो.

आपल्या देशात परंपरागत उपचार पद्धतीचा पगडा लोकांवर अजून खूप आहे. आधुनिक उपचार पद्धतीचा पुरेसा प्रचार झालेला नाही. त्यामुळे अंगात येण्याचा हा प्रकार आपल्याकडे मोठ्या प्रमाणात आढळून येतो. अनेक मागास व विकसनशील देशांतही तो तसा आढळतो. सर्वसामान्य लोकांच्या मते, अंगात येणे म्हणजे एका व्यक्तीच्या शरीरात दुसऱ्या (मृत) व्यक्तीचा संचार होणे. आणि ही पहिली व्यक्ती त्या परकीय आत्म्याची ताबेदार बनते. काही लोकांच्या अंगात दैवी शक्तीचा मग ती मांढर देवी असो, यल्लमा असो वा एखादा होऊन गेलेला बाबा, बुवा, गुरू असो, यांचा संचार होतो.

अशा व्यक्तीची मनोवस्था बदलते. ती उद्दीपित बनते वा उदासीन बनते. ती गाऊ लागते. बडबडू लागते. असंबद्ध वर्तन करू लागते. कधी कधी सामान्य माणूस थकून जाईल अशी शरीरश्रमाची कामे करू लागते. तिच्या चेहऱ्यात बदल होतो. आवाजात, बोलण्याच्या तपशिलात बदल होतो. वागणे बदलते. फीट आलेल्या माणसाप्रमाणे तिच्या हातापायांची हालचाल होते. अंगात आले म्हणजे स्वतः भोवती गिरक्या घेणे, डोळे मिटणे अनैसर्गिक अवस्थेत बराच वेळ बसून राहाणे चालू होते. कधी-कधी खाणे पिणे, जगणे यापैकी कशातच नसल्यासारखी व्यक्ती बसून राहते.

अशा व्यक्तीचे साधारणतः तीन प्रकार करता येतील.

१. अंगात आलेली व्यक्ती वास्तवापासून पूर्णपणे दूर गेलेली असते. शारीरिक संवेदना पूर्णपणे बधीर झालेल्या असतात. चेहऱ्यावरचे भाव बंदलतात. आवाज बदलतो. अशा व्यक्तींना भानावर आणणे कठीण जाते. अंगात आलेल्या अवस्थेत केलेल्या कोणत्याही गोष्टी नंतर त्यांना आठवत नाहीत.

२. माणूस अर्धवट शुद्धीत असतो. संवेदना काहीशा बधीर झालेल्या असतात. आवाजात बदल नसतो. अंगात येऊन गेल्यावर त्या अवस्थेत केलेल्या, बोललेल्या काही गोष्टी त्याला आठवू शकतात.

३. माणूस पूर्णपणे शुद्धीवर असतो. त्याच्या आवाजात वा चेहऱ्यात बदल झालेला नसतो. थोड्याशा प्रयत्नाने त्याला भानावर आणता येते.

अशा व्यक्तींची ही असंतुलित मनोवस्था आहे. याचे भान न बाळगता त्याला झपाटले म्हणून त्याच्यावर इलाज केले जातात. भूत उतरणाऱ्या मांत्रिकाकडे त्याला नेले जाते. धुरी दिली जाते. बडवले जाते. पिवळा भात आणि कोंबडीचा उतारा ओवाळून टाकला जातो. लिंबू उतरून टाकले जाते. ज्याच्यामध्ये मनोविकृती निर्माण होते, त्या व्यक्तीचाही विश्वास असतो की भूत असते, ते झपाटू शकते, आणि त्यानेच आपल्याला झपाटले आहे. स्वाभाविकच मांत्रिकाला मंत्र तंत्राच्या साह्याने ते लिंबात भरून फेकून देता येते, या तोडग्यावर पण त्याचा विश्वास असतो. त्यामुळे मांत्रिकाचा विधी हा त्याच्या दृष्टीने एकमानसोपचारचअसतो. काही वेळा असह्य मारामुळे भूत लागलेली व्यक्ती सरळ येते. हा मार खाण्यापेक्षा काहीही परवडले म्हणून मन मोठ्या मेटाकुटीने भीतीपोटी स्वतःला तात्पुरते सावरते. ही एक अघोरी उपाययोजनाच असते.

भूत लागलेले बाईमाणूस पाच-सहा जणांना आवरत नाही, असे काही वेळा घडते. ही ताकद त्या बाईला कुठून येते ? झपाटलेल्या भुताचीच ही ताकद असते, असा दावा नेहमी केला जातो. त्यात अर्थातच तथ्य नाही. अर्थ आहे तो एवढाच की, हे असे झपाटणे ही मनाची एक प्रकारची उन्मादावस्था असते. आणि अशा अवस्थेत नेहमीच्या परिस्थितीतील वर्तनापेक्षा माणसाचे वर्तन वेगळे असू शकते. पण अर्थातच माणसाच्या शारीरिक सामर्थ्याच्या कमाल मर्यादेतच ते होते. ही गोष्टही ध्यानात ठेवावयास हवी की, झपाटलेली बाई करत असलेल्या अचाट कृत्याचे वर्णन व्यवहारात अनेकदा अतिरंजित असते. सोलापूरकडच्या एका अतिउंच चिंचेच्या झाडावर पंचक्रोशीतील झाडांवर चढण्यात तरबेज मंडळीही चढू शकत नाहीत. पण अंगात आलेली बाई चढते. असा बोलबाला बाहेरगावी होता. प्रत्यक्षात कार्यकर्त्यांनी त्या गावी जाऊन त्या झाडाची पहाणी केली तर जेमतेम पंचवीस फूट उंचीचे झाड निघाले. किस्सा रंगवून सांगण्याच्या आपल्या समाज स्वभावानुसार झाडाची उंची वाढत वाढत जाऊन आभाळाला पोचली होती. या अशा थापेबाजीबद्दल आणखी एक मुद्दा मनावर ठसवावयास हवा की तथाकथित भुताने झपाटलेली कोणतीही व्यक्ती, ज्या गोष्टीसाठी प्रशिक्षित कौशल्याची किमान का होईना गरज असते, ती गोष्ट करू शकत नाही. झपाट-

लेली बाई उंच झाडावरच्या शेंड्याला जाऊ शकेल, पण जर ती पूर्वी कधीही सायकल चालविणे शिकली नसेल तर सायकल कधीही चालवू शकणार नाही. ती झाडाच्या धोकादायक शेंड्यावरही चढून जाऊ शकते. याचे कारण झपाटलेल्या आत्म्याने तिला दिलेले कौशल्य नव्हे. आपण धोकादायक शेंड्यावर चढून गेल्यास पडू शकू आणि कायमचे जायबंदीही होऊ. ही भीती सामान्य विवेकी माणसाला वाटते. मनाची विवेकशक्ती नष्ट झालेल्या स्त्रीला ती भीती नसते. या अशा गोष्टी सारासार विचारशक्ती गहाण पडल्याच लक्षण आहे. झपाटलेल्या सामर्थ्याचे नव्हे. पौर्णिमा आणि अमावास्या या दिवशी झपाटण्याचे प्रकार वाढतात ही समजूतही अशीच निराधार आहे. येरवडा मेंटल हॉस्पिटलमध्ये काही हजार मनोरुग्णांच्या गेली अनेक वर्षे केलेल्या पहाणीमध्ये असे काहीही आढळून आलेले नाही किंवा अन्यत्र कोठेही पाहणीत असा निष्कर्ष निघालेला नाही.

भुताने झपाटणे वा देवी अंगात येणे या दोन्ही बाबत मुळाशी गेले तर भूत आणि देवीचे सख्यच असते. दोन्ही ठिकाणी मनोव्यापार साधारणतः सारखाच असतो. बाई सासुरवाशीण असते. लग्न होऊन चार-पाच वर्षे झालेली असतात. मूल झालेले नसते. मूल न होण्याचा दोष बाईकडेच येतो. नवरा याला कारणीभूत असणे शक्य आहे हे पुरुषप्रधान संस्कृतीत कोण लक्षात घेणार ? घरी सासूचा जाच असतो. मूल नसल्याने शेजारीपाजारी उपहास करत असतात. बरे नवरा दारुडा असल्याने त्याच्या लाथा अधूनमधून खाव्या लागतात ते वेगळेच. या सगळ्यापासून सुटण्याचा कोणताच मार्ग आजच्या समाजव्यवस्थेत नाही. त्या स्त्रीला ना माहेरी परतता येते, ना घरची व्यवस्था बदलता येते, वा स्वतंत्र एकटीने राहता येते. सततच्या होणाऱ्या या मानसिक वा शारीरिक छळवादामुळे तिच्या मनाचा तोल जातो. तिने लहानपणी वा आसपास मंगळवार, शुक्रवार अंगात येणाऱ्या बायका बघितलेल्या असतात. प्राप्त परिस्थितीत योग्य वाट न सापडणारे तिचे मन या मार्गाकडे वळते. ते तिच्या प्रश्नाचे उत्तर नसते. पण आहे त्या परिस्थितीत तिला तात्पुरती पळवाट हा मार्ग देऊ शकतो. हिच्या अंगात शुक्रवारी अंबाबाई येते असे म्हटले की, इतर वेळा कुचेष्टा करणारे शेजारीपाजारी आपल्या प्रश्नांची उत्तरे विचारायला त्या दिवशी तिच्याकडे येतात. इतर वेळा छळणारी सासू तिचे हवे नको बघते. दारुडा नवरा त्या दिवशी तरी लाथा घालत नाही. त्यामुळे हे देवीचे अंगात

येणे हा तिच्या दुःखावर तिने शोधलेला उतारा बनतो. तिने घेतलेले सोंग नसते तर तिच्या व्यक्तिमत्त्वाचाच तो एक भाग बनतो.

तिच्या अवस्थेचे हे निदान आपण करू शकतो. मानसोपचार आणि औषधे तिला मदतीची ठरतात. पण एवढ्याने तिच्या अंगात येण्याचे थांबेलच अशी खात्री नाही. तिला मूल होणे अथवा मूल न झाले तरी सर्वांनी तिला प्रेमाने, आदराने वागवणे आवश्यक असते. ही गोष्ट उपचार करणाऱ्याच्या पूर्णपणे हातातील नसते.

नवरात्रामध्ये देवीसमोर घागरी फुंकण्याचा प्रकार बुद्धिवादी महाराष्ट्रातही शहरोशहरी आता वाढत चालला आहे. घागरी फुंकून मग अंगात देवी येऊन बायका घुमू लागतात. म्हणजे काय होते? फुंकलेल्या घागरीत ऊच्छ्वासामधून फुंकरीमधून बाहेर पडलेला कर्बद्विप्राणिल वायू साठतो. श्वासाबरोबर तो आपल्या फुप्फुसात, रक्तात पसरतो. रक्तातले प्राणवायूचे प्रमाण तुलनात्मक रित्या कमी होते. त्यामुळे मेंदूला पोचणाऱ्या रक्तातला प्राणवायू काही प्रमाणात कमी होतो. मेंदूच्या तल्लखपणावर त्याचा परिणाम घडतो. याबरोबरच अंगात येण्याचा वातावरण निर्मितीशी जवळचा संबंध असतो. काही वार (उदा. मंगळवार, शुक्रवार) काही तिथी (पौर्णिमा, अमावास्या) काही सण हे खास अंगात येण्याचे तिथी, वार, सण असा त्यांचा परंपरागत लौकिक असतो. देवीची सजावट, मोठ्याने म्हटल्या जाणाऱ्या आरत्या, जाळला जाणारा धूप, त्याचा दरवळणारा वास, नगाऱ्याचा आवाज, घंटेचा नाद, मंत्राचा घोष, भक्त गणांची गर्दी या सगळ्या वातावरणाचा प्रभाव पडतो. आणि देवी अंगात आल्याप्रमाणे घुमणे चालू होते. ही बेहोशीदेखील सावध असते. सातारला गावाच्या मध्यभागीच्या चौकातच देवीसमोर चौकातल्या मोकळ्या जागेत चांगल्या पाचपन्नास बायका घुमत होत्या. आमच्या एका मित्राने त्या जागेतच जोराने मोटार सायकल घुसवल्यासारखे केले. ॲक्सीलेटर वाढवून जोरात आवाज काढला. मोटार सायकल बहुधा आपल्या अंगावर येणार या भीतीपोटी सगळ्यांच्या अंगातल्या देवी एका क्षणात बाजूला पळाल्या आणि मोटार सायकल रांगेला लागल्यावर पुन्हा येऊन दाखल झाल्या. एकदा एक बाईतर मोठ्या बेहोशीत हाऽहूऽ करत घुमत होती. स्वतःचे सहा महिन्यांचे मूल घरी ठेवून ती आली होती. घरी मूल रडू लागले. शेजाऱ्यांना ऐकेना. त्यांनी उचलून मूल मंडपात आणले. रडणाऱ्या मुलाचा आवाज ऐकताच देवी पळाली आणि माता राहिली. मुलाला पदराखाली घेतले. पाजले, शांत केले. परत दिले आणि पुन्हा

देवीशी करंट जोडला. घुमणे चालू झाले.

मनाच्या बिघडलेल्या संतुलनाचे कारण हुडकणे आणि दुरुस्त करणे हे काम मानसोपचाराचे. मानसोपचार शास्त्राच्या भाषेत याला 'स्किझो फ्रेनिया' आणि हिस्टेरिया म्हणतात. मनोविकृतीमध्ये याची गणना होते. माणसाला भीती आणि अनिश्चिततेच्या गर्तेत लोटणारा एखादा तडाखा या मनोविकृती त्यांच्यात निर्माण होण्याआधी त्याला बसलेला असतो. घरातील वाढलेले कौटुंबिक ताण तणाव, घरातल्या एखाद्याला झालेला गंभीर स्वरूपाचा आजार, अचानक इस्टेट गेल्याने वाटणारी अनिश्चितता, घरामध्ये अंगात येणाऱ्या व्यक्तीचा मृत्यू या व अशा स्वरूपाचे हे आघात असतात. येथे एक गोष्ट लक्षात घ्यावयास हवी की, भुताने झपाटलेल्या अथवा देवीनी पछाडलेल्या प्रत्येक केसचे मनोवैज्ञानिक पृथक्करण करणे शक्य असतेच असे नाही. शिवाय मनोपृथक्करण ही अतिशय काळजीने व युक्तियुक्तीने करावयाची गोष्ट आहे. कित्येक वेळा डॉक्टरांकडे गेल्यास देवीचा कोप होईल किंवा दैवी संचाराची शक्ती कमी होईल असा गैर-समज अंगात येणाऱ्या व्यक्तीच्या व तिच्या आजूबाजूच्या व्यक्तींच्या ठिकाणी असतो, शिवाय निदान शक्य झाले तरी त्यावर उपाययोजना होऊन त्यापासून सुटका होऊ शकतेच असे नाही. मनोवस्थेला परिस्थितीमधले इतर अनेक घटक कारणीभूत असतात आणि त्यांची दुरुस्ती अनेक वेळा मनोवैज्ञानिकांच्या हाताबाहेरची असते. मनाचा तोल हा सावरण्यापलीकडे गेला असल्यासही त्याबाबत उपाययोजना निष्फळच ठरते.

मनाचाही ढासळलेला तोल सावरून माणसाला पुन्हा उभा करणे हे काम मानसोपचार तज्ज्ञ करतो. आपल्या मंत्रतंत्राच्या आधारे भूत उतराविणारा मांत्रिकही हे करू शकतो. कारण आपल्याला भुताने झपाटलेले आहे आणि मांत्रिकाजवळ वा महाराजाजवळ ते उतरवण्याचे प्रभावी सामर्थ्य आहे. असा विश्वास झपाटलेल्या माणसाचे दुभंगलेले व्यक्तिमत्त्व मानत असते. त्याच्या मनाची पूर्व परंपरागत झालेली जडणघडण याला कारणीभूत असते. आपल्या सारख्यांनी नीरक्षीर विवेक करावयास हवा तो हा की, आपण कुठल्या मार्गाने पेशंटला न्यावयाचे? परंपरागत अशास्त्रीय रस्त्याने का चिकित्सक वैज्ञानिक मार्गाने? आणि यासाठी प्रथम लक्षात ठेवावयास हवी प्रश्नांची वास्तव बैठक.

व्यक्तीचा मनोव्यापार अनेकदा शारीरिक पातळीवरचे बदलही घडवून आणतो. त्याचे शरीर शास्त्रीय कारण न सापडल्याने मग लोकांना हातात

आयतेच कोलीत सापडते आणि करणी झाल्याचा बोभाटा होतो. मनोविश्लेषण आणि त्या आधारे उपचार तज्ज्ञाने केला तर या करणीवर उपाय सापडू शकतो. एक बोलके उदाहरण सांगता येईल, ते मी वैद्यकीय शिक्षण घेत असतानाचे आहे. वीस वर्षांची तरुणी लग्न होऊन दोन महिने झालेली आणि तिला अर्धांग वायूचा झटका आला. शरीराच्या निम्म्या भागातला त्राण गेला. औषधोपचारासाठी हॉस्पिटलमध्ये दाखल झाली. खरे तर इतक्या तरुण वयात अर्धांगवायूचा झटका ही गोष्ट सहसा न आढळणारीच, तिची तपासणी झाली. तिच्यात अर्धांगवायूचे कोणतेही कारण आढळले नाही. पंधरा-वीस दिवस उपचार झाले. काही फरक पडला नाही. उपचाराचा फायदा न होणाऱ्या रुग्णासाठी हॉस्पिटलची कॉट अडविण्यात अर्थ नव्हता. अर्धांगवायूवर खात्रीलायकपणे उपचाराचा गुण येतोच असेही नाही.

त्या वेळचे आमचे प्राध्यापक आणि आजचे भारतातले नामवंत मानसोपचार तज्ज्ञ डॉ. देवसिकवार यांच्या कानावर सहजपणे केसबाबत गेले. त्यांनी तिचे मनोवैज्ञानिक पृथक्करण केले. लक्षात आले की शरीराचा अर्धा भाग लुळा पडण्याचे कारण शारीरिक नाही. दुसरे आहे. इच्छा नसलेल्या पुरुषाबरोबर तिचे लग्न झाले आहे. कायदेशीर पत्नी असल्यामुळे अजिबात इच्छा नसलेला समागम टाळण्याचा तिच्याकडे कोणताच उपाय नव्हता. परंतु तिचा त्या संभोगाला जबरदस्त मानसिक प्रतिरोध होता. त्यामुळे त्या शारीरिक एकत्र येण्याला विरोध करण्याचा तिला उपलब्ध असलेला एकच मार्ग, मानसिक दबावामुळे शरीराने स्वीकारला. अर्धे लुळे पडलेले शरीर पतीला स्त्रीसुख देऊ शकणे शक्यच नव्हते. पण या लुळे पडण्याचे कारण होते जबरदस्त मानसिक तणाव.

मानसोपचाराने हा ताण दूर करण्यात आला. ती पूर्ववत झाली. करणीवर उपचार करणाऱ्या मांत्रिकाचे, ख्यातनाम देव देवर्षींचे कशामुळे फावते हे लक्षात येण्यासाठीही हे उदाहरण लक्षणीय ठरेल. त्या स्त्रीला परिस्थिती बदलण्याचा (घटस्फोट घेण्याचा अन्यत्र वा माहेरी जाऊन राहण्याचा मार्ग उपलब्ध नव्हता.) अशा परिस्थितीत तिच्या मनाला आणि त्या आधारे शरीराला सावरायचे झाले तर तसा विश्वास तिच्यात निर्माण करण्याची गरज होती. मानसोपचार तज्ज्ञ हा आधार औषधे आणि संवाद यातून निर्माण करू शकला. पण हाच आधार एखादा करणी उतरवणारा बाबाही करू शकला असता. कारण तिच्या नातेवाइकांसह खुद्द तिलाही, क्षुब्ध मनोव्यापारांच्या तडाख्याने हे घडले याची

जाणीव नव्हती. (मनोरुग्णांना ती नसतेच) त्यांना ती मुलीचे आयुष्य उद्ध्वस्त करणारी दुष्ट शक्तीची करणीच वाटत होती. स्वाभाविकच त्या करणीवर तोडगा काढणाऱ्या नावाजलेल्या मांत्रिकावरही त्याचा विश्वास होता. त्या विश्वासामुळे आणि वर त्या व्यक्तीने केलेल्या दैवी उपचाराच्या देखाव्यापोटी करणी परताविली गेली हे मनाला पटून तिच्या मनाचा तोल परत येऊही शकला असता. मग वैद्यकीय शास्त्राला न जमलले त्या देवर्षी वा मांत्रिकांना जमले याचा डंका वाजला असता.

नुसते मानसिक आजारच नव्हेत तर शरीराचे वाटणारे पण मनात उगम पावणारे आजार आणि अंधश्रद्धा यामुळेच घनिष्ठ नाते जुळते. फीट येणे, गिरकी येणे, ही गोष्ट आपल्या मेंदूतील पेशींच्या बिघाडामुळे होते. या लोकांना फीट बरोबरच मानसिक रोगांची इतरही लक्षणे दिसू लागतात. उदा. मोडतोड करणे, सतत भांडणे, एकाएकी निघून जाणे ही शारीरिक व मानसिक रोगाची सर्व लक्षणे दैवी कोपामुळे असा समज अजून मोठ्या प्रमाणावर रूढ आहे. या अंधश्रद्धेमुळे अशा मुलांना हमखास दर्ग्यावर वा देवऋषीकडे नेले जाते. याचा फायदा होणे शक्यच नसते. रोग वळावत जातो. आणि हाताबाहेर गेलेला रोगी मग डॉक्टरांच्याकडे आणला जातो. वैद्यकीय उपचारांच्या अपयशामुळे अंधश्रद्धेलाच बळकटी येते. हाच रोगी जर सुरुवातीसच डॉक्टरांकडे आणण्यात येईल तर पुढचे अनर्थ टळून उपचारामुळेअनेक रुग्णांना गुण येऊ शकतो.

काही वेळा रोगी पुतळ्यासारखा निश्चल बसून राहतो. अशा अवस्थेत तो कित्येक तास बसून राहतो. जेवत नाही. बोलत नाही. नैसर्गिक विधींना जाणे इत्यादी गोष्टीही तो करत नाही. या प्रकारची लक्षणे असलेल्या रोग्याला तर हमखास देवर्षीकडे नेले जाते. कालपरवापर्यंत नीटपणे वागणारा माणूस असा विचित्रपणे वागू लागला म्हणजे त्याला निश्चितपणे बाहेरची बाधा झाली असे समजण्यात येते. कोणी तरी केलेला जादूटोणा व करणी हे स्पष्टीकरण पटकन पटते. मानसरोग शास्त्राच्या दृष्टीने अशी व्यक्ती कॅटे टोनिक स्किझोफ्रेनिया या विकृतीची बळी असते. स्किझोफ्रेनिया या मानसिक रोगाच्या प्रकारापैकी हा अधिक गंभीर स्वरूपाचा रोग आहे. वेळेवर उपचार केले तर हा रोग बरा होऊ शकतो. पण देवर्षी आणि दर्गे यात अडकलेला रोगी बाहेर येईपर्यंत वेळ टळून गेलेली असते!

दारू, गांजा, चरस या व्यसनांच्या आहारी गेलेले अनेक लोक आपण

पाहतो. व्यसनाच्या आहारी जाणे ही वैद्यकीय शास्त्राच्या दृष्टीने मानसिक विकृतीच आहे. अशा लोकांना मानसोपचार तज्ज्ञांच्या देखरेखीखाली विशिष्ट प्रकारचे उपचार केल्यास त्याला बराच गुण येऊ शकतो. पण अशा लोकांनाही वेगवेगळ्या धार्मिक स्थळांवर नेण्यात येते. नवस बोलले जातात. १६ सोमवार, संतोषी मातेचे व्रत इ. उपाय केले जातात. या उपायांनी तात्पुरते बरे वाटतेही. पण लवकरच व्यसन डोके वर काढते. दारू, गांजा, चरस घेणाऱ्या व्यक्तींच्या सहवासात आल्यावर तात्पुरता व्यसनमुक्त झालेला माणूसही पुन्हा व्यसनाधीन होतो. कदाचित अधिक गंभीर स्वरूपाच्या मानसिक व्याधीला बळी पडतो. कारण रोगाचे मूळ तसेच राहिलेले असते.

अंधश्रद्धांचा फार जबरदस्त परिणाम मानसिक रुग्णांवर असतो. रोगी डॉक्टरांकडून उपचार घेऊन बरा झाला तरी सुद्धा त्याची अंधश्रद्धा कायम राहते. संपूर्ण बऱ्या झालेल्या रोग्याला आपण विचारले की तुला काय झाले होते ? तर तो सांगतो," वेड लागले होते." कशाने बरे झाले ? "शॉकने व गोळ्यानी बरे झाले." वेड कशाने लागले होते ?... ' करणी केली होती. मूठ मारली होती.' म्हणजे बरे झाल्यावरही रोगी मनातून करणी, बाधा या कल्पना काढून टाकू शकत नाही. या गोष्टींवरचा त्याचा विश्वास,ही त्याची वैयक्तिक गोष्ट नसते. तो ज्या समाजात राहतो त्या समाजाचाच करणी बाधा, मूठ मारणे या कल्पनांवर पक्का विश्वास असतो.मांत्रिकमंत्राने तोडगा करून तीउतरवतो व डॉक्टर औषध, गोळ्या, शॉकने. परंतु यामुळे करणा उतरविण्याचे हे एकच परिणाम साधणारे दोन उपाय ठरतात. करणी नाही हे यामुळे कुठे सिद्ध होते ? असा त्याला प्रश्न पडतो. काही लोक देवर्षींच्या उपचाराने बरे होतात; तर काही वैद्यकीय उपचारानेही बरे होत नाहीत.यामागे रोग्याच्या अवस्थेची कमी जास्त तीव्रता,त्यामागची सामाजिक वस्तुस्थिती अशी अनेक कारणे असतात. ती सामान्य माणसाच्या आवाक्यापलीकडची वाटतात. कारण ज्या वेळी एखादा गाव, भाग, समूह अशा अंधश्रद्धेवर विश्वास ठेवतो अशा वेळी ती अंधश्रद्धा एक सांस्कृतिक (कल्चरल बीलीफ) बनते. एका व्यक्तीला त्याविरुद्ध काही करणे खूप अवघड असते.

मानसिक आजाराला समाजात फार अप्रतिष्ठा आहे. ठाण्याच्या नाहीतर येरवड्याच्या इस्पितळात पाठवणी करा, असे कुत्सित व हेटाळणीच्या सुरात सुनावले जाते. जसलोक किंवा जे. जे. ला पाठवायला पाहिजे.त्यामागे सहानुभूतीचा स्पर्श नसतो. त्यामुळे सुशिक्षित लोकही मनोरुग्णालयात जाण्यास नाराज अस-

तात. प्रसंगी ते देवदेवर्षींकडे जाण्यास तयार होतात. आपल्या मनात काही बिघाड झाला आहे. असे मान्य करण्यापेक्षा बाहेरून कोणीतरी दुष्ट शक्तीने तो लादला आहे हे मान्य करणे श्रेयस्कर वाटते. अप्रतिष्ठेचे ठरत नाही. यासाठी अंधश्रद्धा विरोधी चळवळीतल्या कार्यकर्त्यांनी मानसिक आजाराचे स्वरूप,मनोरुग्णालयाचे काम याबाबत अधिक लोकशिक्षण करावयास हवे.

अंगात येणाऱ्या व्यक्तीला आपल्याकडे मनोरुग्ण असे मुळात समजत नाहीत आणि समजले तरी अशी व्यक्ती अविवाहित असली तर लग्नानंतर होईल सारे आपोआप सुरळीत, असा भ्रम हमखास बाळगला जातो. हा जणू काही खात्रीचा उपाय आहे, असे समजून वधूवरांना आणि घरच्या माणसांना पूर्ण कल्पना न देता लग्न करतात. लग्नानंतर होत असेल तर एवढेच होते की, परिस्थिती आणखी बिघडते. नवीन नाती निर्माण होतात. सर्वस्वी अपरिचित माणसांशी घनिष्ठ संबंध येतात. वैवाहिक जीवनाच्या आशा आकांक्षा असतात. अशा वातावरणात आधीच मनोरुग्ण असलेल्या माणसाचा आणखीच कोंडमारा होतो. मानसिक आजार बरा होण्याऐवजी बळावतो. स्त्रीला मूल झाले की सारे रांगेला लागेल हा त्यापुढचा भ्रम असतो. शरीर आणि मनोरचना यांत बदल होणारे गरोदरपण. आणि मातृत्व अशा रुग्ण मानसिक अवस्थेत स्त्रीला पेलणे शक्यच नसते. कालांतराने मानसिक विकार तीव्र स्वरूप धारण करतो. दोन्हीकडच्या घरात विवंचना, वैताग, कटूता यापेक्षा या साऱ्यामधून काही निष्पन्न होत नाही. वस्तुस्थिती अशी आहे की मनोरुग्ण बरा झाल्यानंतर दोन वर्षे तसा राहिला तर डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार लग्न करण्यास हरकत नसते.

अलीकडे अनेक मानसोपचार तज्ज्ञांनी मांत्रिक देवर्षी यांच्याकडे लोक का जातात याबाबत बरेच संशोधन केले आहे. त्यावरून काही गोष्टी ध्यानात येतात.

एक तर हे मांत्रिक देवर्षी सहजपणे उपलब्ध असतात. जवळच्या भागात असतात. केव्हाही त्यांच्याकडे जाता येते. ते ज्या पद्धतीने प्रश्न, अडचण समजावून घेतात ती भाषा, पद्धत लोकांना परिचित असते आणि म्हणून लोकांना जवळची वाटते. दुसरे असे की या देवर्षी वा मांत्रिकाचे व्यक्तिमत्त्व प्रभावित करणारे असते. तो व्यक्तीला वा प्रसंगी समुदायाला संमोहित करू शकतो. त्याचा आवाज, त्याची बागण्याची पद्धत त्याला अनुकूल असते. तो हजरजबाबी असतो. निरीक्षण सूक्ष्म असते. बऱ्याचदा

त्याचे सामर्थ्य आणि प्रभाव समोरच्या माणसाचे मानस व त्याच्या अवती-भवतीची परिस्थिती याच्या अचूक निरीक्षणातून आलेला असतो. या लोकांच्या जागेत वातावरणही हेतूतःच गूढ व धूसर असते. त्याचाही परिणाम संवेदनशील व्यक्तींच्या मनावर होतो. शिवाय त्यांचे त्या भागातील स्वरूप कम्युनिटी लिडर या स्वरूपाचे असते. त्यांच्याकडे येणाऱ्या लोकांना शारीरिक व मानसिक आजारा-विषयी तो सल्ला देतोच पण काही वस्तू हरवल्यास, जनावर नाहीसे झाल्यावरही ते सल्ला देत शुभकार्याची वेळ तो काढून देतो. खेरदीचा मुहूर्त सांगतो. अशुभ गांष्ट टाळावयास तोडगा सांगतो. तो पार पाडून देतो. पाप झाले तर उपाय सुचवितो. थोडक्यात कोणत्याही प्रश्नावर सल्ला देणारा, उपचार सुचवून धीर देणारा अशी त्याची भूमिका असते. अशा प्रकारे हरत-हेचा सल्ला देणाऱ्या गुरूचे आपल्या संस्कृतीमधले स्थान लक्षात घेतले तर देवर्षी वा मांत्रिक यांच्या मान्यतेचे रहस्य कळून येते. या देवर्षी मांत्रिकांना सामाजिक प्रतिष्ठा असतेच. त्यामुळे त्यांच्याकडे जाण्यामध्ये कमीपणाही वाटत नाही. त्यांच्या वद्दलच्या सुरस व चमत्कारिक कथा पसरविण्यात भक्तगण वाकबगार असतोच. कपोलकल्पित व पराचा कावळा करून अशा गोष्टी सांगितल्या जातात. अंधश्रद्धाळू लोकांचा त्यामुळे विश्वास वाढतो. येणाऱ्या नव्या भाविकांची रांग वाढते. उपचारास येणाऱ्यांमधले पंधरा ते वीस टक्के लोकांचे आजार हे प्राथमिक स्वरूपाचे असतात. ते कालांतराने आपोआपही बरे होणारे असतात. अशा बऱ्या होण्याचे श्रेय या देवऋषींना मिळते. डंका वाजवला जातो. ऐशी पंच्याऐशी टक्के अपयशाबद्दल यशस्वी मौन पाळले जाते.

मानसिक अंधश्रद्धेबाबत एक महत्त्वाची गोष्ट कार्यकर्त्याने लक्षात घ्यावयास हवी. आपल्याला जी अंधश्रद्धा वाटते ती अशी श्रद्धा बाळगणाऱ्यांच्या दृष्टीने जीवन मरणाची गोष्ट असते. कोणीतरी करणी केली, मूठ मारली, अन्नातून विषबाधा केली. किंवा स्वप्नात येऊन सूचक दृष्टान्त दिला अशा गोष्टींवर विश्वास ठेवणे त्यांना स्वाभाविक वाटते. अशा लोकांच्या अंधश्रद्धेची हेटाळणी करून त्यांना दुखवण्यात आणि दुरावण्यात काही हशील नाही. या अंधश्रद्धेवर चढव-लेला बौद्धिक हल्ला त्याचे डोळे दिपवेल पण ते नीट उघडू शकणार नाही. कदाचित ते तुमच्यापासून परावृत्तच होतील. त्यामुळे अशा व्यक्तींना खाजगी व्यक्तिगत पातळीवर, योग्यपणे त्यांना समजेल, उमजेल, पटेल अशा भाषेतून समजावले पाहिजे. याबरोबरच, देवर्षींकडे जावयाचे नाही तर पर्याय काय?

त्याची सोय काय ? त्यासाठी काय केले पाहिजे, याचे ज्ञान कार्यकर्त्यांना हवे. महाराष्ट्रात मानसिक उपचारांची केंद्रे कोणती, तेथे कोणते उपचार केले जातात, तेथे रुग्णाला दाखल करण्यास काय करावे लागते, इथपासून तो अशा व्यक्ती-बाबत घरच्यांनी, शेजाऱ्यांनी काय काळजी घ्यावी इथपर्यंत प्राथमिक ज्ञान आपुलकीच्या भावनेने पोचविणे हा खरा तोडगा आहे. याचे भान बाळगावयास हवे. सर्व दूर पोचवावयास हवे.

* *

चार

अंधश्रद्धेचा आमूड

सकाळी सातची गोष्ट. दूध आणणाऱ्या नेहमीच्या दूधवाल्याबरोबर एक तरुण आला होता. दूधवाल्यानेच त्याला सायकलवरून आणला होता. प्रचंड चक्कर येत होती. चालताना तोल जात होता. धडधाकट, उचापुरा तरुण. तपासायला टेबलावर घेतला आणि तपासता तपासता तो म्हणाला, 'डॉक्टर, डोळ्यासमोर एकदम काळोख यावयाला लागलाय. काहीच दिसेनासं झालंय.' आणि तो बेशुद्ध झाला. इतक्या झपाट्याने बघता बघता वाढत जाणारा रोग क्वचितच असतो. पहिली शक्यता असते विषबाधेची. दूधवाल्याच्या पाठोपाठ घरची माणसे धावतपळत दवाखान्यात येऊन धडकली. गाव सातारच्या शेजारचं अवघ्या दीड-दोन मैलांवरचं. घरच्यांनी माहिती पुरवली. रात्री दहाच्या सुमारास घराच्या गोठ्याजवळच त्याला पान लागलं (म्हणजे साप चावला) शेजारच्या बहिरोबाच्या डोंगरावरचे देऊळ हे सापाचं विष उतरवण्याचे प्रख्यात ठिकाण. गावकऱ्यांनी त्याला देवळात नेला. मंत्रतंत्र झाले. प्रदक्षिणा झाल्या. पण बरे वाटण्याची कोणतीच लक्षणे दिसेनात. मग दवाखान्याची आठवण झाली. माझ्या दवाखान्यातून त्याला तातडीने सरकारी दवाखान्यात हलविले. मध्यंतरी गेलेला वेळ फारच महागात पडला. सापाच्या विषाचा मज्जातंतूंवर परिणाम झाला होता. चक्कर, अंधत्व, बेशुद्धी ही सगळी त्या विषबाधेच्या वाढत्या परिणामाची लक्षणे होती. सगळे उपचार केले पण उपचार सुरू होण्यास मुळातच वेळ झाला होता.

तीन दिवसांनंतर तो सव्वीस वर्षांचा तरुण आणि दोन मुलींचा बाप तडफडत मरण पावला.

विष उतरवण्याचा दावा करणारी अशी देवळे आणि मांत्रिक गावोगावी असतात. त्यांच्या भ्रमजालामुळे माणसे हकनाक मृत्युमुखीही पडतात. तरीही याविरुद्ध पुरेसा जोरदार आवाज उठविला जात नाही. कारण या ठिकाणी जाणारी शंभरातील नव्वद माणसे साप चावूनही जिवंत राहतात. याचे सारे श्रेय त्या जागृत स्थानाच्या सामर्थ्यावर विनधास्तपणे जमा होते. साप चावलेली शंभरातील नव्वद माणसे तर (सरासरीने) कोणताही उपाय न करताच जिवंत राहतात. कारण या देशातल्या सापांच्या जातींपैकी विषारी जाती आहेत अवघ्या चार. बिनविषारी साप चावून काही अपाय होण्याची शक्यताच नसते. मग उपाय करा वा न करा. पण विषारी सापाचा चावा मात्र, मांत्रिकावर अवलंबून राहिले तर थेट यमलोकांचीच वाट दाखवतो. आणि योग्य उपाय केला तर, बहुसंख्य वेळा लाख मोलाचा जीव परत मिळतो anti snake venumचे एक इंजेक्शन वेळेवर दिले तर साप चावलेल्या व्यक्तीला मृत्यूच्या दाढेतून परत आणू शकते.

कुत्रा चावल्यावरची बेपर्वाई हा तर अक्षरशः जिवाशी खेळ असतो. पिसाळलेले कुत्रे चावल्यावर प्रतिबंधक उपाययोजना केली नाही आणि पिसाळलेल्या कुत्र्याचे जंतू शरीराच्या मज्जातंतूंत घुसले तर हायड्रोफोबिया नावाचा रोग होतो. पिसाळलेले मांजर, कोल्हा, लांडगा, मुंगुस, चावूनही हा रोग होऊ शकतो. हा भयंकरच रोग आहे. कारण या रोगावर अजून उपचार सापडलेला नाही. तुम्ही पेशंटला लंडनला न्या; न्यूयॉर्कला न्या वा मास्कोला न्या; मृत्यू अटळ असतो. रोगापासून सुटका होण्याचा मार्ग एकच. रोग होऊच न देणे, आणि त्याची उपाययोजना म्हणजे ॲन्टी रेबीज व्हॅक्सीन (प्रतिबंध करणारी लस) टोचून घेणे. या लसीची चौदा इंजक्शने टोचून घ्यावी लागतात. कुत्रा चावला तर तो पिसाळला म्हणून चावला की, अन्य कशामुळे हे कळण्यास मार्ग नसतो. तो पाळीव असेल, नेहमी पाहण्यातला असेल तरी पुढे धोका नको म्हणून ॲन्टी रेबीज व्हॅक्सीनची तीन इंजक्शने देतात. दहा दिवसांत कुत्रा न पिसाळता राहिला तर पुढच्या इंजेक्शनपासून सुटका होते. कुत्रा पिसाळला असेल तर तो दहा दिवसांत मरतो; मग मात्र चौदा इंजक्शने घ्यावीच लागतात.

कुत्रा पाळीव नसेल वा तो पळून गेला किंवा त्याला कोणी दहा

दिवसांच्या आत ठार मारले तर तो पिसाळलेला होता असे गृहीत धरून चौदा इंजक्शन्स घेणे अटळ असते. कोल्हा, लांडगा, माकड, मुंगुस हे तर बोलून चालून जंगलीच प्राणी. त्यांच्यावर लक्ष ठेवणे अशक्य म्हणून ते चावले तर चौदा इंजक्शन्स घेणे अत्यावश्यक ठरते. मूल असो,महिला असो वा धट्टाकट्टा माणूस असो इंजेक्शने घेण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. मुळात इंजेक्शने घ्यायची वाटणारी भीती,त्यात ही इंजेक्शन्स हमखास दुखणारी. रोज एक अशी संख्येने चौदा. स्वाभाविकच ही इंजेक्शन्स टाळून काही दुसरा उपाय सापडतो का याचा माणसाचा शोध चालू असतो. मानवी स्वभावाला हे धरून असले तरी हे अज्ञान म्हणजे मृत्यूची पळवाट शोधण्याचा प्रकार ठरतो. पिसाळलेला कुत्रा चावला यावर हमखास हातगुणी औषध देणाऱ्या मंडळींचे दवाखाने म्हणजे खरेतर यमराजाच्या हमखास भेटीची ठिकाणे आहेत. पण आज अनेक ठिकाणी या औषध देणाऱ्यांची चलती आहे खरी. असे औषध घ्यावयास येणारे बहुसंख्य लोक साधे न पिसाळलेले कुत्रे चावलेले असतात. साध्या कुत्र्याच्या लाळेत हायड्रोफोबिया रोगाचे जंतू नसतात. त्यामुळे त्यांना रोग होण्याची शक्यता नसतेच. पण त्यांची कल्पना मात्र होते की आपण हे औषध घेतले आणि आपल्याला होऊ शकणारा रोग त्यामुळे झाला नाही. प्रत्येक जिल्ह्यात असा हमखास औषध देणारा एखादा दुसरा तरी असतोच. त्याचा नावलौकिक त्या जिल्ह्यापुरता असतो. नांदणी या कर्नाटक सीमेलगत असलेल्या कोल्हापूर जिल्ह्यातील खेडेगावचा लौकिक तर या कामासाठी दूरदूर पसरला आहे. कित्येक वर्षांपासून शेख नावाची व्यक्ती या गावात हा धंदा करत आहे. दर रविवारी तो औषध देतो. प्रत्येक पुडीत लहान अशा सहा काळसर गोळ्या असतात. बऱ्याचशा पुड्या एकदम बांधून त्या तो एकत्र करतो. मग कसला तरी मंत्र पुटपुटतात. त्यावर फुंकर मारतात. आणि एका पेशंटला एक पुडी याप्रमाणे देतात. तीन दिवस सकाळ संध्याकाळ एकेक गोळी देवाचे नाव घेऊन घ्यावयाची. महिनाभर मेथीची भाजी, खसखस, पपई, फणस, मांस खायचे नाही. दारू घ्यावयाची नाही. बहुतेक ठिकाणी ही औषधे धर्मार्थ सेवेसाठी असे म्हणून दिली जातात. पण प्रत्यक्षात पैसे घेतले जातात. रविवारी शेखांच्याकडे तोबा गर्दी उसळलेली असते. पाच-सहाशे माणसे तरी औषध घेऊन जातात. महिन्याकाठी चार दिवस धंदा करून तीन–चार हजारांचा धंदा होतो. मांजर चावलेल्यावरचे औषध वेगळे असते. त्याचीही फी असते.

रत्नागिरी, पुणे, सातारा, कर्नाटक इथपासून लोक येतात, असे शेखांचे म्हणणे आहे. तीन पिढ्यांचा हा धंदा चालू आहे.

आपले औषध पिसाळलेले कुत्रे चावलेल्यावर अगदी खात्रीलायक व गुणकारी आहे अशी शेखांची खात्री आहे, आणि तशी ती औषध देणाऱ्या प्रत्येकाची असतेच. पण सांगली कोल्हापूरच्या जिल्हा रुग्णालयातील कुत्रे चावून हायड्रोफोबिया झालेल्या आणि मृत्यूचे भक्ष्य ठरलेल्या रुग्णांची हालत काही वेगळीच सांगते. रंजना गणपती गाखे या इंचलकरंजीच्या अकरा वर्षांच्या मुलीला पिसाळलेले कुत्रे चावले. तिच्या वडिलांनी तिला नांदणीचे औषध आणून दिले. पण काही दिवसांतच रंजना आजारी पडली. इचलकरंजीत उपचार हाईनात म्हणून सांगलीच्या सरकारी रुग्णालयात तिला २८ जुलै ८२ ला आणण्यात आले. २९ जुलै ८२ ला ती मरण पावली. नांदणीचे औषध देऊन मुलीचे मरण स्वतःच्या हाताने ओढवून घेतल्याबद्दल रंजनाच्या वडिलांना कपाळ बडवून घेण्यापलीकडे काही उरले नाही. उदगाव येथील शहाबुद्दीन नदाफ व तातोबा मगदूम यांना एकाच दिवशी जवळ जवळ एकाच वेळी पिसाळलेले कुत्रे चावले. तातोबा मगदूम यांनी ताबडतोब चौदा इंजेक्शने सांगलीला येऊन घेतली; पण शहाबुद्दीन नदाफ यांचा विश्वास नांदणीच्या औषधावर. त्यांनी ते औषध घेतले. शहाबुद्दीनचे मेहुणे फरिद नदाफ यांचा या औषधावर बिलकुल विश्वास नव्हता. त्यांनी शहाबुद्दीन यांना इंजेक्शन घेण्याविषयी खूप सांगून पाहिले. पण त्याकडे शहाबुद्दीन यांनी कानाडोळा केला. काही दिवसांनंतर हायड्रोफोबिया होऊन शहाबुद्दीन यांचा अंत झाला. तातोबा मगदूम मात्र व्यवस्थित औषधोपचारामुळे बचावले.

जयसिंगपूरची मनीषा देखील आणखी एक दुर्दैवी उदाहरण. तिला पुण्यात नातेवाइकांकडे गेली असता कुत्रे चावले. नातेवाईक डॉक्टर होते. त्यांनी तिला ॲन्टी रेबीजची तीन इंजेक्शने दिली. पण त्याच वेळी पाच वर्षांच्या मनीषाच्या घरच्यांना काही कारणाने जयसिंगपूरला परतावे लागले. मनीषाला उरलेली इंजेक्शने जयसिंगपूरला पुरी करावयास डॉक्टर नातेवाइकांनी आवर्जून सांगितले, पण मुलगी लहान आहे तीन इंजक्शने पुरी होतील. उरलेल्या अकरा इंजेक्शनपेक्षा नांदणीचे औषध द्यावे ह्या कल्पनेने घरच्यांनी तिला नांदणीचे औषध दिले. आणि तडफडत मरणारी मनीषा बघणे त्यांच्या नशिबी आले. उपचार विषयक अंधश्रद्धेतून घडणारे हे प्रकार करवून घेणाऱ्यांच्या जीवघेण्या

अज्ञानाचे आणि करणाऱ्यांच्या अघोरीपणाचे प्रतीक आहेत.

सोईसाठी वा श्रद्धेसाठी अगतिकतेने वा आशेने सारासार विचार माणसे अथवा समुदाय गहाण ठेवतात. तसे दाखवून देणेही त्यांना आवडत नाही. त्याविरुद्ध संघर्ष करणे दूरच राहिले. उलट त्यामध्येच सार्थक असल्यासारखे त्यांचे आग्रही वागणे असते. एकट्या सातारा जिल्ह्यात मांढरदेवीच्या जत्रेला दरवर्षी अक्षरशः हजारो बकऱ्या मारल्या जातात. देवळाच्याभोवती रक्तमासाचे खच पडतात. अनेकांच्या अंगात येते. पण हे सगळे भाविकपणे करणाऱ्या यात्रेकरूंनी दरवर्षी लक्षावधी मांढरदेवीचा डोंगर फुलून जातो. वाई तालुक्यातले बावधनचे बगाड गाजलेले आहे. पुणे जिल्ह्यातही काही ठिकाणी हा प्रकार गाजलेला आहे. नवस फेडणाऱ्या माणसाला सूर्योदयाबरोबर आंघोळ करून नदीतून काढतात. एका उंचच्या उंच खांबाला आडवा बांधतात. तो खांब बैलगाडीवर ठेवतात. बैल असतात शर्यतीला पळण्यासाठी तयार केलेले. आडवा टांगलेल्या माणसाचे काय होत असेल? या अघोरी उपायाने कोणता नवस फिटत असेल? पण लोकांना अहमहमिकेने ही संधी साधण्यासाठी धडपडत असतात. बगाडाविरुद्ध ब्र काढणे म्हणजे बरगडी मोडून घेणे. बगाडाविरोधी कायदा ब्रिटिशांनीच मंजूर केलाय, पण कायदा काय करणार?

फलटण तालुक्यातल्या जावळी गावी चैत्री पौर्णिमेच्या जत्रेला टकरा होतात. गावच्या देवळाच्या भिंतीवर मातंग मंडळी येऊन टक्कर देतात. साधा दगड वेगाने येऊन डोक्याला लागला तर वैद्यक शास्त्राला काळजी वाटते. मेंदूत आत रक्तस्राव होऊन माणसाच्या जिवाला अपाय होईल. इथे तर दगडी भिंतीवरच पळत येऊन धडक मारावयाची असते. पण त्याविरोधी बोलायचे कसे?

आडगावचा किस्सा ऐकण्यासारखा आहे. पाटणपासून पाच मैलांवर हे गाव. त्या गावात आजही रॉकेलचा दिवा पेटत नाही. दिवे पेटतात गोडेतेलाचे.

गोडतेलाचे भाव तर गगनाला भिडणारे. गरिबाला खाण्यासाठी वापरावयाची पंचाईत. तर कंदिलासाठी कोण वापरणार? पण आडगाव वापरते. लंगोटी वापरणारी गरिबी त्यासाठी आड येत नाही. गेल्या ७०–८०वर्षांत आडगावात कुणी रॉकेल वापरले नाही. रॉकेल पेटवायला गेले की नक्कीच अपशकून होतो. कधी साप आडवा येतो. शिवराम भिमा गायकवाड नावाच्या व्यक्तीने खेकडे धरण्यासाठी रॉकेलच्या बोळ्याचा वापर केला त्यामुळे तो आंधळा झाला. कोंडीबा खराडेंनी रॉकेल साठवले तर त्याच्यावर लागोपाठ आपत्ती आल्यामुळे मुले दगावली व त्याची

बुद्धी भ्रमली. या सर्वांवर गावाचा ठाम विश्वास.

गावकऱ्यांना पटवायला कार्यकर्ते गेले. गावाच्या मंदिरात त्यांनी कंदील पेटवला. काहीच अक्रित घडले नाही. काच तडकली नाही. कंदील भडकला नाही, जमिनीतून साप आला नाही. पण म्हणून गावाला पटलंय असं थोडंच घडलंय? कार्यकर्ते बाहेर पडले आणि चार दिवसांत गावाकडून पत्र आले –पोलिस पाटलांनी गाव जमवून देवाला साकडे घातले. 'ज्यांनी तुझ्या दरबारात रॉकेल जाळलं त्यांना बघून घे. त्यांना लुगडं नेसून नाचत तुझ्या जत्रेला गावात येऊ दे.'

बोरगावला मी भाषणाला गेलो होतो. अंधश्रद्धेवरच बोलायचे होते. गाव वाळण्याच्या साखरकारखान्याजवळच. समृद्ध. सुशिक्षित. भाषणाला ही गर्दी. चार दिवसांपूर्वी गावात पाहुणा आलेल्या एका व्यक्तीने, माकड फार धुमाकूळ घालते, म्हणून बंदुकीने टिपले होते. गावकरी नाराज झाले. प्रत्यक्ष हनुमानाच्या वंशजाला गोळी घालायची. मग वाजत गाजत हनुमानाच्या वंशजाची यात्रा निघाली होती. गाय हा देखील उपयुक्त पशू आहे. परवडत नसेल तर कापा म्हणणे दूरच राहिले. शेतीत धुडगूस घालणाऱ्या उपद्रवी माकडाला मारायची पंचाईत.

अंधश्रद्धेच्या गर्तेत अडकलेले असे असंख्य प्रकार बुद्धिवादी महाराष्ट्रात आजही चालतात. महाराष्ट्र आणि कर्नाटकाच्या सीमेवरची देवदासींची प्रथाही आयुष्याचे मातेरे करणाऱ्या अंधश्रद्धेचे विदारक आणि जीवघेणे दर्शन आहे. यल्लम्मा देवीला मुली सोडल्या जातात. कारण काय? तर केसांत जट आली म्हणून. मुलीच्या घरची गरिबी असते. पाचवीला पुजलेले अडाणीपण असते. केसाला तेलपाणी नसते. वेणीफणी नसते. केस एकामेकांत गुतत जातात. केसांचा गुतडा होतो. याला म्हणतात मुलीला जट आली म्हणून. जट आली म्हणजे साक्षात यल्लम्मा देवीचे बोलावणे आले. मग मुलीला यल्लम्माच्या डोंगरावर नेले जाते. देवीशी लग्न लावले जाते आणि प्रत्यक्षात देवी राहते बाजूला, भोगदासीपण मात्र तिच्या वाट्याला येते. अनेक निष्पाप मुली या भ्रामक अंधश्रद्धेच्या पायी सरळ कुंटणखाण्याच्या रस्त्याला लागतात. मुंबईच्या कामाठीपुऱ्याचे (वेश्या वस्तीचे) ठिकाणीअसे संबंध प्रस्थापित झाल्यावर हितसंबंधाची एक भक्कम साखळीच तयार होते. नाकी डोळी नीटस मुलीचे अथवा बाईचे केस कधी गुंततात, तिला कधी आपण कुंटणखान्याच्या हाया यल्लम्मा पाठवितो, या शोधक नजरेने दलाल मंडळी घिरट्या घालू लागतात.

काही पालक देवीला नवस बोललेले असतात. अमके तमके होऊ दे. तुला मुलगी सोडीन. ते अमके तमके घडते मग देवीच्या ओटीत पोटची पोर टाकणे येते. म्हाताऱ्या देवदासीच्या गळ्यात दर्शन असते. डोक्यावर जग (यल्लम्माचा देव्हारा) असतो. स्वतः मरण्याआधी तिला ते दर्शन कुणाच्या तरी गळ्यात बांधावेच लागते. यल्लम्मा आईचा जोगवा आपल्यापुढेही अखंड चालू राहील याची सोय बघावी लागते. तेवढ्यासाठी ती हुशारीने कुणाला तरी पटवते आणि तिला जिवंत सरणावर चढवते. ज्या देवदासी मुंबईला जात नाहीत त्या गावाकडे भागाकडेच राहतात. एक अनैसर्गिक, अनैतिक आयुष्य तरण्याताठ्या मुलीच्या वाट्याला येते. सुखी जीवनाचे स्वप्न राखरांगोळी होऊन जाते. सुरक्षित जीवन हा शब्द आयुष्यातून हद्दपार होऊन जातो. प्रतिष्ठा हा शब्द दुसऱ्या जगातला वाटू लागतो. उभे आयुष्य नासून जाते. हे सारे कशासाठी ?

गुंतलेले केस म्हणजे डोक्यात आलेल्या जटा आणि दस्तुरेखुद्द यल्लम्माचे निमंत्रण या अंधश्रद्धेपोटी, आयुष्याची अशी माती होते. यल्लम्माची जबर भीती असते ती म्हणे संगळ्यात रागीट देवी, भारी कोपिष्ट. आईची नुसती चर्चा केली तरी घरादाराला सळो की पळो करून सोडते. बाप्याला लुगडे नेसवल्याशिवाय सोडत नाही. असा तिचा धाक. या धाकाने वाकलेल्या मनातला गुंता आणि केसांच्या जटेचा गुंता सोडविणे आता महाराष्ट्रात ठिकठिकाणी चालू झालेय. जट म्हणजे देवीचे निमंत्रण नसते. ती सहज सरळ सोडविता येते. आणि ती सोडविलेल्या बाईचे देवी काहीही वाकडे करू शकत नाही. हे आता हळूहळू पटायला लागलंय, पण किती हळूहळू. मागच्या वर्षीच देवदासी प्रथेविरुद्ध यल्लम्माच्या जत्रेत निदर्शने करताना जाणवत होते. देव मुले मागत नाही. देवाला मुले सोडू नका असे म्हणणारे आम्ही दोनशेजण होतो आणि चारी बाजूने भक्तिभावाने जमा झालेला जनसमुदाय दोन लाख. चुकीच्या समजुती या तशा आपल्या जीवनाचा सर्व भागच व्यापून राहिलेल्या असतात आणि त्याबरोबर आपले मन आणि भवितव्य आपण दोलायमान करत असतो. घराबाहेर कामाला पडताना तीन जण असले तर मनात तीन तिगाडा काम बिघाडा येते. रस्त्यावरून मांजर आडवे गेले की, किंवा विधवा आडवी गेली की मनात शंकेची पाल चुकचुकते. उलट गायवासरू किंवा सुवासिनी गेली तर उगीचच आशा वाढीला लागत. कामाला निघालो आणि कुणी शिंकला की मन साशंक बनते. घुबडाचे ओरडणे ऐकू आले तर अपशकून होतो. उलट स्वप्नात जिवंत माणूस मेलेला

दिसला तर त्याचे आयुष्य वाढते. या अशा असंख्य समजुती तसे बघितले तर अंधश्रद्धेपेक्षा वेगळ्या नसतात. कारण कोणतेही सुसंगत कारण नसताना त्या बरहुकूम आपले काम, आपले जीवन बेतण्याचा व्यक्ती प्रयत्न करते. ते जमले नाही तर मनात खंत बाळगते. अपशकुनाने सचिंत होते. या समजुतीकडे नीटपणे बघितले तर धर्मपरंपरेतील शोषणाच्या आधारावरच त्यातील अनेकांचा उगम असतो. स्वतःचा काहीही दोष नसताना पती मृत झालेली स्त्री विधवा म्हणून अपशकुनी मानली जाते. आणि कुंकवाला धनी आहे एवढ्यावर दुसरी सुवासिनी व शुभशकुनी मानली जाते. या चुकीच्या समजुतीपेक्षा आरोग्यविषयक गैरसमजुती ही थोडी वेगळी बाब आहे. त्याही दृढ असतात. अपायकारक असतात. परंतु प्रत्यक्षात प्रयोगाने त्या दूर करण्याचा प्रयत्न करता येतो. मांजर आडवे गेले की काम होत नाही याचा प्रतिवाद करण्यापेक्षा भात खाऊन जखमेत पू होत नाही हे समजावणे, पटविणे सोपे असते. खूप गरजेचे असते. माणसाचे दैनंदिन आयुष्य सुखी करणारे असते. मीठ खाल्ल्याने रक्त शुद्ध होते. तिखट खाल्ल्याने ताकद येते. मांसाहार हा शाकाहारापेक्षा जास्त आरोग्यदायी. निरसे (न तापवलेले) दूध आरोग्यदायी अशा स्वरूपाच्या अनेक समजुती जनसमुदाय अगदी आपल्याशा करून बसलेला असतो. त्याबाबत खरे तर केवळ डॉक्टराचेच नव्हे तर अंधश्रद्धेविरुद्ध मोहिमेतल्या कार्यकर्त्यांनेही माहिती करून घ्यावयास हवी. लोकांना द्यावयास हवी. मिठाने रक्त शुद्ध होत नाही. आपण सर्वसाधारणपणे खातो त्यापेक्षा खूप कमी मिठाची आवश्यकता शरीराला असते. जास्त मीठ खाल्ल्याने रक्तदाब, मूत्रपिंडाचे विकार याचे प्रमाण वाढते. मीठ जितके कमी खावे तेवढे चांगले व नवीन पिढीला तरी सुरवातीपासूनच ही सवय लावावी. तिखटाचा व ताकतीचा संबंध तर बादरायण आहे. योग्य प्रमाणात तृणधान्ये, कडधान्ये, शेंगदाणे व अन्य असे पदार्थ खाल्ल्यास मांसाहाराइतकेच उत्तम पोषण होऊ शकते. गाईला, म्हशीला क्षयरोग असू शकतो. त्याचे जंतू दुधात येतात. मानवी हात, भांडे, अस्वच्छ पाणी यामुळे दुधात अनेक जंतू मिसळतात. तेव्हा दूध हे कधीही उकळल्याशिवाय पिऊ नये. या व अशा अनेक इतर गोष्टी सर्वसामान्यांच्यापर्यंत सुलभपणे पोचवावयास हव्यात.

याहीपेक्षा पुढची समजूत ही उपचार पद्धतीच्या चुकीच्या कल्पनांबद्दलच असते. डोळ्याला अचानक कमी दिसू लागले तर देवाचे आहे, करणी आहे. विटाळ चांडाळ आहे, असे समजून देव देवर्षी, कोंबडा ओवाळणे, मंत्र, तंत्र यांत

वेळ घालविला जातो. हा बहुमोल वेळ घालवून ज्या वेळी डॉक्टरकडे रोगी येतो, त्या वेळी हा गंभीर नेत्रदोष दुरुस्तीच्या पलीकडे गेलेला असतो.

डोळ्यात कधी काही जाते. परंतु डोळ्याच्या जवळजवळ सर्व बाह्यरोगांत डोळ्यात सलते. पापणीच्या उघडझापी बरोबर वरच्या पापणीत काही तरी गेले आहे असा भास होतो. अशा वेळी गदळ काढा असा सल्ला मिळतो. एकट्या सातारा जिल्ह्यात गदळ काढणाऱ्या बायका केंजळ, बावधन, सरताले, बावले, वाळंजवाडी, नेरले, कीडगाव, आनेवाडी, देवूर, फलटण या भागात आहेत. त्या सुई डोळ्यात घालून, डोळ्यात जीभ घालून, कापूस वा काडी डोळ्यात घालून गदळ काढतात. तात्पुरते कदाचित बरे वाटतेही. पण पुढचे परिणाम डोळे उघडणारे असतात. दुर्दैवाने तोपर्यंत डोळे जाण्याची वेळ आलेली असते. जिभेवर वा लाळेमध्ये जंतू असतात. बुरशी असते. ती रुग्णांच्या बुबुळावर त्वचेवर चढते. त्यामुळे बुबुळ पांढरे पडणे, पू होणे, धनुर्वात होण्याची शक्यता असते. डोळ्यात फूल पडते वा डोळे जातात. नोकरी गमवावी लागते व सर्व कुटुंबावरच आर्थिक अरिष्ट कोसळते.

'अ' जीवनसत्त्वाच्या अभावी मूल रातांधळे होते. त्यावर चटकन उपचार केला तर हा रातआंधळेपणा जाऊ शकतो. अगदी कमी खर्चाचा हा उपचार आहे पण त्यावर उपचार काय तर सात घरी भीक मागून अन्न गोळा करायचेव तेउंबऱ्यावर बसून खावयाचे. कानाला भोके पाडून मंतरलेला दोरा त्यात ओवायचा. मोतीबिंदू हा तर अत्यंत नाजूक शस्त्रक्रियेने काढावा लागतो. योग्य चष्मा लावून मग दृष्टी पूर्ववत होते, पण अडाणी ग्रामीण भागात चलाख वैदू येतात. बऱ्याचदा ते परप्रांतीयही असतात. रुग्णाला समोर बसवितात. त्याचा साथीदार रुग्णाचे डोके धरतो. दुसरा हस्तक डफ वाजवतो. वैदू एका तीक्ष्ण शस्त्राने बुबुळाचा आरपार छेद घेऊन एका झटक्यात मोतीबिंदू आत ढकलतो. हे इतक्या झटकन होते की ते कळतही नाही. रुग्णास त्वरित दिसू लागते व तो मागेल ते पैसे देण्यास तो तयार होतो. मग त्याला गावात हिंडवून इतरांना शस्त्रक्रियेला तयार करतात. गर्दी वाढते दरही वाढतो. गल्ला जमवून हे लोक रातोरात काढता पाय घेतात.

पुढे काही दिवसांनी मोतीबिंदू आत फुगतो, फुटतो. खाली वाकल्यावर, खोकल्यावर, शिंक येऊन तो पुढे बुबुळावर धडकतो. असहाय ठणका लागतो. अशा वेळी मोतीबिंदू पुन्हा काढावा लागतो पण नजर जवळ जवळ जातेच.

मूक बधिर विद्यालयात दाखल होणाऱ्या मुलांवर वाचा येण्यासाठी अघोरी

उपाय करणारे अनेक सुशिक्षित पालकही आढळतात. आमका तमका साधू मुक्या मुलांना बोलके करतो. म्हणून त्या साधूच्या मठीवर मुलाला नेले जाते. काहा तरी छाऽऽछू करून मुलाच्या जिभेला चटका दिला जातो. मूल जिवाच्या आकांताने किंचाळते आणि त्याच्या तोंडून त्यामुळे काही ध्वनी बाहेर पडल्याचा भास होतो आणि साधूबाबाचा दुवा मिळून मुलगा बोलका होईल, म्हणून विज्ञानाचे पदवीधर पालकही, मुलाला पुन्हा पुन्हा नेत राहतात. कुणाचा मुलगा मूक कर्ण बधिर असतो. हे बधिरपण बरे होणारे नाही असे डॉक्टरांनी खात्रीने सांगितलेले असते. पण सुशिक्षित पालक ज्योतिषी, अंगारे करीत फिरतात. मग कुणी तरी ज्योतिषी सांगतो, मुलाच्या मनाला जबरदस्त धक्का बसला तर तो नक्की बोलेल. आपल्या मुलाला कोणत्या प्रकारे धक्का द्यावा याचा पालक डोके खाजवून (की गहाण टाकून) विचार करतात. त्यांच्या लक्षात येते, मुलाला पोहता येत नाही. त्याला तलावाच्या बाजूने फिरावयाला न्यावयाचा आणि अचानक धक्का देऊन तलावात पाडायचा. तसे झाले की मग त्याला धक्का बसणार आणि त्याची वाचा परत येणार. वडील प्रयोग करतात. प्रयोग मुलाच्या जिवावरच बेतण्याची वेळ येते.

जे जे होणार नाही असे वैद्यकीय शास्त्र विज्ञानाच्या आधारे सांगते त्या त्या ठिकाणी अगतिकतेपोटी, अज्ञानापोटी, अंधश्रद्धा जन्म घेते. सहा वर्षांचा मुलगा पोलिओ होऊन पाय निकामी झालेला. कुणी तरी आईवडिलांना सांगितले की, त्याला उकिरड्यात कमरेएवढे पुरून ठेवा. म्हणजे त्याच्या पायात जोर येईल. गणेशच्या वडिलांनी तो उपाय करण्याचे ठरविले. सकाळी पत्नीसह त्यांनी उकिरड्याची पूजा केली. आणि सूर्योदयाला मुलाला उकिरड्यात कमरेइतका पुरला. तो थोडयाच वेळात रडू किंचाळू लागला. पण लक्ष कोण देणार ? शेवटी तो रडून रडून बेशुद्ध पडण्याची वेळ आली. त्या वेळी त्याला बाहेर काढले. दोन्ही पाय सुजलेले. जागोजाग उकिरड्यातले मुंग्या किडे घुसलेले. एक पाय आजाराने गेलाच होता. या अघोरी अंधश्रद्धेने दुसराही पाय निकामी झाला.

अशा आरोग्यविषयक अघोरी अंधश्रद्धा आणि चुकीच्या समजुती जीव घेण्या असतात. आणि त्याच वेळी जीवन व्यापून टाकतात. जन्माआधीपासून याला सुरुवात होते. गर्भारशी बाईला तपासायला नेऊ नये ही समजूत खेडेगावात अजून आढळते. घरीच केलेले बाळंतपण चांगले; अशी तर हटकून अनेकांची समजूत असते. चढत्या तापामुळे बाई बडबडायला लागली तर पहिला संशय

लागीर झाल्याचा (भुताने धरणे) व्यक्त केला जातो. आणि दम्याच्या दमछाक करणाऱ्या धापेचे निदान, त्या धापेने पोट खालीवर होत असते- त्यामुळे पोटातला आजार असे केले जाते. फुप्फुसाच्या रोगांसाठी पोटावर डागण्या देऊन मुलाला हैराण केले जाते.

' माणसाला माणसाची दुःखे भोगावयास लागली पाहिजेत, ' असे मार्क्स म्हणाला होता. झपाट्याने विकासित होत जाणाऱ्या उपचार तंत्रामुळे, प्रतिबंधक उपायांमुळे, आरोग्याविषयक शिक्षणामुळे खरे तर सारी भोंदुगिरी कधीच कोठल्या कोठे परागंदा व्हावयास हवी होती. पण अंधश्रद्धा मनाची बैठक, सामान्याला अगतिक करणारी समाजव्यवस्था आणि याविरुद्ध आग्रहाने झुंजणाऱ्या प्रयत्नांचा अभाव या साऱ्यातून हे घडून आले नाही. यापुढे तरी हमखास यश देणारी ही आघाडी आग्रहाने लढवावयास हवी.

* *

पाच

भानामतीची भानगड

अंधश्रद्धा, बुवाबाजी याबद्दल चर्चा करायला बसलो की भानामतीवर हटकून प्रश्न येतात. आपण भानामतीची करणी बघितली आहे असे सांगणारे त्या तेवढ्याशा बैठकीतही चार दोन जण मिळतात. भानामतीच्या चमत्काराचे काही ठराविक प्रकार फार पॉप्युलर आहेत. घरातल्या वस्तू काहीही कारण नसताना थडाथडा हलू लागतात. फळीवरचे डबे खाली येतात. घरातले कपडे बाहेर जाऊन पडतात. घरातली कपाटे, खुर्च्या, टेबले ही कधी या खोलीतून आपोआप त्या खोलीत जातात. भानामती फारच पॉवरफुल असेल आणि ती बघायला बघ्यांची गर्दी घराभोवती जमली असेल तर चौथ्या मजल्यावरच्या वस्तूही तरंगत तरंगत खाली येताना आढळतात, कधी घरात घाणीने भरलेले मडके अचानकपणे येऊन फुटते. कसे आले, कोठून आले याचा पत्ता लागत नाही. कधी घरातल्या दांडीवर वाळत घातलेले ओले कपडे अचानक पेट घेतात. कपड्यावर आणि अंगावरही बिब्ब्याच्या फुल्या पडणे हा भानामतीचा हातखंडा आहे. ज्याचे स्पष्टीकरण घरच्यांना मिळत नाही, असे अमानवी प्रकार चालू होतात. कोठे घरातला प्रत्येक अन्नपदार्थ कडू होऊ लागतो. कुठे मुलाच्या कमरेचा चांदीचा करगोटा आपोआप नाहीसा होतो. सारे घर त्रासून जाते. शेजारी पाजारीही भयचकित होतात. लोकांना भीती व आश्चर्ययुक्त कुतूहल वाटू लागते. काही काळ त्या भागात तो चर्चेचा विषय बनतो.

मराठवाड्यातल्या बऱ्याच भागात अंगात येण्याला भानामती झाली असे म्हणतात. अशा स्त्रिया घुमतात. जमिनीवर लोळण घेतात. असंबद्ध बडबडतात. एखादा दाढी, जटा वाढलेला, भगवे कपडे घातलेला, गळ्यात रुद्राक्षाच्या माळा घातलेला महाराज हा अशा बायकांचा तारणहार असतो. बाळंतिणीची कवटी हाताची दोन हाडे, चिंध्यांची बाहुली, लाकडी बाहुली, लिंबे, खिळे, दाभण, सुया, शिंदीचे फोक या सामग्रीवर, मध्ये अग्नी पेटवून हालगीच्या नादावर हा महाराज त्यांची भानामती काढतो. हालगीच्या चढत्या आवाजाबरोबर बायकांचे घुमणे वाढते. अंगाचे आळोखे पिळोखे वाढतात. स्वतःच्या कपड्यांचे भान सुटते. मग तास दीड तासाने हालगी हळूहळू थांबली की, त्यांचे घुमणेही कमी होते. त्या स्वतःहून नीटनेटक्या होतात. मग त्या स्त्रीला महाराजांच्या पुढ्यात नेले जाते. तिला ते अंगारा लावतात. कधी एखादी बाई त्यांच्या पुढेही असंबद्ध बडबड लागली तर झपकन् तिच्या अंगावर फोक ओढतात वा कानशिलात देतात. महाराजांपुढे एक नारळ, पाच लिंबे ठेवायची. एक लिंबू मारून ते परत देतात. बाकीची त्यांच्याकडे ठेवतात. साधारणपणे पाच सात वाऱ्यांत गुण येण्याची हमी दिली जाते. तेवढ्यात नाही जमले की, भानामती जबरदस्त म्हणून पुढच्या वाऱ्या करायला लावतात. अशा भानामतीने झपाटलेल्यांचे एक मोठे शिबिर मे १९८२ ला हिंगोळी, जिल्हा परभणी येथे घेण्यात आले. जवळ जवळ ३०० व्यक्तींची मानसोपचार चिकित्सा करण्यात आली. भानामती हा जादूटोण्याचा प्रकार नसून मानसिक आजाराचा प्रकार आहे, हे त्यात सप्रमाण सिद्ध झाले.

शब्दकोशामध्ये भानामती शब्दाचा अर्थ चेटूक, भुताटकी, काळी जादू असा केला आहे. मनुष्याला त्रास देणारी, चटकन् स्पष्टीकरण न देता येणारी गूढ घटना म्हणजे भानामती. अंगात येण्याच्या प्रकाराला भानामती म्हणणे हे काही ठिकाणी प्रचलित असले तरी फारसे बरोबर नाही. भानामतीचे वैशिष्ट्य म्हणजे या घटना या नेहमी गूढ व भीतीदायक असतात. भानामतीने अपघातातून बचावला, भानामतीने विहिरीला पाणी लागले, लॉटरी लागली वा पुत्रप्राप्ती झाली असे कधी होत नाही. सुरुवातीला लिहिल्याप्रमाणे कपड्यावर उमटणाऱ्या काळ्या फुल्या, अचानक पेटणारे कपडे वा शेणी, घरातल्या वस्तूंची आपोआप बदलली जाणारी जागा, घरावर येणारे दगड-धोंडे, घरात लिंबू वा चिंध्यांच्या बाहुल्या सापडणे या गोष्टी भानामतीच्या खात्यावर जमा आहेत. भानामती झालेल्या व्यक्तीबद्दलही काही गैरसमज आढळतात. अशी व्यक्ती कोनाड्यात वा खुंटीवर

बसते, ती आपल्या केसांनी छताला लटकते. अशा व्यक्तीच्या डोळ्यातून, नाकातून कानातून सुया, दाभण, खिळे बाहेर पडतात.

भानामतीने पछाडल्या गेलेल्या व्यक्तीबद्दल, घराबद्दल, लोकांना सहानुभूती वाटते. हळहळही वाटते पण त्यांना या त्रासातून मुक्त करण्याच्या भानगडीत कोणी पडत नाही. 'हे सगळे थोतांड आहे हो' असे म्हणणारा देखील हे कसे थोतांड आहे ते सिद्ध करण्याच्या वाटेला जात नाही. मनातल्या मनात,कशाला उगीच त्या वाटेला जा, खरंच ती असली आणि तिचा फटकारा आपल्याला बसला तर? असे त्यांच्या अंतर्मनात वाटत असणे शक्य आहे. ऐकीव माहिती स्वतःचे तिखटमीठ लावून सांगता सांगता तिचा किती आणि कसा विपर्यास होतो व त्यामुळे विपरीत परिणाम होतो याची जाण सांगणाऱ्याला नसते. यामुळे होते एवढेच की, विज्ञानयुगातही भानामतीची भयानकता कायम राहते.

भानामतीची चिकित्सा चालू करताना एक धारणा ठामपणे प्रत्येकाने मनाशी बाळगावयास हवी. ती म्हणजे विज्ञानाचा साधा सिद्धान्त: कोणत्याही भौतिक शक्तीशिवाय एखादी गोष्ट एक मिलिमीटरही इकडून तिकडे हालवता येत नाही. किंवा शून्यातून आपोआप असे काही निर्माण होत नाही. अशा घटना घडत असतील तर अटळपणे त्यामागे मानवी, यांत्रिक, रासायनिक, जैव रासायनिक अशी करामत आहे आणि ती जाणतेपणे वा क्वचित प्रसंगी अजाणतेपणेही गूढ आवरणाखाली मोडली जात आहे. त्यामुळे उड्या मारणारी भांडी, पेट घेणारे कपडे, येऊन पडणारे घाणीचे मडके अथवा कपड्यावरच्या फुल्या यामागे कोणता ना कोणता सजीव हात असला पाहिजे. भानामती संपविणे म्हणजे हा हात (उवडकीस आणणे) ओळखणे. त्यासाठी अर्थातच अनुभव, शास्त्रीय विचार, चिकित्सक वृत्ती याचा आधार घ्यावयास हवा. साधा तर्कशुद्ध विचारही हे आपल्याला पटवू शकतो की आत्मा, भूत आहेत असे क्षणभर मानले तरी, त्यांना भौतिक अस्तित्व नाही. मग भौतिक नसलेली भानामती भौतिक घटना कशा घडवून आणू शकेल? पण ही शंकाच आपल्या मनाला शिवत नाही.

भानामतीच्या अनेक प्रकारांत अभ्यास केल्यावर काय आढळते? वैफल्यग्रस्त तिरस्कृत, अपयशी व्यक्ती बुहुधा त्याच्या मागे असतात. असे अपयश वा वैफल्य पचविण्याची त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची कुवत नसते. वरे हे अपयश हे प्रत्येक वेळेला त्यांच्या चुकीनेच आलेले असते असेही नाही. अशा वेळी त्यांना सहानुभूतीची

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. ३७१७
निषेध साहित्य संग्रह
शाखा

अतिशय गरज असते. रूढ मार्गाने ती मिळणे शक्य नसते. अशा वेळी लोकांचे लक्ष वेधून घेण्यासाठी आणि आपण किती त्रासात आहोत आपल्याला कसा जाच होतो, पीडा मागे लागली असून आपण कसे जीवन जगत आहोत हे दाखवून लोकांची सहानुभूती व प्रेम मिळवण्यासाठी, वरवर पाहता आत्मक्लेशाच्या भासणाऱ्या घटना अशा व्यक्तीकडून होत असतात.

इतरांचे प्रेम व सहानुभूती मिळावी असे प्रत्येकाला वाटत असते. परंतु अप्रत्यक्ष व विकृत मार्गाने मिळवणे मानसिक दुबळेपणाचे लक्षण आहे आणि त्याबरोबरच त्याला व समाजालाही हानिकारक आहे.

भानामती पीडित व्यक्ती करत असलेली कृती कधी कधी चोरटेपणाने, कधी जाणीवपूर्वक तर कधी अजाणतेपणी व्यक्तीच्या सुप्तमनातील इच्छेच्या दबावामुळेही होते. अशा व्यक्ती मानसिक दृष्ट्या असंबद्ध (सायकॉलॉजिकली मालॲडजेस्टेड) किंवा अनैसर्गिक, विकृत (ॲबनॉर्मल) असल्याने त्यांना मानसोपचाराची गरज असते. अशा व्यक्तींना मानसोपचार तज्ज्ञ संमोहनावस्थेत घेऊन भानामतीमधील त्यांच्या कार्यभागाची कबुली व पुढे असे न करण्याचे आश्वासन मिळवू शकतो. अशा संमोहन अवस्थेत दिलेले वचन व्यक्ती पाळतात. भानामतीच्या संदर्भात एक गमतीची गोष्ट म्हणजे, व्यक्तीबद्दल होणारे वर्तन त्रास उत्पन्न करू शकणारे आहे असे वरवर वाटले तरी प्रत्यक्षात ते तसे नसते. अंगावरचे कपडे अचानक पेट घेतात पण व्यक्ती जबर भाजली कधीच जात नाही. कपाटातल्या वस्तू बाहेर येतात, पण सोन्या-चांदीचे दागिने न येता चिल्लर नाणी येतात. वस्तू नाहीशी झाल्याचा भास केला जातो. पण त्यावरील आपली मालकी कायम राहील याची खबरदारी घेतली जाते. उगाच शारीरिक त्रास वा आर्थिक नुकसान कोण सोसणार ?

भानामतीच्या असे आरपार बघायला लागले की, गमती-जमती, विसंगती दिसायला लागतात. आणि बिंगे फुटायला लागतात. गावाकडून वसतिगृहात राहावयास आलेली एक षोडष वर्षा तरुणी. बिचारी वसतिगृहात आली आणि भानामतीची बळी झाली. अंगावर बिब्ब्याच्या काळ्या फुल्या उठायला लागल्या. घरचे घाबरले, गावाकडे घेऊन आले. भानामतीची बाधा नाहीशी झाली. पुन्हा वसतिगृहात पाठविली तर पुन्हा प्रकार चालू. पुन्हा गावाकडे आली की, प्रकार बंद. घरचे चक्रावून गेले. ते शेवटी एका चिकित्सक निरीक्षकाने ध्यानात आणून दिले. फुल्या अंगावर सगळीकडे उठतात. पण पाठीच्या ज्या भागावर स्वतःचा

हात पोचून स्वतःच्या हाताने फुली काढता येत नाही त्या जागी कधीच कशी फुली उठत नाही. काही फुल्या सराईत व्यवस्थित वळणदार आणि काही खालीवर ओबड धोबड. हे भानामतीमुळेच की, स्वतःच्याच डाव्या हाताच्या फुल्या काढण्यातील कौशल्याच्या अभावामुळे? मग खरे कारण मुलीने सांगितले. तिला शिकायचे नव्हते. गावाकडच्या एका तरुणाशी तिला लग्न करायचे होते. तेव्हा वसतिगृहातून घराकडे यायला आणि त्याला भेटायला तिने ही नामी भानामती हुडकली.

एक बारा-तेरा वर्षांचा मुलगा. डोक्याला अचानक येऊन दगड लागत. आईवडिलांनी मुलाचे किंचाळणे ऐकून धावून यावे तर डोके धरून खाली बसलेला मुलगा आणि आजूबाजूला दोन चार दगड पडलेले. भानामतीचा प्रकार. घरचे घाबरले. देव देवर्षी, गंडेदोरे, तोडगे झालेले. प्रकार थांबेनात. मुलाला शाळेत जाताना काही इजा नको म्हणून हेलमेट घालून शाळेत पाठवू लागले. दीड दोन वर्षे सारे कुटुंब याच चिंतेत. शेवटी एकदा एका बुद्धिवाद्याची मदत काहीशा नाखुषीनेच घेण्यात आली. त्याने चौकशी केली. मुलाच्या डोक्यावर अंगावर दगड येऊन आदळताना प्रत्यक्ष कोणी पाहिले आहे? तसे ना आईने पाहिले होते ना शेजार-पाजाऱ्यांनी, ना मित्राने. मुलाला विचारले, शाळेत जाताना तुझ्या डोक्यावर हेलमेट घालून जाण्याची गरज तुला वाटली की तुझ्या आईला? तो म्हणाला, 'आईला.' तुझ्याबरोबर चोवीस तास आमचा एक कार्यकर्ता ठेवू का, बघूया भानामती कशी येते? तो म्हणाला तुमच्या धाकाने भानामती पळेल. तुम्ही गेल्यावर परत वळेल. तोपर्यन्त मुलाची कौटुंबिक माहिती पण अन्य ठिकाणांहून गोळा झाली होती. लक्षात आले की, मुलगा एकुलता एक आहे. बाप व्यसनी आहे. आईचा मुलावर फार जीव, त्याच्याकडून अभ्यासात फार अपेक्षा. मुलाची बुद्धी यथातथाच. प्रयत्न करूनही कितीशी प्रगती होणार? मग मुलाच्या अभ्यासाबाबत आईची सक्त नाराजी. आपल्याला आईचे प्रेम मिळावे आणि अभ्यासातील यशाचे झंझांट सुटावे म्हणून मुलानेच भानामतीला बोलावले.

पहिल्या काही दिवसांतच त्याला फायदा लक्षात आला. अभ्यासाबद्दल सतत खावी लागणारी बोलणी थांबली. भानामतीची करणी याच्यावर झाली आहे. या कल्पनेने त्याला सहानुभूती, प्रेम मिळू लागले. मग त्याने भानामतीला जवळ ठेवूनच घेतले. येथे लक्षात घ्यावयास हवे की, ही मुलाची लबाडी नव्हे तर त्याच्या अगतिक बालमनाने अबोध मनाच्या पातळीवर शोधलेला हा मार्ग आहे.

आणि म्हणूनच त्याच्या आईवडिलांना सांगावे लागले की, मुलाला यासाठी एकदम हडसाल, खडसवाल तर परिणाम उलटाच होईल. मुलाच्या भावनिक गरजा लक्षात घेऊन त्या पुऱ्या करायचा प्रयत्न जसजसा आईवडिलांचे कडून होऊ लागला तसतशी मुलाच्या वागण्यात सुधारणा दिसू लागली.

एका व्यापाऱ्याच्या घरी अचानक सारे काही कडूकडू लागू लागले. जेवण घ्या, चहा घ्या, वा साखर. सारे काही कडूच लागायचे. घरातले सगळे चक्रावले. बाहेरचे सहानुभूतीने पाहू लागले. हा कडूपणा नेहमी कोयनेलचा होता. एका हुषार कार्यकर्त्याने व्यापाऱ्यांच्या आर्थिक व्यवहाराची माहिती काढली. लक्षात आले की, वरपांगी सर्व उत्तम दाखवले जात असले तरी त्याने बरीच मोठी खोट खाल्ली आहे. देणी देण्याचीही पंचाईत आहे. या पंचायतीतून तात्पुरते सुटण्यासाठी व लोकांची दया मिळविण्यासाठी त्यांनी हा मार्ग काढला होता.

एका आईची तक्रार होती की, तिच्या तान्ह्या मुलाच्या कमरेचा चांदीचा करगोटा कुणीतरी कापून नेते. कुटुंब तसे सधन होते. एक करगोटा गेला की दुसरा आणत. घरात येणाऱ्या प्रत्येकावर पाळत ठेवून झाली. शेवटी पोलिसांत तक्रार झाली. तपास, जाब जबाब झाले. सरते शेवटी बाहेरचे काहीतरी समजून भानामती-साठी मांत्रिक-तांत्रिक ह्यांच्यासाठीही पैसा गेला. हे भलतेच लचांड या बाईच्या मागे लागले, या कल्पनेने तिचे सारे नातलग विशेषतः तिचा नवरा तिच्याशी अधिक आस्थेने वागू लागला. आपल्या मुलावर उद्या येणाऱ्या संकटाची आज ही सुरवातीची चाहूल तर नाही ना ? अशी सर्वांना भेडसावणारी शंका. शेवटी सारे उपाय थकले आणि त्या बाईला मनोविकृती तज्ज्ञाला दाखविले. निदानाचा भाग म्हणून त्या बाईला संमोहनावस्थेत नेली असताना सत्य तिच्याच तोंडून बाहेर आले. बाहेर-ख्याली नवरा घरात तिच्याकडे व मुलाकडे दुर्लक्ष करी. भानामतीचा प्रकार हा आपल्याकडे लक्ष व सहानुभूती वळवण्यासाठी होता. करगोटे विकून पैसे मिळव-ण्याचा त्यात हेतू नव्हता. आजपर्यंतचे सारे करगोटे तिने घरात एका डब्यात ठेवले होते. आईच मुलाचे करगोटे चोरत आहे ही शंका तरी कशी आणि कोण घेणार ? भानामती करता तीच जबाबदार आहे आणि हे प्रकार तिने थांबवायला हवेत अशी तिला जाणीव देण्यात आली. मग सर्वांना काळजीत टाकणारे तिचे वर्तन थांबले.

अज्ञान, अंधश्रद्धा, अगतिकता या पायी येणाऱ्या भानामतीमुळे घरातल्या अन्य व्यक्तींना बराच त्रास होतो. त्यामुळे याला जबाबदार कोण हे समजल्यावर

कुटुंबातील लोक तिच्याशी जशास तसे या नात्याने वागणे स्वाभाविक व शक्य असते. 'आम्हांला त्रास दिला काय, आता तुमची खोड मोडते.' म्हणून भानामती करणाऱ्याला इतरांनी वाईट वागवणे कुणाच्याच हिताचे नसते. मनाने खचलेल्या, दुबळ्या झालेल्या व्यक्ती त्यातून सुटण्याचा, भानामती हा विचित्र मार्ग हुडकतात. त्यांना सूडाच्या भावनेने वागवले, त्यांचा तिरस्कार केला तर त्यांची मानसिक समस्या अधिकच कठीण व जटिल होईल. याउलट ती व्यक्ती तशी वागली हे आस्थापूर्वक समजावून घेऊन त्या मूळ अडचणीचे निराकरण करण्याचे प्रयत्न करावयास पाहिजेत. आपल्या लक्षात नाही आले तर प्रसंगी मानसोपचार तज्ज्ञाचा सल्ला घ्यावा. ज्या घरात भानामती होते तेथील दोषी व्यक्ती व्यतिरिक्त इतर व्यक्तींनी एकूण समस्या कशी हाताळावयाची याबद्दल मार्गदर्शन घ्यावे.

त्रस्त कुटुंबातला भानामतीवरील विश्वास हा निव्वळ खुळ्याचा बाजार आहे असे त्यांना फटकळपणे सांगणे योग्य नाही. असे झाले तर कुटुंबातील मंडळी तुमच्याशी विश्वासाने, मनमोकळेपणे बोलणार नाहीत आणि मग सत्य हुडकून काढणे अधिकच अवघड होईल. भानामतीच्या कथा नेहमीच पराचा कावळा करून सांगितल्या जातात. त्यामुळे ऐकीव बातमीवर विश्वास ठेवण्यात अर्थ नसतो. या माहितीमधली विसंगती हुडकून प्रत्यक्ष घडलेल्या घटनांचा स्वीकार करून चर्चेने समोरच्या व्यक्तीला पटवून देणे श्रेयस्कर असते. भानामती घरातलीच एखादी व्यक्ती करते असा बहुसंख्य वेळचा अनुभव असल्याने एखादी व्यक्ती घटनास्थळापासून दूर ठेवून, त्यामुळे भानामती बंद झाल्यास ती व्यक्ती भानामती करते असे समजण्यास हरकत नाही. खंबीरपणे शोधक प्रश्न विचारत, घटनांचे बारकाईने निरीक्षण करत, वर्तनातील विसंगती हेरून जर पाहणी केली तर बहुसंख्य वेळा भानामती पळ काढते. पण भानामतीचा छडा लावला या यशाने हुरळून जाण्यात अर्थ नाही, तर जी व्यक्ती असे करते याचा छडा लागेल, तिचा कुटुंबात सूड बुद्धीने छळ होणार नाही याची जबाबदारीही कार्यकर्त्याने उचलावयास हवी. या प्रकरणांना प्रसिद्धी चटकन् व सनसनाटी मिळते. पण हे बिंग फोडण्याचे काम कोणाच्या वर्मी घाव घालण्याचे नाही तर जीवघेण्या सामाजिक वास्तवाने होणारी व्यक्तीची कुचंबणा पुढे मांडून ती दूर करण्याचे आहे, याचे भानही बाळगावयास हवे.

* *

सहा

वशीकरण विद्येचे विज्ञान

संमोहन शास्त्राबद्दल आपल्याकडे भरपूर कुतूहल आणि गैरसमजही आढळतात. त्याला 'वशीकरण विद्या' समजण्यात येते. रस्त्यातून जाताना अमुक अमुक व्यक्तीकडे बघितले, मग भूल चढली. त्या व्यक्ती मागोमाग कोठे गेलो ते स्मरत नाही. भूल उतरली त्या वेळी अमुक ठिकाणी आहे असे लक्षात आले. मग परत आलो. अशा कहाण्या वृत्तपत्रात अधून-मधून येत असतात. संमोहन करू शकणाऱ्या व्यक्तीबाबत भयमिश्रित कुतूहल असते. त्याला तसे टाळले जाते. न जाणो यांनी आपल्याला घातली भूल तर! अशी भीती सुशिक्षितांच्याही मनाच्या कोपऱ्यातही असते. दुसऱ्या बाजूला त्याची चैन आहे, तो काय कोणालाही गटवेल अशी भावना असते. त्यामुळे संमोहन शास्त्राकडे एक गूढ तांत्रिक विद्या म्हणून पाहिले जाते. सामूहिक संमोहनाचे जाहीर प्रयोग हल्ली महाराष्ट्रात काही जण करू लागले आहेत. त्यामुळे हा वरील भ्रम काही प्रमाणात दूर होऊ लागला आहे.

हिप्नॉटिझम हा मूळचा ग्रीक शब्द. तो हिप्नॉस या शब्दावरून आलेला. हिप्नॉसचा अर्थ झोप. या अर्थाने बघितले तर हा शब्द चूक आहे. कारण संमोहन म्हणजे झोप नव्हे. मग संमोहन म्हणजे काय? तर आपल्या जागृत जाणिवेचे दोन भाग करता येतील. एक बाह्य जागृती व दुसरी केंद्रित जागृती. संमोहन अवस्थेत बाह्य जागृत जाणीव ही झोपेच्या पातळीवर असते; परंतु

केंद्रित जागृतीची जाणीव वाढते,ती जास्तीत जास्त तीव्र असते. याउलट झोपेच्या अवस्थेत ही केंद्रित जाणीव शून्यवत असते.

मनाचे हे पृथक्करण अठराव्या शतकात पहिल्यांदाच मेस्मरने हुडकले म्हणून त्याला मेस्मॅरिझम हे नाव पडले. त्यानंतर त्याच्यावर ' ब्राईड ' (Braid) चारकॉट, बर्नहॅम, जॅनेट फॉईट, अशा अनेक नामवंत मानसशास्त्रज्ञांनी संशोधन केले. १९३० सालानंतर वैद्यकीय शास्त्रात अमेरिकेमध्ये त्याचा उपयोग ईरकिसन याने केला.

गायक, तत्त्ववेत्ते, कवी, लेखक, यांची तंद्री लागते. देहभान विसरले जाते. ही ज्ञात आणि मान्य गोष्ट आहे. ही एक मनोअवस्थाच आहे. झोपेत चालणे अथवा दिवास्वप्ने पाहणे, ही देखील मनाचीच एक स्थिती आहे. संमोहनामध्ये यापेक्षा वेगळे घडते ते असे की, यातील तंद्री ही संबंधिताला सूचना देणाऱ्या व्यक्तीच्या विशिष्ट सूचनांशी जाणीवपूर्वक जोडलेली असते. त्यामुळे या सूचनाद्वारे प्रत्यक्षात काही घडवून आणणे शक्य होते.

हिप्नॉटिझममुळे व्यक्तीला काही विशिष्ट शक्ती देता येते असे नाही. हिप्नॉटिझमद्वारे जे साध्य होते ते मानसोपचारांच्या अन्य उपायांनीही साधता येते. फायदा एवढाच होतो की, उपायांची परिणामकारकता हिप्नॉटिझमने वाढते. हिप्नॉटिझममध्ये एका शांत जागृत अवस्थेत (तंद्रीमध्ये) व्यक्तीला घेऊन जाता येते.

व्यक्तीला संमोहित करण्यासाठी त्या व्यक्तीची पूर्णपणे मानसिक अनुकूलता हवी. वातावरणही सुखद व सुरक्षित हवे. कपडे साधे आणि ढिले असणे चांगले. संमोहित करण्याच्या पद्धतीत प्रत्येक संमोहका (हिप्नॉटिस्ट) गणिक काही फरक आढळतो. सामान्यपणे एखादे कार्ड, बिंदू यावर लक्ष केंद्रित करण्यास सांगितले जाते. नंतर दीर्घ, खोल, लयबद्ध श्वास घेण्याची, डोळे बंद करण्याची सूचना मिळते. जसे काही आपण स्वतःच्याच डोळ्यात वाकून बघत आहोत. यानंतर एखादी क्रिया करण्याचा, उदाहरणार्थ-हात वर घेण्याचा आदेश मिळतो. मग अधिकारवाणीने सुनावले जाते, " आता हात अडकला आहे. मी सांगितल्याशिवाय खाली घेता येणार नाही. चॅलेंज. घ्या बघू हात खाली." व्यक्तीचा हात तसाच अडकून राहतो. तो संमोहित झाल्याची ती खूण असते. संबंधित व्यक्ती अथवा रुग्ण आणि डॉक्टर यांचा एकमेकांबद्दलचा आत्मविश्वास निर्माण होऊ शकणारी जवळीक,याच्यावर या अवस्थेची परिणामकारकता आणि

नंतरचे यश ठरते.

संबंधित व्यक्ती संमोहित झाली आहे, झोपी गेली आहे का नाटक करत आहे याची खात्री करून पुढच्या सूचना दिल्या जातात. याची एक सोपी खूण आहे. संमोहन अवस्थेत गेलेल्या हजारो व्यक्तींच्या अभ्यासानंतर मानस तज्ज्ञांनी ती नक्की केली आहे. ती म्हणजे संमोहित झालेल्या व्यक्तीची बुबुळे वरच्या बाजूस आढळतात. झोपेत असे होत नाही. संमोहनाचे नाटक करूनही असे होऊ शकत नाही. संमोहित होऊ शकणाऱ्या व्यक्तींचे प्रमाण साधारणतः ७५ ते ८० टक्के असते. इच्छा असूनही ज्या व्यक्ती संमोहित होऊ शकत नाहीत त्यांना तीव्र मानसिक असमाधान, आजार अथवा मेंदूवर आजार करणारा काही रोग असण्याची शक्यता असते. संमोहित होणारी व्यक्ती साधारणपणे तीन अवस्थांमधून जाते. पहिल्या अवस्थेत गुंगी, दुसऱ्या अवस्थेत गाढ गुंगी व तिसऱ्या अवस्थेत प्रगाढ गुंगी, असे म्हणता येईल.

पहिल्या अवस्थेतील माणूस कशाही स्थितीत (वेड्यावाकड्या देखील) घुटका न गिळता व यत्किंचितही हालचाल न करता पडून राहतो. ही स्थिती तो पहिल्या अवस्थेत असल्याचा बळकट पुरावा होय. ही सूचना वैद्यकीय दृष्ट्या उपयुक्त असते. कारण या अवस्थेत दिलेल्या सूचनांचा परिणाम जागृत केल्यानंतर टिकतो. या अवस्थेत संमोहित झालेली व्यक्ती शुद्धीवर असते. आणि आपल्या आसपास काय चालले आहे हे तिला समजते. संमोहिकाचे (हिप्नॉटिस्ट) शब्द त्याला ऐकू येतात. आणि जागृत झाल्यावर ते आठवतात. या कारणामुळे संमोहनाचा यशस्वी प्रयोग झाल्याचे ती नाकारते, त्याचे म्हणणे असे असते की, हिप्नॉटिझमचा प्रयोग झाला होता असे मला वाटत नाही. मला झोप लागलेली नव्हती. तुमचा प्रत्येक शब्द मला ऐकू येत होता. संमोहन निंद्रा ही झोप नसते. हिप्नॉटिझमच्या गुंगीच्या अवस्थेत संमोहकाने दिलेल्या सूचना ऐकू येणार व ती गुंगी काढून टाकल्यावर त्यांची स्मृतीही राहणार. आपल्याला संमोहित करणाऱ्या व्यक्तीविषयी डॉक्टराविषयी रुग्णांच्या काही कल्पना असतात. त्या वर्णनाशी जुळणारा डॉक्टर असेल तर व्यक्ती अधिक लवकर व अधिक चांगली संमोहित होते.

संमोहनाच्या दुसऱ्या टप्प्यात पेशंट करत असलेली कृती तो डॉक्टरांच्या सूचनेप्रमाणे करत आहे हे त्याच्यावर बिंबवले जाते. त्याच शारीरिक कृती त्यासाठी प्रसंगी परत परत करवून घेतल्या जातात. अधिक वेळ जातो तसे

पेशंटचे व आदेशाचे नाते घट्ट होत जाते. संमोहनाच्या या अवस्थेत व्यक्ती अधिक खोल जाते. त्याला माहीत असणाऱ्या शारीरिक क्रिया सूचना देताच करू लागते. संमोहकाचे जाहीर प्रयोग होतात. तेव्हाही स्टेज प्रेक्षकांना खूप हसवते. डास मारा म्हटले की, संमोहित व्यक्ती फडाफड चापट्या मारू लागते. 'पोहा' म्हटले की जमिनीवर उताणे पडून हातपाय मारू लागते. याच अवस्थेत वेदना शून्यता किंवा स्पर्शज्ञानरहित अथवा शारीरिक दुःखाची जाणीव न होणे, या गोष्टी सूचनेद्वारे उत्पन्न करता येतात. तळहाताची कातडी उचलून त्यात सुई आरपार खुपसली तरी त्याला काहीच वेदना होत नाहीत. शरीर इतके ताठ करता येते की, मस्तक आणि घोटा यांच्या खाली एक एक खुर्ची ठेवून ओंडक्यासारखे त्यावर ते राहू शकते. शरीर ढिले करण्याची सूचना देऊन स्नायू अगदी ढिलेही पाडता येतात. स्पर्शज्ञान, वास, चव यांचे भ्रमही या अवस्थेत निर्माण करता येतात. संमोहित व्यक्ती कडू कारले वा कोयनेलची गोळी चॉकलेटच्या वडीसारखी चावून चावून खाते. हाताला लावलेले रॉकेल अत्तरासारखे हुंगते.

संमोहनाच्या तिसऱ्या टप्प्यात रुग्ण काही प्रमाणात डॉक्टरांच्या सूचना झुगारून देतो. पोहणे शिकण्याच्या क्रियेशी तुलना केली तर हा मुद्दा अधिक स्पष्ट होईल. पोहायला शिकवणारा माणूस हा तलावाच्या काठापर्यंत ज्याला शिकवायचे त्याला मार्गदर्शन करू शकतो. पाण्यात उडीही मारू शकतो. पाण्यात पडल्यानंतर काय होईल, काय करावे लागेल, याचे पूर्ण भाकितही करू शकतो. परंतु प्रत्यक्षात पोहावयास सुरुवात केल्यानंतर संबंधित व्यक्ती किती आत्मविश्वासाने, किती सफाईने व वेगाने पोहेल हे शेवटी तीच ठरवत असते. तसेच डॉक्टरही स्थूलमानाने रुग्णाचे वागणे नियंत्रित करत असतो. रुग्णाची कुवत व प्रतिसाद यावर त्यांचे यश अवलंबून असते. सर्वच माणसे चटकन् तिसऱ्या अवस्थेपर्यंत पोहचू शकत नाहीत. पुनःपुन्हा त्यांच्यावर प्रयोग करून तिसऱ्या अवस्थेत काहींना नेणे शक्य होते.

तेव्हा संमोहनाद्वारे होणारे वा केले जाणारे उपचार ही एक जबाबदारीची गोष्ट असते. कोणत्या कारणासाठी आपण संमोहन वापरणार याची स्पष्ट कल्पना डॉक्टरांना हवी. ती त्यांनी रुग्णास द्यावयास हवी. संमोहित करणे, संमोहन टिकवणे, त्यात सूचना देणे हे कौशल्याचे, प्रशिक्षणाचे काम आहे.

व्यक्ती ज्या वेळी गाढ संमोहन अवस्थेत असते. त्या वेळी त्याला दिलेल्या

सूचना नंतर तो तंतोतंत पाळतो. सर्वच माणसे कमी जास्त प्रमाणात सूचनावर्ती असतात. हे सूचनावर्तित्व संमोहन अवस्थेत खूपच वाढते. दुसऱ्या व तिसऱ्या अवस्थेतील संमोहित व्यक्तीला दुसऱ्या कुणाचे बोलणे ऐकू येत नाही. अगदी जवळच्या नातेवाइकांचे बोलणे ऐकू येते पण तो त्याकडे दुर्लक्ष करतो, वाईचे या शास्त्राचे अभ्यासक श्री. भावे यांनी स्वानुभवाचा एक किस्सा सांगितला. एक ओळखीचा मराठा गिरणी कामगार त्यांच्याकडे आला. मुंबईत त्याला रात्रपाळी होती. त्यामुळे त्याला दिवसा झोपावे लागे. परंतु एकाच खोलीत अनेक लोक राहणार. त्यामुळे त्याला त्या गोंगाटात दिवसा झोप येत नसे. प्रकृतीवर झोपे-अभावी वाईट परिणाम होऊ लागला. उपचार करताना त्याला संमोहित अवस्थेत सूचना देण्यात आली की, माझी (श्री. भावे यांची) तांबड्या शाईची सही दृष्टीस पडताच तुला गाढ झोप येईल. आजूबाजूला कितीही गोंगाट असला तरी तुझ्या झोपेत तो अडथळा आणणार नाही. काही बैठकीत ही सूचना त्याच्या मनावर बिंबवण्यात आली व सही असलेली चिठ्ठी त्याला देण्यात आली. पुढे जवळ जवळ महिनाभर त्या कामगाराला दिवसाच्या कलकलाटातही, सही बघताक्षणीच त्वरित झोप येत असे. कालांतराने सूचनेचा परिणाम कमी कमी होत गेला. सूचना दिलेल्या क्षणापासून अमुक इतक्या मिनिटांनी, तासांनी, दिवसांनी, आठवड्यांनी, महिन्यांनी एवढेच नव्हे तर वर्षांनी तुम्ही अमुक गोष्ट कराल अशी सूचना गाढ संमोहन अवस्थेत दिल्यास तिचा परिणाम अगदी अचूकपणे तितका कालावधी लोटल्यानंतर दिसतो. घड्याळ अथवा इतर कोणत्याही साधनांच्या मदतीशिवाय कालमापन खूपच अचूक करता येणे हा अंतर्मनाचा एक गुण आहे. तितका कालावधी लोटल्यानंतर ती सूचना प्रकट मनास पोचून कार्यान्वित होते. समजा, संमोहित व्यक्तीला सूचना दिली की तू आणखी पंधरा मिनिटांनी जागृत होशील त्या वेळी मी ओढत असलेली सिगारेट मागून घेशील, त्याचे एक दोन झुरके घेशील आणि विझवून टाकशील. तर तो बरोबर त्याप्रमाणे करतो. त्या वेळी आपल्याला अशा सूचना दिल्या आहेत याची त्याला जवळ जवळ अजिबात आठवण नसते. तो दोन झुरके मारून सिगारेट विझवतो आणि विशेष म्हणजे ती का विझवली याचा खुलासा स्वतःच्या बुद्धीने, ती ओली होती, मला खोकला झाला आहे, असे काहीतरी सकृतदर्शनी बरोबर दिसणारे कारण देण्याचा प्रयत्न करतो.

संमोहनामुळे काही स्वभावदोष व स्वभावदोषातून येणारे परिणाम

बदलता येतात. स्वतःच्या प्रकृतीविषयी अधिक काळजी घेण्याची जाणीव निर्माण करता येते. काही व्यसने सुटण्यास मदत करता येते. तंबाखू खाणाऱ्या माणसास ती सवय असणारा माणूस वाटेल तिथे पिचकाऱ्या टाकून किती घाण करतो, जवळच्या लोकांना त्याची किती किळस येते, असे सांगून समोहन अवस्थेत त्याच्या मनात त्या व्यसनाबद्दल तिटकारा निर्माण करता येतो. मग तंबाखूचा वास इतःपर तुम्हांला सहन होणार नाही. तंबाखू हातात घेतल्यावर तुम्हांला कुजलेल्या कचऱ्यासारखा वास येऊन मळमळू लागेल, व तुम्ही तंबाखू फेकून द्याल, असे सांगितले तर त्याचा परिणाम होतो. मात्र सूचना परत परत द्याव्या लागतात. कित्येक मुलांना आपली नखे दातांनी कुरतडण्याची सवय असते. काही जण कडाकडा दात खातात. काहीजण कपड्याचे टोक चावतात. काही मुले सहा-सात वर्षांची होऊनही अंथरूण भिजवतात. अशा सवयी घालवण्यासाठी संमोहन निद्रेत दिलेल्या सूचनांचा चांगला उपयोग होऊ शकतो. मनोगंडामुळे होणाऱ्या या गोष्टींचे मूळ अभावितपणे स्वीकारलेल्या स्वयंसूचनात असते. त्यांच्याविरुद्ध सूचना देऊन हे मनोगंड घालविण्याचा प्रयत्न करता येतो. एकाच बैठकीत हे होत नाही तर अनेक बैठकीत थोड्या कालावधीने पुनःपुन्हा द्याव्या लागतात.

मानवी शरीरातील निरनिराळ्या अवयवांचे होणारे आजार दोन प्रकारचे असू शकतात. पहिला प्रकार विशिष्ट अवयव ठीक असूनही क्रिया नीट न चालणे व दुसरा प्रकार अवयव बिघडून क्रिया बिघडणे. पहिल्या प्रकाराला क्रियाविषयक विकृती (Functional disease) तर दुसऱ्या प्रकारास स्वरूप विषयक विकृती (Organic disease) म्हणतात. क्रिया विषयक आजाराने माणूस आजारी असल्यास हिप्नॉटिझमचा उपयोग होऊ शकतो. शरीरांतर्गत क्रिया स्वायत्त मज्जातंतूच्या हुकमतीखाली चालू असतात आणि संमोहन अवस्थेत योग्य सूचना जर अंतर्मनास पोहोचल्या तर ते मन स्वायत्त मज्जातंतूच्याद्वारा क्रियाविषयक बिघाड दुरुस्त करू शकते. मनोघाताने माणूस लुळा होऊ शकतो. हा लुळेपणा शारीरिक नव्हे तर मानसिक आजारातून आलेला असतो. हा आघात दूर करता येतो. स्वतःच्या शरीरावर हा अत्याचार करण्याची गरज नाही हे संमोहन अवस्थेत पटवून देता येते व लुळेपणा दूर करता येतो. एखाद्या दुःखाच्या तडाख्याने माणसे एकदम मुकी बनतात. स्वरेंद्रिय व बाकीचे सर्व व्यवस्थित असते. पण मनोआघात जोवर असतो तोवर स्वतःचे दुःख व्यक्त

करण्यासाठी माणसाला योग्य तो मार्ग दाखविणारी सूचना संमोहन अवस्थेत देऊन त्याचे मौन दूर करता येते. तोत्रेपणाचे उदाहरण घ्या. शब्दोच्चार करणाऱ्या अवयवात काहीही दोष नसतात. पण माणसाचे शब्दोच्चार अडखळत होतात. अशा प्रकाराने संमोहनाचा फायदा होऊ शकतो. सध्या परदेशात दात काढण्याच्या कामी व सुलभ वेदनारहित प्रसूतीसाठी संमोहनाचा उपयोग काही वेळा केला जातो. प्रसूतीसाठी संमोहनाचा उपयोग करावयाचा असल्यास त्याला संबंधित संमोहन करणाऱ्या व्यक्तींच्या सूचनांची सवय गरोदरपणात लावून घ्यावी लागते व प्रत्यक्ष प्रसूतीच्या वेळेस त्या पेशंटला दिलेल्या सूचनांशी संबंधित ही वेदना-रहित अवस्था असते. त्यामुळे सूचनांप्रमाणे बाळंतपणाच्या कळा न जाणवता स्त्री प्रसूत होते. पण Episistory चे टाके घालताना होणाऱ्या वेदना सोसण्या-साठी सूचना जर दिली नसेल तर मात्र Episistory चे टाके घालताना ती जागा भूलीचे इंजेक्शन देऊन बधिर करावी लागते Episistory प्रसूती सुलभ होण्यासाठी विशेषतः पहिल्या खेपेस योनीमार्गाचा अगदी खालचा भाग एका कोपऱ्यात थोडासा कापतात. प्रसूतीनंतर तो टाके घालून शिवतात व पूर्ववत करतात.

मात्र अशा प्रकारात तज्ज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्याची गरज असते. कारण जी प्रसूती योनीवाटे होणार असेल त्याच प्रसूतीमध्ये ही वेदनारहितता उपयोगी आहे, जर योनीमार्गे प्रसूती होणे कोणत्या ना कोणत्या कारणाने शक्य नसेल तर ते मूल सिझेरिअन ऑपरेशन करूनच बाहेर काढावे लागेल. अशा पेशंटमध्ये ही वेदनारहितता अनर्थ ओढवेल कारण पोटातील कळा वाढल्यानंतर वेदना जाणवणार नाहीत. गर्भाची पिशवी आत फाटेल व पेशंटचा जीव धोक्यात येईल. पोटदुखीचे उदाहरण हा मुद्दा अधिक स्पष्ट करील. पोटदुखी अनेक प्रकारची असते. अपेंडिक्समुळे पोट दुखत असेल तर संमोहन अवस्थेमधले वेदनाहरण मृत्यूला निमंत्रणच ठरेल. वेदना तात्पुरत्या थांबतील पण अपेंडिक्स सुजून फुटून त्याचे गंभीर परिणाम होतील. अशा पोटदुखीत अपेंडिक्स काढणे हाच उपाय आहे आणि तो तज्ज्ञ सर्जननेच करावयास हवा.

पेशंटची मनोधारणा, हितसंबंध व इच्छा लक्षात घेऊनच पेशंटला संमोहित करावे लागते. त्यांची मूल्ये व श्रद्धा यांना धक्का लागणारी अशी अनैतिक कोणतीही गोष्ट संमोहन अवस्थेत माणूस करू शकत नाही. करवून घेता येत नाही. एखाद्याला संमोहनातून जागृत अवस्थेत आल्यावर तू घरी जाऊन आई वडिलांच्या थोबाडीत मारशील अशी सूचना दिल्यास तो ती स्वीकारणार नाही.

राग फारच तीव्र झाल्यास तो एकदम जागृत अवस्थेत येईल. पाश्चात्त्य देशात याबाबत झालेल्या एका प्रयोगाची माहिती देण्यासारखी आहे. तीन तरुण मुलींना गाढ संमोहन अवस्थेत विवस्त्र होण्याबद्दल सूचना देण्यात आली. पहिलीने ती सूचना साफ नाकारली. दुसरी घाबरून जागृत अवस्थेतच आली. तिसरीनें मात्र स्वतःचे कपडे काढण्यास सुरुवात केली. याचे विश्लेषण करताना लक्षात आले की, तिसरी स्त्री ही मॉडेलिंगचा व्यवसाय करणारी होती. विवस्त्र अवस्थेत असणे याबाबत तिच्या मनात अनैतिकतेची भावना नव्हती.

मात्र इतर साध्या सूचनांप्रमाणे वागणे, जे इतरांच्या दृष्टीने मूर्खपणाचे, विचित्रपणाचे आहे, ते संमोहित व्यक्ती न कचरता अमलात आणते.

संमोहनाबद्दलचा एक गैरसमज म्हणजे कमकुवत मनाच्या माणसावर संमोहनाचा प्रयोग चटकन होतो. खरे तर परिस्थिती वेगळी आहे. खंबीर मनाच्या माणसावरच हा प्रयोग यशस्वी होण्याची शक्यता जास्त. कारण संमोहित करणाऱ्या व्यक्तीच्या सूचनांकडे संपूर्ण लक्ष देणे अशा माणसाला शक्य होते. संमोहित होणाऱ्या व्यक्तीचे मनही संमोहित होण्यास तयार हवे. हे अर्थात महत्त्वाचे आहेच. वेड लागलेल्या माणसाच्या मनावर संमोहनाचा परिणाम होत नाही. वेडे स्वतःच्याच एका कल्पनाविश्वात वावरत असतात. एखाद्या सूचनेकडे लक्ष देण्याचा त्यांचा कालावधी इतका कमी असतो की, संमोहित होण्यासाठी लागणारे किमान मानसिक तादात्म्य त्यांच्याकडून मिळू शकत नाही. त्यांच्या मनाने वास्तवाकडे पाठ फिरवलेली असते. आणि त्यामुळे त्यांच्या विचारांशी संपर्क साधणे ही गोष्ट खूप मुष्कील असते. संमोहन करणारी व्यक्ती संमोहकाला तशाच अवस्थेत सोडून गेली तर....असा एक प्रश्न बहुतेकांच्या मनात असतो. अशा जाण्याने दोघांमधला मनोसंबंध (Rapport) भंग पावल्याने संमोहन निद्रिस्ताला एकदम जाग येऊ शकते. अशी जाग न आल्यास तो संमोहन अवस्थेतून रोजच्या नैसर्गिक झोपेत प्रवेश करतो. आणि ती झोप पूर्ण होताच उठतो.

संमोहनशास्त्र तसे कोणालाही प्रयत्नाने साध्य होणारे शास्त्र आहे. व्यक्तीची मनोधारणा, हितसंबंध लक्षात घेऊनच तिला संमोहित करावे लागते. मोकळेपणाने आणि जिज्ञासूपणे संमोहनाकडे बघावयास शिकले पाहिजे. हे शास्त्र अवगत असलेल्या व्यक्तीला काही गूढ दैवीशक्ती अनुकूल असते ही समजूत पूर्णपणे खोटी आहे, हे समजून व्यावयास हवे; इतरांना सांगायला पाहिजे.

सात

ग्रहांचे मायाजाल

माझ्याबरोबरचा वर्गमित्र. त्याची आई आम्हांला शास्त्र शिकवीत असे. वडील गणित. पुढे तो माझ्याबरोबरच डॉक्टर झाला. एम. डी. ही झाला. आम्ही इतर सारी दोस्तमंडळी मांडवाखालून गेलो. संसार वाढीला लागले, तरी यांचा संसार सुरूच होईना. मी त्याला खोदून खोदून विचारल्यावर तो म्हणाला, " त्याचे काय आहे, माझ्या पत्रिकेत मंगळ फार कडक आहे. मुली अनेक येतात पण मला मंगळाचीच मुलगी हवी. माझी पत्रिका अडचणीची आहे. " मी त्याला हसत हसत विचारले, " तुझ्या आईनेच आम्हांला शास्त्र शिकवले. चंद्रावर पोचलेल्या माणसाची आणि मंगळाच्या दिशेने निघालेल्या यानाची माहिती दिली. तू स्वतः तर वैद्यकीय शास्त्रातला उच्च पदवीधर, असा आंधळा विश्वास ठेवताना आपले काही चुकते असे नाही तुला वाटत ?" मित्र म्हणाला, " बाबारे, जन्मभर संसार करायचाय. नसता धोका कसा पत्करणार ? " आपण सध्याच्या जगाला विज्ञानयुग म्हणतो खरे, पण पत्रिका आधी पाहू, जुळली तर मुलगी पाहण्याचे बघू. यामध्ये इच्छुक वधू-वर विज्ञान पदवीधर होऊन अजून काही फारसा फरक पडलेला नाही. याउलट एकूणच फलज्योतिषाला वाढती मान्यता मिळवण्याचा खटाटोप चालू आहे. त्याला काही प्रमाणात यश मिळत आहे. स्वतःला पुरोगामी, विज्ञाननिष्ठ म्हणविणारी वृत्तपत्रे, मासिके, प्रकाशने हीदेखील ग्रहांची भाकिते आणि ग्रहांच्या आधारावरचे साप्ताहिक, दैनिक, भविष्य धूमधडाक्यात

छापत आहेत. फलज्योतिष हे मुळी शास्त्रच आहे. असा डांगोरा पिटण्याचे काम ज्योतिषांच्या मोठमोठ्या परिषदा भरवून चालू आहे. काही नामांकित डॉक्टरही याच्या आहारी गेले आहेत. जे महाराष्ट्रात चालू आहे तेच कमी जास्त प्रमाणात भारतात व जगातही चालू आहे.

आदिम अवस्थेमधल्या माणसाला दूरवर चमचमणारे आकाशातील ग्रह-गोल देवांची निवासस्थाने वाटली. कर्ता करविता देवच आहे, अशी गाढ समजूत असल्याने त्याच्या निवासस्थानातील हे प्रकाश देणारे ग्रहगोल ही आपल्या जीवनावर प्रभाव गाजवणारी स्थाने वाटली. आपल्या जीवनातील घटनांशी त्यांचा निकटचा संबंध वाटला. पण दिवस बदलले. ग्रहगोलांचे अभ्यास झाले. पृथ्वी-पासूनची त्यांची अंतरे आणि गुणधर्म लक्षात आले. दूरवर असणारे ग्रह व त्याहीपेक्षा दूरवर असणारी नक्षत्रे गुरुत्वाकर्षण वा अन्य कोणत्या शक्तीमुळे माणसावर, त्याच्या दैनंदिन जीवनावर वा भविष्यावर परिणाम घडवू शकतात, ही कल्पनाच निकाली निघाली. आकाशातल्या ग्रहांच्या स्थितीनुसार काही विशिष्ट कामासाठी एखादा दिवस शुभ वा अशुभ ठरविणे हा भंपकपणा ठरू लागला. परंतु जे विज्ञानाला समजते, तर्काला पटते, ते प्रत्यक्षात आचरले जातेच असे नाही. फलज्योतिषाबाबत तर अनुभव अगदी उलटाच आहे. लोक त्याला केमिस्ट्री, फिजिक्स, गणित याप्रमाणे शास्त्र समजू लागले. खरे तर, फार– फार तर भविष्य-शास्त्राला एक कला म्हणता येईल. एक यशस्वी कला, जी भविष्यवेत्त्याला यश मिळवून देते. समोरच्या माणसाचे पूर्वज्ञान अथवा तो विचारात असलेल्या प्रश्नांचे स्वरूप यावरून त्याला पटण्यासारखे काही भविष्य सांगणे, ही कला अवघड असली तरी कष्टसाध्य आहे आणि ते काहीसे यश संबंधितांना भलतीच प्रसिद्धी मिळवून देते. लग्नाची शुभवेळ असो वा निवडणुकांचे फॉर्म भरणे असो वा मंत्रि-मंडळाचा शपथविधी असो, लक्षावधी अथवा कोट्यवधी मैल अंतरावर असणारे ग्रहतारे आपल्या आयुष्याचे, निवडणुकीचे वा शासनाचे भले करण्यासाठी मदतीला हवे असतात! महाराष्ट्राच्या एका माजी मुख्यमंत्र्यांनी आपल्या मंत्रिमंडळाचा शपथविधी मुहूर्तावर केला. पुढे त्यांचे मंत्रिमंडळ गेले, आणि त्यांचे मंत्रिपदही गेले, हा भाग वेगळा. हीच व्यक्ती काही वर्षांनंतर भारताची शिक्षणमंत्री झाली. घटनेत समाविष्ट केलेली वैज्ञानिक दृष्टी रुजविण्याची ज्यांची सगळ्यात जास्त जबाबदारी त्यांची ही स्थिती, मग इतरांबाबत न बोलणेच बरे.

आपले मतलब साधण्यासाठी या ग्रहांना वेठीला कसे धरले जाते, याचा

एक मजेदार किस्सा माझ्याच मित्राच्याबाबत घडला. मित्राचे स्थळ लग्नासाठी एकदम सुरेख. त्याचे मन बसलेली मुलगीही अनुरूप, पण आमच्या शहरातल्या सर्वज्ञ ज्योतिषाने ठामपणे लग्नाला खोडा घातला. हिंदी सिनेमासारखा पेच. हे लग्न झाले तर मुलाच्या आई-वडिलांना हमखास मृत्युयोग. पत्रिकेत तसे स्पष्ट दिसतंय. दोस्तांच्या घरच्यांचा ज्योतिषावर गाढ विश्वास. त्यांच्या शब्दाबाहेर जायला सक्त विरोध. इतर वेळा बंड करणे सोपे. पण इथे आमच्या मित्राला वाटायला लागले, आपण घरच्यांना झुगारून लग्न केलेच, तर पोरीला पाघळला आणि आई-बाबांच्या जिवावर उठला, अशी टीका होणार. आम्ही चौकशी केली तर अंदरकी बात अशी होती की, ज्योतिष महाराजांच्या परिवारातल्या एकाला तिथे आपले नाणे चालवायचे होते. त्यासाठी मुलाच्या मनातला हा पतंग काटणेच आवश्यक. त्यांनी ज्योतिषामार्फत ग्रहताऱ्यांना मदतीला बोलावले.

तीन-चार महिने असेच जाऊ दिले. विषय मागे पडला. मग मी मुलाची पत्रिका घेतली. त्यावर नाव लिहिले सतीश देशपांडे. मुलीची पत्रिका घेतली तिच्यावर लिहिले माधुरी खरे. आमच्यातल्याच पण वयस्क अशा व्यक्तीला बरोबर घेतले. महाराजांकडे गेलो, त्यांना साष्टांग नमस्कार घातला. (आयुष्यात बुवाला घातलेला एवढा एकच साष्टांग प्रणिपात) माझ्याबरोबर आलेल्यांनी खिशातून कुंडल्या बाहेर काढल्या. म्हणाले, हे पुण्याचे सतीश देशपांडे. यांचे एका मुलीवर प्रेम आहे. तिचे नाव माधुरी खरे. ही तिची पत्रिका. पुण्यात सांगितलंय, पत्रिका जुळत नाही. लग्नानंतर काही तरी अशुभ घडेल. हे घराण मूळचं सातारचं. यांच्या भावांचा, वडिलांचा तुमच्यावर फार विश्वास म्हणून मुद्दामहून तुमच्याकडे पत्रिका घेऊन आलोय. कृपा करून काय ते सांगा? ज्योतिष महाराजांनी आम्हांला अर्धा तास बसायला सांगितले. तोपर्यंत कुंडल्या बघितल्या. पंचांगे चाळली. आणखी काही आकडेमोड केली. सरते शेवटी ते म्हणाले, " अजिबात काळजी नको. पत्रिका उत्तम जुळते. आमच्या शास्त्रात ही तरणी पोरं फार झालीत. उथळ पाण्याला खळखळाट फार." महाराज हे म्हणणार ही खात्री होतीच. कारण नमस्कार करताना पन्नास रुपयांची नोट त्यांच्या पायावर ठेवली होती ना ? आम्ही म्हणालो, " आपले हे म्हणणे जरा लिहून दिले तर बरे. पुण्याला वडिलांना पटविणे सोपे जाईल." महाराज म्हणाले, " जरूर." स्वतःचे लेटर हेड त्यांनी पुढे ओढले. दोघांच्या पत्रिका काढल्या. स्वहस्ते लिहून दिले. आम्ही मित्राचे घर गाठले . सतीश देशपांडे. माधुरी खरे या पत्रिका खऱ्या कोणाच्या आहेत ते

दाखविले. महाराजांचे सर्टिफिकेट दाखवले. घरची मंडळी अक्षरशः हादरली. त्यांनी त्याच पावली महाराजांना गाठले. पण महाराज खरे धंदेवाईक. ते गडबडले नाहीत. शांतपणे म्हणाले, 'पत्रिका देताना मला त्यांनी सांगितले, मुला-मुलीचे एकमेकांवर प्रेम आहे आणि आमच्या शास्त्राचा नियम आहे की, ज्यांचे एकमेकांवर प्रेम असते त्यांची खरी पत्रिका बघायची नसते.' सफाईदार उत्तराने वेळ मारून नेली. पण विश्वास मिळवला नाही. घरच्यांचा विरोध बोथट झाला. लग्न झाले. आता दोन मुलांसह आणि आपल्या आईवडिलांसह मित्राचा संसार सुखात चालू आहे.

अशी उदाहरणे अनेक सांगता येतील. पण तरीही प्रत्यक्षात फरक का पडत नाही. एक कारण आहेच. आजुबाजूची परिस्थिती अनेकदा अस्थिर असते. व्यक्तीच्या आवाक्याबाहेरची असते. अशा वेळी कमकुवत मनाच्या व्यक्तीला स्वतःचा निर्णय स्वतः घेणे अवघड वाटते. योग्य निर्णय घेण्यासाठी कुणाचे तरी मार्गदर्शन लाभावे असे अशा व्यक्तींना वाटत असते. आणि अशीच संख्या समाजात बहुसंख्य असते. त्यांना अवकाशातल्या ग्रहगोलांच्या हातातील आपली नियती आणि उपासना यांनी ती बदलण्यास होणारी मदत हेच अधिक भरवशाचे वाटते.

भविष्यापेक्षा हे वाटणे अधिक भयंकर असते. परिस्थिती अवघड असणे शक्य आहे. पण तिला आपणच सामोरे गेले पाहिजे. आपले भविष्य कोण्या ग्रहताऱ्यांच्या हातून घडविण्यापेक्षा आपल्या हाताने, कर्तृत्वाने, पुरुषार्थाने स्वतः घडविले पाहिजे हे ओळखण्याची, आचरण्याची गरज आहे.

खरे तर, फलज्योतिषाचा दावा सरळ सरळ चुकीचा आहे. अशास्त्रीय आहे. बुद्धिप्रामाण्याच्या विरोधी आहे. अवास्तव आणि भोंदुगिरीच्याजवळ नेणाऱ्या या प्रकारांना उघडपणे आम्ही आव्हान देत आहोत, असे जगातल्या नामवंत एकशे बावन्न शास्त्रज्ञांनी पत्रक काढून जाहीर केले आहे. त्यात नोबेल पारितोषक विजेते शास्त्रज्ञही आहेत. कोणत्याही वैज्ञानिक सिद्धान्ताचा पाया आकडेशास्त्राने सिद्ध केलेला पुरावा असतो. गेल्या हजार वर्षांत एकाही ज्योतिषाने आकडेवारीने पुरावा घेऊन भविष्याची अनुमाने सिद्ध केलेली नाहीत. पत्रिकेप्रमाणे गुण जमवून झालेली किती टक्के लग्ने गेल्या पन्नास वर्षांत यशस्वी झाली ? पत्रिका न पाहता लग्न करणाऱ्या इतर बहुसंख्य धर्मीयांच्या यशस्वी लग्नाचे कारण काय ? याचा विचार कोठे झाला ? कोणत्याही शास्त्रीय विधानाचा (१) Observe (२) Arrange (३) Question (४) Srnthes's (५) Generalise (६) Make

hypothesies (७) Verify (८) Conclude अशा पद्धतीने विचार करावा लागतो. गेल्या हजार वर्षांत भविष्याने आपले असे पृथक्करण केलेले नाही.

खरे तर, शास्त्रज्ञांनीही भविष्याचे श्रोतांड उघडे करून सांगण्याची गरज नाही. आपण विचार केला तरी आपल्याला अनेक तर्क-विसंगत गोष्टी आढळतील. जन्मपत्रिकेचेच बघा. जन्माची वेळ ही पत्रिका ठरविण्यासाठी अत्यंत उपयुक्त, महत्त्वाची असते. त्या वेळी असलेल्या ग्रह नक्षत्रांच्या स्थितीप्रमाणे व्यक्तीचे भविष्य नियंत्रित होते असे ज्योतिषशास्त्र मानते. या वेळेत काही सेकंदांची वा मिनिटांची चूकभूल झाली तर सगळे भविष्य चुकते असेही सांगितले जाते. पण मुलाचा जन्म म्हणजे काही क्षणार्धात होणारे रॉकेटचे उड्डाण नाही. नॉर्मल प्रसूतीमध्ये मुलाचे डोके पहिल्यांदा बाहेर येते व काही सेकदांत, प्रसंगी काही मिनिटांत मुलाचे संपूर्ण शरीर बाहेर येते. भविष्य शास्त्राप्रमाणे कुठली वेळ नक्की धरायची ? आणि मूल पायाकडून जन्माला येणार असेल तर ? त्यासाठी पाय बाहेर आल्यानंतर प्रसंगी अर्धा तासही लागू शकतो. त्याचा जन्म कधीचा धरावयाचा ? काही औषधे वापरून प्रसूतीच्या कळा वाढवता येतात. प्रसूती लवकर वा सुलभ व्हावी यासाठीही औषधे वापरतात. या औषधांमुळे आगेमागे होणारी जन्मवेळ मुलाचे भविष्यच बदलून टाकते काय ? आणि अगदी शुभ वेळेला जन्माला आल्यानंतर मुलगा आयुष्यात भाग्यवान आणि यशस्वी ठरणार असेल तर ती शुभ वेळ साधण्यासाठी काही दिवस अलीकडे नेमक्या त्या वेळेला सीझेरिअनचे ऑपरेशन करून मुलाला जन्माला घालता येणेही शक्य आहे. या सगळ्यात तथ्य आहे असे मानायचे का ? मग मुलाची जन्मवेळ नियंत्रित करणारा हाच मुलगा भविष्यकर्ता मानावयास हवा. पण ना डॉक्टर, ना ग्रह, ना भविष्यवेत्ता मुलाचे जीवन ठरवितात. तर ते ठरते मुलावर परिणाम करणाऱ्या अनेकविध सामाजिक वास्तवामुळे आणि मुलाच्या अंगभूत शारीरिक, मानसिक गुणवैशिष्ट्यामुळे. या दोन्ही गोष्टी ग्रहांची, चंद्र-सूर्य, ताऱ्यांची स्थिती यांच्याशी काहीही संबंधित नाहीत. लक्षावधी मैलांवरून येणारी किरणे, जन्मापासून बाळाच्या जीवनावर प्रभाव गाजवणारी ठरत असतील, तर त्यासाठी जन्माची वाट कशाला पहावयास पाहिजे ? लक्षावधी मैलांचा प्रवास करणारे किरण पोट आणि गर्भाशयाचा दोन चार इंच जाडीचा प्रवास करू शकत नाहीत का ? याला काही उत्तर नाही. कारण ही विचारप्रणालीच भ्रामक आहे.

जन्मवेळेवरूनच जन्माचे भवितव्य ठरत असेल तर मोठ्या सार्वजनिक

प्रसूतिगृहात एकाच सेकंदाला जन्माला येणाऱ्या डझनभर मुलांचे आणि त्याच वेळेस जगभरच्या प्रसूतिगृहांत जन्माला येणाऱ्या हजारो मुलांचे भविष्य एकच घडावयास नको का? आणि अणुबॉम्बच्या एकाच स्फोटात एकाच सेकंदात खलास होणाऱ्या जपानमधल्या लाखभर लोकांच्या जन्मपत्रिकेत मृत्युयोग त्याच सेकंदाला लिहिलेला असावयास हवा.

भविष्य शास्त्रवेत्त्यांची आणखी एक गमंत असते. त्यांना त्यांच्या शास्त्राची अशास्त्रीयता आणि अतार्किकता दाखविली की, ते खरे झालेले एखादे दुसरे भविष्य दाखवतात आणि त्यालाच जणू काही शास्त्रीय पुरावा असे धरून बसतात. खरे तर, निव्वळ योगायोगाने बरोबर येणाऱ्या घटनांचे काही प्रमाण असते. त्याला शास्त्रीय आधार तो काय मानायचा? शिवाय बरोबर आल्याचा दावा असलेल्या भविष्यात होय वा नाही अशा स्वरूपाची भाकिते असतात. उदा. निवडणूक जिंकेल का? मुलगा होईल का? जगेल का? त्यात बरोबर येण्याची शक्यता असतेच. निवडणुकीच्या तुल्यबल लढतीत दोन नामवंत भविष्यवेत्त्यांनी एकाने याला आणि एकाने त्याच्या प्रतिस्पर्ध्याला जिंकेल असे सांगितले, तर एकाचे भविष्य शंभर टक्के बरोबर येणार यात नवल नसते. पण अशी बरोबर आलेली भविष्ये धरून ही मंडळी सुताने (खरे तर सुताशिवायच) स्वर्ग गाठतात आणि चुकलेली असंख्य भाकिते त्यांना दाखविली की, चुकीची पत्रिका, त्या संबंधित भविष्यवेत्त्याचे अपुरे ज्ञान यांच्यावर ठपका ठेवून नामानिराळे होतात. आणखीही एक गमतीदार दावा केला जातो. काही वर्षांपूर्वी आठ ग्रहांची काही विशिष्ट स्थिती होती. या अष्ट-ग्रहामुळे जगात हाहाकार होत असल्याची आवई उठली होती. त्यासाठी जप-जाप्य, पूजा असे बरेच झाले. प्रत्यक्षात काहीही झाले नाही. पण भविष्यवेत्ते त्यामुळे डरणार थोडेच? त्यांनी शोध लावला की, आपल्या पूजेअर्चेमुळेच हे अष्टग्रहींचे अरिष्ट टळले. आता बोला. परदेशातील काही विद्यापीठांत भविष्याला शास्त्र म्हणून मान्यता मिळण्याचे सांगण्यात येते. त्यावर संशोधन होऊन लोकांनी डॉक्टरेट मिळवण्याची माहिती पुरवली जाते. याबद्दलचा तपशील खुबीने टाळला जातो. अशी विद्यापीठे असतील तर त्यांची नावे कायं? हा एक प्रश्न? शिवाय डॉक्टरेट कोणत्या विषयाला दिली? 'भविष्यशास्त्राचा फोलपणा' या विषयालाही डॉक्टरेट मिळाली असेल आणि भविष्याच्या विषयावर डॉक्टरेट, एवढेच अर्धसत्य खुबीने बाहेर सांगितले गेले असेल! याबरोबरच आणखी एक आरग्युमेंट केले

जाते. नसेल ज्योतिषशास्त्र १०० टक्के खरे व अचूक; पण कोणते शास्त्र तसे आहे? डॉक्टरकडून रुग्ण दगावला जातो आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरणाऱ्या विमानालाही अपघात होतो. अशा परिस्थितीत भविष्य शास्त्राची काही भाकिते तरी खरी व अचूक ठरतात यालाही काही अर्थ आहे की नाही?

खरे तर, वकिली दाव्यात तथ्य नाही. वैद्यकीय शास्त्र वा कोणतेही शास्त्र चुकते हे खरेच. पण ती चूक कशामुळे झाली हेही ते शास्त्रीयपणे शोधून काढते. आणि ती चूक वा त्रुटी टाळली, तर पुन्हा असे होणार नाही हेही ठामपणे सांगू शकते. भविष्यशास्त्राचे सगळे उलटेच. ही चूक कशामुळे झाली आणि ती पुढच्या वेळी निश्चित टाळता येईल का, याच्याबद्दल हे शास्त्र काहीच सांगत नाही. काही भविष्ये खरी होतात. यातली खरी मेख अशी की, शेकडो माणसांना एकच भविष्य सांगितले किंवा एकाच माणसाला शंभर गोष्टी सांगितल्या, तर त्यांतल्या काही बरोबर येणारच, हे समजायला भविष्यवेत्ता कशाला पाहिजे?

काही सावध, चाणाक्ष मंडळी हल्ली जरा नम्र दावा करतात की, या शास्त्राआधारे आम्ही तुम्हांला भवितव्यातील संभाव्यता सांगतो. त्याबद्दल मार्गदर्शन करतो. पुढच्या आयुष्यातील धोके टाळण्यासाठी याचा उपयोग होऊ शकतो. यातील ग्यानबाची मेख अशी की, भविष्यातील घटना कोणालाच माहीत नसतात. त्यामुळे त्यांनी आपला मार्ग बदलला की नाही हे ही कोणाला सांगता येणे शक्यच नसते.

डॉ. कोवूरांनी याबाबत दिलेले आव्हान पुरेसे बोलके आहे. भविष्यवेत्त्याला आम्ही दहा कुंडल्या देतो. त्यांपैकी कोणत्या स्त्रियांच्या आहेत, कोणत्या पुरुषांच्या आहेत, कोणत्या मुलांच्या आहेत आणि त्यातील जिवंत वा मृत कोण आहेत एवढेच अचूक सांगणाऱ्यालाही त्यांनी एक लाख रुपयांचे बक्षीस ठेवले आहे.

शास्त्राबद्दलचा काहींचा दावा मर्यादित असतो. रसायन वा भौतिक यासारखे काही हे शास्त्र नाही. परंतु भविष्याला इंपिरीकल शास्त्र मात्र म्हणता येईल. पण इंपिरीकल शास्त्र म्हणून मान्यता देण्यासाठी जी निरीक्षणे आणि प्रयोग यांची गरज असते ती तरी भविष्य शास्त्राबाबत कोठे आणि कधी झाली आहेत? संख्या-शास्त्राच्या आधारे देखील बहुसंख्य भविष्ये बरोबर असल्याचे कधी दाखविले गेले आहे? ज्या वेळी भविष्यशास्त्राच्या या उणिवेवर बोट ठेवले जाते, त्या वेळी दावा केला जातो. वैद्यकी शास्त्राचीही निदाने चुकतातच ना? ही निव्वळ दिशाभूल

आहे. एकतर वैद्यक शास्त्रात निष्कर्षाला येण्याची एकच पद्धत असते. सर्व जगभर सारखीच असलेली. भविष्य शास्त्राच्या बाबतीत जग सोडाच, व्यक्ती-गणिकच पत्रिका वाचण्याची पद्धत बदलते. स्वाभाविकच अनुमाने, निष्कर्षही कोठच्या कोठे बदलतात. वैद्यकीय शास्त्रातील चुकीची निदानेही शास्त्राच्या पुढच्या विकासाच्या पायऱ्या ठरतात. भविष्यातील चुका हा वर्तुळातला आंधळ्या कोशिंबिरीचा खेळ ठरतो.

शास्त्रीय पाया असल्याशिवाय का भविष्यशास्त्र इतके वर्षे टिकले ? असा प्रश्न विचारण्यातला मतलबही समजला पाहिजे. अनेक शतके अस्तित्वात आहे म्हणून काही शास्त्रीयता येत नाही. असंख्य अंधश्रद्धा आणि अहितकारक समजुतीही समाजजीवनात हजारो वर्षे मूळ धरून बसल्या आहेत. म्हणून त्यालाही शास्त्रीय समजायचे काय ?

खपावर नजर ठेवून भविष्याचा कॉलम छापण्याचा धंदा आता सुप्रतिष्ठित पुरोगामी म्हणणारी वृत्तपत्रेही करू लागली आहेत. मागणी तसा पुरवठा या तत्त्वाचे समर्थन, स्वतःला ध्येयवादी विज्ञाननिष्ठ म्हणविणाऱ्या वृत्तपत्रांनी करावा हे खेदजनक आहे. ही भविष्ये म्हणजे बालीशपणा आणि विसंगती याची उदाहरणे असतात. एखाद्या राशीला रविवारच्या दिवशीदेखील अनेपक्षित पत्रे येतील असे छापलेले असते. काही नातेवाईक व काही मित्र यांच्याशी जरा सावधानतेने व्यवहार करा. एकादोघांकडून फसवणूक संभवते, अशी भाकिते वार्षिक भविष्यात काहीतरी मोठे सांगतो, अशा थाटात सुनावली जातात. आता एक दोघा मित्रांकडून वा नातेवाइकांकडून थोडेबहुत फसवले जाणे ही इतकी व्यवहारी शक्यता आहे की त्यात भविष्य ते काय सांगायचे ? एखाद्या राशीच्या व्यक्तींना या आठवड्यात लॉटरीचे तिकीट काढा, भाग्य नक्की उजळेल, असा सल्ला असतो. भारताची सत्तर कोटी लोकसंख्या बारा राशीत विभागली तर प्रत्येक राशीच्या वाट्याला सरासरी सहा कोटी लोक आले. या सगळ्यांचे भाग्य एका फटक्यात एका आठवड्यात उजळणाऱ्या मेंदूची कीव करावी का कौतुक करावे ? एकाच राशीच्या व्यक्तीच्या दोन दैनिकांतील भविष्यात जमीन-अस्मानचा फरक असतो. एकात सहज पैसे मिळतील असा दिलासा असतो तर, दुसऱ्यात आर्थिक तंगीने हैराण होणार असे भाकीत असते.

या भविष्यामुळे भाबड्या माणसाच्या मनाला आशा-निराशेचे धक्के उगीचच खावे लागतात. त्याचा फक्त तोटाच होतो. फायदा कधीच नाही.

आणि सहज करमणूक म्हणूनच जर हे छापावयाचे असेल तर, मग घटकाभर करमणूक करणाऱ्या इतर असंख्य कल्पना संपादकाला का सुचत नाहीत?

हल्ली तर गाव, शहर, प्रांत, स्वदेश यांचीही कुंडली मांडून भविष्य वर्तवण्याचे फॅड निघाले आहे. आता भारताच्या कुंडलीसाठी कोणती वेळ प्रमाण मानावयाची? दिल्लीची, मुंबईची, कलकत्त्याची का मद्रासची? पाकिस्तानबाबत तर फारच पंचाईत. कारण पूर्व पाकिस्तानची वेळ पश्चिम पाकिस्तानपेक्षा एक तासाने कायम पुढे होती. मग कुंडली मांडावयाची वेळ कोणती? (आता दोन वेगळे देशच झाल्याने तेवढा प्रश्न सुटला.) कदाचित सरसकट १५ ऑगस्ट १९४७ चे रात्रीचे बारा ही वेळ भविष्यवेत्ते मंडळी घेत असतील. पण मग एकाच वेळी जन्माला आलेल्या या राष्ट्राचे भविष्य इतके वेगवेगळे कसे?

आपल्याकडे काहीजणांना प्राचीन अभिमान फार. भास्कराचार्य, वराह मिहीर, आर्यभट्ट या मान्यवरांचा पुरावा देऊन विचारले जाते, की त्यांचा भविष्याचा अभ्यास म्हणजे काय ढोंगबाजी होती? एक गोष्ट नीट समजावून घ्यावयास हवी की, पुस्तकात कोणी काय म्हणाले यावर त्याचे मूल्यमापन होत नाही. खुद्द आदि शंकराचार्यांनीच अशांना जमाल गोटा देऊन ठेवला आहे, की शंभर पुस्तकांनी अग्नी शीतल असतो आणि तो प्रकाश देत नाही असे सांगितले तरी ते खरे नाही. ग्रंथाचे दाखले कुचकामाचे असतात. वस्तुनिष्ठ अनुभव महत्त्वाचे असतात.

खरे तर, ज्योतिषशास्त्राचे तीन भाग असतात. गणित, खगोलशास्त्र व भविष्य. वराह मिहीर, आर्यभट्ट, भास्कराचार्य हे गणिती होते. खगोलशास्त्रज्ञ होते. पण प्रचंड धार्मिक पगडा असलेल्या हिंदूंनी घेतले फक्त ज्योतिष शास्त्रातले भविष्य. पुराणमतवादी धार्मिक दृष्टी हीच आपली खरी अडचण असते. ग्रीक संस्कृतीशी संबंध आल्यावर त्यांची विकसित भूमिती शिकण्याऐवजी त्यांची गूढ-विद्या आणि भविष्य शिकण्यातच आपल्याला जास्त रस वाटला असे इतिहास सांगतो. ग्रहांचा पृथ्वीवर जो काही परिणाम होतो तो त्याच्या गुरुत्वाकर्षण शक्तीमुळे. पौर्णिमेला समुद्राला भरती येऊन तो उचंबळेल अशा काही घटनांपलीकडे त्याचे महत्त्व नाही. सजीव जीवनावर तर त्याचा अजिबात परिणाम होत नाही. शिवाय ग्रहांना स्वतःचा प्रकाश नसतोच. ते परप्रकाशित असतात. सूर्याचे किरण ते परावर्तित करतात एवढेच. आणि स्वाभाविकच या प्रकाशकिरणांत असे काही आगळेवेगळे नसते की, ज्याचा मानवी जीवनावर सर्व दूर परिणाम व्हावा.

भविष्य बघण्याच्या बारा राशी असतात. जन्माच्या वेळी नवग्रहांची जी परिस्थिती त्यावर या राशी ठरवल्या जातात. मुळात हा पायाच किती कच्चा आहे. या नवग्रहांतले राहू, केतू हे ग्रहच नाहीत तर नेप्चून, प्लूटो, ॲस्ट्रॉइड हे ग्रह असून त्यांचा शोध अलीकडेच लागल्याने त्यांचा समावेश नवग्रहात नाही.

या सगळ्यांमधून सारासार विचाराने हाती लागते ते एवढेच की, जे स्वामी विवेकानंदांनीच सांगून ठेवले आहे. " कमकुवत मनाची माणसे ज्या वेळी त्यांना असाध्य वाटते, सर्वस्व गमावल्यासारखे वाटते, तेव्हा भविष्याकडे येतात. जर ग्रह, तारे माझे आयुष्य बदलू शकतील तर मी ते जगण्याच्या लायकीचे नाही. ताकदवान व्हा, अंधश्रद्धांच्या पलीकडे जा. स्वतंत्र व्हा."

* *

आठ

नवे जुने बुद्धिभेद

१. पुनर्जन्म

'भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतो' हे विधान चार्वाकाने दोन हजार वर्षांपूर्वी केले. शरीराची राख होते. विश्वाच्या द्रव्यात मिसळून जाते. सारा खेळ खलास होतो. जगाचे रहाटगाडगे अविरत चालूच राहते.

परंतु माणूस अनेक अतृप्त आशा, आकांक्षा, भावना, वासना, जबाबदाऱ्या ठेवून जातो. त्याच्यामागे राहणारे सगेसोयरे पण त्यामध्ये गुंतलेले असतात. त्यामुळे कायम वियोगाची ही कल्पना सहन होणारी नसते.

त्याशिवाय आपली परंपरा, धर्मकल्पना ठामपणे आत्मा मानते. पुनर्जन्म मानते. माणसाने अंगावरचे कपडे बदलावेत तसा आत्मा शरीररूपी कपडे बदलतो. आणि दुसऱ्या जीवात प्रविष्ट होतो. हा आत्मा अविनाशी असतो. तो शस्त्राने न मारला जाणारा, पावसाने न भिजणारा, वाऱ्याने न वाळणारा, अग्नीने न पोळणारा असा असतो. आपली ही परंपरागत पक्केपणाने रुजलेली भावना आहे. याच्या मदतीला चौऱ्याऐंशी लक्ष योनींचा जन्म-मृत्यूचा फेरा आहेच. हा फेरा छेदून कायम नरकात जाऊन पडणारे किंवा थेट स्वर्गातली सीट रिझर्व्ह करणारे पापात्मे वा पुण्यात्मे फारच थोडे. बाकीच्या पामरांना या फेऱ्यातून जाणे आहे, आणि त्यामुळे पुर्नजन्मही आहे.

खरे तर, या फेऱ्यात नशिबाने एकदाच मानव जन्म लाभतो. पण कुणी कुणी महापुण्यवान असतात. त्यांना मरणोत्तर पुन्हा मानव जन्मच लाभतो. पुनर्जन्माचा दावा करणाऱ्या या व्यक्तींच्या हकीकती अधून मधून नेहमी ऐकिवात येतात. जगाच्या लोकसंख्येच्या १० टक्के असणाऱ्या हिंदू धर्मातच पुनर्जन्म मानतात. ख्रिस्ती व इस्लाम वर्ग पुनर्जन्म मानत नाहीत. राजस्थान विद्यापीठाने अशा सातशे केसेसचा अभ्यास केला. या अभ्यासातून काहीही निष्पन्न होत नाही. म्हणून त्यांनी हा विभागच मग बंद केला.

अशा केसेसना आपल्या समाजात नेहमीच अफाट प्रसिद्धी मिळते. पैसा कमवायला या अफवा उपयोगी असतात. अशा केसेसची काळजीपूर्वक तपासणी केली, तर बनावट हकिकतीचे काही दुवे हेरता येतात. पुनर्जन्माचा दावा करणारी व्यक्ती आणि तिचे हल्लीचे व पूर्व-जन्मीचे कुटुंब याचा पुसटसा संबंध लक्षात येऊ शकतो. शिवाय जन्म, मृत्यू, लग्न यांच्या नोंदी, मरणोत्तर तपासणी यांचे अहवाल पाहता येतात.

मृत व्यक्तीचे काही मागे राहिले आणि ते दुसऱ्या देखत काही काळाने प्रविष्ट होते असे मानावयास गेलो तर फारच घोटाळे होतात. मधल्या काळात हे आत्मे कोठे राहतात ? हवेत भटकत की वेताळाच्या टेकडीवर ? शिवाय हे पुनर्जन्म मिळतात कोणत्या आधारावर ? सध्याच्या कल्पनेप्रमाणे आधार मानावयास हवा, पूर्वसंचिताचाच. म्हणजे सगळा कर्मविपाकाचाच सिद्धान्त मानावयास हवा. या जन्मीच्या पाप-पुण्याचा हिशेब होणार, त्याआधारे कुठल्या योनीत पुनर्जन्म येणार का मोक्ष मिळणार हे ठरणार. त्यामुळे पूर्वजन्मीच्या कल्पनेला पुसटशीही मान्यता द्यायची म्हणजे आपापल्या संचिताने आपल्याला घडवले. चातुर्वर्ण्य दिले. भोग दिले. हे सगळेच मानावयास हवे. पुरुषार्थी माणसाला पुनर्जन्मांची कल्पना अशी फटक्यात पराधीन करून टाकते.

कधी कधी घरातील अमुक एक व्यक्ती आजोबा, आजी मरते आणि त्याच वेळी चार दोन दिवसांनी सून वा नातसून बाळंत होते. तिला मुलगा झाला तर आजोबाच आणि मुलगी झाली तर आजीचा पुनर्जन्म मानला जातो आता या तर्काला काय म्हणावे ! जन्माला आलेला जीव खरे तर आईच्या उदरात नऊ महिन्यांपूर्वीच जन्माला आलेला असतो. ऑपरेशनची वा औषधाची मदत घेतली असली, तर तो आजोबा आजीच्या मृत्यू आधीही जन्माला येऊ शकला असता. आठव्या महिन्यापासूनच तो जीव जगण्यालायक होतो.

(Viable Child) मग त्या जीवात आत्मा कुठला होता. इकडे तर आजोबा आजी जिवंतच होते. पण हे साधे प्रश्नही अक्कल गहाण टाकली की, सुचत नाहीत. आत्मा हा जीवापेक्षा वेगळा आहे. जीवाला नव्हे तर आत्म्याला पुनर्जन्म आहे. हा युक्तिवादही म्हणून टिकत नाही. खरे तर, आत्मा म्हणजे काय ? त्याची वैशिष्ट्ये कोणती ? याचे बुद्धिगम्य विश्लेषण अद्याप कोणीच केलेले नाही. एक तर केवळ कल्पनाशक्तीने (स्पेक्युलेशन) त्याचे वर्णन केले जाते. किंवा फारतर काही जणांच्या अनुभवाचा हवाला दिला जातो. यातली कोणतीच गोष्ट प्रत्यक्ष पाहता येत नाही. अनुभवाच्या कसोटीवर घासून पाहता टिकत नाही. म्हणूनच अशा पुनर्जन्माच्या कल्पनेबाबत मुळापासूनच नकार देणे श्रेयस्कर व योग्य आहे.

२. भावातीत ध्यान– एक अर्धसत्य

महर्षी योगी यांचे भावातीत ध्यानकेंद्र निघाले. १९५७ साली भारत, अमेरिका, युरोप या ठिकाणी ते झपाट्याने पसरले. अत्याधुनिक कॉम्पुटरच्या साहाय्याने सर्व संस्थांची माहिती संकलित करण्याची प्रथा १९६७ सालापासून या केंद्रांनी चालू केली. आतापर्यंत सहा लाख लोकांहून अधिकांनी भावातीत ध्यानाचे प्रशिक्षण घेतल्याचे ते सांगतात. सुमारे सहाशे पूर्णवेळ पगारी शिक्षक या प्रशिक्षणाचे काम करतात. या प्रशिक्षणाची फी घेतली जाते. अमेरिकेत सर्वाधिक, त्या खालोखाल जर्मनी आणि इंग्लंडमध्ये हे शिक्षण चालते. पंचवीस वर्षे लोटूनही याचे पुरेसे आकर्षण अजून कायम आहे. महर्षी योगी स्वतः वैदिक स्कॉलर आहेत. पदार्थविज्ञानाचे उच्च पदवीधर आहेत. भारतातले असल्यामुळे त्यांना पौर्वात्य तत्त्वज्ञानाचा रस आहे. याचा एकत्रित परिणाम स्वाभाविकच त्यांचे प्रतिपादन आकर्षक बनण्यात होतो.

महर्षी महेश योगी यांना असे ठामपणे आणि प्रामाणिकपणे वाटते की, भावातीत ध्यान आणि वेदांचे सुयोग्य ज्ञान यांचा मिलाफ व प्रसार जगाला उज्ज्वल भवितव्य देऊ शकेल. तुरुंगांची गरज राहणार नाही. ते रिकामे पडतील. सैन्याचीही गरज राहणार नाही. ती संपुष्टात येतील.

भावातीत ध्यान तुम्हांला जो आत्मज्ञानाचा साक्षात्कार घडवते, तो

तुमचे जीवन बदलून टाकणारा असतो असा त्यांच्या समर्थकांचा दावा आहे. स्वाभाविकच असे ध्यान, त्या ध्यानासाठी प्रत्येक व्यक्तीला दिला जाणारा मंत्र, ध्यानामागचे तत्त्वज्ञान याला एक गूढता प्राप्त होते. आणि त्याला दैवी परिणाम असल्याचे वादू लागते.

एखाद्या दैवी स्पर्शाने वा मनोसामर्थ्याने रुग्णाला बरे करण्याचा इतिहास तसा जुनाच आहे. आजारी असलेल्या व्यक्तीला स्पर्श करून किंवा स्वतःच्या मानसिक सामर्थ्याचा परिणाम समोरच्या व्यक्तीच्या मनावर करून त्याला बरे केल्याचा दावा अशा वेळी केला जातो. आणि स्वाभाविकच त्याला गूढ, दैवी परिमाण प्राप्त होते. भावातीत ध्यान हा अशाच उपचार प्रक्रियेचा एक भाग आहे.

अशा स्वरूपाच्या उपचार पद्धतीबाबत बरीच चर्चा शास्त्रात झालेली आहे. अमुक व्यक्तीच्या मनाचे वा स्पर्शाचे सामर्थ्य आपणास बरे करू शकेल याचा आशावाद आणि त्यांच्या (त्या स्पर्शातून वा अन्यप्रकारे) मिळणाऱ्या सूचना याचा परिणाम अशा वेळी होतोच. आज बऱ्याच प्रमाणात मानसशास्त्र असे मानते की, मनाचा आशावाद, सुयोग्य प्रकारे देण्यात आलेल्या सूचना, आणि स्वतःचे आरोग्य व जीवन या बद्दलच्या अजूनही पुरेशा प्रमाणात लक्षात न आलेल्या शारीरिक व मानसिक मानवी क्षमता यांचा परिणाम मानवी जीवनावर होतो.

सकाळ-संध्याकाळ वीस-वीस मिनिटे डोळे मिटून खुर्चीत बसून दिलेल्या मंत्राच्या साह्याने करावयाचे भावातीत ध्यान, हा म्हणूनच एक मानसोपचार म्हणता येईल. भावातीत ध्यान किंवा तत्सम अन्य प्रकारानंतर अधिक उत्साह, जोम चैतन्य वाटते. कार्यक्षमता वाढते. वाईट सवयीपासून मन दूर होते. मनाला पोखरणाऱ्या चिंता कमी होतात. याचा अर्थ एवढाच की, मनाचा तो एक प्रकारचा व्यायामच होतो. अशा स्वरूपाच्या ध्यानधारणा यांच्याकडे मनःशांतीसाठी वळण्याची पाश्चात्त्य देशात वाढती गरज आणि काहीशी फॅशन निर्माण झाली आहे. अमेरिकेत पिकते ते आपल्या देशात मोठ्या कौतुकाने स्वीकारण्याच्या इथल्या एका वर्गाच्या मानसिकतेने आपल्याकडेही त्याच्याबद्दल तसेच कुतूहल आढळते. या सर्वच प्रकाराबाबत लक्षात ठेवावयास हवे ते हे की, हे सर्व स्वतःच्या मनाला सुधारण्याचे वा बळकटी आणण्याचे मार्ग आहेत. त्याचा काहींना फायदा होतो हे जसे खरे तसे त्याच्यापासून अवास्तव अपेक्षा निर्माण केल्या जात असल्याने, त्यांच्यापासून अनेकांचा भ्रमनिरासही होतो. या भावातीत ध्यानाने घडवले जाणारे परिणाम हे मानसोपचाराने घडविले जाणे शक्य आहे. या

साधनांच्या मागे लागताना हे लक्षात घेतले जात नाही की, शास्त्रीय मानसोपचाराला या साधना पूरक ठरू शकतील. पर्याय अजिबात नाही. स्वतःची मनोदुर्बलता काही काळ दूर झाल्यासारखी कदाचित वाटेलही. परंतु या दुर्बलतेच्या मुळाशी असलेल्या मानसशास्त्रीय कारणांचा शोध घेतला नाही, तर हा वरवरचा प्रासंगिक उपचार अधिकच धोकादायक ठरेल.

याबरोबरच आणखी एक इशारा ध्यानात घ्यावयास हवा. आपली पद्धत ही माणसाच्या मनाचा छेद घेणारी व परिवर्तन घडवणारी जवळ जवळ वैश्विक पद्धत आहे, असा यापैकी प्रत्येकाचा दावा असतो. त्यामुळे कोणत्याही स्वरूपाच्या मानसिक ताणासाठी तीच सुचवली जाते. त्याचा प्रत्येक व्यक्तिगत केसमध्ये सुपरिणाम व दुष्परिणाम याचा विचारच न करण्याचे हे आंधळेपण धोकादायक असते.

पुन्हा अशी ध्यानधारणा ही एक उपचारपद्धती आहे, असे लक्षात घेतले की, त्यामुळे उपचार घेतानाही सुपरिणामाबरोबरच काही दुष्परिणामही (side effects) संभवतात. हे लक्षात घेणे आणि त्यावर उपाय योजणे आणि प्रसंगी उपचार बंद करणे; हे मानसोपचार तज्ज्ञाला शक्य असते. पण अशा योग्यांना ना त्याची कल्पना असते ना काळजी.

३. दिशाभुलीचे नवे मार्ग

उघड बुवाबाजी परवडली; पण बुवाबाजीच्या संरक्षणासाठी विज्ञानाचे तथाकथित धूपदीप जाळून केलेले मायाजाल नको. ते त्या बुवाबाजीहून अधिक घातक आहे, असे परखडपणे बजावण्याची वेळ आता आली आहे. विज्ञान माणसाला डोळस बनवते. चिकित्सक प्रयोगातील विचार करावयास शिकवते. स्वभाविकपणेच अंधश्रद्धा, बुवाबाजी, मंत्रतंत्र, यज्ञ-याग या साऱ्यांची दांडगाई विज्ञानाच्या प्रकाश झोतात लुळीपांगळी पडते. हे आक्रित टाळण्यासाठी आता नवीनच युक्ती लढविण्यात आली आहे. या साऱ्या गोष्टीच मुळी विज्ञानाच्या परिभाषेत मांडावयाच्या आणि त्या जणू सिद्धच आहेत असा रेटून दावा करावयाचा. होम-हवन हे खरेतर वेळ आणि जीवनोपयोगी वस्तू वाया घालविण्याचे एक निव्वळ कर्मकांडच आहे. पण त्याला अग्निहोत्राचे गोंडस रूप दिले गेले

आहे. हवेतील वाढत्या प्रदूषणाला विरोध ही आजची अपरिहार्य गरज आहे. या प्रदूषणावर आग्निहोत्र म्हणजे जणू काही अक्सरी इलाज आहे, असा भास निर्माण केला जातो. अग्निहोत्राच्या धुरात हवा प्रदूषित करणारे, सर्व जंतू मारण्याचे सामर्थ्य आहे, असा दावा केला जातो. हे कोणत्या प्रयोगशाळेत कधी सिद्ध झाले ? अग्निहोत्रात तयार झालेल्या धुराचे ॲनॅलिसीस कुठल्या लॅबोरेटरीत झाले ? पण असे प्रश्न विचारून या पवित्र विधींना अडचणीत कसे आणावयाचे ?

एकदा आपल्या आधाराला शास्त्र वेठीला धरण्यास मतलबी हव्यास चालू झाला की, मग शास्त्रांच्या नावाखाली कल्पनाविलास लढविगेच चालू होते. सध्या धार्मिक पुस्तकांच्या खपाची चलती आहे. शेकड्यांनी या विषयावरची पुस्तके बाजारात येतात. त्यांना मागणी चांगली असते. अशा पुस्तकांपैकी अनेक पुस्तके आता परंपरागत मांडणी करत नाहीत. जमाना बदलल्याची चलाख जाणीव त्यांना असते. त्यामुळे गायत्री मंत्र असो, देवाभोवतालची प्रदक्षिणा असो अथवा रुद्राक्ष, गंगेचे पाणी वा भस्म असो, त्यांच्या प्रभावाला एक शास्त्रीय आवरण चढवलेले असते. गायत्रीमंत्र एखादा माणूस श्रद्धा म्हणून म्हणत असेल तर समजू शकण्यासारखे आहे. पण दावा काय करायचा ? गायत्रीमंत्राच्या उच्चाराबरोबर शरीरात काही विशिष्ट मायक्रोवेव्हज निर्माण होतात. या वेव्हजमुळे संपूर्ण शरीरातील रुधिराभिसरण ॲक्टिव्ह होऊन माणसाला एक्स्ट्रा एनर्जी मिळते. इतकेच नव्हे तर, शरीराची सर्व सिस्टिम सुपर इलेक्ट्रिकल पार्टिकल्सनी संक्षिप्त होऊन माणूस निरोगी बनतो. शिकला सवरला माणूसही सारासार बुद्धी गहाण ठेवून या भुलभुलैयात अडकतो. आपल्या पूर्वजांनी फार पूर्वी किती शास्त्रीय विचार केला याने गहिवरून येतो. आणि मग एकूणच ते पूर्वज, त्यांची परंपरा, त्यांचे विचार यांचा पाईक बनतो. व्रतवैकल्ये, देवपूजा, मूर्ती प्रदक्षिणा या कर्मकांडात आजच्या धावपळीच्या माणसाला गुंतायला सांगणे मुळात खरे नाही, पण त्यातही मनाच्या दुबळेपणाने समाधानासाठी तो स्वतः त्यात गुरफटलाच असेल, तर एक वेळ समजू शकेल. पण देवाच्या देवळातल्या प्रदक्षिणेला शास्त्रीय आधार असल्याचा दावा करायचा म्हणजे अतीच झाले. त्यांचा दावा असतो " प्रदक्षिणेचे महत्त्व आपण नीट लक्षात ठेवावयास हवे. देवदेवता तेजोमय असतात. त्या तेजाची लहरी वलये मूर्तीभोवती सतत फिरत असतात. हा त्यांचा फिरण्याचा मार्ग त्यांच्या उजव्या बाजूकडून डाव्या बाजूकडे असा चक्राकार असतो. आपण देवाभोवती त्याच मार्गाने गेलो तर संपूर्ण तेजोवलयातील दिव्यकण आपल्या भोवतीच

चिकटतात आणि शरीरच नव्हे तर, मनाचे कोशही शुद्ध करतात." आपल्याकडची दक्षिणेतील वा उत्तरेतील मोठी देवळेही आहेत. तिथे पैसा टाकल्यावर देवाच्या दलालाकडून काही प्रसाद म्हणून विकत मिळते. प्रचंड अस्वच्छता, पुजाऱ्यांचा बुजबुजाट, आरेरावी, भक्तांना हिडीस फिडीस आणि संधी मिळताच त्यांची लूट असे वातावरण ज्या ठिकाणी जमा झाले आहे, तेथे कसलो तेजोवलये फिरतात? आणि मग चोवीस तास त्यांच्याच सान्निध्यात राहणाऱ्या पुजाऱ्याला व बडव्याला ती कशी शुद्ध करत नाहीत?

जे देवतांचे तेच तिथल्या पवित्र म्हणून गणले गेलेल्या वस्तूंचे, कोठले भस्म, कोठली रुद्राक्षाची माळ, गंगेचे पाणी, कोठे अभिषेकाचे तीर्थ या सगळ्यांनाही हा पवित्रतेचा शास्त्रीय गुण चिकटविला जातो. त्यामधून म्हणे अनेक प्रकारच्या सत्त्वयुक्त लहरी बाहेर पडतात आणि स्वाभाविकच तेथे वाईट विचारांच्या लहरी टिकू शकत नाहीत. आता पंढरपूरला कोणी डोंबे नावाचा गुंड तिथला कर्दनकाळ बनतो. आणि सगळं पंढरपूर त्याला पाहून चळाचळा कापते. त्याच्यावर कधी सत्त्वयुक्त लहरींचा परिणाम होत नाही. काशीला पंडे चक्क लूटच करतात. त्यांच्यावर कधी समोरून वहणाऱ्या गंगामैय्याच्या लहरी प्रभाव पाडत नाहीत. अनेक धार्मिक स्थळे ही दंगलीचा विखार पेरणारी केंद्रे बनतात. त्या वेळी त्या सत्त्वयुक्त लहरी कोठे गडप होतात?

खरे तर असे काही नसतेच. पण ते जसे असते तसे विकण्याचे दिवस संपत आल्याची चाणाक्ष जाणीव आता मंडळींना होऊ लागली आहे. म्हणून त्यांनी हे भ्रमजाल उभारावयास सुरवात केली आहे. पुन्हा हा बरकतीचा धंदा आहेच. कारण गायत्रीमंत्राचे शास्त्रीय सामर्थ्य विशद करून सांगणारे पुस्तक वा ग्रहांच्या खड्यावरून सौख्याचे धडे देणारा ग्रंथ हा एकाच वेळी गरजू वाचकांची दुहेरी तहान भागवतो. त्याच्या भाविक मनाला आधार मिळतो. आणि सुशिक्षित मनाला आपण विज्ञानाच्या आधारे चालत आहोत हा दिलासा मिळतो; म्हणूनच ही दिशाभूल बुवाबाजीपेक्षा अधिक घातक ठरते.

४. परामानसशास्त्र

प्रत्येक संस्कृतीत आणि इतिहासाच्या प्रत्येक कालखंडात इंद्रियाच्या आकलनशक्तीच्या पलीकडील मार्गाने दूरवरच्या व्यक्तीशी संपर्क साधल्याचे

उल्लेख आढळतात. या बाबी धर्माचे तंत्रमंत्र अथवा गूढविद्या या संबंधित आहेत असे मानण्यात आले. त्यामुळे या गोष्टींकडे फारसे लक्षही देण्यात आले नाही.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात पहिल्यांदा या बाबींकडे लक्ष पुरविण्यात आले. अशा घटनांचा अभ्यास करण्यासाठी इंग्लंडमध्ये १८८२ साली सोसायटी फॉर सायकिकल रीसर्च स्थापन झाली. १८८७ साली अमेरिकन सोसायटी फॉर सायकिकल रीसर्च स्थापन झाली. इतर अनेक देशांतही अशा संस्था निघाल्या. काही नामवंत शास्त्रज्ञांनी या अभ्यासात भाग घेतला. या संस्थांच्या आग्रहाने काही विद्यापीठांनीही या घटनांचा प्रायोगिक पाठपुरावा केला.

या शक्तीचे प्रकार साधारण चार आहेत. (१) टेलिपथी (Telepathy) (२) Clair Voyance क्लेअरव्हायन्स (३) प्री कॉग्निशन (pre cognition) (४) सायको कायनेसिस (psycho kinesis) या शक्तीच्या समर्थकांच्या मताने त्यांचे स्वरूप पुढीलप्रमाणे असते. टेलिपथीचा अर्थ कुठल्याही ज्ञात संदेश यंत्रणेशिवाय दुसऱ्याच्या मनातला विचार समजण्याचे सामर्थ्य. क्लेअरव्हायन्समध्ये आधी घटना घडून गेलेली असते. ही शक्ती बाळगणाऱ्या माणसाला त्याची माहिती इंद्रियाच्या ज्ञात साह्याने असण्याची शक्यता नसते. उदाहरणार्थ, चोरी होऊन गेलेली असते. चोरीबद्दल त्याला काहीही कल्पना नसते. परंतु तो आपल्या शक्तीच्या साह्याने चोराचे वर्णन पोलिसांना सांगू शकतो. प्री कॉग्निशन असणाऱ्या माणसाला भविष्यात होणाऱ्या घटना आधी समजतात. सायको कायनेसिसचे सामर्थ्य प्राप्त झालेली व्यक्ती कोणत्याही भौतिक शक्तीशिवाय मनःशक्तीच्या जोरावर वस्तू हलवू शकते. याबाबत संशोधन चालू झाले. सुरवातीच्या काळातले संशोधन व्यक्तिगत आलेल्या अनुभवावरच होते. यात अनेकसे दुवे होते. काही वेळा संबंधित शक्तीचा दावा करणाऱ्या माणसांपर्यंत माहिती आधीच पोचलेली असल्याचे आढळून आले. काही प्रसंगी योगायोगाचा भाग असे, तर काही निव्वळ बनावट असत.

शास्त्र म्हणून अभ्यास करण्यासाठी पद्धत अधिक नेमकी हवी होती. जे. वी. रीन्हे या मानसोपचार तज्ज्ञाने शोधून काढलेली कार्डाच्या आधारे ध्यावयाच्या चाचण्यांची पद्धत ही या दृष्टीने प्रमाणित मानली गेली. ही कार्डस् पत्त्याच्या पानासारखीच असतात. पंचवीस कार्डाचा एक सेट असतो. कार्डावर चौकोन, चांदणी, फुली, वर्तुळ व रेघा यांपैकी कोणतीतरी एक खूण असते. ती ठळक काळ्या शाईत छापलेली असते.

टेलिपथीची चाचणी देणारी व्यक्ती 'अ' एका खोलीत बसते. ज्याच्याकडून त्याला संदेश मिळतात तो दुसऱ्या 'ब' खोलीत बसतो. अन्य कोणत्याही मार्गाने संदेश जाणार नाही, याची खबरदारी घेतली जाते. खोलीतल्या व्यक्तीला कार्डे दाखविली जातात. त्यापैकी किती कार्डांवरच्या खुणा अ खोलीतील माणसाकडे तो टेलिपथीच्या साह्याने पोचवितो, हे पाहिले जाते. क्लेअरव्हायन्सच्या चाचणीसाठी कार्डे उलटी करून ठेवली जातात. आणि ती कोणत्या क्रमाने आहेत हे ओळखण्यास संबंधित व्यक्तीला सांगितले जाते. कॉग्निशनच्या चाचणीत पिसल्यानंतर कोणत्या क्रमांकाने कार्डे येतील हे कार्डे पिसण्याआधी ओळखण्यास सांगितले जाते आणि त्याचा पडताळा घेतला जातो.

या साऱ्या अतींद्रिय शक्तींचा समावेश ज्यामध्ये होतो, त्याला Para Psychology 'परामानसशास्त्र' म्हणतात. ज्या घटनांचा खुलासा सध्याच्या भौतिक व रासायनिक शास्त्रीय नियमांच्या आधारे करता येत नाही, त्या घटनांचा अभ्यास म्हणजे परामानसशास्त्र अशी त्याची व्याख्या केलेली आहे.

अतींद्रिय शक्तीचा पुरावा म्हणून अनेक पुस्तके लिहिली गेली आहेत. अनेक घटनांचे त्यात वर्णन असते. परामानसशास्त्र ही जणू झालेलीच बाब आहे. अशी त्यात भलावण असते. मात्र याबाबत तज्ज्ञांनी भरपूर रास्त शंका व्यक्त केलेल्या आहेत. अतींद्रिय शक्तीचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी केलेल्या प्रयोगातही अनेक चुका, कच्चे दुवे आढळले आहेत. ज्यांचा या शक्तीवर अजिबात विश्वास नाही अशांच्या उपस्थितीत काटेकोरपणे या चाचण्या घेतल्या जात नाहीत. आपल्यामध्ये सातत्याने अशा स्वरूपाची शक्ती आहे. आपण ती नियंत्रित करू शकतो, असे कोणीही सिद्ध केलेले नाही. याची मग अनेक कारणे दिली जातात. उदाहरणार्थ, मनोअवस्थेवरही शक्ती अवलंबून असते. मन उत्साही, आनंदी असेल तर ती अस्तित्वात येते. उदासीन, काळजीग्रस्त असेल तर लोप पावते. (स्वाभाविकच चाचणीच्या वेळेस ती लोप पावण्याचीच शक्यता आधिक).

अशा घटना घडतात हे आधी सिद्ध करावयास हवे आणि ते कधी काळी सिद्ध झालेच तरी त्याचा अभ्यास वीज, वाफ, रेडिओ लहरी, अणुशक्ती यांचा होतो त्याच पद्धतीने होणार. अंधविश्वास न ठेवता असा अभ्यास घेण्यास बुद्धिप्रामाण्याशी, वैज्ञानिक निष्ठेशी, विसंगत काही नाही. पण आता अशी घटना घडल्यावर विज्ञानाला डावलून त्याची स्पष्टीकरणे दिली जातात. लोकांची अंधश्रद्धा पोसण्यास ती उपयोगात आणली जातात.

अशी स्पष्टीकरणे देणाऱ्यांचा एक दावा असतो. त्यांचे म्हणणे असे असते की, या घटनांना वैज्ञानिक चिकित्सेचे ज्ञान, नियम लागूच होत नाहीत. तुमच्या अत्याधुनिक प्रयोगशाळेच्या आणि विज्ञानविचाराच्याही कुवतीबाहेरच्या या घटना आहेत. हे वरपांगी बरोबर वाटणारे स्पष्टीकरण विसंगत आणि फसवे आहे. सर्वस्वी विज्ञानाच्या आवाक्याबाहेर वाटणाऱ्या असंख्य घटना विज्ञानाने आपल्या चिकित्सक प्रयोगशीलतेने ज्ञात करून घेतल्या. काही गोष्टी आज समजत नसल्यातरी शेवटी त्यांची उकल करण्याचा मार्गही अधिक प्रगत वैज्ञानिक दृष्टिकोन हाच आहे. त्याच मार्गाने आजच्या अज्ञात घटनांचे कार्यकारण भाव आज ना उद्या समजणार आहेत. परंतु ज्या वेळी विज्ञानाच्या पायाभूत पद्धतीलाच डावलण्याचा हेका धरला जातो, त्या वेळी परामानसशास्त्राच्या पुराव्यासाठी पुढे केलेल्या घटनांच्या खरेपणाबाबतच साशंकता निर्माण होते. ज्या अनेकांचे डंके या शक्तीचा पुरावा म्हणून पिटण्यात आले, त्या प्रत्येकाचे बिंग या ना त्या प्रकारे फुटले आहे. या स्वरूपाच्या घटनांचा वादातीत पुरावा आजही उपलब्ध नाही, ही गोष्ट महत्त्वपूर्ण व लक्षणीय आहे.

* *

नऊ

वैज्ञानिक दृष्टिकोन--बुद्धिप्रामाण्यवाद

जगाचे वस्तुनिष्ठ,यथार्थ व निश्चितज्ञान मिळवण्याचा एकमेव मार्ग म्हणजे वैज्ञानिक व्यवहार. साक्षात्कार, अंतर्ज्ञान, ग्रंथप्रामाण्य यापेक्षा ह्या मार्गानेच ज्ञानप्राप्ती करून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

धर्माला हे मान्य नसते. सृष्टीचे ज्ञानेंद्रियांना होणारे ज्ञान सत्य नाही. बाह्य अनुभव, वैज्ञानिक साधनांनी पूर्ण ज्ञान होत नाही. त्यासाठी ध्यानधारणा, अनासक्ती, भक्ती या मार्गाने आंतरिक शक्ती जागृत करावयास हव्यात. असा धर्माचा दावा असतो. या मार्गाने होणारे ज्ञान व्यक्तिनिष्ठ अनुभूतींवर आधारलेले असते. त्यात चर्चा, वाद, सुधारणा यांना वाव नसतो. प्रयोगाचा प्रश्न नसतो. तरीही हे ज्ञान अंतिम, सर्वकालीन व चिरंतन असल्याचे धर्माचे प्रतिपादन असते.

वैज्ञानिक व्यवहाराचा पायाच वेगळा असतो. विज्ञानाचा विषय असणारे भौतिक जग माणसाच्या जाणिवेच्या बाहेर स्वतंत्रपणे अस्तित्वात आहे. ते नियमबद्ध आहे व निश्चित अशा नियमबद्ध प्रक्रियेमधून बदलत आहे. या जगाला हे जे स्वयंभू अस्तित्व आहे, नियमबद्धता व गतिमानता आहे, ती बाहेरच्या कोणत्याही ईश्वरी शक्तीमुळे लाभलेली नाही, तर तिचे स्पष्टीकरण या जगाच्या व्यापारातून शोधावयास हवे. माणूस या जगाचा भाग आहे. त्याच्या जाणिवेला जगाचे ज्ञान होण्याची क्षमता आहे. ही क्षमता त्याला ईश्वराच्या कृपेमुळे येत नाही, तर त्याच्या व्यवहाराचे स्वरूपच असे आहे की ती त्याला येते. माणसाच्या

ज्ञानाचा उगम, विकास त्याच्या (सामाजिक) व्यवहारात होतो व ज्ञानाच्या सत्यतेचा निकष व्यवहारात पडताळणी हाच असू शकतो. हा विचार वैज्ञानिक व्यवहाराचा पाया असतो.

जो दृष्टिकोन सुसंघटित, सूत्रबद्ध, वस्तुनिष्ठ अनुभवाने निश्चित असतो त्यास वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणतात. वैज्ञानिक पद्धतीत समस्या, ती सोडविण्याचा संकल्प, त्याबद्दलची उद्दिष्टे, सिद्धान्त कल्पनेची मांडणी, सिद्धान्त कल्पनेची तपासणी (प्रश्नावली, मुलाखत, निरीक्षण, प्रयोग यापैकी कोणत्याही पद्धतीने, पण शास्त्रीय निकष मनात धरून) निष्कर्ष आणि सिद्धान्त कल्पनेचा स्वीकार किंवा त्याग इतके टप्पे असतात. या खटाटोपानंतरच घटना आणि संबंधित घटक यामध्ये संबंध प्रस्थापित करता येतात.

वैज्ञानिक दृष्टिकोनात वस्तुनिष्ठता आणि बुद्धिप्रामाण्यवादी चिकित्सा या गोष्टी महत्त्वाच्या असतात. पुराव्यानिशी सिद्ध झाल्याशिवाय कशावरही विश्वास ठेवायचा नाही, ही वृत्ती त्यामध्ये असते. वैज्ञानिक दृष्टिकोन हा व्यक्तीच्या जीवनाच्या तत्त्वज्ञानाचाच एक भाग बनतो. त्यामुळे व्यक्तीच्या जीवनात बदल होतात.

आयुष्यातील प्रत्येक घटना, धार्मिक, सामाजिक, रूढी परंपरेकडे अशी व्यक्ती चिकित्सक भूमिकेतून पाहू लागते. एखाद्या गोष्टीबद्दल मन तयार करताना पुरेसे निरीक्षण करते. कोणत्याही गोष्टींचा फाजील अभिमान न बाळगता अथवा भावनाविवश न होता विचार करते. कोणत्याही व्यक्तीकडे वा घटनेकडे पूर्वग्रह-दूषित नजरेने पाहणे नाकारते. कोणत्याही व्यक्तीचे वा ग्रंथांचे, ती व्यक्ती वा ग्रंथ सांगते म्हणून शंभर टक्के प्रामाण्य नाकारते. चिकित्सापूर्ण अभ्यासाने अनुभवलिखित पुराव्याच्या साहयाने सिद्ध झालेल्याच गोष्टी स्वीकारते.

आपल्या व्यक्तिगत, सामाजिक, राजकीय जीवनात या वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव आहे. आपल्या एकूण समाजात सामाजिक व धार्मिक परंपरांच्या पगड्यामुळे चांगले काय वाईट काय; खरे कोणते, खोटे कोणते याची चिकित्सा करत नाहीत. कुटुंबामध्ये बहुधा कुटुंबकर्त्याची एकाधिकारशाही असते. त्यामुळे स्वतंत्र विचार करण्याची प्रवृत्ती वाढीला लागत नाही. याशिवाय सामाजिक, धार्मिक, राजकीय क्षेत्रांतील काही व्यक्तींचे दैवतीकरण करून त्यांचे सर्व म्हणणे प्रमाण मानावे असा अट्टाहास चालू होतो. चाकोरीबद्ध शिक्षणपद्धती, पुरोगामी शक्तींचा अपुरेपणा यामुळे वैज्ञानिक दृष्टिकोन समाजात रुजत नाही.

हे घडवायचे तर मुलांच्या स्वतंत्र व्यक्तित्वाची जडण-घडण लहानपणापासून होईल हे पाहावे लागेल. मुले आपला निर्णय चिकित्सापूर्वक घेतील, असा प्रयत्न करावा लागेल. प्रयत्नवादावरचा व्यक्तीचा विश्वास वाढवावा लागेल आणि दैववादी प्रवृत्तींना विरोध करावा लागेल. प्रबोधन आणि आचरण या दुहेरी मार्गाने वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवावा लागेल.

माणसाने विवेकाने वागावे. बुद्धिप्रामाण्यवादी बनावे. वैज्ञानिक दृष्टिकोन अंगी बाणवावा. माणसाचे हित आणि प्रगती यामध्येच आहे. अशी मांडणी केली की, हमखास काही प्रश्न विचारले जातात. त्यांपैकी काही निवडक प्रश्न व त्यांची उत्तरे खालीलप्रमाणे आहेत.

प्रश्न : आज सर्वत्र नीतिमत्ता ढासळत चालली आहे. धर्मश्रद्धा आणि देव हे समाजाला या ढासळत्या नीतिमत्तेच्या संकटापासून वाचवण्यासाठी आवश्यक आहेत.

उत्तर : हा एक नेहमी केला जाणारा पण भ्रामक युक्तिवाद आहे. त्यापासून स्पष्ट फारकत घेण्याची गरज आहे. व्यक्तिगत पातळीवर धर्माची कर्मकांडे पार पाडणारे, यथासांग देवपूजा करणारे असंख्य लोक असतात. स्वतःच्या दैनंदिन सामाजिक वागण्यात मात्र ते रोकडे व्यवहारवादी असतात. तथाकथित यशस्वी होण्यासाठी व्यवहारात जे आचरण करावे लागते. ते करण्यात त्यांना काहीही वावगे वाटत नाही. मग ते भेसळ करणे असो, कर चुकविणे असो, काळाबाजार असो, स्वतःच्या स्वार्थासाठी दुसऱ्याला टांग मारणे असो. पारलौकिक जीवनाच्या सफलतेसाठी करावयाचे धर्माचरण, देवपूजा वेगळी आणि रोजचा व्यवहार वेगळा ही फारकत करण्यात त्यांना काहीही गैर वाटत नाही. याच्या उलट बुद्धिप्रामाण्यवाद्याची विवेकनिष्ठा समाजधारणेचा अधिक साक्षेपी प्रामाणिक विचार करते. समाजाची जडणघडण न्यायतत्त्वावर होण्यासाठी स्वतःलाच धडपडावे लागणार आहे याची त्याला जाणीव असते. ज्या लोकांची धर्मभावनेची तीव्रता बोथट झाली आहे त्यांत सामाजिक बांधिलकी, राष्ट्रप्रेम, सहिष्णुता, क्षमाशीलता या गुणांची वाढ थोडी अधिक असल्याची दिसते.

"कोणता धर्म माणसाला अनैतिकता शिकवतो? सर्वधर्मांचा पाया नैतिकतेवरच अवलंबून असतो." या मांडणीचा प्रतिवादही नीट समजावून घ्यावयास हवा. धर्मविचार, धर्माचे तत्त्वज्ञान व धर्मसंस्था यात फरक आहे आणि व्यवहारात तर ही फारकत फारच मोठी आहे. धार्मिक तत्त्वज्ञानामध्ये धर्माचा

अर्थ उदात्त असतो. पण व्यवहारात माणसाच्या वाट्याला काय येते? चुकीच्या कल्पनांचे अतिरेकी आग्रह, धर्मनेत्यांचे अहंकार, स्वार्थ परायण संकुचित आचार. विसंगत परंपरा व कर्मकांडे या सर्वांतून नैतिकता निर्माण होईल याला फारसा आधार नाही. सर्वाधिक पवित्र मानल्या गेलेल्या सुवर्ण-मंदिरात मादक पदार्थांचे साठे सापडतात. परदेशी शस्त्रास्त्रांचे ढीग मिळतात. निरपराध माणसांचे निर्घृण खून होतात. स्त्रियांच्यावरही अत्याचार होतात. आणि तरीही धर्माचे आचरण नित्यनेमाने काटेकोरपणे चाललेले असते. हे आपणाला अगदी अलीकडे पहावयास मिळाले. या धर्माचा नैतिकतेशी कसा संबंध जोडावयाचा ?

समुदायाच्या पातळीवर धर्मश्रद्धा विवेकहीन बनते. पिळवणूक, दुःख, अमानुषता याचे साधन बनते. धर्माच्या नावाने राज्य करणाऱ्या इराणमध्ये, पाकिस्तान वा बांगला देशामध्ये आज नैतिकतेऐवजी दंभ आणि क्रूरताच माणसाच्या वाट्याला येत आहे. हे देश मुस्लीम धर्मीय आहेत. हिंदू धर्म सहिष्णू व नैतिक आहे. यामुळे या देशाच्या धर्माच्या आधारे नैतिकता पोसली जाईल. या समजण्याला तरी वास्तवाचा आधार आहे काय ? सती जाण्याची चाल, विहिरीला पाणी लागण्यासाठी दिलेले नरबळी, अस्पृश्यता, स्त्रीचा दुय्यम दर्जा, उपासतापास हे सर्व धर्मश्रद्धांचेच भाग मानले गेले होते आणि आजही अनेक ठिकाणी मानले जातातच ना ? यामध्ये समाजधारणेसाठी कोणती नैतिकता आहे. चर्च, मशिदी, देवळे यांनी जमविलेली कोट्यवधी रुपयांची संपत्ती माणसाला सुखी करण्यासाठीच वापरली जाते असा अनुभव नाही.

धर्माच्या प्रभावाखाली, देवाच्या धाकाखाली नैतिक आचरण करणारे लोकही खरोखरच त्यातून काही फलप्राप्ती अपेक्षित असतात. हे फल काही निर्गुण, निराकार, आनंदात नसते. तर सगुण, साकार, भौतिक गोष्टीत असते. कुणाला धंद्यात यश पाहिजे असते. कुणाला नोकरीत बढती, कुणाला कोर्टकचेऱ्यांत आपल्यासारखा निकाल. मग यापेक्षा भौतिक इच्छेसाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करणे व सामाजिक नीतिमत्तेचे इहलोकातील कर्तव्य म्हणून पालन करणे हे धर्माच्या बडग्यापेक्षा जास्त हितकारक, विवेकी नव्हे काय ?

प्रश्न : अनेक थोर शास्त्रज्ञांची देवावर, धर्मावर नितांत श्रद्धा होती. तेव्हा शास्त्रीय प्रगती कितीही केली तरी शेवटी देव धर्म या कल्पनांचा वरचष्मा राहणारच हेच यातून दिसत नाही का ?

उत्तर : शास्त्राचे ज्ञान मिळवणे आणि शास्त्रीय दृष्टी बाळगणे या वेगवेगळ्या गोष्टी आहेत, याची स्पष्ट जाणीव ठेवावयास हवी. शास्त्राचा अभ्यास केलेला माणूस तो वैज्ञानिक असो, डॉक्टर असो वा इंजिनीअर, शास्त्रीय दृष्टिकोनाचा स्वीकार करतोच असे नाही. जगात तिसऱ्या क्रमांकाचे वैज्ञानिक मनुष्यबळ असलेल्या भारतात अंधश्रद्धा आणि धार्मिक पगडा नष्ट करण्याच्या कार्यात विज्ञानाचा विशेष प्रभाव पडलेला दिसत नाही. कारण आमचे शास्त्रज्ञ वैज्ञानिक सिद्धान्तात पारंगत असले तरी वैज्ञानिक मनोवृत्ती ह्यांच्या अंगी मुरलेली नाही. वैज्ञानिक मनोवृत्तीचा हा अभाव त्यांच्या व्यावसायिक व खाजगी जीवनात फार प्रकर्षाने दिसून येतो. विज्ञान आणि धार्मिक विसंगती ही आपल्याकडे अनेकदा एकत्र नांदताना दिसतात. शास्त्रीय ज्ञान मिळवणे हा त्या त्या क्षेत्रातली ज्ञानाची मांडणी स्पष्ट बुद्धीने,सुसंगतरीत्या आत्मसात करण्याचा प्रश्न आहे. पण जीवनात शास्त्रीय दृष्टिकोन स्वीकारण्याचे तसे नाही. ते मूल्य आहे. तो जीवन दृष्टीचा आणि प्रवृत्तीचा भाग आहे.

प्रश्न : मृत्यूची भीती प्रत्येकाच्या मनात असतेच. तो कधी येणार हे माहीत नसते. विज्ञानालाही हे गूढ उकलता येईल असे वाटत नाही. या भीतीमुळे माणसामध्ये पराधीन वृत्ती, दैवाला शरण जाणे येते. याचा मुकाबला वैज्ञानिक दृष्टिकोनाने कसा करणार ?

उत्तर : ' मरणकल्पनांशी थांबे तर्क जाणत्याचा, पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा ' अशी मृत्यूबाबत आणि त्यामुळे येणाऱ्या पराधीनतेबाबत सर्वसामान्यांची कल्पना असते हे खरे आहे. येणाऱ्या मृत्यूच्या अचूक वेळेचे रहस्य उलगडता येणार नाही हे बरोबर आहे. पण अस्तित्वात नसलेल्या अमानवी गूढ विद्येला शरण जाऊनही मृत्यूपासून अजिबात सुटका नाही. निसर्गचक्राच्या फेऱ्यातील एक अपरिहार्यता असणाऱ्या मृत्यूच्या कल्पनेला म्हणूनच नीटपणे व धीटपणे सामोरे जाण्याचे सामर्थ्य बुद्धिप्रामाण्यवादातील विवेक व विचार तुम्हांला देतो. कधी ना कधी येणाऱ्या मृत्यूची अटळता मान्य करावी. त्या दृष्टीने कौटुंबिक, सामाजिक जबाबदारीची आखणी करावी. आपले जीवन अधिकाधिक अर्थपूर्ण बनविण्यासाठी प्रयत्नशील राहावे. या सर्व गोष्टी मृत्यूचे रहस्य मान्य करूनही करता येतात. यामुळे मृत्यूवर नव्हे, पण विचाराच्या पोटी येणाऱ्या भीतीवर मात करता येणे शक्य आहे. इष्ट आहे.

प्रश्न–बुद्धि प्रमाण मानावयाची खरी. पण कोणाची बुद्धी प्रमाण माना-

वयाची ? शिवाय बुद्धिप्रामाण्य म्हणून जे सांगितले जाते ते तर पुष्कळदा शब्द-प्रामाण्यच असते. आंबेडकरांनी सांगितले, त्यांचा शब्द प्रमाण मानून देव फेकले. यामध्ये स्वतंत्र बुद्धीचा संबंध कोठे आला ? बुद्धीने विचार करावयाचा तर जे फेकले ते दगडच होते, मग कोनाड्यात राहिले काय ? उकिरड्यावर गेले काय ?

उत्तर– बुद्धिप्रामाण्यावरोबर शब्दप्रामाण्य येते हे खरे. कोणाची बुद्धी प्रमाण मानावी ? हा प्रश्नही पडतो. पण तो अनुत्तरित नाही. प्रामाण्याचेच दोन भाग पडतात. प्रमाण व अप्रमाण प्रामाण्य. असे शब्द मानावेत. बुद्धिवाद म्हणजे केवळ जाणिवांच्यावर विश्वास नव्हे. तपासलेल्या जाणिवांवर विश्वास. कारण जाणीव ही सत्य व आभास दोन्ही प्रकारची असते. प्रत्यक्ष चंद्र जरी तळहाता-प्रमाणे दिसला तरी शास्त्रीय अनुमानाने तो फार प्रचंडवदूर आहे हे सिद्ध होते. असा सिद्ध शब्द प्रमाण मानावा.

कोणाची बुद्धी प्रमाण मानावी ? याचेही शास्त्रीय निकष ठरलेले आहेत. त्याला ' अेपिस्टीमॉलॉजी ' असे म्हणतात. त्यानुसार गणित हे तर्कलिखित शास्त्र असल्याने प्रमाण मानणे योग्य. पण वेद, कुराण, बायबल ईश्वराने सांगितले म्हणून प्रमाण मानणे चूक.

ईश्वर कधी चूक करणार नाही म्हणून त्याने सांगितलेला धर्म चुकणेच शक्य नाही, असे पूर्वी मानत असत. पण पूर्वीच्या काळातही याला वारंवार आव्हान देणारे महापुरुष झाले. गौतम बुद्ध परमेश्वर मानत नसे. जन्मांध मूल ठोकरा खात धडपडते आहे हे ईश्वराला कसे बघवते, असे तो विचारतो. श्राद्ध करून स्वर्गातल्या पितरांना अन्न मिळणे शक्य नाही, असे चार्वाक सांगतो. यज्ञ करूनही पर्जन्यवृष्टी होत नाही हे कसे, असा प्रश्न लोकायताने उपस्थित केला.

माणसाने निर्माण केलेली सृष्टी बुद्धिप्रामाण्यांचाच विजय आहे. परमेश्वराची पूजा करून यातली कोणतीही गोष्ट मिळालेली नाही. प्रत्यक्ष अनुमान, प्रयोग यावर सगळा इतिहास आधारित आहे. धर्मशास्त्र प्रमाण मानणारे लोक ईश्वर मानतात. पण हे केवळ हायपोथेसिस आहे. ते असिद्ध होऊ शकते. पण ते सिद्धच आहे आणि त्यात बदल होणारच नाही, असा संबंधितांचा दावा असतो. उलट, विज्ञान जशी प्रगती करील तसे जुने तर्क मागे पडून नवीन जास्त योग्य तर्क त्याची जागा घेतात. कारण बुद्धिप्रामाण्यवाद हा सर्वांत नम्रवाद आहे. त्यात आपला प्रत्येक सिद्धान्त चूक ठरण्याची शक्यता प्रथमपासूनच मान्य केलेली असते. धर्मशास्त्र हे कधीच नम्र शास्त्र नव्हते. पण हा अखेरचा.

यापुढे आता शास्त्र नाही असे कोणीही वैज्ञानिक म्हणत नाही.

प्रश्न : बुद्धीला प्रमाण मानणारी मंडळीही भावनाविरोधी असतात. भावनारहित असतात. त्यांना जीवनातील भावनेच्या सौंदर्याचे महत्त्वच समजत नाही.

उत्तर : बुद्धिप्रामाण्यवादी मंडळींचा बुद्धीशी उभा दावा आहे, ही कल्पना साफ चूक आहे. गैरसमजावर आधारलेली आहे. प्रेम, वात्सल्य, राग, शृंगार या स्वरूपाच्या भावनांना मानवी जीवनात महत्त्वाचे स्थान आहे. या भावनांच्या अतिरेकामुळे अविचारी बनून स्वतःचे वा इतरांचे अहित होऊ नये,एवढीच माफक अपेक्षा बुद्धिप्रामाण्यवादी बाळगतो. कोणी आप्तेष्ट निधन पावला तर त्या पोटी रडणे स्वाभाविक आहे. परंतु त्या पायी आततायीपणा करणे योग्य नव्हे. जिवलग व्यक्तीच्या निधनामुळे कोणी झोपेच्या गोळ्या घेऊन महिनोन् महिने गुंगीत राहू लागला वा मृत व्यक्ती पुन्हा भेटेल या कल्पनेने काही गूढ मंत्राच्या मागे लागला तर ते अविवेकीपणाचे आहे. बुद्धिप्रामाण्याविरोधी आहे.

प्रश्न– सुखी जीवनाला, कार्यसाफल्याला, श्रद्धेचा आधार लागतो. श्रद्धेचा आधार हे तर बुद्धिप्रामाण्यवादी कमकुवतपणाचे, आंधळेपणाचे लक्षण मानतात. हे इष्ट आहे काय ?

उत्तर– याबाबतची परिस्थिती नीट समजावून घ्यावयास हवी. श्रद्धेने जगायला धैर्य मिळते म्हणून श्रद्धा बाळगा हे बुद्धिप्रामाण्यवादी विचाराला मान्य नाही. उदा. आई गावाला गेली आहे हे सांगण्याऐवजी ती जवळच बाहेर गेली आहे असे सांगितल्यामुळे मूल काही काळ शांतचित्ताने खेळते. पण हे खोटे समाधान आहे. ते समाधान देणे प्रासंगिक सोईचे वाटले तरी मूलतः हिताचे नाही. माणसाचे मन कमकुत असते. खरे वास्तव ते स्वीकारू शकत नाही. त्यामुळे असे सांगावे लागते. हा युक्तिवाद बरोबर नाही. ही कमकुवत मने समर्थ बनविणे हेच बुद्धिप्रामाण्याचे काम आहे. बुद्धिप्रामाण्याचे सामर्थ्य जनमानसात पसरू लागले तर अशी खोटी समाधाने करून घेण्याची वेळ येणार नाही. आणि निकोप समाजवाढीसाठी असे घडणे उपयुक्त आहे. आवश्यक आहे. चोरी करू नका कारण ते पाप आहे आणि देव त्यासाठी शिक्षा करील हे सांगण्यापेक्षा चोरी करणे म्हणजे दुसऱ्याचे स्वकष्टार्जित धन लुबाडणे आहे. ते चूक आहे. आणि त्याला कायद्याने शिक्षाही आहे. हे समाजात रुजविणे अधिक उपयुक्त आहे.

प्रश्न– श्रद्धेचा परिणाम जीवनात होतो आणि त्याला महत्त्व आहे, हेच बुद्धिप्रामाण्यवादी नाकारत नाहीत का?

उत्तर– श्रद्धेचा परिणाम जीवनात होतो हे खरे आहे. परंतु हा परिणाम ती श्रद्धा मनोधारणेत जो बदल घडवून आणते त्यात आहे. स्वाभाविकपणेच ज्या कामात व्यक्तीची अधिक एकाग्रता हवी आहे. सर्वस्व ओतण्याची गरज आहे. त्या बाबींत श्रद्धेच्या पोटी जो मानसिक परिणाम घडून येतो, त्याचा फायदा होतो.

आईला नमस्कार करून गेल्यावर पेपर चांगला जातो, या श्रद्धेमागे काय आहे? अभ्यास योग्य प्रकारे केल्याशिवाय पेपर चांगला जाणे शक्यच नाही. परंतु अभ्यास करूनही एक अव्यक्त मानसिक ताण परीक्षार्थींच्या मनावर असतो. आईच्या आशीर्वादाने त्याच्या श्रद्धाळू मनाला जो दिलासा मिळतो त्यामुळे हा ताण कमी होतो. त्याचा परिणाम पेपर अधिक चांगला लिहिण्यात होऊ शकतो. लढाईला जाणाऱ्या सैनिकाचा पाय अडखळतो आणि अपशकुन म्हणून तो थांबतो, ही पूर्वीच्या काळातील वर्णने आपण वाचली आहेत. अशा वेळी खरे तर काय घडते? लढाईला जाण्यासाठी सैनिकाचे मन या ना त्या कारणाने उत्सुक नसते. त्यामुळे हेतुतः नव्हे, परंतु त्या अव्यक्त अबोध मनाच्या परिणामाने पाय अडखळतो. पाय अडखळल्याने अपशकुन समजला जाईल आणि लढाईवर जाण्यापासून आपली तात्पुरती सुटका होईल, हे मनात जाणवलेले असते.

मात्र ज्या वास्तवाशी मनोव्यापाराचा प्रत्यक्ष संबंध नाही, ते घडल्यास श्रद्धा ठेवली काय आणि नाही ठेवली काय, काहीही फरक पडत नाही.

परीक्षेला निघण्यास खूप उशीर झाला. बस चुकली. आता ताबडतोब दुसरी बस वा वाहन मिळू दे, यासाठी श्रद्धेने आईला नमस्कार करून निघण्याने काहीच घडत नाही. कारण पेपर लिहिणे हे व्यक्तीच्या मनोव्यापाराशी संबंधित आहे. त्यावर श्रद्धेचा परिणाम होतो. वाहन मिळणे याचा असा काहीही संबंध नाही आणि त्यामुळे आईवर श्रद्धा असणे वा नसणे यामुळे त्याबाबत कोणताच फरक पडत नाही. अशी श्रद्धा ही उघडपणे बुद्धिप्रामाण्याविरोधी आहे.

प्रश्न– माणसाची कोणत्या मूल्यावर श्रद्धाच नसेल तर समाज परिवर्तनाचे लढे कसे होतील? एखाद्या विचारासाठी अपयश दिसत असतानाही हसत

हसत हौताम्य पत्करणे ही श्रद्धा अंधश्रद्धा समजावयाची का ?

उत्तर– याबाबतची भूमिका नीट समजावून घ्यावयास हवी. एखादे मूल्य उदाहरणार्थ–समता, अहिंसा, व्यक्तीने विचाराने स्वीकारलेले असते. हा स्वतःच्या बुद्धीचा निर्णय म्हणून मान्य केलेला असतो. समता, स्वातंत्र्य अशा ज्या उच्च मूल्यांसाठी माणसे स्वखुशीने बलिदान करतात. त्यांना इतिहासाच्या परिशीलनातून, स्वतःच्या चिंतनातून अशी खात्री पटलेली असते की, हीच मूल्ये मानवीसमाजास हितकारक आहेत. अशा वेळी त्या मूल्यांसाठी स्वतःच्या जिवाची बाजी लावणे हे अंधश्रद्धेचे ठरत नाही. परंतु आपण आपल्या बुद्धीने स्वीकारलेला निर्णय हा दुसऱ्याच्या बुद्धीने चुकीचा, अशास्त्रीय आणि अहितकारक असेल की नाही ? या ठिकाणी आपण समाजाबद्दलच्या विविध विचारसरणीपर्यंत येतो. उदाहरणार्थ, धर्माच्या आधारेच राष्ट्रनिर्मिती करणे योग्य व हितकारक आहे असे एखाद्याला वाटेल, तर दुसऱ्याला हे पूर्णतः चूक व अहितकारक वाटेल. समाजात असे भिन्न मतप्रवाह असतात. समाज परिवर्तनाचा लढा हा या मतभिन्नतेचाच झगडा असतो. आपल्या मनाशी प्रामाणिक राहून त्यासाठी हौताम्य पत्करणे हे म्हणून अंद्धश्रद्धेचे ठरत नाही. परंतु आपली मते अंतिम आहेत, यांपुढे आणखी काही समजून घेणेच नको, असे म्हणणे मात्र बुद्धीच्या विरोधी आणि अंधश्रद्धेला खतपाणी घालणारे आहे. स्वतःची मते नव्या ज्ञानाच्या, अनुभवाच्या प्रकाशात केव्हाही तपासण्याची खुली तयारी जर व्यक्तीची असेल तर, त्याची त्याबाबतची श्रद्धा ही बुद्धिप्रामाण्यवादाशी विसंगत ठरत नाही.

प्रश्न– बुद्धिप्रामाण्य मानणारी मंडळी आपला पुरोगामीपणा मिरवण्यासाठी स्वतःला बुद्धिप्रामाण्यवादाची झिरुदावली लावून घेतात. प्रत्यक्षात मात्र वेळ पडल्यावर ते आचाराला फाटा देतात.

उत्तर– ज्या व्यक्तींच्या आचार-विचारात असा अंतर्विरोध असेल ती त्याची चूकच आहे. एक तर त्या स्वतःच्या विचाराशी प्रतारणा करणाऱ्या, अप्रामाणिक असल्या पाहिजेत. वा दुसरे म्हणजे व्यवहारातल्या मर्यादांमुळे अगतिकपणे त्या काही तडजोडी करत असल्या पाहिजेत.

एका गोष्टीचे व्यावहारिक भानही बाळगावयास हवे. एखादा विचार १०० टक्के मान्य असूनही त्याचे शंभर टक्के पालन करणे व्यक्तीला जवळजवळ अशक्य असते. या वेळी केलेली तडजोड ही समर्थनीय नाही, क्षम्य मानावी लागते. परंतु हेही फक्त तेव्हाच की जेव्हा विचाराची मूळ दिशा इतर व्यवहारात

अंधश्रद्धेची डोळस तपासणी

१. गोडबाबाचा गडबडगुंडा
२. जंगलीदासबाबाची अघोरी साधना
३. सिद्ध बाळयोगीराजांच्या लीला
४. दोन तरुणींचा संन्यास-दीक्षाविधी

□

१. आपल्यासाठी
२. नार्वेकर गुरुजींचा अखेरचा 'निरोप'

बदललेली नसते. उदाहरणार्थ, आईवडील बुद्धिप्रामाण्यवादी आहेत. मुलगा कॅन्सरने आजारी आहे. वैद्यकीय उपचारांचा उपयोग नाही, हे सिद्ध झाले आहे. अशा वेळी म्हाताऱ्या आजीच्या आग्रहाखातर मुलाच्या आईवडिलांनी नाईलाजाने देवाला नवस केला तर ते चूक आहे. पण अशा टोकाच्या वेळी आजीचे मन मोडण्याची त्यांची असमर्थता समजून घ्यावयास हवी. पण उद्या दुसऱ्या मुलाच्या उठल्या-सुटल्या कुठल्याही आजारपणात आजीच्या आग्रहासाठी मुलाचे आईवडील अंगारा आणि तीर्थ लावू लागले, तर मात्र त्यांनी बुद्धिप्रामाण्यवादाला सोडचिठ्ठी दिली असे समजावयास हवे. (या विवेचनाबाबत मतभेद होऊ शकतात. परंतु याचा आधार घेऊन बुद्धिप्रामाण्य या तत्त्वावरच हल्ला करणे हे योग्य नव्हे.)

प्रश्न : बुद्धिप्रामाण्यवादी असणे हे सामान्य माणसाचे हे काम नव्हे. प्रस्थापित रूढी, परंपरा, कर्मकांड यांना फाटा द्यावयाचा, स्वतःच्या बुद्धीला प्रमाण मानून स्वतंत्र विचार करावयाचा यासाठी माणसाला तशीच बुद्धिमत्ता असावयास हवी. आणि सर्वसामान्यात ती कोठून असणार ?

उत्तर : हा एक निव्वळ गैरसमज आहे. बुद्धिप्रामाण्यवाद स्वीकारण्यासाठी व्यक्ती अत्यंत बुद्धिमान असावी लागते, असे नव्हे तर ती स्वतंत्रपणे विचार करणारी असावी लागते. स्वतंत्र विचार करणे आणि स्वतःला पटलेला विचार रोष वा विरोध पत्करूनही निर्भयपणे आचरणात आणण्यासाठी धडपडणे हा जीवन व ज्ञानविषयक संस्काराचा भाग आहे. केवळ बुद्धिमत्तेचा नव्हे. सर्वसामान्य बुद्धिमत्तेची व्यक्तीही म्हणून प्रखर बुद्धिवादी असू शकते. सामान्य माणसाला बुद्धिप्रामाण्यवाद झेपणार नाही म्हणून त्याला धर्माचाच आधार दिला पाहिजे. हे म्हणणेही वास्तवावर टिकणारे नाही. सर्वसामान्याला झेपण्याचाच प्रश्न काढला तर धर्माची खरी शिकवण सर्वसामान्य माणसाला पेलणे हे तर महाकठीण काम आहे. (धर्माची शिकवण माणसाला हितकारक आहे, असे म्हणण्याचा उद्देश नाही. पण क्षणभर तसे गृहीत धरले तरी सामान्य जनाला ते विचार पेल-विणार नाहीत. हे सांगण्यासाठी हा मुद्दा मांडला आहे.)

* *

दहा

बुवाबाजीविरुद्ध झुंज

गोडबाबाचा गडबडगुंडा

दैनिक तरुण भारत ता. १४।५।८३ 'केवळ हस्तस्पर्शाने वस्तू गोड ! एक महत्त्वाचा प्रयोग' या मथळ्याखाली पान भरून लेख. भानूदास मारुती गायकवाड याला एका गुरुवारी आढळून आले की, त्याच्या बोटाचा स्पर्श झालेली कोणतीही गोष्ट गोड होते. याचा पडताळा पाहण्यासाठी झालेला प्रयोग. लेखाची मांडणी शास्त्रीय पद्धतीची. लेखाच्या दोन्ही बाजूंना दोघांचे फोटो. एक भानूदास गायकवाडचा आणि दुसरा प्रा. ब. वि. अकोलकरांचा.

तरुण भारत ता. २७।६।८३ पुन्हा पानभर लेख. वरील लेखातल्या शोधाचा पुढचा भाग. जाड टाइपात मथळा 'भानुदासच्या स्पर्शाने गोडी:जैव रासायनिक स्वरूपाचा प्रकार त्यातले प्रतिपादन' भानूदासचे स्वप्नातील तसेच जागेपणीचे त्याने वर्णन केलेले अनुभव आध्यात्मिक दृष्ट्या सूचक वा अर्थपूर्ण आहेत, असे जर आध्यात्मिक क्षेत्रातील अधिकारी मंडळींना वाटत असेल, तर मात्र परामानसशास्त्रीय क्षमता व जैव रासायनिक क्षमता, यांच्या संबंधावर थोडा प्रकाश पडू शकेल. मात्र भानुदासने महाराज बनण्याच्या मोहापासून दूरच राहावे. सोबत अमेरिकेतून या संबंधात अकोलकरांना आलेले कार्लिस ऑसीस यांच्या पत्राचे मराठी भाषांतर 'तो तरुण प्रसिद्धी मिळून दुष्प्राप्य होण्यापूर्वी

आणखी संशोधन करा असे आग्रहाने सुचवितो.'

१४ नोव्हेंबर १९८२ पुणे केंद्राच्या प्रादेशिक बातम्या. पुणे जिल्ह्यातील बारामती येथील एक तरुण भानुदास मारुती गायकवाड यांच्या जीवनात अचानक चमत्कार घडला. हात लावेल ती वस्तू भानुदास गोड करतो. या चमत्काराची प्रचिती त्याने आकाशवाणी केंद्रातील अनेक अधिकाऱ्यांना दिली.

ता. २९ जानेवारी 'श्री साप्ताहिकाचा स्पेशल रिपोर्ट.' गोडमहाराजांचा बोलबाला दिवसेंदिवस वाढतच आहे. पुणे, मुंबई, ठाणे, कोल्हापूर, या लांबलांबच्या गावाहून लोक दर्शनाला येतात. झोपेत त्याला नित्य परमेश्वराचे दर्शन घडते. स्वप्नात जे आदेश मिळतात, ते प्रत्यक्षात आणण्याची त्याची धडपड चालू असते. फलटण रोडवरील, त्याच्या शेतावर ८००-९०० लोक दर गुरुवारी व सोमवारी दर्शनासाठी येतात.

१५ जानेवारी ते २९ जानेवारी पुण्याहून व बारामतीहून पत्रे 'या भागात गोडबाबाचे प्रस्थ वाढू लागले आहे. सिनेमात स्लाइड्स दाखवतात. हात लावील तिथे साखर, बारामतीमध्ये अजब चमत्कार'! टीप– भानुदास गायकवाड यांचे तज्ज्ञांना आव्हान– या गोष्टींचा खुलासा करून दाखवा. तुम्हीं प्रत्यक्ष या.

मी ठरवितो आव्हान स्वीकारायचे. शनिवार ता. २९ जानेवारी, वेळ रात्री ९ वाजता. बारामतीचे ख्यातनाम ॲडव्होकेट विजय मोरे यांचा प्रशस्त असा 'आकाश' हा बंगला. भानुदास गायकवाड, मी, ॲडव्होकेट विजय मोरे, यांच्या माजी नगरसेवक असलेल्या पत्नी अलका मोरे, त्यांची मुलं, ॲडव्होकेट गायकवाड, बाळासाहेब महाडीक आणखी काहीजण.

भानुदासच्या अंगावर चांगल्या कापडाचे भगवे कपडे; मळ्यात दोन मोठ्या रुद्राक्षांच्या माळा, केस कुरळे, चेहरा काळा सावळा, चेहऱ्यावरचे भाव साधे भोळे, बंगल्याच्या पोर्चमध्ये त्याची भगव्या रंगाची सायकल, सायकलच्या मागे मोठ्या अक्षरात 'स्वीट' असे लिहिलेले. बाजूच्या चेनकव्हरवर भानुदास मारुती गायकवाड हे पूर्ण नाव, पत्त्यासह आणि खाली ओळ 'दत्ता कृपा झाली, अंगी गोडी आली.'

या दत्तकृपेची हकीकत भानुदास सांगतो. सुमारे दीड वर्षांपूर्वीची गोष्ट. गुरुवारी स्वतःच्या शेतात उंबराच्या झाडाखाली मी झोपलो होतो. मी तसा कामधाम नसलेला मुलगा. वडिलांनी आशा सोडलेली. पुणे आणि बारामतीत फिरून

राहायचो. काहीजण तर वेडाच म्हणायचे. उंबराच्या सावलीत मला बरं वाटलं म्हणून मी लवंडलो. तर मला कुणीतरी उठून बस म्हणतंय म्हणून आवाज आला. मी उठलो. बघतो तर आजुबाजूला कोणीच नाही. मला आश्चर्य वाटलं. घरी आलो. घरच्यांना सांगितलं तर त्यांनी वेड्यात काढलं. मित्रांनी टर उडविली. दुसऱ्या दिवशी शेतात गेलो. सायकलची चावी सहज तोंडात धरली तर गोड लागली. खिशात काही गूळ वगैरे आहे का ते बघितलं, तर काही नव्हतं. मुलांना सांगितलं. त्यांनी सायकल चाटली तर गोड लागली. मिरच्या खाल्ल्या-तरी गोड लागल्या. डॉक्टरांना हे सांगितलं तर त्यांनी मला वेड्यात काढलं.

ही वार्ता गेली पोलिसांच्या कानापर्यंत. त्यांनी स्टेशनात बोलावलं. सायकल धुऊन पुसून आणून ठेवली. मी तिला हात लावला. मग अनेकांनी ती चाटून बघितली. ती गोड लागू लागली. सगळीकडे ही एक बातमीच झाली. स्थानिक साप्ताहिकांनी त्यावर अंक काढला. हात लावीन तिथे साखर. मग बारामती मधल्या डॉ. नायगावकर, डॉ. कारंडे, पाटील, डॉ. खन्ना, डॉ. मोकाशी यांनी माझी तपासणी केली. पुण्यात गेलो. तेथे तरुण भारतमध्ये गेलो. डॉ. अकोलकरांनी तपासणी केली. रक्तात व लघवीत साखर नाही. मी जे पाणी गोड करायचो त्यातही प्रयोगशाळेत साखरेचा अंश आढळावयाचा नाही.

मी समजलो मला सिद्धीच प्राप्त झाली. मी नास्तिक होतो तो आस्तिक झालो. पुण्याच्या गव्हर्नमेंट फोटो झिंको प्रेसमध्ये माझा भाऊ नोकरीला असतो. त्याने मला एकदा तिथं नेलं. लोकांनी चमत्कार बघितला. ऑफिसमधल्या दत्तमूर्तीच्या गळ्यातली रुद्राक्षाची माळ माझ्या गळ्यात घातली. मला प्रश्न विचारले,' आम्हाला बोनस मिळेल का ?' मी म्हणालो,' मिळेल. सहा महिन्यांच्या आत.' भाऊ घरी आल्यावर म्हणाला, ' तू नसती भविष्य कशाला सांगतोस. सरकारी नोकरीत कुठला बोनस ? ' पण त्यांना चारच महिन्यांत बोनस मिळाला. माझ्यावरची त्यांची श्रद्धा वाढली. पुण्याचे डॉक्टर प. वि. वर्तक शनिवारातले. त्यांचा उजवा हात दुखत होता, तो पण मी बरा केला.

लोकच आता मला गोडबाबा म्हणू लागले आहेत. कुणी महाराज म्हणतात, तर कुणी साखर सम्राट पण म्हणतात. मी शेतात बसतो. लोक येतात पाया पडतात. जवळच्या पाटातलं पाणी नाही तर विहिरीतलं पाणी मी ओंजळीनं त्यांना देतो. हात लावला तर तंबाखू, मिरची, माती देखील गोड होते. तिथं पाण्याची काय कथा. लोकांची कामं होतात. दुखणाऱ्याचं दुखणं

थांबतं. आजाऱ्याचा आजार पळतो. एका माणसाला मधुमेह होता. औषधपाणी आणि पथ्य चालू होतं. त्याला मी सांगितलं हे तीर्थ घे, आणि खुशाल औषध आणि पथ्य सोड. त्याने तसं केलं. तो बरा आहे. कुणाचं अंग दुखत असतं, ताप येतो. डॉक्टरांच्याकडून बरे होत नाही. माझ्याकडे येतात. मी अंगारा देतो. औषध बंद करतो. आजार बरा होतो.

भूत देखील मी उतरवतो. भुताचं डोकं केसांनी गच्च भरलेलं असतं. हात कोपरापासून उलटे असतात. एका माणसाला तर एकूण सव्वीस भुतांनी धरलं होतं. तो नावेच सांगत होता. त्याला मी सोडवला.

आता मला स्वप्नं पडतात. दृष्टान्त होतात. स्वप्नात मी हजारो भक्तांच्या मध्ये बसलेला असतो. दत्ताची आरती 'श्रीपाद वल्लभ दिगंबरा' हा जप चाललेला असतो.

लोक म्हणतात पावत्या काढा. मंदिर बांधूया. पण ते नको. लोक दर्शनाला आले की पैसे देतात. मी नाकारतो.

लोक पहिल्यांदा मला अर्धवटच समजत. नंतर हा गोडपणा आल्यावरपण त्रास द्यायचे. हात लावायला शाळेतल्या पोरांच्या झुंडीच्या झुंडी मागं असायच्या. डॉक्टर म्हणायचे हा रोग आहे. पण आता सहा महिन्यांत बघा. लोक वेडा म्हणायचे तिथं पाया पडतात. म्हणून मी म्हणतो ही सिद्धीच असणार आणि माझा देवावर विश्वास बसला. आता लोक 'या महाराज' म्हणतात. गादीवर बसवतात. हॉटेलात गेलं तर मालक पैसे घेत नाहीत. सिनेमाला फुकट सोडतात. दोन तीन वेळा तर मला दारू पण द्यायचा आग्रह झाला. पण दारूच्या ग्लासच्या तळाशी मला दत्ताची मूर्ती दिसली. आता आपल्याला पोलीस इन्स्पेक्टर पण मानतो. म्हणजे सिद्धीच असली पाहिजे की नाही? अहो, पुण्याहून पेपरसाठी लेख लिहायला आणि प्रयोग करायला एक मोठे डॉक्टर आले. ते पण पाया पडले. शिवाय मागच्या वर्षी पाच सहा पोती ज्वारी शेतात झाली, ती आता या वर्षी वीस पोत्यांवर गेली. मी आपलं खरं ते सांगतो. नाहीतर मला तसं बनवाबनवीचं काही पण सांगता येईल. माझी मुलाखत मुंबईच्या मोठ्या साप्ताहिकानं घेतली. त्या वेळी त्यांचे संपादक म्हणाले, "तुला लहानपणापासूनच दत्तभक्तीचा लळा होता, म्हणून सांगं." पण मी खोटं कशाला सांगू. रेडिओवर प्रादेशिक बातम्या सांगणाऱ्या एका बाईच्या बांगड्यांना हात लावला तर, त्या दहा दिवस गोड लागत होत्या.

त्या म्हणाल्या " हात लावल्यावर सोनं होणाऱ्या राजागत तुझा चमत्कार दिसतो. तुम्हाला दाखवू."

भानूदासने माझ्या बोटांवर बोटे घासली. म्हणाला, ' चाटून बघा.' मला चव लागली नाही. मग माझ्या घड्याळाच्या काचेवर बोट घासलं आणि समोरच्या पाण्याच्या पेल्यात बोटं बुडविली. घड्याळाची काच बेचव लागली. पाणी अगदी साधारण गोड लागलं. तो म्हणाला, ' रात्री ही शक्ती जरा कमी होते.' मग त्याने त्याचे बोट माझ्या बोटावर आणि घड्याळाच्या काचेवर जरा जास्त जोरानं घासले. या वेळेला मला बोट आणि काच गोड लागली. मग भानूदासला हात साबणाने स्वच्छ धुवायास लावले. धुतलेले हात त्याने टॉवेलला पुसले. मोऱ्यांनी टॉवेलची चव बघितली किंचित गोड लागली. पाण्यात बोट बुडवलं, पाणी गोड झालं. दहा पैशाचं नाणं मोऱ्यांच्या मुलीने भानूदासला दिलं. त्याला पण गोडी आली. भानूदास म्हणाला, माझ असं आहे की इच्छा असेल तेव्हा मी गोडी देऊ शकतो. इच्छा नसली तर थांबवू शकतो. दिलेली गोडी सहा सहा महिने टिकते. ' श्री ' साप्ताहिकाचे संपादक अरुण ताम्हणकरांचा रुमाल दोन महिने गोड होता. थोड्या उशिरानं आमच्या बैठकीत सामील झालेल्या बाळासाहेब महाडीक या विश्व हिंदू परिषदेचं काम करणाऱ्या तरुणानं आणखी माहिती पुरविली. याला ज्या झाडाखाली गोडी प्राप्त झाली. ते झाड पुढं सहा दिवस हळूहळू मोडून पडत होतं. आम्ही यानं हातानं गोड केलेल्या पाण्यानं वीस जणांचा चहा साखर न घालता करून प्यालो. मगच याच्यावर विश्वास ठेवला. पुढं मंदिर बांधण्याची कल्पना निघाली. परंतु त्यासाठी जोमानं कामाला लागायचं तर याची गोडी एके दिवशी खरोखरच नाहीशी झाली. आम्ही अडचणीत सापडलो पण नंतर यांच्या स्वप्नात म्हातारा आला तो म्हणाला, मी पंढरीचा विठोबा.वर स्वर्गात तुझ्या गोड पाण्याची चर्चा चालू आहे म्हणून आलो. मग त्याला एकदम पंढरपूरच दिसू लागलं नंतर एक त्रिशुळ आलं. ते झाडात रोवला गेला.झाड मोडलं मागोमाग गाय व कुत्रा आले. दत्तगुरू हसल्याचा भास झाला आणि हा उठून बघतो तर त्याला गोडी परत प्राप्त झाली. भानुदास हा आपल्याला दृष्टान्त झाला असेच मानतो. त्यानंतर उंबराचं झाड अचानक जळलं. उंबराचं झाड कापसासारखं जळतं पण हे झाड पावसातही दोन दिवस जळत होतं.

रात्रीचे ११ वाजून गेले होते. भानुदास उठला. म्हणाला, ' सायकल चाटून बघणार का ? ' मी म्हटलं नको सकाळी जयंत निलाखे भेटायला आले.

तरुण भारत, केसरी आणि महाराष्ट्र टाईम्सचे वार्ताहर. ते म्हणाले याला प्रसिद्धी तरुण भारतने दिली. खरी. पण त्याचा महाराज करू नका म्हणूनही लिहिलं होतं. आमच्या केसरीच्या संपादकांनी तर बोलायला गेल्याबरोबरच आम्हाला फटकारलं. याच्या गोडपणाचा फायदा आता हा स्वतः आणि इतरही घेऊ लागले आहेत. स्वतःचे पाय चाटा म्हणण्यापर्यंत याची मजल गेली. अहो, वीस वर्षे उपासना करणाऱ्याकडे दत्त कृपाकटाक्ष टाकायची पंचाईत, तर याच्याकडे दत्त कुठला प्रकटणार ? हा पैसे मागत नाही हे खोटं. पैसेही मागतो आणि ते इकडे तिकडे खर्च ही करतो. भविष्य म्हणजे निव्वळ थापेबाजी असते. दहाजणांचं सांगितलं तर चुकून एखाद्याचं बरोबर येणार. आता पोथ्या पुराणं सांगणाऱ्या काही जणांना हा सोईचा वाटतो. याला दत्त महाराज करायचा. पूजा घालायला लावायच्या. पूजा सांगण्याचा धंदा चालतो. दक्षिणा आणखी वर केळं, खारीक खोबरं मिळतं. माणूस याच्याकडे येणार यात नवल नाही. अडचणीतला माणूस शेणसुद्धा प्रसाद म्हणून खाईल. याची सारी बनाबनवी माझ्या मनात पाठ आहे. वेळ आल्यावर मी बरोबर काय ते करतो. नाहीतरी अलीकडे याचं प्रस्थ थोडं वाढू लागलंच आहे. या भागातल्या एका प्रसिद्ध बागाईतदाराने स्वतःच्या सुंदर मुलीचं लग्न बरेच दिवस होत नाही म्हणून याला घरी बोलावून उपाय विचारला.

माहिती गोळा करायला मी विजय मोऱ्यांच्याबरोबर त्यांच्या मोटार सायकलने बाहेर पडलो. अनेकांशी बोललो. बबन्याचा बबन. बबनराव, बबनरावजी कसा झाला याची गोष्ट लहानपणी वाचली होती. त्याची आठवण होत होती.

कुमुद शहा या एका डॉक्टरांच्या सुविद्य पत्नी. कौटुंबिक ताणामुळे तीन वर्षांपासून अक्कलकोट स्वामी महाराजांच्या उपासनेला लागलेल्या. त्यांची हकीकत मोठी ऐकण्यासारखी. त्यांच्याच तोंडून ती ऐकली. ती अशी. बारामतीचे अर्थशास्त्राचे प्राध्यापक बोंद्रे हे बारामतीमधील अक्कलकोटच्या स्वामी महाराजांचे केंद्र. त्यांच्याकडे मी सुरुवातीला जात असे. पण गुण नाही, मग त्यांनी मला वरिष्ठांकडे म्हणजे चिंचवडच्या उदास महाराजांकडे पाठविलं, त्यांनाही काही जमेना. मग उदास महाराजांनी माझी केस अक्कलकोटलाच डायरेक्ट केली. पुढे अशी काही प्रचिती येत गेली. हे अक्कलकोट महाराजांचे अवतार आहेत. यावर माझा व माझ्या भावाचा विश्वास बसला. आम्ही यांना घेऊन अक्कलकोटला गेलो. तिथल्या खारट विहिरीचं पाणी बादलीत घेऊन यानं गोड केलं. तिथल्या पुजाऱ्यांना त्यांची

अचूक भविष्ये सांगितली. परत येत असताना बसमध्ये यांना साक्षात्कार झाला की, अक्कलकोटचे स्वामी महाराज कुमुदमध्ये प्रगट होणार होते. पण तिची स्त्री-जात. तिला मासिकपाळीमुळे अशुद्धता येते. तेव्हा अक्कलकोट महाराजांचा संचार यांच्या (गोड महाराजांच्या) अंगात होईल. मी आरती धरायची व त्यांनी पूजा करायची. अक्कलकोटहून आल्यापासून बाराची आरती सुरू केली. पण मुलांची शाळा १२–३० ची. मला आरतीला जाणं जमेना. पुन्हा यांना दत्तगुरूंचा साक्षात्कार मिळाला. मी १२ ला भिक्षेला निघतो. (क्षेत्र गाणगापूर हे दत्ताचं निवासस्थान. तेथे दत्त १२ वाजता भिक्षेला निघतात अशी समजूत आहे.) १२–३० ला जेवायला बसतो. तेव्हा १ वाजता माझी आरती केली तरी चालेल. मग मी आता रोज १ वाजता रिक्षाने आरतीला जाते .

महाराजांना रोज नवे नवे दृष्टान्त होतात. या कुमुद शहांच्या म्हणण्याचा प्रत्यय थोड्याच वेळात आला. महाराज तिथं येऊन दाखल झाले. आपल्याला कसे कसे ' करंट ' येतात आणि त्यावरून काय काय समजतं हे त्यानं सांगितलं. आरतीचं ताट मूर्तीच्या पुढं फिरवताना आपल्याला त्या मूर्तीच्या ठिकाणी कुमुदच रूप कसं दिसलं आणि त्यामुळे कुमुदमध्येच अक्कलकोटचे स्वामीमहाराज (ते दत्ताचे म्हणे प्रत्यक्ष अवतार होते.) प्रगट झाले आहेत, याची खात्री कशी पटली ते सांगितलं आणि आरतीची वेळ झाली म्हणून सायकलवर टांग मारली. बरोबर आरतीचं पुस्तक कुमुदकडून मागून घेतलं.

त्याच्या पाठोपाठ मोटार सायकलने फलटण रोडवरचा महाराजांचा मळा आम्ही गाठला. अंकुरू लागलेल्या महाराजांच्या खुणा तिथं दिसत होत्या. लाकडांच्या वाशांना पत्रे मारून शेड घातली गेली होती. दत्ताचे आणि अक्कलकोट स्वामी महाराजांचे फोटो लावलेले होते. पत्र्यावर शंकराचा फोटो रंगवलेला होता. एक छोटं कपाट होतं. त्याला कुलूप. त्यावर शंकराची मूर्ती. कपाटावर ' दत्त कृपा झाली, अंगी गोडी आली ' हे घोषवाक्य. कपाटाच्या पुढे एक पसरट दगड त्यावर एका कोपऱ्यात दत्ताची छोटी पितळी मूर्ती. त्याच्यापुढे बिल्वपत्रं, फुलं, कुंकु, गुलाल. बाजूला बरीच डबर पडलेली. बांधकामासाठी भक्तजनांनी स्वखुशीने दिलेली ती मदत होती. रस्ता जेथे शेडकडे वळत होता, तिथं ' नियोजित दत्तमंदिराची जागा ', म्हणून मोठी पाटी होती.

आरती वाचता येणारं कुणीच नव्हतं. महाराजांना आरती पाठही नव्हती, वाचताही येत नव्हती. त्यांनी विजय मोऱ्यांना आणि मला विनंती केली. आम्ही

नकार दिला. विजय मोऱ्यांना राहावलं नाही. ते म्हणाले, ''भानुदास, तुझ्या अंगच्या गुणाचा तू धंदा करतोस असं नाही वाटत ?'' महाराज म्हणाले '' छे ! ही तर सिद्धीचीच कृपा आहे. यात मला संशय नाही.'' गोडबाबाला अजिबात संशय नसणे आणि आम्हाला फक्त संशयच असणे दोन्ही स्वाभाविकच होते. गोडबाबाच्या गोडीची दोन स्पष्टीकरणे डोळ्यांसमोर होती.

एक,शरीरातील काही वेगळ्या स्वरूपाची जैव रासायनिक प्रक्रिया. दुसरे सॅकरिन किंवा तत्सम पदार्थाच्या साह्याने चलाखीने केलेली लबाडी.

डॉ. अकोलकर हे गोडपणाचे स्पष्टीकरण पहिल्या प्रकारे देण्याच्या मताचे होते. त्यांनी केलेली मांडणी साधारण या प्रकारची होती. शरीरातील ॲमिनो ॲसिडमधून अखेर प्रथिनाची, प्रोटीनची निर्मिती होते. या प्रक्रियेमध्ये जी पेप्टाईडस् बनतात त्याचा निचरा भानुदासच्या त्वचारंध्रातून होत असला पाहिजे. सध्या अशी कृत्रिम पेप्टाइडस् तयार करण्याचे प्रयत्न चालू आहेत. ती सॅकरीनपेक्षा कित्येक पटीने गोड असतात. गोडी देण्यासाठी त्यांचे $\frac{१}{१०००}$ (एक सहस्रांश) मिलीग्रॅम इतके सूक्ष्म प्रमाण देखील पुरते. अपवादात्मक स्वरूपाच्या जैव रासायनिक प्रक्रियेमुळे अशी अती गोड पेप्टाइडस् भानुदासच्या शरीरातून सूक्ष्म प्रमाणात बाहेर पडत असावीत.

अर्थात अशा प्रकारची द्रव्ये त्याच्या शरीरातून बाहेर पडतात का ? आणि पडत असल्यास कशामुळे,याचे संशोधन भानुदासने सहकार्य दिल्यासच शक्य होते. याबाबतचा त्याचा अनुभव उलटा होता.

'तुझ्या अंगी ही गोडी का आली याचे कारण शोधून काढणारे तपशीलवार प्रयोग मी मुंबई वा दिल्ली येथे करतो. तू येतोस का ? असे मी त्याला ॲडव्होकेट मोरेंच्या घरी विचारले. त्यावर ' नको. मला ब्रुस लीसारखे मारून टाकतील.' असे त्याचे उत्तर होते. मी गमतीने विचारले ' मुंबई, दिल्लीत कदाचित नाही संशोधन झाले तर अमेरिकेत जावे लागेल.' त्यावर मात्र भानुदास ' अमेरिकेत जावयाचे असेल तर नक्की येतो,' असे झटकन म्हणाला. दुसऱ्या दिवशी सकाळी कुमुद शहांच्याकडे पुन्हा नकार देताना मात्र त्यांनी अस्सल बुवासारखे स्पष्टीकरण दिले. तो म्हणाला, '' मी तुम्हाला रात्री भारतात कुठे येणार नाही पण अमेरिकेत येईन असे म्हणालो. कारण मला तसा त्या वेळी वरून आदेश मिळाला. पण पुन्हा आज सकाळी करंट मिळाला की, तू तपासणी करून घ्यावयाची नाही. तुझे हात धुवून त्यांना पाणी नेऊन दे. आणि काय करावयाच्यात त्या तपासाण्या

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
३७१९
दा. नं. ३७१७
विषय : शाखा (स्थळ प्रत)

खुशाल करू दे. तेव्हा मी फक्त तुम्हाला गोड केलेले पाणी देईन.'' आता अशा माणसाचे संशोधन म्हणा वा चाचणी म्हणा कशी करणार? आणि अशा व्यक्तीने सिनेमागृहात स्लाईड्स दाखवून तज्ज्ञाला आव्हान द्यावे. याला थोतांड नाही तर काय म्हणावे !

तरीही ॲड. विजय मोरेंनी त्यांनी गोड केलेले पाणी घेतले. दिल्लीला माझा थोरला भाऊ एका ख्यातनाम संशोधन संस्थेत उच्चपदस्थ आहे. अधिकृत रीत्या असे सॅम्पल्स तपासून घेणे हे खर्चाचे काम तर होतेच. पुन्हा अशा स्वरूपाच्या कामाबद्दल संस्थेच्या संचालकांनी उत्साह दाखवण्याचीही शक्यता नव्हती. पण स्वतःच्या ओळखीने या जबाबदारीवर हे पाणी तपासण्याची आणि त्याचे Microanalysis करण्याची पद्धत करविण्याचे भावाने मान्य केले. हा रिपोर्ट अनधिकृत मिळणार होता. पण प्रत्यक्षात अधिकृत रिपोर्टएवढेच त्याचे महत्त्व असणार होते. १५ मे ला मोरेंनी पाणी दिल्लीला पाठविले. त्याच्या दरम्यान पुण्याहून मला परामानसशास्त्र संघटनेचे, महाराष्ट्राचे अध्यक्ष ब. वि. अकोलकरांचे पत्र आले होते. या प्रकरणाचे त्यांनी पहिल्यांदा संशोधन केलेले असल्यामुळे त्यांना मला भेटावयाचे होते. विज्ञान यात्रेचा पाठपुरावा करण्यासाठी राष्ट्रसेवादलाने २१ ते २३ मे पुण्याला शिबिर घेतले होते. त्यासाठी गेलो असताना २३ मे ला मी अकोलकरांना घरी जाऊन भेटलो. त्यांनी स्वागत चांगले केले. भानुदासची बुवाबाजी त्यांनाही मान्य नव्हती. पण एकंदरीत भानुदासला प्राप्त गोष्ट ही काही वैशिष्ट्यपूर्ण जैव रासायनिक प्रक्रिया असावी याबद्दल त्यांची खात्री पटल्याचे मला आढळले. त्यासाठी पाण्याचा नमुना पूर्ण शास्त्रीय काटेकोरपणे घेऊन दिल्लीस पाठवावा याबाबत त्यांनी भानुदासला पुण्यास बोलवावे व काही तज्ज्ञांच्या उपस्थितीत भानुदासकडून पाणी गोड करून घ्यावे असे मी सुचविले. आम्हाला अशी तपासणी करून देण्यास त्यांनी नकार दिला होता. मात्र डॉ. अकोलकरांच्यावर त्याचा विश्वास असल्याने तो तपासणीला तयार होईल असा त्यांना विश्वास वाटत होता व ते सर्वसाधारणपणे मान्य झाले.

मी सातारला परतलो. चार दिवसांत मला भावाकडून रिपोर्ट मिळाला. त्यामध्ये पाण्यात सॅकरिन असल्याचे लिहिले होते. सॅकरिन हा पूर्णतः प्रयोगशाळेत बनवला जाणारा सिंथेटीक पदार्थ आहे. तो गोडबाबाने गोड केलेल्या पाण्यात आढळला. याचाच अर्थ गोडबाबाची गोडी ही जैव रासायनिक प्रक्रियेतील नसून बनवाबनवी हातचलाखी यातून निर्माण झालेली

आहे असा होत होता. त्याप्रमाणे मी वृत्तपत्राला दिले. श्री. अकोलकरांनाही पत्र पाठवले आणि अजूनही एकदा तुमच्या समाधानासाठी मी प्रत्यक्ष भेटीत सुचविल्याप्रमाणे आपला जाहीर प्रयोग करू असे सुचविले (कारण ज्या पद्धतीने पाण्याचे पृथक्करण करण्यात आले ती संपूर्ण प्रक्रिया मला मिळालेली असल्यामुळे आता तपासणी अधिकच सोपी होती.) त्यांचे जे उत्तर आले ते पत्रच मी ठेवले आहे. परंतु त्यातला महत्त्वाचा शेवटचा भाग असा की, हा प्रकार जैवरासायनिक व चयापचय प्रक्रियेशी (कदाचित विक्रियेशी) संबद्ध असावा. ह्या आमच्या निष्कर्षाच्या अनुरोधाने आता आपण मंडळींनी ह्या प्रकाराविषयीचे संशोधन हाती घेणे हेच युक्त ठरेल.

माझ्या दृष्टीने असे संशोधन हाती घेण्याची काहीच गरज नव्हती. पण अकोलकरांना वाटत असेल तर, त्यांचेही समाधान व्हावे एवढाच माझा उद्देश होता. त्यांनी अंग काढून घेतल्याने उलट माझी बाजूच बळकट झाली. बाबा, बुवा, महाराज यांच्याविरोधात झुंजताना एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी असते. जोपर्यंत बाबांच्या तथाकथित चमत्काराला, सिद्धीला कोणी नीटपणे आणि धीटपणे आव्हान देऊन ठामपणे उभा रहात नाही. तोपर्यंतच हा सारा गमजा चाललेला असतो. गोडबाबाचेही असेच झाले. त्याच्या गोडीच्या चमत्काराला आव्हान देणारे आमचे निवेदन सर्व वृत्तपत्रांतून छापून आले. ' मनोहर ' साप्ताहिकाने तर सविस्तर वृत्तांत छापला. बारामतीमध्ये त्याची खूप चर्चा झाली. नंतर काही दिवसांनी गोडबाबाने गोड केलेल्या पाण्यात सॅकरिन असल्याचे वृत्त आले. गरज पडली तर बारामतीत जाहीरसभा, चमत्काराचे प्रत्यक्ष प्रयोग दाखवणे याची पण आम्ही तयारी केली. पण याची गरज पडली नाही. गोडबाबाचे प्रस्थ कमी होत चाल्ल्याची बारामतीची बातमी होती. पुढे वर्षानंतर विषमता निर्मूलन परिषदेच्यासाठी बारामतीला गेलो. गोडबाबाला बसलेला तडाखा स्पष्टपणे जाणवत होता. स्वतःच्या अंगाला चंदनाचा वास येतो आणि त्याने हात लावलेल्या प्रत्येक गोष्टीला चंदनाचा वास येतो. असा नवा प्रयत्न त्याने चालू केला होता. पण त्याकडे लक्ष द्यावे असे कोणालाच वाटत नव्हते. आणि गावातून निरुद्देशी भटकण्यापलीकडे त्याला काही धंदा राहिला नव्हता. जो धंदा त्याला करावयाचा होता त्याला गिऱ्हाईक राहिलेले नव्हते. फुगवलेल्या फुग्याला टाचणी लागली होती.

ही गोष्ट मात्र चळवळीची गोडी निश्चितच वाढवणारी होती.

२. जंगलीदासबाबाची अघोरी साधना

चैत्रशुद्ध प्रतिपदा–गुढीपाडवा–साडेतीन शुभमुहूर्तांपैकी एक. तारीख नेमकी १४ एप्रिल १९८३. घटनेचे शिल्पकार आणि विज्ञान निष्ठेचे कट्टर उपासक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्मदिन !

नेर्ले गाव सांगली जिल्ह्यातले. हमरस्त्यालाच असलेले. तिथल्या जंगलीमहाराजांच्या मठात भाविकांची आणि बऱ्यांची ही गर्दी उसळलेली. नंदा शंकर देसाई ही पंधरा-सोळा वर्षांची तरुणी, वयाच्या दहाव्या वर्षापासून बरदार सोडून ती मठातच मुक्कामाला आलेली. मठाच्या भाषेत तिचे नाव हिंदमाता. मठप्रमुख जंगलीदास बाबाची शिष्या. जंगलीदास बाबांच्या तरुण शिष्यांची नावेच अशी झोकदार. एकीचे हिंदमाता, दुसरीचे राष्ट्रमाता, तिसरीचे जगन्माता अशा दहापंधरा.

हिंदमाता मठातल्या देवळातून बाहेर आली. हजारो नजरा ताणल्या गेल्या, तिची पंचाग्नी साधना पाहण्यासाठी. उन्हाळ्यातला ऐन दुपारचा उन्हाचा दणका. त्या उन्हात मठासमोरच्या मोकळ्या जागेत अडीच फूट त्रिज्येच्या एका छोट्या वर्तुळात हिंदमाता साधनेला बसली. वर्तुळाच्या परिघावर अडीच मण लाकडे रचण्यात आली. आणि पेटवण्यात आली. धगधगता इंगुळ तयार झाला. चारी बाजूने धगधगते निखारे, वरून रणरणता रविराज, पाची बाजूंनी पोळणारा अग्नी म्हणून पंचाग्नी. पद्मासन घालून हिंदमातेने ध्यान लावले. मांडी तशीच ठेवून शरीर पुढे झुकवून डोके जमिनीला लावायचे. हा या ध्यानातला नमस्काराचा प्रकार. पुन्हा हळूहळू डोके उचलून कंबर ताठ करून आसनाच्या स्थितीत येऊन ध्यान चालू ठेवायचे. साधना चालू झाली. पहिला नमस्कार हिंदमातेने केला. पण तो प्रत्यक्ष परमेश्वराच्या चरणीच रुजू झाला असावा. कारण ती जी वाकली ती कोलमडलीच. एकच हलकल्लोळ उडाला. तातडीने तिला मोकळ्या मैदानातून मठाच्या आतल्या भागात हलविण्यात आले. डॉ. धडेंना धावतपळत इस्लामपूरहून बोलविण्यात आले. त्यांनी तपासणी केली. पूजा कायम स्वरूपी संपली होती. पुढचे सोपस्कार अटळ होते. इस्लामपूरला शव हलवून प्रेताची उत्तरीय तपासणी झाली. हिंदमातेच्या पाठीमागच्या बाजूस भाजून जखम झाली होती. आजूबाजूची धगधगती उष्णता मृत्यूला कारणीभूत झाली असे डॉक्टरांचे मत पडले. मृत्यूचे कारण नोंदवले गेले, ऊष्माघात. असहाय उष्णतेने शरीराच्या

सर्व क्रिया एका तडाख्यात निकामी झाल्यामुळे आलेले मरण. शरीराचे उष्णतामान १०९°फॅ.पर्यंत वाढले असावे. आणि ताप १०५°फॅ.च्या वर गेला तर डॉक्टरांसह सर्वांना काळजी लागते. आणि १०६° फॅ. वर ताप गेल्यास शरीर टिकाव धरू शकत नाही हा व्यवहारातला अनुभव. पण जंगलीमहाराजांच्या मठातल्या जंगलीदास बाबांच्या जंगलीसाधनेत हा व्यवहारी शहाणपणा कोठून असणार? अघोरी साधनेत एका निष्पाप मुलीच्या जीवनाची शोकांतिका झाली; पण ही शोकान्तिका घडलेली नव्हती, घडवलेली होती. हा अपघात नव्हता, अघोरी पूजेने घेतलेला बळी होता. ही अघोरी साधना मनात लहानपणापासून बिंबवून त्याच्या प्रभावामुळे घडलेली ही आत्महत्या नव्हती, हत्या होती.

अंधश्रद्धा भक्तांना आंधळी बनवते म्हणून तर तिला अंधश्रद्धा म्हणावयाचे. कारण नंदा शंकर देसाई ही शेजारच्या कापूरखेड गावची तरुणी. वडील शेतकरी, चुलते दिनकर राजाराम देसाई हे तर सध्या हवालदार, पण मुलीचे पालक, नातेवाईक, सगेसोयरे, या सगळ्यांनी हे मुलीचे प्राक्तन मानले, आणि तिला मुक्ती मिळाली, असे समजून अंत्यसंस्कार उरकला. तक्रार करावी असे कुणाला वाटलेच नाही. तक्रार नाही तर चौकशी कोठून होणार? तीन-चार हजारांच्या डोळ्यांसमोर घडलेली घटना काळाच्या ओघात न्यायाशिवाय वाहून जाणार असे दिसू लागले. याविरुद्ध पहिला आवाज उठविला तो अशोक थोरात या तरुणाने. हा आय. काँग्रेसचा इस्लामपूरचा कार्यकर्ता. त्याने कलेक्टरपासून मुख्यमंत्र्यांपर्यंत सर्वांना,या प्रकरणाची चौकशी व्हावी असे निवेदन पाठविले (त्याची साधी पोच अजून आली नाही) कोल्हापूर सकाळने प्रश्नावर अग्रलेख लिहिला. पण बातम्या,निवेदनाने भागण्यासारखे नव्हते. ११ जूनला अशोक थोरातच्या घरी, इस्लामपूर–कासेगाव भागातली परिवर्तनाच्या चळवळीतली मंडळी जमली, त्यात शलाका पाटणकर, पतंगराव थोरात असे पंधरा-एक जण होते. त्यांना सणक आली की, आता अर्ज विनंत्यांचा घोळ बास. डायरेक्ट ॲक्शन करायची. मंडळींनी टेम्पो ठरविला आणि नेर्ले गाठले. गावातील काही मंडळी बरोबर आली. सरपंचही उपस्थित होते. तीस-चाळीस जणांनी मठाकडे मोर्चा वळविला. जंगलीदास बाबाला हात धरून जाब विचारला. आवाज चढविले. गावातून चंबू–गबाळे आटपून ताबडतोब निघून जाण्यास सांगितले. आणि घाव अचूक बसला. जंगलीदास बाबाने गावातून तोंड काळे केले. बुवाबाजीविरुद्ध लढाई जिंकल्याने मंडळी खूष झाली. पण बरकतीचा धंदा असा बंद पडत नसतो. आपण जिंकली ती

लढाई नव्हती चकमक होती, याचा अनुभव चार–सहा महिन्यांतच आला. महाराज हिमालयात परिभ्रमणाला गेले आहेत, असे शिष्य सांगत होतेच पण त्यांनी महाराजांची हिमालयपर्यटन संपवून ते परत येण्याची तारीख पण जाहीर केली. ती १५ फेब्रुवारी.

पुनरागमन सोहळ्यासाठी हॅन्डबिले काढण्यात आली. मजकूर असा– श्री जंगली महाराज प्रसन्न. श्री समर्थ विश्वात्मक, विश्वव्यापक समर्थ कृपा आशीर्वादाने सद्गुरू जंगलीदास महाराज यांचा पदयात्रेचा सांगता समारंभ माजी आमदार विलासराव शिंदे, माजी आमदार वसंतराव नाईक, नेर्ले लॅप फॅक्टरीचे चेअरमन विलासराव पाटील, कृष्णा सहकारी साखर कारखाना सचालक रवींद्र पाटील यांच्या उपस्थितीत बुधवार तारीख १५–२–८४ रोजी ४ वाजून १५ मिनिटांनी होणार आहे. रात्री श्रींच्या पालखीची मिरवणूक, भजन, कीर्तन, १६–२–८४ रोजी पहाटे संतदर्शन, सकाळी महाप्रसाद व बैल-गाड्यांच्या शर्यती आहेत. तरी सर्व भाविक, भक्त, ग्रामस्थ मंडळींनी उपस्थित राहावे. आपले, सद्गुरु जंगलीमहाराज भक्त मंडळ, नेर्ले ग्रामस्थ' या पत्रका-बरोबरच कार्यक्रमाला येण्याची शेकडो निमंत्रण कार्डे मोहन पाटील आणि शाम मोकाशी या नावाने पाठवण्यात आली. वृत्तपत्रातून पण आगमनाचा गाजावाजा करण्यात आला.

स्वस्थ बसणे शक्यच नव्हते. कोल्हापूरहून विज्ञान प्रबोधिनीचे कार्यकर्ते, सातारहून मी, सांगली-इस्लामपूरहून तिथली मंडळी असे सगळेजण १२ तारखेला इस्लामपूरला अशोक थोरातांच्याकडे जमलो. कोल्हापूरहून डॉ. सुभाष आठल्ये, सुरेश शिपूरकर, गजानन जोशी, व्यंकप्पा भोसले, कागलचे विष्णू कुंभार; इस्लामपूरचे प्रा. डॉ. बसाडे, अनिल पाटील, दिलीप सालुंखे, असा ग्रुप झाला. दोन कारवाया पुढे होत्या. एक नेर्ले गावात जाऊन, पहाणी करून, बोलून, या अंधश्रद्धा विरोधी मोहिमेस ग्रामस्थांचा आधार मिळवणे आणि दुसरी शासकीय पातळीवरच्या कारवाईची मागणी करणे.

नेर्ले हे पुणे-कोल्हापूर-हमरस्त्यावरचे गाव. रस्त्यावरच 'जंगली महाराजांचा मठ' ही मोठी पाटी. गाड्या हमरस्त्यावरून आत वळवल्या की, फर्लांगभरात गावाच्या सुरुवातीसच प्रशस्त मठ लागतो. गावात जाण्यापूर्वी मठात शिरलो. 'मठ' ही कल्पना जुनी. पण त्याचे आधुनिकीकरण झाले होते. मठाच्या दारापाशीच दोन्ही बाजूला शहरातल्या शॉपिंग-सेंटरसारखे दुकानाचे गाळे

होते. आत एक एकराचे विस्तीर्ण आवार. मठाच्या पुढच्या आवारात वर्तुळकार ठेवलेल्या विटा. पंचाग्नी पूजेची जागा दाखविणाऱ्या. आम्ही शोधक नजरा इकडे तिकडे वळवेपर्यंत मोहन पाटील आणि शाम मोकाशी गडबडीने पुढे आले. मनातला संशय बाहेर न दाखवता त्यांनी माहिती दिली. " हा मठ तसा सव्वाशे वर्षांपूर्वीचा. पण पाच वर्षांपूर्वी जंगलीदास महाराज आले आणि भाग्य उजळले. महाराज कोण,कुठले माहीत नाही. महाराष्ट्र कर्नाटक सीमेवरच्या हुपरीजवळच्या कारदगे गावाहून ते आले. हे सगळं पडायला आलं होतं. सोपा मोडकळीस आलेला. कुंभारी कौलंही फुटून गेलेली. गावातल्या काहींनी तर याचा चक्क गोठा केला होता. महाराजांच्या प्रेरणेनं कंपाऊंड बांधले. हा लांब रुंद सोपा व्यवस्थित झाला. चांगली मंगलोरी कौलं मठावर चढली. समोरचा भला थोरला हॉल.... बांधून झाला. गावातल्या अनेकांची व्यसनं सुटली. महाराज आपले चिंतन, नामस्मरण करतात. वाचन नाही, बोलणं कमी. रोज शे-पाचशे माणूस येऊ लागले. गुरुवारी तीन वेळा आरती, पौर्णिमेला पालखीची मिरवणूक, महाराजांनी चालू केली. आता नंदा देसाई गेल्या हे खरं, पण त्यांच्या घरच्या कुणाचीही काही तक्रार नाही ही बाहेरच्यांचीच काव-काव. गावातली काही राजकारण करणारी पुढारी मंडळी त्यांना सामील. त्यांना या आवारात गुरे बांधायचीत. समोरच्या हॉलमध्ये शाळा भरवायचीय. गंगोत्री, जम्नोत्री, बद्रीकेदार करून महाराज परत येत आहेत. विरोध झाला तर ते काय,कापील, आगाशी, कालमवाडी, नाटोशी, शिराळा (ही सर्व जवळपासची गावे आहेत.) यां ठिकाणच्या मठात जातील. पण नुकसान आमचे आहे. आम्ही बरे जाऊ देऊ? विरोध झाला तर काय गोळीचा जबाब गोळीनं." एवढ्यात आसपासची बरीच मंडळी जमली होती. एका फाटक्या अंगाच्या माणसाने फार चांगले सुनावले. तो म्हणाला," चोर खरा,पण आमचा फायदा करून देतोय ना ?"

मठाच्या इमारतीमध्ये फिरताना हा फायदा चांगलाच लक्षात आला. मूळ मठाचा हॉल चांगलाच लांब रुंद होता. जवळ जवळ सव्वाशे फूट. त्याच्या आत पुन्हा मोठ्या खोल्या. हॉलच्या दर्शनी भागात महाराजांचे साधनास्थान, संगमरवरी फरशी, मोठा पलंग, जंगलीमहाराजांचा आठफूट उंचीचा फोटो, बाजूला तेवणाऱ्या समया, पलंगावरच्या तक्क्याला सॅटीनचे मखमली कापड, त्यावर रुद्राक्षाची माळ, छताला आधुनिक हंड्या, आणि विजेचे दिवे, भिंतीवर चांगले घड्याळ, सगळ्या गोष्टी साधनेची सुबत्ता दाखविणाऱ्या. याच्यासमोर मठाचा मोठा हॉल

१६५×२८ अल्ल्या वाळवे तालुक्यातला एक नंबरचा. मधोमध लोखंडी खांब वर पत्रे. हा हॉल म्हणे महाराजांनी २१ दिवसांत बांधला. हॉलच्या एका बाजूला फुटभर उंचीचे रेलींग, त्यामागे टाईल्स लावलेला सुरेख चौथरा, महाराजांची बसण्याची जागा. दोन्ही बाजूंला जंगली महाराजांची पंधरा फूट उंचीची प्रचंड चित्रे. चौथऱ्याच्या पुढे छतापासून खाली येणारे आणि पूर्ण रुंदी व्यापणारे पडदे. त्याच्यापुढे भक्तगणांनी पैसे टाकण्यासाठी ठेवलेल्या दहा पेट्या. चौथऱ्याच्या बरोबर मागच्या बाजूला एक रंगीत भारी चादर, मागचा दरवाजा (गुप्त होण्याचा मार्ग?) न कळण्यासाठी लावलेली. शेजारच्या खोलीत तीन फूट लांबी-रुंदीची ऐसपैस खुर्ची. दोन्ही बाजूला हातांना सिंहाच्या तोंडाचा आकार. खुर्ची सनमायकाने मढवलेली. तिच्यावर हिंदमातेचा-नंदा देसाईचा रंगीत मोठा फोटो. १५-१६ वर्षे वयाची नंदा देसाई, डोक्यावर मुगुट, गळ्यात माळा, केस मोकळे सोडलेले, जरीकाठाची साडी, हातात हिरव्या बांगड्या, हातावर गोंदलेली अक्षरे जंगली महाराज प्रसन्न, पद्मासनात बसलेली. या फोटोच्या बाजूसच ज्ञानेश्वरांचा छोटा फोटो. मोठ्या खुबीने त्यांच्या समाधिस्थ होण्याशी हिचे नाते सूचित करणारा. एका कोपऱ्यात कोल्हापूरच्या गंगावेस सारखी प्रशस्त तालीम, मधल्या मोकळ्या जागेत छोट्या कृष्ण मंदिराची उभारणी चाललेली.

मठातून बाहेर पडून आम्ही गावात शिरलो. लोकांना भेटलो. सुभाष शहा, पतंगराव पाटील ही मंडळी जंगलीदास बाबांना हाकलण्यात पुढे होती ती भेटली. त्या सात जणांवर, पिस्तुल घेऊन मला खुनाची धमकी दिली असा खटला घालायला पोबारा, करता करता महाराज विसरला नव्हता. गावाची नैतिक बाजू बिघडते. गावात फूट पडते म्हणून आमचा बाबाला विरोध, असे मंडळी म्हणाली. विश्वास मोकाशीने तर एका पौर्णिमेला भलतीच साधना बघितल्यामुळे दाढी धरून महाराजांना जाब विचारल्याचे सांगितले. मारुतराव ज्ञानोजी नेर्लेकरांच्या फसवणुकीचा किस्सा कळला. आगाशिवाच्या डोंगरावर उत्सवाला माणसे नेण्यासाठी त्यांचा ट्रॅक्टर महाराजांनी घेतला, त्या ट्रॅक्टरला अपघात झाला, दुरुस्त करून देतो म्हणून महाराजांनी तो कोल्हापूरला टाकला. अडचण म्हणून त्या दुरुस्त करणाऱ्याकडूनच पाचशे रु. हातउसने घेतले. दोन महिने तिकडे कोणी फिरकलेही नाही. शेवटी मारुतराव दुसरीकडे तो दुरुस्तीला द्यावा म्हणून आणावयास गेले, तर गॅरेज मालकाने पाचशे रु. मागितले. शिवाय दुरुस्तीचा खच आला अकरा हजार. महाराजांचा उत्सव असा महागात पडला.

गावात आमची सभा लावण्याचा विचार चालू झाला. साशंकता होती. तेवढ्या वेळात आम्ही चार मैलांवरचे कासेगाव पोलिस स्टेशन गाठले. रविवारच्या सुटीमुळे थोडे निवांत असलेले फौजदार म्हस्के घाईघाईने घरून आले. आम्ही दोन मागण्या मांडल्या. पंचाग्नी पूजा व नंदा देसाईचा मृत्यू याची पूर्ण उच्चस्तरीय चौकशी करा आणि जंगलीदास बाबा याला जबाबदार असल्याने ही चौकशी होईपर्यंत त्याला सांगली जिल्ह्यात प्रवेश बंदी करा. शिवाय वातावरणातला प्रक्षोभ वाढू नये यासाठीही ही बंदी योग्य ठरेल. फौजदार काय बोलणार ? ते म्हणाले प्रकरण गंभीर दिसतेय,उद्या सांगलीला जाऊन एस. पी. साहेब आणि कलेक्टरला भेटतो.

गावाकडे परतताना नेर्ले लॅप फॅक्टरीचे चेअरमन विलासराव पाटील यांना भेटलो. जंगलीदास बाबांच्या स्वागताचे ते एक प्रमुख अतिथी होते. ते म्हणाले देवाला आणि धर्माला तुमचा का विरोध ? आम्ही त्यांना समजावून सांगितले, " देव आणि धर्म व्यक्तिगत बाब. याला आमचा विरोध नाही. मठाच्या नादाला लागलेल्या तरुणी, पंचाग्नी पूजेसारखी घातक पूजा याला आमचा विरोध आहे. या सगळ्याची चौकशी नको काय ?" विलासरावांना मुद्दा मान्य झाला. मी म्हटले, " ज्याच्या चौकशीची मागणी त्याच्याच स्वागताला तुम्ही कसे जाता ?" विलासराव पटल्यासारखे हसले. (ते पुढे स्वागतास गेले नाहीत.)

सायंकाळी सातला गावात सभा चालू झाली. सभेला सुरुवात होताना आमच्या मागण्या मांडणाऱ्या घोषणा आम्ही जोरात दिल्या. आठ हजाराचा गाव. आम्ही अपरिचित शिवाय सभेच्या सुरुवातीसच लाईट गेलेले. त्यामुळे लाऊड स्पीकरही बंद. सभा पेट्रोमॅक्सच्या प्रकाशात फक्त खड्या आवाजाच्या सहाय्याने चाललेली. शे-पाचशे लोक फारतर जमतील ही अपेक्षा. प्रत्यक्षात मात्र तीन हजाराचा समुदाय जमला.गावातलेच भीमराव पाटील अध्यक्ष होते.भगवानराव साळुंखे, दिलीप साळुंखे, सुरेश शिपूरकर बोलले. शेवटी मी बोललो. बोलताना सभेला प्रश्न विचारले. मठाच्या उभारणीसाठी गावाने दमडा दिला नाही असे मठात म्हणतात, खरे का ?एकेकाने पाच-पाचशे रु. दिलेत'असं उत्तर आलं. " सासरच्या छळाला कंटाळून सुनेने आत्महत्या केली तर त्याची जबाबदारी छळणाऱ्या सासरच्या मंडळीवर सरकार खटले भरते. इथे जंगलीदास महाराजांच्या प्रभावाने त्याने सुरू केलेल्या अघोरी साधने पोटी एका निष्पाप कुमारिकेचा बळी गेला या हत्येला बाबा जबाबदार नाही का ? लोकांनी माना डोलवून आपला होकार

दर्शवला. अशा बाबाचे स्वागत गावात होतेच कसे ? असे विचारून सभा संपवली. सभेला अनपेक्षितपणे मिळालेले यश व प्रतिसाद पाहून मठाशी संबंधित लोक चिडले. सभा उधळता आली नाही म्हणून सभा संपल्यावर त्यांनी गोंधळाचा प्रयत्न केला. वातावरणात भरपूर ताण आला. पण फौजदार म्हस्के आणि स्थानिक मंडळींनी परिस्थिती यशस्वीपणे हाताळली.

दोन दिवस वातावरण तापतच गेले. पेपरांनीही गाजावाजा केला. प्रा. अनिल पाटील, प्रा. ए. ए. बसाडे यांच्या नेतृत्वाखाली इस्लामपूरच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजचे विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने पुढे आले. कोल्हापूरची विज्ञान-प्रबोधिनी, जंगली महाराज हटाव कृतिसमिती यातील मंडळी पण सोबत होतीच. हमरस्त्यावरून गावात शिरण्याच्या जागेवर काळे झेंडे घेऊन तीनशे निदर्शक थांबले. बंदोबस्ताला डी. एस. पी. जातीने आले होते. महाराज गावाच्या वेशीवर येताना झेंडे दाखवत घोषणा देत जोरदार निदर्शने झाली. आधीच्या प्रचार मोहिमेच्या मर्यादित यशामुळे नेर्ले ग्रामस्थ स्वागतापासून तटस्थपणे दूर राहिले. जाहीर केलेली नेतेमंडळीही आली नाहीत. महाराजांबरोबर आलेल्या बाहेरगावच्या लोकांनी निदर्शकांवर किरकोळ दगडफेक केली आणि तंग वातावरणाचा अंदाज बांधत अक्षरशः पळवीतच महाराजांना मठाकडे नेले.

महाराज स्थानापन्न झाला खरा, पण त्याला स्थिरावू द्यावयाचा नाही असा मंडळींचा निर्धार आहे. महाराजांचा एक मठ कऱ्हाड तालुक्यात अगाशिवी डोंगरावर आहे. तेथील वातावरण नैतिक दृष्टीने, आर्थिक व्यवहाराच्या दृष्टीने संशयास्पद वाटते म्हणून तेथे पोलीसपहारा बसवून चौकशी करावी अशी मागणी 'कऱ्हाड तालुका जंगलीदास बाबा हटाव समिती'ने केली आहे. त्यासाठी ते पोलिसस्टेशनवर मोर्चा नेणार आहेत. उच्चस्तरीय चौकशी कसोशीने व्हावी, पंचाग्नी पूजा साधनेपायीच नंदा देसाईचा अघोरी मृत्यू आणि महाराजांशी त्याचा असणारा संबंध लक्षात घेऊन महाराजांवर त्वरित खटला भरावा. अशा मागणीसाठी सांगलीच्या जिल्हाधिकारी कचेरीसमोर धरणे धरण्याचा निर्णय झालाय. वाळवे तालुक्यात जनतेच्या पातळीवर हे सारे समजावून सांगण्याची मोहीम उघडून अंधश्रद्धा विरोधी मोहिमेचा पाया व्यापक करायचा, जनतेत रुजवायचा, याचीही धडपड चालू आहे. चकमक हरणे-जिंकणे चालू असले तरी अंधश्रद्धा विरोधी लढाई आपण जिंकायचीच असा कार्यकर्त्यांचा निर्धार आहे. मात्र, महात्मा फुले यांची सत्यशोधक चळवळीची परंपरा असलेल्या महाराष्ट्रात ही

झुंज घडू लागली आहे. याचा आनंद वाटतानाच शंभर वर्षांची परंपरा, आधुनिक शिक्षण व विज्ञान पाठीशी असूनही अशा गोष्टींना आजही सामोरे जावे लागते याचा विषाद मनात सलत राहतो.

३. सिद्ध बाळयोगीराजांच्या लीला

तरडगाव हे तसं एक साधं-सुधं गाव. फलटण तालुक्यातलं. लोणंदपासून चार-पाच मैलांच्या अंतरावरचं. विकास व्हावा म्हणून चाफळकर ट्रस्टनं काही वर्षांपूर्वी गाव दत्तक घेतलं. काही विधायक कामं चालू केलेली.

पण आता तसं करण्याचं कारणच उरलं नाही. सारे प्रश्न एकदम सोपे झालेत. प्रत्यक्ष सिद्ध बाळयोगीराजांनीच गावात जन्म घेतलाय. तसा जन्म महाराजांनी घेतलाय अठरा वर्षांपूर्वीच. बौद्ध आई-बापांच्या पोटी. त्या वेळी त्याचं नाव ठेवलं विलास. विलास सोनावणे सात वर्षांचे असतानाच त्यांच्या अंगात म्हणे आदिनाथ महाराजांचा संचार होऊ लागला. पुढे साक्षात जालिंदरनाथांनी गिरनार पर्वतात दीड वर्षे त्याचे शिक्षण केले. तोपर्यंत विलास सोळा-सतरा वर्षांचा झाला होता. काही दिवस मुंबईत घालवून तो तरडगावी परत आला. आई-वडील मजुरीच करत होते. चार लहान भावंडांपैकी तिघेजण शाळेत न जाता असातसा वेळ घालवत होते. आणि श्रावण महिन्यात विलास सोनावण्यांचा विलास बाबा झाला. पुढे विलास महाराज आणि आता तर सिद्ध बाळयोगीराजच ! अवघ्या सहा महिन्यांतच केवढी ही आध्यात्मिक धाव !

महाराजांची कीर्ती हळूहळू आजुबाजूच्या गावांत पसरू लागली. गुरुवार आणि रविवार हे,नवनाथ महाराजांचा वरून आदेश घेऊन तो अनुग्रह भक्तांपर्यंत पोचविण्याचे महाराजांचे खास दिवस. या दिवसांची गर्दी आता वाढती आहे. रखरखत्या माळावर एका बाजूला पुरुषांची आणि एका बाजूला महिलांची रांग. सकाळी सातपासून लागलेली असते. रात्री मुक्कामाला आलेली मंडळी बस स्टॉपच्या नाहीतर झाडाच्या आधाराने पडून असतात. ती सकाळपासून रांग पकडतात. महाराज अंगारा देतात आणि सोबत ' ॐ नमः शिवाय 'चा जप. बस्स. मुक्याला वाचा येते. पांगळे चालायला लागतात. असाध्य त्वचारोग बरे होतात. हरवलेली माणसं आणि वस्तू सापडतात. भूतबाधा उतरते. वांझ कूस

समृद्ध बनते. साधारणपणे आदेश गुरुवारी व रविवारीच येतात परंतु तसा विषेश कुणी पाहुणा आला तर नवनाथ अधूनमधूनही आदेश पाठवतात. (पत्रकार ही विशेष मंडळीत जमा होणारी जात असल्याने शुक्रवारी पण नाण्यापासून विभुती काढून त्याचा आम्हाला प्रसाद मिळाला.) हवनाचा कार्यक्रम हा महाराजांचा हातखंडा खेळ आहे. हवनाच्या वेळी ते मंत्राने अग्नी पेटवतात. विशेष म्हणजे कुंडात पाणी ओतले आणि 'ॐ नमः शिवाय 'चा जप केला की, अग्नी पेटतो. परंतु हे तर काहीच नाही. थोड्याच वेळात महाराजांच्या हृदयातले आत्मलिंग शिवलिंगाच्या रूपाने त्यांच्या मुखावाटे बाहेर येते. सर्वांना दर्शन देते आणि पुन्हा मुखावाटे अदृश्य होते.

असा हा सगळा दुर्मिळ दैवयोग पाहायला आम्ही तरडगाव गाठले. दुपारच्या उन्हात स्टँडवर उतरून रस्त्याच्या डाव्या बाजूला असलेल्या वाटेने आम्ही पिराच्या स्थानाकडे निघालो. तेवढ्यात एक बाई लगबगीने पुढे आली आणि म्हणाली. " बाबांना भेटायला आला ना? बाबा आता घरी असतात. चला मी घर दाखवते. गुरुमहाराजांना स्वतःच जाऊन भेटायचे असल्याने आम्ही वाटाड्या नाकारला आणि गावात शिरलो. एका माणसाशी आम्ही गप्पा काढल्या. पन्नास-एक वर्षांचा, माळ घातलेला, आठ एकर बागायत असलेला, गावच्या राजकारणात तरबेज असलेला हा भगवान बाबुराव गायकवाड. विलासबाबाचा विषय काढताच उसळलाच. " थोतांड आहे सारं ! " असले प्रयोग गावच्या शाळेतला किर्ते मास्तर पण करून दाखवतो. अंगाऱ्यांनी अशी पोरं होत असतील तर यशवंतरावांनी आपल्याकडेच याला नेऊन ठेवले असते. याचा बोभाटा गावाच्या बाहेरच्या लोकांनीच जास्त केलाय. अहो, हवापाणी बदललं की पंधरा दिवसांत रोग हटतो आणि कौतुक करतात याच्या अंगाऱ्याचं. असं दुखणं रेड्याला आणि इंजेक्शन पखालीला देऊन कुठं काय होतं होय? सगळा बनवाबनवीचा प्रकार ! माझ्या घरी चार पाहुणे आले मुक्कामाला. म्हणाले दर्शनाला आलोय. मी त्यांना सांगितले, " तुमच्या बुवाबाजीपायी आमच्या घरचे दाणे संपायला नकोत. दुसरी सोय बघा. माझ्या गळ्यात माळ आहे ती अंतःकरणाची आहे. मला सात मुली आणि एक मुलगा आहे म्हणून मी कधी मुलासाठी देवदेव केला नाही. आणि तुमच्यासारखे सूट-पॅन्टवाले त्याच्यामागे लागतात. काय बोलावं ! " आम्ही चाटच पडलो. त्याला विचारलं, " हे तुम्ही जाहीर मांडत का नाही ? " भगवान म्हणाला, " गाव म्हणते, कशाला उलटे बोला? आता लोक मंदिर

बांधून देतात. मंदिर होईल, माणसं आणखी वाढतील. चार पैसे गावात येतील. कशाला भांडण तंटा काढायचा ? पण मला विचाराल तर असल्या बाबाला स्थान नाही पाहिजे. खुशाल माझ्या नावावर तुम्ही हे छापा. ''

चौकशी करत आम्ही बुद्ध वस्ती गाठली. एका घरासमोरून पुढे जाताना आतून एक माणूस लगबगीने पुढे आला आणि म्हणाला, '' बाबांच्याकडे आलात ना ? या, या.''

आम्ही आत गेलो. तरडगावला उतरल्या उतरल्या आम्हाला भेटलेली बाई तिथे होतीच. शिवाय आम्हाला आत बोलवणारे चौगुले मास्तर एका बाजूला बसले होते. एका बाजूला महाराज होते. त्यांच्यासमोर मातीचा फूट दीड फूट उंचीचा आणि चार फूट लांबीचा ओटा होता. देवादिकांच्या तसबिरी ओट्याच्या मागच्या भिंतीवर लावलेल्या होत्या. ओट्यावर देवाच्या मूर्ती होत्या. रामनवमीला मुलांच्या खेळण्यात विकत मिळतात किंवा कुठल्याही दुकानात वा रस्त्यावर प्लॅस्टरच्या मिळतात तशा त्या मूर्ती. नवनाथ महाराजांची एक मोठी तसबीर होती. बाकी गणपती, शंकर, हनुमान, साईबाबा, पांडुरंग आदी सर्व मंडळी तेवढ्या जागेत एकमेकांशेजारी सुखेनैव वावरत होती. मूर्तीच्यापुढे शिवलीलामृत आणि गजानन महाराजांची सूत्रे यांच्या पोथीची पुस्तके होती. ओट्यावर दोन तीन घंटा टांगल्या होत्या. एक समई पण होती. या साऱ्याच्या समोर विलास सोनावणे ऊर्फ सिद्ध बालयोगीराज बसले होते. अंगात पिवळ्या रंगाचा गुरुशर्ट, भगव्या रंगाची लुंगी, केस अगदी सत्यसाईबाबासारखे डोक्याभोवती चक्राकार, हनुवटीवर थोडीशी दाढी, उंची जेमतेम पाच-सव्वापाच फूट, शरीरयष्टी किरकोळीत जमा होणारी. '' आम्ही वृत्तपत्रांची माणसे. आपली कीर्ती ऐकून लांबहून आलो.'' सांगितल्यावर मोठ्या उत्साहाने त्यांनी आपला वृत्तान्त ऐकविला.

'' नवनाथ महाराज आदेश देतात. अंगारा देतात. त्याच्यामुळे सर्व काही घडते. आम्ही नुसते निमित्यमात्र. सारवावाडीची एक बाई आमच्या दर्शनाला नियमाने प्रत्येक गुरुवारी येई. सगळे सांधे आखडून तिचे नुसते मुटकुळे झाले होते. परवा भक्तगण म्हणाले, ' महाराज, किती दिवस अंत बघणार ? ' ' आम्ही आदेश घेतला. ॐ नमः शिवाय चा जप म्हणून अंगारा फेकला आणि पंधरा वर्षे न चाललेल्या त्या बाईने उठून पाच प्रदक्षिणा घातल्या. पाडेगाव फॉर्मजवळ असाच एक अकरा बर्षांचा मुलगा होता. अजिबात बोलता येत नव्हते. पाण्यात मिसळून तीन वेळा विभूती

दिली. आता तो हळूहळू बोलू लागलाय." "हे तर काहीच नाही." महाराजांना मध्येच थांबवीत चौगुले मास्तर म्हणाले, "बी. डी. शिंदे हे माजी मुख्यमंत्री अंतुलेचे सचिव, त्यांच्या उजव्या हाताची तर्जनी अजिबात वाकत नव्हती. सगळे डॉक्टरी उपाय हरले. शेवटी ऑपरेशनसाठी परदेशात जायचे ठरले. पण महाराजांनी भस्म लावले आणि पाच मिनिटांत बोट वळू लागले. त्यांना इतका आनंद झाला की, गाडीत बसलो तरी हात बाहेर काढून त्यांची तर्जनी सारखी नाचवून ते लोकांना दाखवीत होते.

"उस्मानाबादच्या खासदार टी. एम्. सावंतांचे तसेच. त्यांच्या पांगळ्या मुलाला महाराजांनी बरे केले. पी. सावळाराम आणि शाहीर साबळे पण आले होते. शाहीर साबळेंचा आवाज खूप खराब झाला होता. महाराजांनी विभूती दिल्यापासून आता बरा आहे." पुन्हा महाराजांनी आपले बोलणे चालू केले. "माझ्याकडे तसा उच्च-नीच-धर्म-जात असा कोणताच भेदभाव नाही. नवनाथाचा आदेश घेणे आणि पोचविणे हेच तेवढे माझे काम."

तो आदेश कसा येतो. आणि भस्म कसे पैदा होते. हे बघायला आम्ही आता उत्सुक झालो होतो. आम्ही महाराजांना नम्रपणे विनंती केली. "महाराज, आमच्यासाठी काही प्रसाद द्यावा." महाराज बाहेर पडले. घरापासून पिराच्या स्थानापर्यंत जाताना त्यांनी आम्हाला स्वतःचे गुणगान ऐकविले. "विशेष प्रसंगी मी हवन करतो. समोर लाकडे असतात मी आदेश घेतो. हातात पाणी घेतो. ॐ नमः शिवाय म्हणतो. पाणी गरम होते. लाकडावर टाकतो. लाकडे पेटतात. मग पुन्हा आदेश होतो. माझ्या हृदयातच नवनाथांनी लिंग ठेवले आहे. ते लिंग हळूहळू मुखावाटे बाहेर येते. प्रत्येक वेळेस त्याचा रंग, आकार वेगळा असतो. बाहेर आल्यावर ते मोठे होते. त्यात लोकांना शंकराचे दर्शन घडते. अलीकडे ३ डिसेंबरला श्री शशिकांत दैठणकरांकडे (सचिव, महाराष्ट्र राज्य शिक्षण खाते) फलटणला असे हवन झाले. लोणंदला एस. एस. काकडे यांच्या घरी, तर साखर कारखान्याचे बाबालाल काकडे यांच्या घरी पण हवन झाले. त्यांनी दलित संघर्षाचा ९-२-८२ चा अंक आम्हाला दाखवला. ॲड. अशोक निळे त्याचे संपादक. त्यांनी खडकीला सिद्ध बाळयोगीराज ऊर्फ विलास सोनावणे यांनी खडकी येथे चव्हाण बुवांच्या घरी १-२-८२ ला शिवलिंगाचे दर्शन कसे घडवले याची रोचक माहिती दिली होती. महाराज म्हणाले, दलित समाजात हा मी पहिलाच साधुपुरुष. स्वाभाविकच समाजाला मोठा संतोष वाटतो.

आम्ही उघड्या माळावरच्या पिराच्या स्थानापर्यंत एव्हाना पोहोचलो होतो. जेमतेम आठ बाय आठची एक दगडी खोली होती. मधोमध हिरव्या चादरीने आच्छादलेली कबर. त्याच्यावर फुलांच्या माळा, मागच्या भिंतीवर नवनाथाचे मोठे चित्र लावलेले. पुढच्या बाजूला छोटा शेडवजा मंडप होता. मंडपाच्यापुढे शंभर फुटांवर पुरुषभर उंचीचा आणि दोन पुरुष लांबीचा मोठा खड्डा खणलेला. बाजूला दगड, विटा असे सगळे बांधकामाचे सामान. या खड्ड्यापासून आणि पिराच्या स्थानापासून, समान अंतरावर, पण कोपऱ्यात बाभळीची खुरटी झुडपं.

हा खड्डा म्हणजे माझ्या साधनेसाठी तळघर. दैठणकरांनी याचा खर्च उचललाय. मी कोणाकडून एक पैसाही घेत नाही. लोक परस्पर काही करत असतात आणि ही बाजूची बाभळीची झाडे झुडपे दिसतात ना, त्या ठिकाणी कुंड तयार होणार. नवनाथांनीच सांगितले आहे. अंगारा टाकला की, या मातीतून स्वच्छ पाण्याचा झराच चालू होईल. मग कसल्याही रोग्याने आंघोळ करावी आणि रोगमुक्त व्हावे.

आम्ही पिराच्या स्थानाजवळ येऊन खोलीत बसलो. मी माझ्याजवळ पत्रकार आणि संघटनेचा कार्यकर्ता विजय मांडके. एवढ्यात दशरथ डोम्बाळे हा तरुण पण आमच्या जवळ आला. चौगुले मास्तर होतेच. मग महाराजांनी आमच्याकडून दहा पैशाची नाणी घेतली. चतकोर कागदाच्या तुकड्यावर आम्हाला नऊ वेळा ओम् आणि नऊ आकडा लिहावयास लावला. तोपर्यंत आमचे दहा पैसे हातात घेऊन ते बोटाच्या चिमटीतून फिरवणे, तोंडासमोर धरून त्याच्यावर फुंकर मारणे, मान हलविणे, आदेश, आदेश पुटपुटणे चालूच होते. मग त्यांनी दहा पैसे आमच्या हातात दिले. मुठीत घट्ट पकडावयास सांगितले. दोन मिनिटांत मूठ गरम झाली. पाच मिनिटांत नाण्याचे भस्म झाले. बिचारा डोंबळ्यांचा दशरथ अक्षरशः भारावून गेला. महाराजांची गुरूची विद्या गुरूला फळावी का याचा विचार करत आम्ही बाहेर पडलो.

आम्ही ज्या तुच्छतेने बाहेर पडलो ती महाराजांना आणि त्यांच्या भक्तांना चांगलीच झोंबली असणार. आमच्या मागे एकजण पळतपळत आला आणि खोदून खोदून आमची चौकशी करू लागला. एवढ्यात फलटण लोणंद बस आली. आम्ही बसमधे चढलो. लोणंदला उतरल्यावर आम्ही डोईफोड्यांना हुडकले. त्यांनी

तोंडातून आत्मशिवलिंग काढतानाचा महाराजांचा फोटो आम्हाला मोठ्या भक्तिभावाने दिला.

सातारला आल्यावर वृत्तपत्रात हा सगळा वृत्तान्त दिला. नाण्यातून विभूती काढण्यापासून ते शिवलिंग काढण्यापर्यंतचा कोणताही प्रयोग विलासबाबाने वैज्ञानिक कसोटी खाली करून दाखवावा असे जाहीर आव्हान दिले. दुसऱ्या स्थानिक वृत्तपत्रातून बातमी देऊन विलासबाबाने आपण आव्हान स्वीकारणार असे जाहीर केले.

लोणंदहून काही तरुण मंडळी आली. आम्ही तुम्हाला मदत करू इच्छितो म्हणाली. त्यांना मी म्हणालो, ' विज्ञान जागराचा प्रयोग लोणंदला ठेवा. त्यांनी लोणंदला बोर्ड लावले. 'स्वामी विज्ञानानंदाचे प्रयोग नाण्यातून विभूती काढणे मंत्राने अग्नी पेटवणे, जिभेतून नळी आरपार घालणे, चमत्कार पहा. विज्ञान समजावून घ्या. '

मी, विजय मांडके, सुजीत शेख, बापू आफळे असे चारपाचजण लोणंदला गेलो. सायंकाळी ६।। चा प्रयोग. लोणंदमधील वीज त्या दिवशी नेमकी गायब झाली. विलासबाबाचा प्रभाव दुसरे काय ! शेवटी अगदी वरच्या ऑफिसर पर्यंत फोनाफोनी करून वीज आली रात्री आठ वाजता. लोणंदची ग्रामपंचायतीची इमारत सर्व महाराष्ट्रात मोठी आहे. ग्रामपंचायतीसमोरच्या विस्तीर्ण, पटांगणावर कार्यक्रम चालू झाला. ' हटीहटीच्या आयाबायांनो जागराला या या हे गाणे झाले. प्रयोगाला सुरुवात झाली. भरपूर गर्दी होती. विज्ञानानंद बाबांचे आगमन झाले. लोकांच्याकडून दहा पैशाचे नाणे घेऊन त्यातून विभूती काढून दाखविली. दुसऱ्या चमत्काराकडे बाबा वळणार, तोच दोनचार माणसे व्यासपीठावर आली आणि हातातील आठ आणे नाचवत ओरडू लागली. यातून काढा बघू अंगारा. मी माईकवर म्हणालो, " हे बधा तुमच्या सगळ्या शंका कुशंकांचे उत्तर आम्ही नंतर देणारच आहोत. चमत्काराबद्दलही सांगणार आहोत, पण तुम्ही हे सगळे शांतपणे बघून घ्यावयास हवे. त्यानंतर पुढच्या मंत्राच्या साह्याने तूप ओतून अग्नी प्रज्वलित करण्याचा चमत्कार झाला. तो संपतो न संपतो तोच पंधरा वीस माणसे व्यासपीठावर आली. माईक ताब्यात घेऊन एकजण तावातावाने बोलू लागला, " ही शुद्ध फसवणूक आहे हे तूप नाही ग्लिसरीन बोरॅक्स आहे. हे साधे शाळेतले शास्त्राचे प्रयोग आहेत. आमचे विलास महाराज असे करत नाहीत ते त्यांच्या तपःसामर्थ्याने नाण्यातून विभूती काढतात. पाण्याने अग्नी पेटवतात. या

लोकांना आमच्या गावात येऊन आमच्या श्रद्धेवर हल्ला करायचा हा नसता धंदा आम्ही चालू देणार नाही.'' व्यासपीठावर चढलेल्या लोकांनी घोषणा, आरडा-ओरडा चालू केला. सभा अस्वस्थ झाली. काही प्रेक्षक उठले. वातावरण तापू लागले. गोंधळ वाढला. ध्वनिक्षेपकावरून सांगितलेलेही कोणाला ऐकू जाईना. कार्यक्रम थांबवावा लागला. आम्ही ग्रामपंचायतीच्या इमारतीच्या वरच्या एका खोलीत बसलो. पुढे काय करायचे ? याचा विचार करत अंदाज घेत.

आम्हाला लोणंदला निमंत्रण देणाऱ्या तरुणांना झाला प्रकार बरोबर वाटेना. पुढे काय होणार या कुतुहलाने जमाव थांबला होता. खरे तर तो वाढला होता. गडबड, गोंधळ,जमाव, यामुळे आधी हजर नसलेले दोन हवालदार पण आले होते. बाहेर गावच्या लोकांना आपण बोलायला देत नाही हे बरे नाही, असे गावातल्या काही लोकांना वाटत होते. शेवटी आम्ही आमची बाजू मांडायची व विलासबाबांच्या भक्तांनी त्यांची बाजू मांडायची असा निर्णय झाला. सवाल-जबाबाचा हा कार्यक्रम रात्री साडे नऊला चालू झाला. हजार दीड हजार पुरुष आणि पाच-सातशे बायका त्या अवेळी, उत्सुकतेपोटी थांबल्या होत्या. मी आधी बोललो '' भक्तीला आमचा विरोध नाही, आम्ही देवधर्म मानत नसलो तरी ते मानणाऱ्यांच्या विरोधात आम्ही नाही. पण लोकांच्या भाविकतेचा फायदा घ्यायचा आणि हातचलाखीने प्रयोग करून बाबा बनायचे याच्याशी आमचे भांडण आहे. चमत्कार खरे असतील तर, विलासबाबाने १ लाख रुपयांचे आव्हान स्वीकारावे नाहीतर भोंदुगिरी बंद करावी.'' माझ्यानंतर विलासबाबाचा कोणी भक्त बोलला. त्याने उपस्थित केलेल्या प्रश्नांना पुन्हा मी उत्तर दिले. मध्येच आणखी कुणी काही विचारले. लोकांच्यात भरपूर उत्सुकता होती. कुतूहल होते. लोक चिठ्या पाठवत होते. कधी कधी प्रश्नाचे उत्तर मी देण्याआधीच उत्साहाने प्रेक्षकांतून पुढे येऊन लाऊडस्पीकरचा ताबा घेऊनच स्वतःच जबाब देत होते. सभेला आमचे म्हणणे हळूहळू पण पटत होते. जवळजवळ दोन तास हा कलगी तुरा चालला. तो संपला तेव्हा हवा साफ बदलली होती. साडे अकरा वाजता कार्यक्रम संपवताना विलासबाबाला एका भक्ताने ' बोला विलासमहाराज की ' म्हणून जोरात आवाज दिला. जमावाकडून त्याला प्रतिसाद मिळाला नाही. त्यानंतर महिन्याभरात वार्ता आली की, नवनाथ महाराजांच्या साधनेसाठी विलासबाबा अज्ञातवासात गेले.

खरे तर, एवढ्या वर हा प्रकार थांबला असता. पण ॲड. अशोक निळे

यांच्या उत्साहीपणामुळे तो पुढे चालू राहिला. अशोक निळे हे स्वतःला कट्टर आंबेडकरवादी म्हणवतात. धुळ्याकडे त्यांची शिक्षणसंस्थाही आहे. त्यांच्या मते विलासबाबांना खरी सिद्धी आहेच. त्यांचे इतर बुवांसारखे नाही. दलित समाजात पाहेलाच सिद्ध पुरुष जन्माला आला. म्हणून तुम्ही त्यांना मुद्दामहून त्रास देताय आम्ही शनिवारवाड्यासमोर हा प्रयोग करण्यास तयार आहोत. दाभोळकरांनी मुख्यमंत्री अंतुलेंच्याकडे १ लाख रुपये ठेवावेत आणि आव्हान स्वीकारावे असे त्यांनी राजा भीमदेवी थाटात जाहीर केले. मुंबईच्या एका पेपरने त्याला प्रसिद्धी दिली.

मी धुळ्याला गेलो. ॲड. अशोक निळेची भेट घेतली. आमने-सामने चर्चा केल्यावर त्यांचा पारा बराच खाली आला. मी सुनावले शनिवारवाड्यासमोर भावयाच्या या परीक्षा नव्हेत. आम्ही विलासबाबाचीं पूर्ण तपासणी करू. नंतर एका खोलीत आमच्या वतीने दोन जादूगार,एक वैज्ञानिक, एक पोलिस अधिकारी आणि एक पत्रकार एवढी माणसे आणि तुमच्या वतीनेही तुमची पाच माणसे अशी रहातील. ही प्राथमिक चाचणी असेल. त्यासाठी तुम्ही आणि आम्ही त्रयस्त लवादाकडे एक हजार रुपये ठेवू.प्राथामिक चाचणीत तुम्ही अयशस्वी ठरल्यास हजार रु.जप्त होतील. यशस्वी ठरल्यास आम्ही लाख रु. ठेवू. आणि अंतिम चाचणी घेऊ तेव्हा यासाठी तुम्ही तयार असल्याचे लेखी आश्वासन द्या.मी तयारीला लागतो. ॲडव्होकेट साहेब म्हणाले, बघू. मी बाबांशी बोलतो आणि कळवतो. ॲडव्होकेट साहेबांच्या पत्राची वाट पाहिली ते आले नाहीच. मग मीच त्यांना पत्र पाठवले. तेच सर्व पेपरांनाही दिले. अनेक पेपरांतून ते प्रसिद्ध झाले ते असे–

ॲड. अशोक निळे यांनी,फलटण तालुक्यातील श्री. बाळसिद्ध योगीराज ऊर्फ विलासबाबा यांच्या संदर्भात अजूनही चमत्कार होतात व ते सिद्ध करण्यास आम्ही तयार आहोत,अशा स्वरूपाच आव्हान दिलेले आहे. संबंधित बुवाच्या भोंदुगिरीबद्दल मी व आमच्या संघटनेने आवाज उठविला असल्याने याबाबत काही गोष्टी स्पष्ट करत आहे.

अशा तऱ्हेचे आव्हान स्वीकारण्याची व शास्त्रीयदृष्ट्या त्याची पूर्ण कसोटी घेण्याची व ते सिद्ध झाल्यास एक लाख रुपये बक्षीस देणारी एक यंत्रणा,आज आधीच अस्तित्वात आहे. या यंत्रणेमार्फत या आव्हानाचा विचार केव्हाही करण्यास आम्ही तयार आहोत. परंतु त्या आधी अशोक निळे यांनी खालील गोष्टी स्पष्ट केल्या पाहिजेत.

(१) श्री. बाळसिद्ध योगीराज यांच्या वतीने आव्हान देण्याचा अधिकार श्री. अशोक निळे यांना देण्यात आला आहे याचे कायदेशीर हमीपत्र.

(२) चमत्कार सिद्ध करणे खोटे ठरले तर जनतेची अशा पद्धतीने फसवणूक केल्याबद्दल बाळसिद्ध योगीराजांनी लेखी माफी मागणे व त्यासाठी योग्य त्या कारवाईस तयार असणे. याबाबतचे लेखी हमीपत्र,

(३) असे प्रयोग ॲड. अशोक निळे यांनी सुचविल्याप्रमाणे शनिवार-वाड्यावर होत नसतात. शास्त्रीयदृष्ट्या आवश्यक ती सर्व दक्षता घेऊन व त्या कसोटीस कोणतीही बाधा येणार नाही अशा वातावरणात हे प्रयोग केले जातील. त्या ठिकाणी समाजातील निःस्पृह तज्ज्ञ व्यक्तींची व विज्ञान क्षेत्रातील अधिकारी व्यक्तीची उपस्थिती असेल व आवश्यक ती सुरक्षा व्यवस्था असेल.

(४) श्री. अशोक निळे हे वकील आहेत. कोणत्याही गोष्टीचा शास्त्रीय दृष्टीतून निर्णय कसा लावावा लागतो हे त्यांना माहीत असेलच. तेव्हा वरील अटी मान्य करून पाण्याने लाकडे पेटविणे, हातातून विभूती काढणे, तोंडातून आत्मशिवलिंग काढणे हे चमत्कार सिद्ध करण्यासाठी पुढील कार्यवाहीने करतील अशी अपेक्षा बाळगून आहे– नरेंद्र दाभोळकर.

दोन वर्षे होऊन गेली.ना अशोक निळे ना विलासबाबा, कोणीच पुढे आले नाही.

दोन महिन्यांपूर्वी तरडगावच्या हायस्कूलला बदलून गेलेले आमचे फलटणचे मित्र प्रा. विलायत शेखसांगत होते. "विलास महाराजांचा धंदा साफ बदललाय; गुरुवारी पाचशे माणसे असायची, तिथे आता पाच-दहा असायची मारामार."

४. दोन तरुणींचा संन्यास-दीक्षाविधी

२८ मे ला दुपारी चार वाजता पुण्याहून बाबा आढावांचा फोन आला. 'ताबडतोब फलटणला जा. तिथं संन्यास दीक्षाविधी समारंभ आहे. काय करणं शक्य आहे बघ. मुलींच्या आयुष्याची अक्षरशः परवड होते त्यांच्यात.' शक्य तितकी घाई करून सात वाजेपर्यंत मी सातारहून फलटण गाठले.

२९ मे ला फलटणला दोन तरुण मुलींचा संन्यास-दीक्षा-विधी समारंभ

होता. कु. कुसुम आणि कु. शोभा ही त्यांची नावे. या नावानेच त्यांच्या दीक्षा समारंभाला हजर राहण्याच्या निमंत्रण पत्रिका, मठ प्रमुखाने मोठ्या प्रमाणात वाटल्या होत्या. फलटणला महानुभव पंथाची वस्ती मोठी आहे. महानुभावांची ती दक्षिण काशी समजण्यात येते. या धर्माची दीक्षा देण्याचे असे समारंभ अधूनमधून जाहीरपणे चालूच असतात. याबाबत काही तरी करावे असे वाटणाऱ्या सौ. सुहासिनी मानेंनी आढावांना कळवले. सामाजिक कामात नेहमी तडफेने पुढे असलेले त्यांचे पती ॲड. जी. बी. माने गावाला गेले होते आणि एकट्यानेच काही करायचे म्हणजे त्यांच्यावर स्वाभाविकच दडपण आले होते.

मी मानेंच्या घरी गेलो. वकीलसाहेब नुकतेच गावाहून आले होते. निमंत्रण पत्रिका घेतली, जनमत तयार करण्यासाठी फारसा वेळच नव्हता. त्यामुळे तडक पोलिस स्टेशन गाठले. हातभट्टीचा वास सर्वत्र दरवळत होता. कुतूहलाने एका खोलीत डोकावलो तर नुकतेच जप्त केलेले दारूचे फुगे, रसायन यांनी खोली भरली होती. तिथंच एका बाजूला ठाणे अमलदार बसला होता. दोन्ही इन्स्पेक्टर परगावी होते. समोरच्या खुर्चीवर बसण्याची त्यांनी विनंती केली. वातावरणातला वास आम्हाला अस्वस्थ करतो आहे हे लक्षात आल्यावर तो आम्हाला दुसऱ्या खोलीत घेऊन गेला. आम्ही निमंत्रण पत्रिका त्याला दाखवली "श्री. चक्रधर प्रसन्न आणि श्री. कृष्ण वंदे अशी सुरुवात होती मधोमध बासरी वाजविणाऱ्या गोपाळ कृष्णाचे चित्र होते. 'संन्यास-दीक्षा-विधी समारंभ' असे ठळकपणे लिहिले होते. त्यानंतर गीतेच्या पाचव्या अध्यायातला दुसरा श्लोक छापला होता आणि मग 'सहर्ष कळविण्यात येते की, श्रीचक्रधरस्वामींच्या कृपाप्रसन्नतेने धर्मकुमारी कु. कुसुम व कु. शोभा आपल्या स्वेच्छेने, महानुभाव महाज्ञानानुसार, शुक्रवार तारीख २९-५-८१ रोजी ९-४५ या शुभमुहूर्तावर संन्यासाश्रमात पदार्पण करणार आहेत. यांचा धर्म सिद्धीस जाण्यास आपण उपस्थित राहून शुभचिंतन करावे' असा मजकूर होता.

पत्रिकेच्या खाली विनीत दत्तराज गोविंदराज दादा विश्वास यांचे नाव होते आणि आपले नम्र म्हणून आणखी मोजून २४ जणांची नावे होती.

पत्रिका बघून बिचाऱ्या पोलिसाला काहीच बोध होईना.

'असे कार्यक्रम फलटणात नेहमीच घडतात. आमचा याच्याशी काय संबंध?' तो म्हणाला.

आम्ही सांगितले, 'हे बेकायदेशीर आहे. कायद्याने याला परवानगी

नाही. आपण कारवाई करावयास हवी.' नोकरीत पांढऱ्याचे काळे झालेल्या बिचाऱ्याने हा कायदा कधी ऐकलाच नव्हता. तो बुचकाळ्यात पडला 'कायदा दाखवा', 'तक्रार द्या' मग वद्यू असे बचावाचे बोलू लागला. कायद्याचे पुस्तक घेऊन आम्ही पोलीस स्टेशनमध्ये गेलो नव्हतो. त्यामुळे घरी परतणे भाग होते.

प्रथम देवाशी लग्न

घरी परतण्याआधी मुद्दामहून कार्यस्थळी गेलो. 'श्रीकृष्ण सेवा आश्रम २१०, बुधवार पेठ, फलटण.' लग्नासाठी ऐसपैस मंडप टाकावा तसा मंडप टाकला होता. लाऊडस्पीकरवरून सिनेसंगीत चालू होते. लगीनघाईचे वातावरण सगळीकडे जाणवत होते. हिरवा चुडा भरलेल्या आणि हळदीच्या कपड्यात असलेल्या, मुंडावळ्या बांधलेल्या कुसुम आणि शोभा बावरलेल्या चेहऱ्याने बसलेल्या होत्या. पंगतीसाठी केलेल्या लाडवांचा ढीग पडला होता. एका बाजूला डोक्याचे चमन केलेल्या आणि काळे कपडे नेसलेल्या मध्यम आणि वयस्कर बायका होत्या. तर त्याचबरोबर गुलाबी लुंगी, गुलाबी नेहरू शर्ट आणि विशिष्ट पद्धतीने बांधलेला गुलाबी फेटा. अशा पोषाखातील महानुभावांच्या धार्मिक पंथातील कर्ती मंडळी वावरत होती.

लग्न आणि दीक्षा समारंभ हा नित्याचा भाग होता. मठात आजूबाजूला किंवा गावात काही विशेष घडते आहे असे वातावरण अजिबात नव्हते. महानुभावी पंथाची मोठी वस्ती फलटणात आहे. वार्षिक उत्सवाच्या वेळेस साऱ्या देशातून माणसे जमतात. पितळी घोडे डोक्यावर धरून मोठी मिरवणूक निघते. अंगात येते आणि त्यावर उपचार केला जातो. आबासाहेब आणि बाबासाहेब असे दोन मठ गावात आहेत. मुलीचे देवाशी लग्न लावणे याचा अर्थ तिच्या जीवनातील सर्वोच्च आनंद तिला देणे असा असतो. या मुली लहानपणीच मठात आणून सोडलेल्या असतात. आईवडील मुले होण्यासाठी किंवा अन्य स्वरूपाच्या संकट निवारण्यासाठी नवस बोलतात. तो फेडायला जन्माला आलेले मूल सोडले जाते. आजूबाजूला कळलेल्या माहितीप्रमाणे फलटणच्या मठात तरी ही मुले म्हणजे जवळ-जवळ सर्व मुलीच होत्या. या मुली मठाच्या धार्मिक संस्कारातच वाढतात. घर तुटल्याने मठच त्यांचे घर बनते.

आणि लगेच संन्यास —

वयात आल्यावर मुलींचा संन्यास दीक्षा समारंभ होतो. या वेळी

साधारणपणे त्यांचे वय १०-१२ वर्षांचे असते. परंतु बहुधा ते १८ वर्षांवर सांगितले जाते.

दीक्षा समारंभाच्या आदल्या दिवशी देवाशी लग्न लागते. दुसऱ्या दिवशी लगेच संन्यासच. सगळे केस पूर्णपणे कापले जातात. अक्षरशः तुळतुळीत चमन बनतो. हिरवा चुडा फोडला जातो. कुंकू पुसले जाते. काळी वस्त्रे अंगावर चढविली जातात आणि मग जन्मभर हा सक्तीचा संन्यास सोसावाच लागतो. अशा विद्रूप अवस्थेत सार्वजनिक ठिकाणी जाणेच शक्य नसते. त्यामुळे सगळे आयुष्य आपोआप मठात बंदिस्त होते. भावना, बुद्धी, तारुण्य, यांचा अक्षरशः होम होतो. सती जाण्याच्यामागे ही उदात्तता निर्माण करणाऱ्या आपल्या संस्कृतीने या प्रकारामागे संन्यास दीक्षाविधी समारंभाचे पावित्र्य आणि त्यांची गोंडस जाहिरात उभी केली नसल्यास नवल !

सारी माहिती मिळवून आम्ही मानेंचे घर गाठले. त्या वेळी रात्रीचे १० वाजले होते. वेठ-बिगार, शेतमजूर, भटके, फासेपारधी, झोपडपट्टीवाले, यांच्यात काम करणारे माने फलटण भागातले नामवंत वकील आहेत. जिल्ह्याच्या ठिकाणीही क्वचितच मिळेल अशी कायद्याच्या पुस्तकाची लायब्ररी त्यांनी केली आहे. त्यामुळे थोड्या वेळातच ' १९३४ चा देवदासी संरक्षण कायदा ' आम्हाला मिळाला. मानेंनी तो वाचला आणि मांडीवर थाप मारत म्हणाले. " वा ! आपली बाजू चांगलीच बळकट आहे. कोणत्याही स्त्रीस कायद्याच्या तिसऱ्या कलमाप्रमाणे स्वतःच्या इच्छेविरुद्धच नव्हे तर, पूर्ण इच्छेने सुद्धा देवाशी लग्न करता येत नाही आणि हा कलम ५ प्रमाणे दखल पात्र गुन्हा असून त्याला एक वर्ष सक्त मजुरीची तरतूद आहे. स्त्री या शब्दाची व्याख्याही कोणत्याही वयाची महिला असा. केला जातो आहे. त्यामुळे वयाचा प्रश्नच उद्भवत नाही."

पुस्तक घेऊन आम्ही पुन्हा पोलिस स्टेशन गाठले त्यावेळी १२ वाजत आले होते. हातभट्टीचा वास वाढला होता. बघितले तर मध्यंतरीच्या दोन तासांच्या काळात जप्त करून आणलेली एक सायकल आणि त्याच्यावरचे फुगे यांची आधीच्या माळांत भर पडली होती.

आम्ही कायदा दाखवला आणि तक्रार नोंदवून घेण्यास सांगितले. सर्वांच्या नोकरीतला अशा स्वरूपाची केस दाखल करून घेण्याचा पहिलाच अनुभव होता. त्यामुळे काय करावे हे त्यांना समजेना. त्यांनी सातारला जिल्ह्याच्या ठिकाणी वरिष्ठांशी संपर्क साधला. वरिष्ठांनी तरी या गोष्टी कधी ऐकल्या होत्या ? त्यांना

फोनवरून संबंधित भाग वाचून दाखवावा लागला. त्यांनी पुन्हा सरकारी पोलिस वकिलांना विचारले. कायद्याची खातरजमा केली. परिस्थिती हाताळण्यासाठी लोणंदच्या फौजदाराला फलटणला पाठविले आणि संबंधितांना घेऊन येण्यास पोलिस पाठविले.

स्टेशनमध्ये बसून राहण्यापेक्षा आम्ही घरी परतलो. रात्री अडीच वाजता दोन पोलिस बोलवावयास आले. मठामध्ये तेच गेले होते. प्राथमिक चौकशीमध्ये आमच्या तक्रारी मधले तथ्य त्यांना जाणवल्याचे ते सांगत होते. मुलींची वये ही १६, १७, अशीच असल्याची कबुली मुलींनी दिली होती.

पोलिस स्टेशनात पोहोचलो तर पाचसात बायका आणि दहा पंधरा पुरुष मंडळी बसलेली. सर्वच बायका काळ्या वेशात होत्या. त्यांच्यामध्ये हळदीच्या कपड्यांनी बसलेल्या, हिरवा चुडा भरलेल्या, सडपातळ अंगाच्या, मध्यम उंचीच्या, नाकीडोळी नीटस असलेल्या कुसुम व शोभा चटकन वेगळ्या दिसत होत्या. स्टेशनच्या मधल्या चौकात पुरुष मंडळी घोळका करून उभी होती. सर्वचजण भांबावलेले.

आम्ही तडक ऑफिसमध्ये शिरलो. लोणंदचे फौजदार विलास लाड आले होते. तक्रार नोंदवून घेण्याबाबत त्यांच्या मनात अजूनही शंकाच असावी. 'कायदा देवदासी संरक्षणाचा आहे. या मुली तर संन्यास दीक्षाच घेणार, या देवदासी कशा?' त्यांनी आपली शंका बोलून दाखविली. आम्ही त्यांना पुस्तकातले शब्द दाखवले. dedicated to God (डेडीकेटेड टू गॉड) असा शब्दप्रयोग आहे 'देवाला ज्यांना अर्पण केले आहे, अशा सर्व स्त्रिया' असा त्याचा अर्थ होतो असे सांगितले. कुसुम व शोभाला त्यांनी आत बोलविले. 'तुमचे लग्न देवाबरोबर झाले का?' या प्रश्नाला दोघींनी स्पष्टपणे होकार दिला. मग हवालदाराने फिर्याद नोंदवण्याचा कागद पुढे ओढला. तक्रार नोंदविली. तेवढ्यात बाहेर जमलेल्यांपैकी एक माणूस दारात आला. आत येऊ का? बोलावयाचे आहे, असे म्हटल्याने त्याला आत घेतले. महानुभव धर्म हा जगभर कसा पसरला आहे, कसा महान आहे, या धार्मिकविधी मागे कसे तत्त्वज्ञान आहे हे अजीजीने आम्हाला पटविण्याचा त्याने प्रयत्न केला. आम्ही त्याला सांगितले, 'धर्माबद्दल आमचे काहीच म्हणणे नाही. परंतु हा तुमचा विधी पूर्णपणे बेकायदेशीर आहे' आम्ही खोलीतून बाहेर पडलो. स्कूटर चालू करेपर्यंत आम्ही माघार घ्यावी यासाठी त्यांचे बोलणे चालू होते. ॲड. मानेंनी जागेचा

पंचनामा करण्यास सांगितले होते. त्या पुराव्याने केस चांगलीच बळकट होणार होती. पुरावा नष्ट केला जाऊ नये यासाठी दोन पोलिस कार्यस्थळावर पाठविण्यास सांगून आम्ही घरी आलो, त्या वेळी पहाटेचे चार वाजून गेले होते.

सकाळपासून मानेंच्या घरचा फोन खणखणू लागला. प्रतिक्रिया विविध होत्या. काही जणांनी तरुण मुलींच्यावरचा हा खुशीचा जुलूम थांबविल्याबद्दल धन्यवाद दिले. आम्हांला आदल्या दिवशी गावात याबाबत माहिती देणाऱ्या काही जणांनी आमचा पाठिंबा आहे, पण आम्हाला जास्त आत ओढू नका म्हणून विनंती केली. तर त्या भागाच्या लोक प्रतिनिधीने फोन करून, " कशाला उगीच असे केलेत आपली माणसे आहेत, त्यांच्याशी भेटून बोलायचे तरी, एकदम असे करणे बरोबर नाही," असे सुनवले. त्यावर मानेंनी उसळून, " तत्त्वाच्या बाबतीत कसली आली आहेत आपली आणि परकी " असे त्यांना खडसावले.

पोलिस स्टेशनला फोन केला. फलटणला त्या दिवशी कोर्ट नसल्याने मुलींना वडूजला पाठवण्यात आले होते. श्री. विद्वांसावर खटला दाखल झाला होता. संन्यासदीक्षा-विधी समारंभ अर्थातच बारगळला होता. पोलिसांवर एकंदरीत दबाव येत होताच; परंतु त्यांनी आपले काम चोख बजावले.

दहा वाजता पत्रकार परिषद झाली. या स्वरूपाचा हा महाराष्ट्रातला पहिलाच खटला होता आणि प्रबोधन चळवळीच्या दृष्टीने त्याला अर्थात बरेच महत्त्व होते. पत्रकारांनी तपशील घेता त्याबरोबर हिंदूंच्याच धर्मातच तुमचा हस्तक्षेप का ? मुसलमानांच्या बाबत मूग का गिळता ? हे नेहमीचे प्रश्न विचारलेच. अपवाद वगळता बातमी सर्वत्र दाबली गेली. बहुधा राजकीय वा सामाजिक दबाव आला असावा. ज्या ठिकाणी ती आली ती देखील मूळ मुद्दे बाजूला सारून वेगळ्याच स्वरूपात.

मानेंच्या निषेधाचा मोर्चा गावात निघणार याच्या बातम्या एव्हाना येऊन धडकल्याच होत्या. शिवाय आमचे हात दिल्लीपर्यंत आहेत, आमचे कोण काय करते बघू. असाही एक सूर होता. सातारचे कलेक्टर त्या दिवशी फलटणलाच होते. त्यांना मी व माने भेटलो. कलेक्टर खूपच उदारमतवादी. धर्माचे स्थान कुठले आणि त्याचा रूढीचा पिळवणूक करणारा कालबाह्य भाग कोणता, याची चांगली सामाजिक चर्चा या निमित्ताने चालू होईल असे त्यांना वाटले. मात्र आता यापेक्षा अधिक काही न करण्याचा सल्ला त्यांनी दिला. प्रकरणाची तपशीलवार माहिती घेतली. स्वतःच्या डायरीत नोंद घेतली. कुतुहलाने निमंत्रण पत्रिकाही

स्वतःकडे ठेवून घेतली. येणाऱ्या मोर्चाबाबत प्रांताधिकाऱ्यांना सूचना दिली.

चारशे लोकांचा मोर्चा निघाला. माने वकील मुर्दाबाद आणि पोलिसांच्या धिक्काराच्या घोषणा होत्या. पोलिसांनी धार्मिक कामात हस्तक्षेप केल्याचा जोरदार निषेध होता. लोणंदच्या फौजदारावर त्यांनी नंतर मुलींना असभ्य वागणूक दिली म्हणून खटला दाखल केला.

बाबा आढावांना फोनवरून सर्व कल्पना दिली होतीच. त्यांनी ताबडतोब ना. जयंतराव टिळकांना फोनवरून कळविले. इंदूताई टिळकांना सर्व प्रकरण प्रत्यक्ष भेटून सांगितले. पोलिसांनी योग्य खबरदारी घेतल्यास अनेक मुलींचा जन्माचा दुवा मिळेल असे इंदूताईच म्हणाल्या. मुख्यमंत्री अंतुलेंच्या बरोबरही बोलण्याचे त्यांनी कबूल केले. विरोधी पक्षनेते ग. प्र. प्रधानांच्या बरोबरही बाबा बोलले. सातारा जिल्हा पालकमंत्री अभयसिंह भोसले यांच्याबरोबर बोलण्याचे प्रधानांनी मान्य केले. जयंतराव टिळकही ना. भोसलेंच्या बरोबर बोलले.

सातारा शहरात माझ्या मित्राकडे फलटणची मंडळी धडकून गेली. कसेही करून दाभोळकरांनी केस मागे घ्यावी असे त्यांचे मागणे होते. त्यासाठी कोणत्याही तडजोडीला त्यांची तयारी होती. मित्रांनी त्यांना परस्पर वाटाण्याच्या अक्षता लावल्या.

बातमी हळूहळू सर्वत्र पसरली. आश्चर्याची आणि आनंदाची गोष्ट म्हणजे अनेकांना झाले ते योग्य असे वाटले. मुलींच्या जीवनाबद्दल अनेक महिलांनी, त्यात महानुभाव पंथीयांच्या स्त्रियादेखील होत्या, सहानुभूती दाखवली. " आता तरी स्वतःच्या पायाखाली काय जळते आहे आणि धर्माच्या नावाखाली रूढीच्या प्राबल्याने समाजातील बायकांची कशी परवड होते आहे, याचा शोध आणि बोध घेण्याची सुरुवात धर्माभिमानी करतील अशी आशा बाळगावी काय?" असे मी या निमित्ताने लिहिलेल्या लेखात लिहिले होते. या प्रकरणाचा पाठपुरावा चालू ठेवावा लागणार याची कल्पना होती.

दोन महिन्यांनी पुन्हा फलटणला गेलो. महिला समता परिषदेच्या तयारीची बैठक होती. महानुभाव पंथातील मुलींच्या संन्यास दीक्षा विधी समारंभाचा संदर्भ होता.

बैठकीला चाळीस पन्नास महिला होत्या. दहा-बारा पुरुष होते. विशेष

म्हणजे आय काँग्रेसचे तालुका अध्यक्ष, युवक आयचे जिल्ह्याचे अध्यक्षही होते. सौ. सुहासिनी माने प्रथम बोलल्या. याबाबत त्यांचा प्रथमपासूनच पुढाकार होता. त्यांनी नेमकी कल्पना दिली. महिला समता परिषदेचा उद्देश सांगितला. अन्य काही स्त्रिया बोलल्या. पुरुष मंडळींनी पाठिंबा दिला.

अठरा वर्षांची कल्पना बोलली. सडेतोड रोखठोक. "संपूर्ण नाव कल्पना शिवाजी खलाटे, गाव शिरस्वे, ता. बारामती, जात हिंदू मराठा. आम्ही चार बहिणी. वडिलांनी दोन लग्ने केली. दुसऱ्या लग्नानंतर काही दिवसांतच वडिलांनी चारी बहिणींना मठाला देऊन टाकले. धाकटी बहीण त्या वेळी अंगावर पीत होती. पुढे वडिलांचा सहा महिन्यांतच खून झाला. सख्खी आई वाईट मार्गाला लागली. आम्ही पंधरा वर्षे फलटणातच मठात वाढलो. दोन नंबरची बहीण अंजना. मी तीन नंबरची कल्पना. आम्हाला पाच-सहा वर्षांपूर्वी म्हणजे आम्ही बारा तेरा वर्षांच्या असतानाच दीक्षा दिली. सगळ्यात धाकटी बहीण आशा. तिने संन्यास घेण्याला नकार दिला. तिच्याबाबत गैर प्रकार घडला. म्हणून आम्ही मठ सोडला. सुदैवाने आशाचे लग्न झाले. आम्ही पाच महिने आता बाहेरच राहतोय. पोटाचा प्रश्न म्हणून परंपरागतपद्धतीने पहिल्यांदा कऱ्हाडला भिक्षा मागितली काही दिवसांची सोय झाली. पुन्हा प्रश्नच. पण आता हिम्मत बांधलीय. शिवण क्लासला नाव घातलयं. अंजनानेही मठ सोडलाय, पण संन्यास सोडलेला नाही. संन्यास सोडण्याची तिला मनातून भीती वाटतेय. पण हे खरे नव्हे. आमचे होऊन गेले, इतरांची वरवादी नको. सगळी बंधने संन्यास घेतलेल्या बायकांवरच. ती पुरुषावर कुठे आहेत ? मी म्हणते हा संन्यास बंद करावा. ज्याला धर्माचे काम करायचे त्यांनी रोखठोक करावे. केसाचे मुंडन कशाला."

कल्पना बरेच बोलत होती. नाकी डोळी नीटस. काळ्या वस्त्रातही दहा जणांच्यात उठून दिसेल अशी. खुद्द फलटणमध्ये असे बोलण्याची काय किंमत द्यावी लागेल याची तिला कल्पना नव्हती असे नव्हे. महानुभाव पंथाच्या दृष्टीने संन्यास विधी अतिशय महत्त्वाचा होता. त्या धर्मातील सर्वांच्या त्याबद्दलच्या भावना तीव्र होत्या. पण आतून उठणारी उकळी तिला गप्प बसू देत नव्हती. भारतातील महानुभाव पंथातील ही पहिली बंडखोरी,धर्माविरुद्ध केलेली !

दिवस गेले तरी पोटापाण्याचे काय हा प्रश्न तीव्रच बनत चालला. घरातले सामानसुमान, पोटापाण्याच्या व्यवसायासाठी काही भांडवल, याची गरज होती. ॲड. जी. बी. माने आणि सुहासिनी बाईंनी मुख्यमंत्र्यांना भेटायचे ठरवले.

बुवाबाजीविरुद्ध झुंज

बॅ. अंतुले त्या वेळी मुख्यमंत्री होते. त्यांचा दरबार पुण्याला होता. तिथे भेट घेतली. बरोबर कल्पना व अंजना होत्याच. त्यांची बंडखोरी सांगितली. मदतीची मागणी केली. मुख्यमंत्र्यांना आवाहन पोचले. त्यांनी प्रत्येकी ५ हजार रु. मंजूर केले.

नोव्हेंबरमध्ये फलटणला परिषद झाली. पाच-सहाशे बायका जमल्या होत्या. सगळ्या जाती, धर्माच्या होत्या. बाबा आढाव होते त्या वेळचे समाज-कल्याण मत्री, ताराबाई वर्तक आणि वाहतूक मंत्री-बाबासाहेब भोसले होते. संन्यासविधी प्रकरण आणि एकूण स्त्रियांचे अन्यही प्रश्न यावर जोरदार भाषणे झाली. बाबासाहेब भोसले मुख्यमंत्री निधीचे प्रत्येकी ५००० चेक घेऊन आले होते. समारंभपूर्वक ते कल्पना व अंजनाना देण्यात आले. दोघीनांही आपले काळे कपडे टाकून देऊन आल्या होत्या. अशा धार्मिक रूढी विरुद्धच्या बंडखोरीबाबत मुख्यमंत्र्यांनी आणि तेही अल्पसंख्याक समाजातील अशी वाजत-गाजत मदत करावी ही उमेद वाढवणारी गोष्ट होती.

साथीदारावर दडपण येईल. ते धर्माचे प्रमुख ठिकाण आहे तेव्हा सातारला हा खटला चालवावा अशी आम्ही विनंती केली. कलेक्टरांनी ती नामंजूर केली. तब्बल तीन वर्षांनी खटला सुनावणीला निघाला. फलटणला सातारकरांच्या कोर्टात. कोर्टाची खोली आत पाय ठेवायला जागा नाही इतकी गच्च भरलेली. खोलीत आणि बाहेरच्या प्रशस्त व्हरांड्यात सगळे महानुभव पंथीय, आरोपीच्या पिंजऱ्यात मठाधिपती दत्तराज गोविंदराज दादा विद्वांस आणि शोभा व कुसुमचे आईवडील. कारण देवाशी लग्न लावायला मुलीला सोडणारे आईवडीलच म्हणून तेही गुन्हेगार.

पहिल्यांदा शोभा आणि कुसुम यांची साक्ष झाली. शोभा आणि कुसुम या अगदी लहानपणापासून मठात वाढलेल्या. संन्यासाचा विचार घट्टपणे त्यांच्या डोक्यात बसवलेला. कऱ्हाड महिलासुधार गृहातला महिना वगळता मधल्या तीन वर्षांच्या काळात पुन्हा मठातच राहिलेल्या. सगळ्या दबावाखाली त्या फुटणार हे गृहीत होते. तसेच झाले. संन्यास विधीच्या पत्रिका छापलेल्या होत्या. त्यामुळे ते नाकारणे शक्य नव्हते. परंतु आम्ही संन्यास घेणार आहोत,त्यात देवाशी लग्न हा प्रकार नसतो असा ठेका त्यांनी लावला. हळदी लावल्या होत्या. मळवट भरला होता. हिरवा चुडा होता. कपाळावरची केसाची बट कापली होती हे सर्व नाकारले. खोटे बोलण्याची त्यांची तालीम

अगदी घासून पुसून घेण्यात आली होती. मांडववाले, पत्रिका छापणारे ही मंडळी ही धंद्याने बांधलेली. समाजात दबाबाखाली त्यांनीही पढवलेली साक्ष दिली.

वृत्तपत्रात या खटल्याला बरीच प्रसिद्धी मिळाली. कायदा १९३४ साली झालेला आणि त्याखाली पहिला खटला सुनावणीस आला. १९८४ साली, तब्बल ५० वर्षांनी. साक्षीदार फुटले याचा गाजावाजा बराच झाला. मला सहानुभूतीदाराची पत्रेही आली. तुम्ही मोठ्या शर्तीने केस घातलीत पण यश येणार का ?

लग्न लावण्याचा विधी नाकारला जात होता. मला जाणवत होते. आपण तयारीत कमी पडलो. पोलीस स्टेशनावर शोभा आणि कुसुम आल्या. त्या वेळी हळदीच्या त्या कपड्यांनी आणि भरलेल्या चुड्यांनी आल्या होत्या. त्या वेळी रंगीत फोटो घेतला असता तर !

माझी साक्ष ५ जुलैला झाली. तीन तास उलटतपासणी चालली होती. "देवदासी वेगळी आणि महानुभव पंथाची दीक्षा घेतलेली संन्यासिनी वेगळी. हे माझ्या तोंडून वदवावे म्हणून खूप खटपटी लटपटी झाल्या. देवदासी, वेश्याव्यवसाय करतात या संन्यासिनी कुठं करतात ? असा प्रश्न विचारण्यात आला. देवदासीही व्यवसाय करतातच असे नाही पण देवाशी लग्न ही गोष्टच अनैसर्गिक अनैतिक व बेकायदेशीर आहे म्हणून याला विरोध." मी. मला देवदासी प्रतिबंधक कायदा काढून हातात दिला व सांगितले, " वाचा आणि त्यातला देवाशी लग्न हा शब्दप्रयोग कुठे आहे तो सांगा आणि कायद्यात हा शब्दप्रयोगच नसताना या कलमाखाली तुम्ही खटला घातलाच कसा ? " मी कलम वाचले. खरे होते. शब्दप्रयोग ' Dedication to God ' देवाला वाहणे असा होता. देवाशी लग्न असे कुठेच म्हटले नव्हते. क्षणभरात मी चमकलो पण उत्तर सुचले. मी म्हणालो ' Dedication to God. includes marriage plus some thing more? देवाला वाहणे या शब्दप्रयोगात विवाहासह काही अधिक शक्यता गृहीत धरल्या आहेत. तीन तासांनी उलट तपासणी संपली तेव्हा वकील म्हणाले, ' चांगला जबाब दिलात ? मठातून बाहेर पडून लग्न केलेल्या कल्पनाची साक्ष खरे तर त्याच दिवशी होणार होती. आपल्या दीड वर्षाच्या मुलाला व वृद्ध सासऱ्यांना घेऊन ती साक्षीला आली होती. कोर्टात आपली सारी बिरादरी विरोधात उभी असल्याचे पाहून चमकली. परंतु तशी खंबीर होती. माझीच साक्ष संपायला साडेपाच वाजले. मग तिची साक्ष दुसऱ्या दिवशी घेण्याचे ठरले.

दुसऱ्या दिवशी दुसरेच खेकटे काढण्यात आले. आरोपींनी सातारच्या जिल्हा कोर्टात अर्ज केला. या न्यायमूर्तींच्याकडून आम्हाला न्याय मिळेल असं वाटत नाही. हा खटला दुसऱ्या न्यायमूर्तींच्याकडे वर्ग व्हावा. त्याच्या तारखा पाडण्यास तब्बल दहा महिने गेले. सातारच्या कोर्टात या अर्जाची अजून सुनावणीही झाली नाही.

* *

अकरा

परिशिष्ट

१. आपल्यासाठी

नाव– धंदा– धर्म–
वय– लिंग– शिक्षण–
आर्थिक परिस्थिती-- गरीब मध्यम उच्चमध्यम श्रीमंत
पत्ता—

---

(१) पुढील गोष्टींवर आपला विश्वास आहे काय ?

विषय	होय	नाही	अनिश्चित
(१) परमेश्वर			
(२) पुनर्जन्म			
(३) सिद्धान्त			
(४) आत्मा			
(५) प्लँचेट			
(६) भुते			
(७) नवस			

(८) फलज्योतिष
(९) हस्त सामुद्रिक
(१०) शुभाशुभ संख्याशास्त्र
(११) शकुनाचा आकडा
(१२) शकुनाचा खडा
(१३) शकुनाचा रंग
(१४) शकुनाचे वाहन
(१५) श्राद्धविधी
(१६) भूमिपूजन
(१७) वास्तुशांत
(१८) जन्माधिष्ठित जातिश्रेष्ठता
(१९) स्वर्ग
(२०) नरक
(२१) मुंजविधी
(२२) पत्रिका जुळणे (वधूवरांच्या)
(२३) वटसावित्री
(२४) सत्यनारायण
(२५) अंगात येणे (भुते)
(२६) अंगात येणे (देव)

(२) तुमच्या घरात देव आहेत का ?
किती ?
पूजा करता का ?
किती वेळ ?
कारणे— परंपरा / इच्छापूर्ती / मनःशांती

(३) आपली प्रिय देवता आहे का ?
(उदा. राम, दत्त, श्रीकृष्ण)

(४) देवदर्शनासाठी नियमित जाता का ?
(किंवा मशिदीत वा चर्चमध्ये)
(अ) जात असल्यास कारण–परंपरा / इच्छापूर्ती / मनःशांती

(५) होऊन गेलेले कोणी संत,बाबा आपले
विशेष आवडते आहेत काय ?

(६) हयात संत, बाबा गुरू इ. कोणी आपले
आवडते आहेत काय ? कोण ?

(७) वेद / बायबल / कुराण यातले
खरे आहे असे आपण मानता काय ?
(अ) हे ग्रंथ परमेश्वराने लिहिले आहेत—
असे आपण मानता काय ?

(८) अचानक संकट आल्यास एखादा मंत्र जपता का ?

(९) मृत्यूनंतर नेत्रदान करू इच्छिता का ?

(१०) मृत्यूनंतर संस्कारयुक्त दहन वा दफन /
संशोधनाकरता मृतदेह वैद्यक महाविद्यालयास देणे /
संस्कार विरहित विद्युत भट्टीत दहन
कोणते तुम्हाला योग्य वाटते ?

(११) आपल्या वाचनापैकी टक्केवारी सांगा.
(१) ललित (२) वैचारिक (३) धार्मिक

(१२) एखाद्या धार्मिक ग्रंथाचे पारायण करता का ?

(१३) गोहत्या बंदी आवश्यक वाटते का ?
असल्यास कारण– धार्मिक, आर्थिक, परंपरा म्हणून

(१४) आपणास मान्य की अमान्य सांगा.
(अ) एककोटी रामनामाचा जप पुण्यप्रद असतो.
(आ) नारायण नागबली विधीमुळे मुलगा होतो.
(इ) गुरुमंडळी चमत्कार घडवू शकतात.
(ई) गंगेत स्नान केल्यामुळे पापे धुऊन जातात / मक्केला जाण्यामुळे, दर्शनामुळे.
(उ) लुर्द येथील चमत्काराने कॅन्सरसारखे रोग बरे होतात.
(ऊ) काही देव / पीर / चर्चेस / नवसाला जास्त पावतात.
(ए) प्रार्थनेमुळे शारीरिक रोग दूर होतात.
(ऐ) मरताना परमेश्वराचे नाव घेतल्यास स्वर्गप्राप्ती होते.

(ओ) माणसाच्या नशिबात जे काही असेल ते होणारच. ते कोणी बदलू शकत नाही.

(औ) मंत्राने कावीळ, सर्पदंश इत्यादी विकार बरे होतात.

(अं) अंगारा लावल्यास रोगग्रस्त माणसास उतार पडतो.

(अः) रुद्राक्षमाळा घातल्याने आरोग्य सुधारते.

(क) नवग्रहाच्या अंगठ्या वापरल्यास संकटे टळतात.

(ख) महारोग, वंध्यत्व, कोड, पूर्वजन्मीच्या पापामुळे होतात.

(ग) मंत्र, जप वा यज्ञ केल्याने ग्रह शांत होतात.

(घ) ठराविक दिवशी ठराविक देवांचे दर्शन घेणे चांगले असते.

(च) आपला धर्म सोडून दुसरा स्वीकारणे यासारखे पाप नाही.

(छ) धर्माकरता केलेल्या युद्धात जिहाद मध्ये दुसऱ्याला मारणे पाप नाही.

(ज) स्त्रियांना आत्मा नसतो.

(झ) स्त्रिया पुरुषांच्या पेक्षा कमी बुद्धिमान असतात.

(ट) मुलांना आई-वडिलांचा धर्म पाळण्याची सक्ती असावी.

(ठ) मरता-मरता वाचलेला माणूस परलोकातील अनुभव सांगू शकतो.

(ड) शाळेत धार्मिक शिक्षण सक्तीचे असावे.

(ढ) धार्मिक कार्यक्रमासाठी सरकारी पैसा खर्च होण्यास हरकत नसावी.

(ण) यज्ञ वा अग्निहोमामुळे दूषित वातावरण शुद्ध होते.

(१५) विज्ञाननिष्ठा व मानवता हाच जगाचा धर्म असावा असे आपणांस वाटते काय ?

* *

२. नार्वेकर गुरुजींचा अखेरचा 'निरोप'

(कॉ.नार्वेकर हे कोल्हापूरचे ज्येष्ठ सत्यशोधक.ते अलीकडेच वारले.त्यांचे मृत्यूपत्र)

चि. वसंत आणि चि. भरत ऊर्फ बापू यांस आशीर्वाद.

एक वेळ अशी येणार आहे की, माझ्या व सौ. लक्ष्मीच्या मृत्यूमुळे तुम्ही दोघेही गर्भगळित होऊन गोंधळून जाणार आहात (आम्ही दोघे एकाच वेळी मरू असे घडणार नाही; तसे घडावे अशी आमची आतारिक इच्छा आहे.) अशा वेळी प्रेतयात्रेकरिता जमणारे काही लोक सांगतील त्याप्रमाणे तुम्ही भयभीत परिस्थितीत कृती करण्यास तयार व्हाल. म्हणून तुम्हांला या जाहीर पत्राद्वारे धोक्याचा इषारा आम्ही देत आहोत. आम्हा दोघांच्या मृत्यूनंतर तुम्ही कोणताही धार्मिक विधी करता कामा नये. फक्त अग्नी देऊन प्रेताची विल्हेवाट लावावी.

आपल्या घरात देवा-धर्मासंबंधीचा कोणताही विधी आपण करीत नाही. आपल्या लहान मुलांच्यावर देवाधर्माचे घाणेरडे संस्कार होऊ नयेत म्हणून आपण अत्यंत काळजी घेत असतो. बोलण्यात पुरोगामीपणा आणि आचरणात प्रतिगामी कृती हे आपण कधीच केलं नाही. स्वतः बुद्धिप्रामाण्यवादी आहोत असे लोकांना सांगायचे आणि घरात निर्बुद्धतेची प्रतीकं असलेली सत्य-नारायणाची पूजा वगैरे सर्व धार्मिक कर्मकांडे करायची. असे आचरण आपण कधीच केले नाही. प्रथम स्वतःच्या घरात सुधारणा, आणि मग दुसऱ्याला उपदेश यात आपण शंभर टक्के यशस्वी झालो आहोत.

धर्म म्हणजे कायदा आणि नीती म्हणजे कानू; तसेच देव ही एक कल्पना आहे. हे तत्त्वज्ञान आपण आत्मसात केल्यामुळे यासंबंधीचे आपले आचरण अत्यंत शास्त्रशुद्ध आहे. समाजाची फसवणूक करण्यासाठी काल्पनिक मूर्तिपूजा, तीर्थयात्रा, उपास-तापास वगैरे धूर्तांनी तयार केलेले मृगजळ आहे. शहाण्यांनी सांगितलेल्या पापपुण्याच्या कल्पना हे एक थोतांड आहे, प्रत्येक मनुष्य जन्माला येतानाच बरोबर मृत्यूही घेऊन येत असतो, कोण किती वर्षे सन्मानाने जगतो एवढाच प्रश्न आहे. त्याने समाजाकरिता जे काही चांगलं वाईट केलं असेल तेवढंच मागं राहतं. येताना नंगा आणि जातानाही नंगाच जात असतो.

आम्ही गरिबीत प्रपंच सांभाळून आमच्या कुवतीप्रमाणं राजकारण आणि समाजकारण केलेलं आहे. अर्थात अखेरपर्यंत आपण दरिद्रीच राहिलो. आम्ही तुमच्यासाठी संपत्ती साठवून देऊ शकलो नाही. मात्र गुरुवर्य केशवराव विचारे यांच्या कृपेने पुरोगामी विचारांचं धन आम्ही तुम्हाला दिलेलं आहे. दिवंगत विचारे यांनी आम्हाला शास्त्रीय दृष्टी दिली. त्यांनी दिलेल्या बौद्धिक ज्ञानामुळेच आमची आजची वैचारिक प्रगती दिसते.

मृत्यूनंतरचे सोपस्कार :

हिंदू धर्म रूढीप्रमाणे माणसाच्या मृत्यूनंतर त्याला बाहेर आणून त्याच्या अंगावर चार तांबे पाणी ओतले जाते. एका मातीच्या लोटक्यात तांदूळ शिजवल्या-सारखे करतात. नंतर प्रेताला तिरडीवर बांधून, अबीर, बुक्का लावून प्रेतयात्रा सुरू होते. प्रेताच्या जवळच्या नातलगाने तांदूळ घातलेले ते लोटके हातात घेऊन पुढे चालायचे असते. प्रेतयात्रेतील लोकांनी भरपूर झोकलेली असेल तर त्या प्रेताचे हालच. नंतर पुढे स्मशानभूमीच्या अलीकडे ते प्रेत खाली उतरायचे त्या ठिकाणी ते तांदळाचे लोटके फोडायचे, आणि मोठ्याने बोंब मारायची. हे कशा-करिता आणि का करायचे ? हे कोणाला विचारल्यास कोणाला काहीच सांगता येत नाही. ' वडील जे जे करिती तया नाम धर्म ठेविती, आणि तेची आचरती इतर सकळ ' असे संतांनी परोपरीने सांगितले आहे. तरीही समाजामध्ये बुद्धिभ्रंश करणारी आंधळी परंपरा अखंडपणे चालूच आहे.

स्मशानभूमीतील विधी :

त्यानंतर ज्यांनी सुरुवातीला खांदे दिले होते, त्यांनीच मग ते प्रेत स्मशान-भूमी पर्यंत न्यायचे.मग सरणावर प्रेत ठेवायचे. नंतर त्याच्या जवळच्या नातलगाने एका मातीच्या लोटक्यात पाणी भरून ते खांद्यावर घ्यायचे आणि प्रेताच्या भोवती पाठीमागे सरकत फिरायचे. पाच फेऱ्या घालायच्या. प्रत्येक फेरीला एक-एक भोक पाडायचे, नंतर ते लोटके फेकून देऊन ठो ठो मोठ्याने बोंब मारायची. हे कशाकरिता करायचे ? याची काही आवश्यकता आहे का ? नाही. पण पारंपरिक प्रथेप्रमाणे करायचे ! एवढेच लोकांना शिकविले आहे. नंतर मग हरेटी प्रत्येकाने घ्यायची आणि प्रेताच्या तोंडात पाणी घालायचे. मग स्मशानातील कामगाराने एक पूर्वापार चालत आलेला ' बोल ' बोलायचा. नंतर प्रेताला अग्नी लावायचा.

आपल्या कोल्हापुरात प्रेत जाळण्याचे विद्युतगृह नाही. ती फारच चांगली पद्धत आहे. त्याचं काहीच शिल्लक राहत नाही. सर्व जळून खाक होते. दुसऱ्या प्रेताला जागा रिकामी करून देण्याचा प्रश्नच नाही. कोल्हापुरात विद्युतगृह झाले तर आमच्यासाठी त्याचा उपयोग करा.

कावळ्याचे शिवणे :

त्यानंतरचा विधी म्हणजे राख सावडणे आणि नंतर दशपिंड. दशपिंडाच्या वेळी मृताच्या मुलांनी अगर जवळच्या नातलगाने स्मशानभूमीत जाऊन नदीवर आंघोळ करायची. न्हाव्याकडून संपूर्ण केस काढून घ्यायचे. मग पुरोहित भटजी सांगेल त्याप्रमाणे विधी करायचा. (बारशापासून बाराव्यापर्यंत भटजी लागतोच) मेलेल्या माणसाच्या आत्म्याला समाधान मिळावे म्हणून, चांगले जेवण करून ते पत्रावळीवर वाढायचे आणि कावळ्यांना काव-काव करून हाका मारायच्या आणि वाढलेल्या पानापासून दूर जाऊन बसायचे. जर कावळा चटकन् पानाला शिवले तर मेलेला माणूस भाग्यवान होता असे म्हणायचे, कावळ्याने लवकर पानाला शिवले नाही, तर मग त्याची इच्छा कोठेतरी अडकली असावी म्हणायचे आणि त्याच्या आवडीचा पदार्थ उदा. दारू वगैरे (सुद्धा) आणून त्या पानावर ठेवायची आणि थोडे लांब जाऊन बसायचे. तेवढ्यानेही कावळा पानाला शिवला नाही तर, मग त्याची मुलगी अगर मुलगा असेल तर त्याचे आम्ही पालनपोषण चांगलं करू, लग्न करू, तू काळजी करू नकोस, असं गाऱ्हाणं घालून पुन्हा आणि थोडं अधिक लांब जाऊन बसायचे, माणसे थोडी अधिक लांब गेली म्हणजे कावळा चटकन येतो आणि अन्नाला चोच मारून जातो. मग लगेच सर्वांनी म्हणायचे, "त्याचा जीव मुला-मुलींत घुटमळत होता." वगैरे. कावळा का पानाजवळ येत नाही ? त्याला वाटते की, "ही कंजूष माणसे एरवी उष्ट्या हाताने कावळा उसकणारी, आज आम्हाला मुद्दाम बोलावून जेवणाचे सर्व पानच का देत आहेत ? यात काही तरी धोका असावा. प्रत्येक प्राणी आपल्या जिवाला भयंकर भीत असतो, त्याचा अर्थ माणसं आपणाला पाहिजे तसा काढतात. पानापासून माणसे खूप लांब गेली असली तरी कावळा ते अन्न निवांतपणे खात बसत नाही. एक चोच मारतो आणि उडून जातो. कावळ्याने पानाला शिवलं की, जमलेली माणसे निघून जातात आणि मग कावळे यथेच्छ पानावर ताव मारतात. शहरातील स्मशानभूमीत कावळे सरावलेले असल्यामुळे ते लवकर

पानाला शिवतात. खेड्यावर कावळे पानाजवळ लवकर येत नाहीत.

कावळे आमचे वडील :

सर्व पक्ष्यांमध्ये घाण पक्षी कावळा आणि तो आमचा वडील ? आमच्या धर्मगुरूंनी, भिक्षुकांनी बहुजन समाजाला वर्षानुवर्षे मूर्ख नि निर्बुद्ध बनविण्यात यश मिळवलेलं आहे. वर्षाला वडिलांचे श्राद्ध घालायचे. त्या वेळी सर्व प्रथम कावळ्याला जेवण द्यायचे आणि मग इतरांनी जेवायचं. असे केल्याने स्वर्गातील सर्व पितर शांत होतात. हे केलं नाही तर जणू काय ते स्वर्गात बंड करून उठतात ! बुद्धीला न पटणारी अशी कृती, अपवाद वगळता चांगले शिकलेले पदवीधर, स्वतःला बुद्धिप्रामाण्यवादी आणि पुरोगामी म्हणवून घेणारे लोक, अत्यंत भाविकपणे सातत्याने करीत असतात. तेव्हा तुम्ही यापैकी कोणताच विधी करू नका. कोणाकडून तरी राख तेवढी नदीत टाकण्याची व्यवस्था करा. कारण दुसऱ्या प्रेताला जागा मोकळी करून दिली पाहिजे.

तुम्ही हे वरील वेडगळ प्रकार करता कामा नये. लोकमताला भिऊन जर कदाचित तुम्ही डळमळीत झालात, तर आम्ही आतापर्यंत केलेले कार्य वाया गेले असे होईल. आमची प्रेते माणसांनी खांद्यावरून नेण्यापेक्षा महानगरपालिकेच्या शववाहिकेतून अगर इतर कोणत्याही वाहनातून न्यावीत. आम्ही मेल्यानंतर तरी खांदा देणाऱ्या मंडळींना आमचा त्रास का ?

मुलांचे मुंडण :

बाप मेल्यानंतर मुलांनी मुंडण का करायचे ? याला काही बुद्धीला पटेल असे उत्तर नाही. जिवंत माणसांच्या केसाचा आणि त्या मृत देहाचा अर्थाअर्थी संबंध काय ? असा प्रश्न कोणी निर्माण करीत नाहीत, त्याविरुद्ध प्रचार नाही. मेंढराप्रमाणे सर्व समाज गतानुगतिक अनंत काळ चालत आला आहे. याविरुद्ध वैचारिक बंड कोण करणार ? नेते मंडळींना त्याची गरजही भासत नाही. सत्तास्थाने मिळाली की झाले.

प्रचाराचा अभाव :

वेडगळ चालीरीतीपासून समाजाला परावृत्त करण्याचा प्रयत्न साधु संतांनी आणि समाज क्रान्तिकारांनी अहर्निशपणे केलेला आहे. पण त्यांच्या

प्रचाराची शक्ती अपुरी पडली. धर्मगुरूंच्या आणि राज्यकर्त्यांच्या मार्फत होणाऱ्या प्रचाराच्या ढोलताशांच्या आवाजात त्यांच्या टिमकीचा आवाज समाजाला ऐकूच येत नाही. उदा. जनार्दन महाराजांचा अभंग पहा, भजन चालले उफराटे....

अर्थात या अभंगातील ओव्या तुम्हा दोघांनाही लागू नाहीत. कारण तुम्ही आमची खूप सेवा केली आहे. तुम्ही अखेरपर्यंत आज्ञाधारक राहिलात. आमचा शब्द तुम्ही कधीच ओलांडलेला नाही. हे आम्ही अभिमानाने लिहून ठेवीत आहोत. पण अपवाद वगळता सर्व समाजाकडून वरील अभंगाप्रमाणेच कृती घडत असते. आईबाप जिवंत असताना त्यांचे तोंडही बघायचे नाही आणि ती मेल्यानंतर त्यांच्या नावाने सर्व सोंगं ढोंगं करायची? भटाला वडिलांच्या नावे गाय दान द्यायची. जेवणावळी घालायच्या, वर्षश्राद्ध करायचे, त्यांच्या नावाने तांब्या पितळेचे टाक तांबटाकडून करून घ्यायचे आणि ते देव्हाऱ्यावर पूजायचे. अशा प्रकारचे विविध विचित्र विधी, समाज आंधळेपणाने अनादी काळापासून करीत आलेला आहे. हाच आपला खास धर्म. अशी त्यांची समजूत करून दिली आहे. पाप होऊ नये, पुण्य घडेल या भीतीच्या पोटी बुद्धीला न पटणारे विधी समाज सातत्याने करीत आलेला आहे.

काल्पनिक पोथ्यापुराणे :

अस्तित्वात नसलेला स्वर्ग, अशा स्वर्गातील वडिलांचा, पितरांचा आत्मा शांत करण्यासाठी स्वतःची बुद्धी धर्मगुरूंच्याकडे गहाण ठेवून नाना प्रकारचे विधी करण्यात येतात. पृथ्वीवर ब्राह्मणाला गाय, वस्त्र, भांडी, पैसा, वगैरे दान दिले म्हणजे स्वर्गातील आत्म्यांना शांती मिळते आणि ही किमया भटजी आपल्या जोरावर करतो, असे समाजाला भासवले जाते. कल्पनेने रचलेल्या असंख्य पोथ्या-पुराणांतून हे सर्व थोतांड लिहून ठेवलेले आहे.

सत्याचा लोप—पापाची चलती :

एकदा माणूस मेला म्हणजे सर्व काही संपले. पंचमहाभूतांपासून बनलेला देह पंचमहाभूतांत विलीन होतो हे खरे शास्त्र नि तत्त्व आहे. तुकाराम महाराजांनी यावर एक मार्मिक अभंग केला आहे. 'पंचभूते जाती लया' त्या शिवाय तुकाराम महाराजांनी हे ही सांगितले आहे की, 'जन्म नाही रे हा आणिक, तुका म्हणजे माझी भाक' याउलट आपला सनातनी धर्म सांगतो की,

चौऱ्याऐंशी लक्ष योनी फिरल्यानंतरच मनुष्यजन्म मिळत असतो. तेव्हा माणसाने या जन्मात हरिनामाचा जप करीत सर्व आयुष्य घालवावे. दगडधोंड्याच्या पूजा-अर्चा कराव्यात, तीर्थयात्रांना जावे. असे केले तरच माणसाला मेल्यानंतर मोक्ष मिळतो. 'मोक्ष मेल्यापाठी आम्हासी होईल ऐसे जे म्हणतील अतिमूर्ख--ऐसे मूर्ख अज्ञान जन--केले संकल्प बंधन--शत्रु आपणासी आपला होऊन गेले--' असे ज्ञानेश्वरांनी आपल्या अनुभवाअंती आवर्जून सांगितले आहे. पण त्यांनी केलेल्या उपदेशांची नावनिशाणीही तथाकथित धर्मगुरूंनी शिल्लक ठेवलेली नाही. आज सगळीकडे सत्याचा लोप झाला आहे आणि पापाची चलती आहे.

खोट्या प्रचाराचा प्रभाव :


बहुजन समाजाला वास्तवतेपासून वंचित करण्यासाठी खोटा प्रचार निरनिराळ्या साधनांद्वारे सत्ताधीश-राज्यकर्ते आणि धर्मगुरू यांनी अनादी काळापासून आजतागायत अहर्निश चालू ठेवलेला आहे. हेतू हा की, परोपजीवी धर्मगुरूंना कष्ट न करता फुकटात खायला मिळावे आणि पिळवणुकीवर आधारलेल्या अर्थव्यवस्थेला, सत्ताधीशांच्या जुलमाला समाजाने विरोध करू नये. कष्टकरी वर्गाकडून त्यांच्या सत्तेला धोका पोहचू नये यासाठीच त्यांनी हेतुपुरस्सर काल्पनिक देवधर्माचा सापळा, बहुजन समाजासाठी तयार करून ठेवलेला आहे. याच मायावी मोहात राबणारा वर्ग अनंत काळापासून खितपत पडलेला आहे. सारांश, बहुजन समाज आपल्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाची वेळ आणि स्वतःची अचाट शक्ती आणि बुद्धी या काल्पनिक कर्मकांडात घालवतो. साधुसंतांनी, समाजसुधारकांनी, महात्मा फुले, आगरकर यांनी केलेला उपदेश हवेतच विरून जातो. त्यांच्या कार्याचा, तत्त्वांचा असर समाजावर होता कामा नये, अशी प्रचार यंत्रणा सत्तेच्या साधनांतून करण्यात आलेली आहे. आजचे रेडिओ, टी. व्ही., वृत्तपत्रे, दोन कोटी भिकारी, बुवाबाजी करणारे हजारो साधू व भोंदू, मंत्री व पुढारी, (अपवाद वगळता) आर. एस एस. हिंदू एकता, पतित पावन संघटना, सर्व धर्मगुरू इत्यादींच्या मार्फत समाजाला गुंगविण्याचे कार्य अहर्निश चालू आहे. देवधर्माच्या आचरणाने जर कोणाचा फायदा होत असेल तर तो मूठभर मुत्सद्दी माणसांचा. सर्वसामान्य समाजाला अंधश्रद्धारूपी अफूच्या गुंगीत ठेवल्याने त्यांच्यावर निरंकुश सत्ताही गाजवता येते. आणि त्यांनी स्वकष्टाने निर्माण केलेली संपत्तीही मन मानेल तशी लुटता येते. बहुजन समाज

कसा आहे. त्याचे वर्णन एका ओवीत संतांनी सांगितले आहे. " एक तांब्याचे बाहुले केले। पाट मांडून वर बैसविले। मना आले ते नाव ठेवले गा । या जगाशी लागले वेड " अशा प्रकारच्या वागणुकीमुळेच बहुसंख्य समाज आज दैववादी, दुबळा, बनला आहे. त्यांच्यांतील माणुसकीचे चैतन्यच नष्ट झाले आहे.

सारांश, तुम्ही कसल्याही प्रकारचा विधी करू नका. आम्ही उभयतांनी केलेले कार्य जेवढे जमेल तेवढे करा. कष्टकरी समाजाचे पिळवणुकी विरहीत सच्चे स्वराज्य या देशात लवकर यावे. यासाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांना यथाशक्ती हातभार लावा. स्मशानभूमीकडे आलेल्या सर्व सज्जनांना हा अखेरचा निरोप सांगा.


तुमचा आण्णा— डी. एस. नार्वेकर

* *





REFBK-0024717



भ्रम आणि निरास

सोळा ते पंचवीस या वयात माणसाचे मन
श्रध्दावादी तरी बनते
किंवा बुध्दीवादी तरी बनते.
बहुतेक व्यक्ती तडजोडवादी वृत्ती स्वीकारतात.
म्हणून अंधश्रध्दांचा त्याग करण्यासाठी
अवश्यक तो प्रचार कॉलेजमधील
युवकयुवतींमध्येच प्रामुख्याने व्हावयास हवा.
क्षणोक्षणी मांत्रिकाकडे, गुरूकडे अथवा
देवाकडे धाव घेण्याची सवय लागली की
पुरुषार्थ निकालात निघतो, हे त्यांना समजले
पाहिजे किंवा समजावून सांगितले पाहिजे.
अंधश्रध्देचे भारताला लागलेले खग्रास ग्रहण
श्री. दाभोळकरांच्या प्रयत्नांनी जरी अंशतःच
सुटले तरी ते इष्टच ठरणार आहे. विज्ञानाचा
सूर्य माथ्यावर आलेला असताना अंधश्रध्देची
झापडे बांधून ठेचकाळत राहण्यात शहाणपण
ते काय ?

ना. ग. गोरे

राजहंस प्रकाशन/पुणे